# मुलखावेगळी माणसं

• संपादक •
डॉ. दत्ता पाटील
डॉ. सुभाष जाधव
डॉ. प्रभाकर पवार

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd.1962
NAAC ‘A++’ Grade

सी.बी.सी.एस. नुसार पुनर्रचित अभ्यासक्रम, जून २०२० पासून
बी. ए. भाग – तीन
विद्याशाखीय विशेष निवड
(अभ्यासपत्रिका क्र. १६, DSE - E130)

वाङ्मय प्रकाराचे अध्ययन : ललितगद्य (व्यक्तिचित्रे)

# मुलखावेगळी माणसं

संपादक
डॉ. दत्ता पाटील
डॉ. सुभाष जाधव
डॉ. प्रभाकर पवार

मुलखावेगळी माणसं : बी. ए. भाग – तीन, विद्याशाखीय विशेष निवड
(अभ्यासपत्रिका क्र. १६, DSE - E130)

प्रकाशक : डॉ. व्ही. डी. नांदवडेकर,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

ISBN : 978-93-85190-19-3

प्रती : १,५००

मुद्रक : श्री. भूषण पाटील,
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर – ४१६००४.

प्रथम आवृत्ती : जून, २०२०

मुखपृष्ठरचना : शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर

मूल्य : रु. ८५/–

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## मराठी अभ्यास मंडळ


१. **डॉ. दत्ता पाटील – अध्यक्ष,**
मराठी विभाग प्रमुख, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज.

२. **प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे – सदस्य,**
मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. **प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे – सदस्य,**
प्राचार्य, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

४. **डॉ. शहाजी पाटील – सदस्य,**
मराठी विभाग प्रमुख, पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगांव.

५. **डॉ. सुभाष जाधव – सदस्य,**
मराठी विभाग, श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी.

६. **डॉ. प्रभाकर पवार – सदस्य,**
मराठी विभाग प्रमुख, मुधोजी महाविद्यालय, फलटण.

७. **प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण – सदस्य,**
प्राचार्य, श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर.

८. **डॉ. अरुण शिंदे – सदस्य,**
मराठी विभाग प्रमुख, नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर.

९. **डॉ. उदय जाधव – सदस्य,**
मराठी विभाग प्रमुख, शहाजीराजे महाविद्यालय, खटाव.

१०. **प्रा. (डॉ.) दासू वैद्य – सदस्य,**
मराठी विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

११. **प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे – सदस्य,**
प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१२. **प्रा. (डॉ.) गोपाळ गावडे – सदस्य,**
मराठी विभाग प्रमुख, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

१३. **श्री. के. एस. अतकरे – सदस्य,**
कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| भूमिका | | डॉ. दत्ता पाटील | |
| प्रस्तावना | | डॉ. सोमनाथ कोमरपंत | |
| १. | रामा मैलकुली | व्यंकटेश माडगूळकर | १ |
| २. | मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी | प्र. के. अत्रे | १० |
| ३. | निळू मांग | अण्णाभाऊ साठे | २१ |
| ४. | मोरणी | विभावरी शिरूरकर | ३२ |
| ५. | जमीला जावद | हमीद दलवाई | ४० |
| ६. | यंकटअण्णा | व. वा. बोधे | ६२ |
| ७. | दगडूमामा | उत्तम कांबळे | ७२ |
| ८. | मुंबईचा चित्रकार | अरुण खोपकर | ८२ |
| ९. | हिरा | इंद्रजित भालेराव | ९४ |
| १०. | बाबा मास्तर | दि. बा. पाटील | १०३ |
| ११. | दादासाहेब वस्ताद | सयाजीराजे मोकाशी | ११२ |
| १२. | डोकेवाला संशोधक : दादाजी रामजी खोब्रागडे | व्ही. एन. शिंदे | ११९ |

# भूमिका...

मराठी वाङ्मयात व्यक्तिचित्र लेखनाला मोठी परंपरा आहे; पण इतर लेखनातील एक महत्त्वाचा उपप्रकार म्हणूनच व्यक्तिचित्रांचे स्थान आहे. व्यक्तिचित्रांना रेखाचित्र, शब्दचित्र, व्यक्तिपरलेख असे पर्यायी शब्द वापरले जातात. व्यक्तीच्या भावविश्वात शिरून त्याचे उदात्त व गंभीर भावदर्शन तेवढेच बहिरंगाचेही अचूक रेखाटन, नाट्यमयता आणि गद्यशैलीतील काटेकोर मांडणी ही व्यक्तिचित्र लेखनाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. अर्थात एखाद्या व्यक्तीच्या अंतर्बाह्य गुणांचे लेखकाला जाणवलेल्या सूक्ष्म निरीक्षणातून ललितगद्य लेखनाच्या आधारे मांडलेले चित्र म्हणजे व्यक्तिचित्र होय. यामध्ये 'मी' ला आलेले अनुभव व्यक्त होत असतात; पण 'मी' इतकेच सभोवतालचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय पर्यावरणातील विविध संदर्भ, तसेच स्थळ-काळ आणि समकालीन व्यक्तींचे संदर्भ व्यक्तिचित्रात येतात. त्यामुळे लघुकथा वाटणारा असा हा ललितगद्य लेखनातील महत्त्वाचा उपप्रकार होय. व्यक्तिचित्र लेखनासंदर्भातील ही कौशल्ये पदवी पातळीवरील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना कळावीत; तसेच वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील व्यक्तिचित्रांच्या आशयातून समाजभान यावे. या हेतूने प्रस्तुत ''मुलखावेगळी माणसं'' हा संपादित ग्रंथ बी.ए. भाग-३ मराठी, सत्र-६, अभ्यासपत्रिका क्रमांक सोळासाठी (XVI) जून, २०२० पासून सी. बी. सी. एस. नुसार पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी नेमला आहे.

प्रस्तुत ''मुलखावेगळी माणसं'' या संपादित ग्रंथात सुरुवातीला ललित गद्य संकल्पना, स्वरूप आणि ललित गद्याची वैशिष्ट्ये व वाटचाल तसेच व्यक्तिचित्र लेखनासाठी आवश्यक गुण या अनुषंगाने दीर्घ प्रस्तावना लेखन प्रा. डॉ. सोमनाथ कोमरपंत, गोवा यांनी केले आहे. या प्रस्तावनेत व्यक्तिचित्र लेखनासंदर्भातील तात्त्विक विवेचनासह अभ्यासक्रमात जी व्यक्तिचित्रे समाविष्ट केली आहेत त्या अनुषंगानेही केलेले समीक्षात्मक भाष्य विद्यार्थ्यांची ललित गद्य आणि व्यक्तिचित्र लेखनासंदर्भातील वाङ्मयीन अभिरुची प्रगल्भ करणारे आहे. कोरोनाकाळ असतानाही डॉ. कोमरपंतसरांनी आमच्या आग्रहाखातर आणि विद्यार्थ्यांविषयीच्या आत्मीय भावनेतून प्रस्तावनालेखन वेळेत करून दिले.

याबद्दल डॉ. कोमरपंत सरांचे मनःपूर्वक आभार. तसेच सदर ग्रंथ मुद्रणदृष्ट्या निर्दोष होण्यासाठी प्रा. नानासाहेब जामदार सरांचे सहकार्य खूप महत्त्वाचे आहे. या संपादित ग्रंथाची छपाई आणि मुखपृष्ठ रचना उत्तम रीतीने पूर्ण करण्यासाठी ज्यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले यामध्ये शिवाजी विद्यापीठ मुद्रणालयाचे अधीक्षक श्री. भूषण पाटील, अक्षरजुळणी करून देणारे श्री. सचिन नायकवडी, श्री. विशाल पाटील आणि मुद्रणालय विभागातील सर्व स्टाफ या सर्वांचेही मनःपूर्वक आभार मानतो. तसेच शिवाजी विद्यापीठातील अभ्यास मंडळे विभाग आणि मराठी अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य यांच्या सहकार्यामुळेच हा संपादित ग्रंथ सिद्ध झाला आहे. त्याबद्दल त्यांचेही नम्रपणे आभार मानतो.

प्रस्तुत ''मुलखावेगळी माणसं'' या व्यक्तिचित्रलेखन संग्रहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्यात समाजभान निर्माण होण्याबरोबर व्यक्तिचित्रलेखन कौशल्ये रुजावीत हाच अभ्यास मंडळाचा हेतू आहे; तो साध्य होईल ही अपेक्षा.

**डॉ. दत्ता पाटील,**
अध्यक्ष,
मराठी अभ्यास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## व्यक्तिचित्रांविषयी काही विचार

वाङ्मयाच्या सर्व प्रकारामध्ये निबंध हा गंभीर प्रकृतीचा मानला जातो. त्याच्या मांडणीची बैठक वैचारिक असते. अर्थात त्याचे माणसाच्या बौद्धिकतेला आवाहन असते. विचारांचे खंडनमंडन, तर्कशुद्ध विवेचन आणि विद्वत्ताप्रचुर शैली यांचा सुमेळ निबंधात साधला जातो. मानवी प्रज्ञेचे बुद्धी हेच केवळ केंद्र असू शकत नाही. माणसाच्या मनात बुद्धिजन्य व्यापाराबरोबर भावभावनांचा कल्लोळ असतो, संवेदनांचा प्रवाह असतो; संस्कृतिविकासाच्या प्रक्रियेत आजवर निबंध वाङ्मयाने प्रबोधनाचे फार मोठे कार्य केले आहे. पण तेवढ्याने काही भागत नाही. बुद्धिविकासाचे मापदंड कालौघात बदलत गेले. संस्कृतीच्या विकासक्रमात वाङ्मयात अभिरुचीला नवीन वळण मिळाले. मानवी मनाच्या सम्यक आकलनासाठी बौद्धिकक्षमता वाढविण्याऱ्या वाङ्मयाची निपज जशी महत्त्वाची ठरली; तशीच मनाचे क्षितिज रुंदावण्यासाठी अन्य घटकांचे तसेच अनुभूतींचे चित्रण होणे ही काळाची गरज ठरली. सोळाव्या शतकातील थोर फ्रेंच लेखक माँतेन हा वैचारिक निबंधाचा जनक मानला जातो. लॅटिन ग्रंथकार सेनेका आणि प्लुतार्क या दोघांच्या साहित्याच्या परिशीलनाने त्याला ही प्रेरणा मिळाली. माँतेनचे निबंधवाङ्मय केवळ फ्रान्समध्येच नव्हे तर अन्य युरोपियन देशात लोकप्रिय झाले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांची अधिसत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर उच्चविद्याविभूषित पिढीने पाश्चात्त्यांची निबंधशैली आत्मसात केली. महाराष्ट्रातील राष्ट्रकारण करणाऱ्या प्रज्ञावंतांनी तिचा अवलंब केला. येथील प्रबोधनयुगात निबंधवाङ्मयाचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. एवढेच नव्हे तर सृजनशील साहित्याचा मूलस्रोतदेखील तोच आहे. येथूनच आधुनिक वाङ्मयाच्या कालखंडास प्रारंभ झाला.

वैचारिक निबंधाप्रमाणेच लघुनिबंधाची मूळ भूमी फ्रान्स हीच होती. गुजेन गिनो या फ्रेंच लेखकाकडे त्याचे जनकत्व जाते. इंग्रजी साहित्य वगळता अन्य युरोपियन देशात त्याचा प्रसार झाला नाही. इंग्रजी साहित्याच्या परिशीलनामुळे आपल्याकडील लेखकांनी तो स्वीकारला. लोकप्रिय केला. लघुनिबंध हे जरी वैचारिक निबंधाचे भावंड असले तरी त्याचा प्रकृतिधर्म निराळा आहे. केवळ लघुत्व हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण नसून लालित्य हा त्याचा गाभा आहे.

त्यात पांडित्य प्रकटनाला वाव नसतो. आत्माविष्कार हा या वाङ्मयप्रकाराचा आत्मा. यातील अनुभूतिचित्रणात अट्टहास नसतो. असतो तो अनौपचारिकपणा. मित्रसंवादासारखे त्याचे स्वरूप असावे. पण या निवेदनात्मकतेत अघळपघळपणा नसतो. एकूणच त्याची संरचना-प्रारंभ, विस्तार आणि परिणामकारक शेवट सहज जुळून आलेला आहे असे वाचकाला वाटले पाहिजे. लेखकाने आपली योजकता, कल्पकता आणि भाषाशैली यांचा स्वरमेळ येथे साधलेला असतो. हा आविष्कार आल्हाददायी स्वरूपाचा असतो. अशा प्रकारचे लेखन करणाऱ्या लेखकांचे व्यक्तिमत्त्व निर्मितिपूर्व प्रक्रियेत साहित्य, संगीत, नाट्य, चित्रकला आणि जीवन समृद्ध करणाऱ्या कलांच्या समवायामुळे संपन्न झालेले असते. या दोन वाङ्मयप्रकारांचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर लघु-निबंध हा निबंधाचा उपप्रकार नसून तो पृथगात्म आणि सशक्त असा स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे हे ध्यानात येते.

प्रा. ना. सी. फडके 'रत्नाकर' मासिकातून 'गुजगोष्टी' या सदराखाली लेखन करू लागले. हा मराठीतील आधुनिक स्वरूपाच्या लघुनिबंधाचा प्रारंभ होय. या वाङ्मयप्रकाराच्या निमित्ताने प्रा. ना. सी. फडके यांनी जे विचार प्रकटन केले आहे ते मार्गदर्शक ठरावेः

''एखाद्या जलाशयाच्या काठावर बसून आपण एक लहानसा दगड त्यात टाकतो व मग जलपृष्ठावर उठणारे तरंग पाहत राहतो, तद्वत या आधुनिक निबंध प्रकारात, कोणत्याही विषयाच्या निमित्ताने लेखकाच्या अंतरंगात उठणाऱ्या विचार-विकार-तरंगाचे दर्शन व्हावे व त्या दर्शनापासून आल्हाद व्हावा एवढीच वाचकांची अपेक्षा असते. बोध अजिबात वर्ज्य असतो असे नव्हे; पण तो अभिप्रेत असलाच तरीसुद्धा फक्त ध्वनिरूपाने तो प्रकट व्हावयाचा असतो. स्वतः विषयी कलात्मक रीतीने दुसऱ्याला जे जे म्हणून सांगता येण्यासारखे असेल ते ते लेखकाने निबंधात लिहावे, अशी परवानगी आहे. इतकेच नव्हे तर लेखकाने हे आत्मकथन सौंदर्याचे नियम न मोडता जितके निःसंकोच असेल तितका त्याच्या निबंधाचा सरसपणा वाढेल. अर्थात आधुनिक निबंध हा पुष्कळ अंशी संभाषणाच्या स्वरूपाचा असून सुहृदयभाव हा त्याचा आत्मा होय.''

या लेखनप्रकारात ‘रचनेची खटपट’ असू नये असे म्हणण्याऐवजी रचनेची खटपट त्यात ‘दिसू’ नये असे म्हणणे सत्याला अधिक धरून होईल असे मला वाटते. असे मत प्रा. ना. सी. फडके यांनी व्यक्त केले आहे. या नव्या मळवाटेवरून वाटचाल करीत अनेक लघुनिबंधकारांनी हा वाङ्मयप्रकार मराठीत चांगलाच रुजविला. त्यात प्रा. अनंत काणेकर, वि. स. खांडेकर, वि. पां. दांडेकर, म. ना. अदवंत, ना. मा. संत, गो. रा. दोडके, भगवंत देशमुख, वि. ल. बर्वे यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

मित्राशी केलेले हितगूज, आटोपशीरपणा, संभाषणपरता, सोपी खेळकर विनोदी भाषा, आठवणी, चुटके, चलाख विनोद, आकर्षक चटकदार प्रारंभ, अनपेक्षित शेवट इत्यादी घटकांमुळे या वाङ्मयप्रकाराला लोकप्रियता, मिळाली असे प्रा. वि. शं. चौघुले यांनी अधोरेखित केले आहे.

१९४५ ते १९७५ या कालखंडात ललितगद्य म्हणून गणले गेलेले ललित निबंध लेखन विपुल प्रमाणात झाले. त्याची गुणात्मकता वाढली. त्यांत कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर, माधव आचवल, ग्रेस, श्रीनिवास विनायक कुलकर्णी या अनुभवसंपन्न आणि सव्यसाची साहित्यिकांचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. यातील प्रत्येक लेखक– लेखिकेचे व्यक्तिमत्त्व भिन्न स्वरूपाचे; अर्थात या व्यक्तिमत्त्वाची निराळी मिती लाभल्यामुळे सशक्त जीवनानुभूतीचा प्रत्यय या लेखनातून येतो. मधु मंगेश कर्णिक, आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर हे या क्षेत्रातील नामवंत लेखक आहेत. विजया राजाध्यक्ष, शांता शेळके, सरोजिनी वैद्य, वासंती मुझुमदार, इंदिरा संत, पद्मजा फाटक, सुरेश मथुरे, मधुकर केचे, महेश एलकुंचवार आणि अनंतराव पाटील यांच्या लेखनामुळे त्याला ललित गद्य तसेच मुक्त गद्यांचे स्वरूप, प्राप्त झालेले आहे. ही वाट अद्ययावत करण्याचे सृजनात्मक कार्य अनिल अवचट, अरुणा ढेरे, द. ता. भोसले आणि इंद्रजित भालेराव यांच्याकडून घडत आहे.

जुन्या पिढीतील काकासाहेब कालेलकर, वि. द. घाटे, रा. भि. जोशी इत्यादी साहित्यिकांचे प्रसन्न शैलीतील ललित निबंधात्मक लेखन आनंदाचा प्रत्यय आणून देणारे आहे.

प्रा. मा. ना. आचार्य यांनी आपल्या ‘अनुषंग’ या पुस्तकात ‘वाङ्मय प्रकाराच्या मुक्ततेची कहाणी’ आणि प्रा. वि. शं. चौघुले यांनी ‘लघुनिबंध ते मुक्तगद्य’ या पुस्तकात आपल्या प्रदीर्घ प्रस्तावनेमधून या वाङ्मयप्रकाराचा अभ्यासपूर्ण वेध घेतलेला आहे. ‘लघुनिबंध’, ‘ललितनिबंध’, ‘ललित गद्य’, ‘ललित लेख’ आणि ‘मुक्तगद्य’ या संज्ञांनी तो प्रकार ओळखला जाऊ लागला. त्याच्या बहिरंगात अनेक स्थित्यंतरे होत गेली तरी त्यातील आत्मप्रकटीकरणाचा गाभा कायम राहिला. शांताबाई शेळके यांनी या वाङ्मयप्रकाराचा मागोवा घेताना प्रवासवर्णन, शब्दचित्र, व्यक्तिचित्र, विनोदी लेख, वृत्तपत्रीय स्तंभलेखन यामुळे साहित्य–कला–संस्कृती–राजकारण इत्यादी घटकांना आपल्या अनुभूतिविश्वाच्या कवेत घेतल्याचे नमूद केले आहे. मराठीतील आत्मनिष्ठ निबंधाच्या वाटचालीचे पर्यालोचन केल्यानंतर काही महत्त्वाची वैशिष्ट्ये अधोरेखित करावीशी वाटतात. ‘बहुरूपी निबंध’ या संपादित ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले गेले आहे. ‘‘लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार हे ललित निबंधाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. लेखकाचा भावानुभव व विचारानुभव यांचा लालित्यपूर्ण हसतखेळत केलेला हा आविष्कार असतो. साहजिकच लेखकाचे व्यक्तिमत्त्व जितके प्रसन्न व समृद्ध तितका लघुनिबंध रंगत जातो. लेखकाच्या व्यक्तिगत आवडीनिवडी, अभिरुची, स्वभाव, मनःस्थिती आणि जीवनविषयक दृष्टिकोन या सर्वांचे प्रतिबिंब लघुनिबंधात पडत असल्यामुळे लेखकाचे व्यक्तिमत्त्व त्यात स्पष्ट दिसते. लघुनिबंधात मनाचा अनिर्बंध संचार असला तरी त्यात एक कलात्मक संगती असते.’’ (बहुरूपी निबंध : संपा. श्री. ना. बनहट्टी व म. ना. अदवंत/ प्रस्तावना)

एखादा वाङ्मय प्रकार अनेक लेखक जेव्हा हाताळतात, तेव्हा त्याच्या लोकप्रियतेमुळे म्हणा किंवा यशामुळे म्हणा त्याचे तंत्रबद्ध साचे तयार होतात. वर्णनशैलीला सांकेतिकता येते. त्यातील जीवनदर्शनातील चैतन्य लोप पावते. लघुनिबंधातील आणि नंतरच्या ललित निबंधातील जिवंतपणा यामुळे हरवला गेला. अभिव्यक्ती सौंदर्याच्या अतिरिक्त हव्यासापायी आणि लालित्यपूर्ण शैलीच्या अनुकरणप्रियतेमुळे हा वाङ्मयप्रकार निष्प्रभ होत चालला. अशा वेळी तो अधिक आशयनिष्ठ व्हावा म्हणून काही लेखकांनी बुद्धिपुरस्सर प्रयत्न केले. जुन्या पिढीतील रसरशीत व्यक्तिचित्र लिहिणाऱ्या वि. द. घाटे या समर्थ साहित्यिकाची

येथे आठवण होते. 'काही म्हातारे आणि एक म्हातारी' व 'पांढरे केस....हिरवी मने' मधील व्यक्तिचित्रे गतकाळाचा समृद्ध पट उलगडून दाखविणारी आहेत. ती वास्तवाधिष्ठित आहेत. या संदर्भात आणखी एक नाव आवर्जून घ्यावे लागेल ते म्हणजे रघुवीर सामंत यांचे. त्यांचा १९३२ मध्ये 'हृदय' हा व्यक्तिचित्रांचा संग्रह प्रसिद्ध झाला. कुमार रघुवीर या टोपणनावाने त्यांनी लेखन केले. हा महत्त्वाचा टप्पा होय. कारण त्यांनी शब्दचित्रे, स्वभावचित्रे अशी भेदरेषा स्पष्ट करून आपले लेखन केले. 'सुभान्या', 'भंगीण', 'व्हिक्टोरियावाला', 'अप्पांची बैलांची जोडी,' ही 'हृदय' या संग्रहातील शब्दचित्रे त्याचप्रमाणे 'न्यायदेवता', 'स्थितप्रज्ञ', 'टळलेला अपघात', 'माणसातला मी', व 'ओळखी अनोळखी' इत्यादी शब्दचित्रे व स्वभावचित्रे उल्लेखनीय आहेत. रघुवीर सामंतांच्या या लेखनाचे संपादन प्रा. वि. शं. चौघुले यांनी केले आहे. त्यांच्या विवेचक प्रस्तावनेमधून रघुवीर सामंतांच्या शब्दचित्रांची आणि स्वभावचित्रांची गुणवैशिष्ट्ये दृग्गोचर होतात. वास्तवावर आधारलेली व्यक्तिचित्रे रंगविण्याचा नवा मनू त्यांनी निर्माण केला. त्याच्यामागे विशिष्ट जीवनदृष्टी होती. प्रयोगशीलता होती.

१९४५ च्या दरम्यान मराठी कथा आपले रूप पालटू लागली. या कथेत कथानकापेक्षाही त्यातील माणसांचा शोध हा तिचा केंद्रबिंदू ठरला. त्यामुळे तिच्यातील व्यक्तिचित्रणाला महत्त्व प्राप्त झाले. या कथेमधून जीवनाचे अधिक वास्तव, सूक्ष्म व विविध पातळ्यांवरून चित्रण होऊ लागले. मनोविश्लेषणाच्या नव्या स्वरूपाचे दर्शन ही कथा घडवू लागली. या कालखंडातील महत्त्वाच्या कथाकारांनी आत्मभान आणि समाजभान ठेवून अशा प्रकारची स्वभावचित्रे आपल्या कथेतून रेखाटली. कल्पनाविलास आणि काव्यात्मकता टाळून माणसांच्या जगाचा आणि मनोविश्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न व्हायला लागला. 'माणूस' या नावाने कथालेखन करणाऱ्या अंबादास अग्निहोत्री यांनी प्रामुख्याने आपल्या कथांमधून मध्यमवर्गीयांचे विश्व रंगविले आहे. मानवाच्या विविध भावभावना, त्यामधील विसंगती आणि त्यांच्या जीवनातील विविध संघर्ष यांचे चित्रण त्यांनी सूक्ष्मतेने आणि कलात्मकतेने केले आहे.

ललित निबंधातील स्वभावचित्रांचा विचार करताना अग्निहोत्री यांच्या व्यक्तिचित्रणाचा उल्लेख एवढ्यासाठी केला की त्यांनी माणसांच्या कथा

लिहिल्या. मध्यमर्गीय जीवनाचे ते कुशल भाष्यकार होते. अशा विविध वाटांवरून मराठीतील व्यक्तिचित्रांचा प्रवास सुरू झाला. व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसे' या कथात्म साहित्यातून जी व्यक्तिचित्रे रंगविली आणि ग्रामीण जीवनविश्व उभे केले अशा प्रकारच्या आदिप्रेरणांतूनच.

साधारणतः १९३० पासून आजमितीला ललित निबंधाचा जो विविधांगी विकास झाला. त्याची कारणे अनेक आहेत. विसाव्या शतकातील विचारप्रवाह त्याला अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरले आहेत. हे शतक प्रामुख्याने व्यक्तिवादाच्या उदयाचे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे होते. जॉन स्टुअर्ट मिल यांच्या 'ऑन लिबर्टी' या ग्रंथाचा तत्कालीन सुशिक्षित पिढीवर फार मोठा प्रभाव होता. आत्मपरिपोषासाठी आणि आत्मप्रकटीकरणाची धडपड या शतकातील माणसांमध्ये दिसते. वाढत्या शिक्षणाच्या प्रसारामुळे येथील माणसांच्या आशा-आकांक्षा पल्लवित झाल्या होत्या. राजकीय पारतंत्र्यामुळे व्यक्तिमनांचा संकोच झाला होता. ती मुक्त होऊ पाहत होती. प्रागतिक विचारांचे नवे युग आंतरराष्ट्रीय क्षितिजावर निर्माण झाले. मार्क्सवाद, फ्रॉईड-युंगवाद, गांधीवाद आणि नवमतवाद या विचारसरणीच्या प्रभावामुळे समाजमंथनाची प्रक्रिया सुरू झाली. माणसे लिहायला प्रवृत्त झाली. व्यक्त होऊ लागली. अनेक वाङ्मयप्रकार हाताळणाऱ्या समर्थ लेखकांनी ललित निबंधाचे माध्यम स्वीकारले. अनंत काणेकरांसारखे दीर्घकाळ आणि सातत्याने लघुनिबंध लिहिणारे लेखक विरळच. त्यांनीदेखील कविता, एकांकिका, प्रवासवर्णन इत्यादी वाङ्मयप्रकार हाताळले होते. ललित निबंधकारांनी आपले लेखनक्षेत्र हे आनंदाचे बेट मानून कोणत्याही राजकीय प्रणालीचे वा विचारसरणीचे वाहक होऊ दिले नाही हे विशेष. त्यांनी मुक्त अभिव्यक्तीला प्राधान्य दिले. तेच या वाङ्मयप्रकाराचे एक व्यवच्छेदक लक्षण.

ललित निबंध लिहीत असताना व्यक्तिचित्रे लिहिण्याची प्रथा वाढत्या प्रमाणात सुरू झाली ती माणूस शोधण्याच्या आदिप्रेरणेतून. गतिमान काळात संवेदनशील लेखकांना सतत कल्पनाविश्वात वावरणे आवडेनासे झाले. शब्दांचा विलास निर्माण करून त्यात विहार करणे त्यांना अपराधीपणाचे वाटू लागले. 'स्व' चे केंद्र न सोडता त्यांनी आपली सहानुभूती व्यापक केली. जाणिवा सखोल केल्या. माणसाबरोबर, त्याच्या स्वभावातील सुष्ट-दुष्ट कंगोऱ्यांबरोबरच

मनुष्यत्वाचा त्यांनी शोध घेतला. आत्माविष्कार करणारा लेखक जितका संवेदनशील आणि समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा तितके विविधांगी त्याने घडविलेले अनुभूतिदर्शन उत्कट, तरल आणि प्रगल्भ स्वरूपाचे. माणूस अधांतरी राहू शकत नाही. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश यांच्याशी तो निगडित असतो. माणसाचे यांच्याशी असणारे भावानुबंध उलगडून दाखविणारे ललित लेखन दुर्गाबाई भागवत (ऋतुचक्र) आणि श्रीनिवास विनायक कुलकर्णी (डोह) यानी केले. 'डोह' मधील प्राणिजीवन आणि पक्षिजीवन तसेच अन्य जलचर यांचे जीवन यांनी प्रत्ययकारी शब्दांत चित्रित केले आहे. दुर्गाबाईंनी सृष्टीच्या लावण्यरूपाचा प्रसन्न शैलीत वेध घेतला. मारुती चितमपल्लींनी अरण्यवाचन हा आपल्या कुतूहलाचा विषय बनवून आजवर अलक्षित राहिलेल्या संपन्न क्षितिजाचे दर्शन घडविले. ते आत्मजाणिवेच्या प्रेरणेतूनच. निसर्गाच्या रौद्र रूपाचा आणि प्रसन्न रूपाचा शोध ललित निबंधाच्या माध्यमातून घेतला गेला.

ललित निबंधातील एका सशक्त अशा व्यक्तिचित्रात्मक प्रकाराकडे येथे आवर्जून लक्ष वेधावेसे वाटते. या प्रसंगी श्री. ना. पेंडसे यांनी 'रथचक्र' या आपल्या कादंबरीच्या प्रारंभी प्रकट केलेले चिंतन अधोरेखित करावेसे वाटते.

''आशय म्हणजे प्रतिसृष्टी असते. प्रत्यक्ष सृष्टीप्रमाणेच ह्या ठिकाणीही पवित्र आणि ओंगळ, मंगल आणि अमंगल एकमेकांत गुरफटलेली असतात. शक्य असेल तेवढ्या परिणामांनी जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. ह्या जीवनाचा त्याला कप्प्यांमध्ये विचार करता येत नाही; कारण ज्या प्रत्यक्ष जीवनामुळे त्याला हे नवं जग दिसतं ते कप्प्यांचं बनलेलं नसतं. ह्या जीवनदर्शनाच्या केंद्रस्थानी असलेला माणूस साकार करण्याचा प्रयत्न लेखक करत असतो. हा माणूस अनादिकालापासून लेखकाला आव्हान देत आला आहे. केवढंही चिंतन केलं तरी तो संपूर्ण समजू शकत नाही. माणसाचं मन हा तळ नसलेला डोह आहे. त्याचं संशोधन हा कधी न संपणारा उद्योग आहे. हजारो वर्षे लिहूनही हा विषय संपत नाही तो ह्यामुळं...''

महाभारतासारख्या श्रेष्ठ साहित्यकृतीचा शोध संशोधनात्मक अंगाने, व्यक्तिचित्रणात्मक अंगाने आणि सम्यक चिंतनाच्या अंगाने घेतला गेला. दुर्गाबाई

भागवत (व्यासपर्व), डॉ. इरावती कर्वे ('युगान्त'), आनंद साधले ('हा जय नावाचा इतिहास आहे.') शं. के. पेंडसे (महाभारतातील व्यक्तिदर्शन) आणि डॉ. रा. शं. वाळिंबे ('सीमावृक्ष') या दृष्टीने उल्लेखनीय साहित्यकृती होत. त्यातही पुन्हा दुर्गाबाई भागवत यांच्या 'व्यासपर्व' ला आणि डॉ. इरावती कर्वे यांच्या 'युगान्त' ला संशोधन, चिंतन याबरोबरच लालित्याची डूब मिळालेली आहे.

मराठी साहित्यातील व्यक्तिचित्रे जशी असामान्य व्यक्तींविषयी आहेत, तशीच ती सामान्य व्यक्तींची असतात. मागच्या कालखंडात प्रा. ना. सी. फडके, आचार्य प्र. के. अत्रे, वि. स. खांडेकर आणि ग. त्र्यं. माडखोलकर यांनी साहित्य, नाट्यकला, संगीत आणि अन्य कला या क्षेत्रातील नामवंताची व्यक्तिचित्रे लिहिली. केशवराव भोळे यांनी संगीत, नाट्य आणि चित्रपट या व्यवसायातील श्रेष्ठ असामींविषयी लिहिले. प्रा. रा. भि. जोशी यांनी 'सोन्याचा उंबरठा'मधून गतकाळातील समृद्ध व्यक्तिमत्त्वांचे दर्शन प्रसन्न शैलीतून घडविले. प्रा. शरच्चंद्र चिरमुले यांनी आपल्या आयुष्यात आलेल्या आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देणाऱ्या व्यक्तींविषयी 'वास्तुपुरुष' या पुस्तकातून लिहिले. पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेली 'गणगोत' आणि 'गुण गाईन आवडी' ही पुस्तके म्हणजे जीवनाच्या विविध क्षेत्रांतील माणसांची तशीच अभिरुचिसंपन्न माणसांच्या सहवासातील रंगलेली मैफलच आहे. 'व्यक्ती आणि वल्ली' मधील व्यक्तिरेखांचे चित्रण त्यांनी विनोदी ढंगाने केलेले असले तरी मानवी स्वभावाचे त्यांनी जे नमुने पेश केलेले आहेत. त्याला तोड नाही. त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, मानवी स्वभावाच्या छटा रंगवणारी त्यांची शैली आणि मराठी भाषेवरील त्यांचे असामान्य प्रभुत्व या गुणांचा येथे प्रत्यय येतो.

प्राचार्य राम शेवाळकर यांनाही पु. ल. देशपांडे यांच्याप्रमाणे गुणिजनांचा सहवास लाभला. सकारात्मक अनुभूती हा शेवाळकरांच्या प्रतिभेचा गुणधर्म विधायकतेचा मार्ग पत्करून ज्यांनी ज्यांनी आपले जीवन सार्थ केले त्यांची व्यक्तिचित्रे त्यांनी रंगविली. त्यात सामाजिक कृतज्ञतेची भावना आहे. जीवनातील चांगुलपणाची पूजा त्यांनी बांधलेली आहे. 'वाळ्याचा मळा', 'स्नेहगोत्री' आणि 'माणिकाच्या वाती' या व्यक्तिचित्रात्मक पुस्तकांतून पूर्वसूरींविषयींचे आणि समकालीन व्यक्तीविषयींचे त्यांनी चित्रण केले आहे. यातून त्यांच्या

श्रद्धास्थानांवर प्रकाश पडतो. ज्या समकालीनांविषयी त्यांनी लिहिले त्यातून परस्पर साहचर्याच्या आणि सौहार्दाच्या खाणाखुणा आढळतात. या सर्व व्यक्तिरेखा त्यांच्या अंगप्रत्यंगासह उभ्या राहतात. या व्यक्तिरेखाटनातून लेखकाच्या जडणघडणीचा आलेख उभा राहतो. यातील सगळ्याच व्यक्तिरेखा असामान्य आहेत असे नाही. काही व्यक्ती अलक्षित आहेत. पण जीवनाच्या विविध क्षेत्रांत अनिरुद्ध संचार करीत असताना आपल्या सहवासात आलेल्या व्यक्तींविषयी शेवाळकरांनी आत्मीयतेने केलेले हे लालित्यपूर्ण लेखन आहे. त्यांच्या प्रज्ञेच्या आणि प्रतिभेच्या आलोकात असामान्य व्यक्तिजीवनातील अज्ञात कोपरे उजळून निघतात; त्याचप्रमाणे सामान्यांमधील असामान्यत्वही ते टिपतात. ही सारी किमया आहे ती व्युत्पन्नता, सहृदयता, रसिकता आणि शब्दप्रभुत्व असलेल्या प्राचार्य राम शेवाळकर या संपन्न व्यक्तिमत्त्वाची! त्यांच्या लेखनाचा विशेष गुण म्हणजे ते कुणाचाही अकारण गौरव करीत नाही. निःपक्षपातीपणा आणि स्पष्टवक्तेपणा त्यांच्या निवेदनात्मकतेत आढळून येतो. 'भाऊसाहेब' या दीर्घ लेखात पासष्ट वर्षे निरंतर कीर्तनसाधना करणाऱ्या आपल्या वडिलांविषयी समरसून लिहिले आहे. त्याचप्रमाणे वैचारिकता आणि कृतिशीलता यांचे संगमतीर्थ असलेल्या बाबा आमटे यांच्या व्यक्तिमत्त्वावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. 'करपलेला झंझावात' या लेखात ख्यातनाम कवी आणि गझलकार सुरेश भट यांच्या प्रतिभाधर्माची वैशिष्ट्ये त्यांनी टिपलेली आहेत पण त्याचबरोबर ''वैपुल्याच्या तालावरच त्यांचे मन झुलत राहिले आणि बिचाऱ्या जाईच्या पाकळ्या डुलल्या, दवबिंदूंच्या अभावी उपाशीच राहिल्या.'' या त्यांच्या मर्यादांचाही उल्लेख केलेला आहे. त्यांच्या व्यक्तिचित्रणदर्शनामागे त्यांची निश्चित अशी धारणा आहे. ते म्हणतात, ''गुणांचे आधिक्य वाढविण्याच्या साधनेमुळे महापुरुष उदयास येतात तर दोष उगाळत बसण्याच्या व्यसनामुळे दुर्जनांची आणि निष्क्रियांची संख्या वाढते.'' शिवाय ''सद्गुणांचा स्फुल्लिंग फुंकरीने फुलवता आला तर दोषांच्या प्रभावाला व विस्ताराला काहीसा आळा बसू शकेल.'' असे त्यांना वाटते. या त्यांच्या निवेदनातून व्यक्तिचित्रणाचा निकष अधोरेखित होतो.

मधु मंगेश कर्णिक यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यातून कोकणच्या परिसराचे चित्रण तन्मयतेने केले. माती आणि माणूस यांमधील दृढ अनुबंध अधोरेखित

करणे हे त्यांचे लेखन वैशिष्ट्य. तेथील निसर्गाची स्पंदने, माणसांचे वृत्तिविशेष आणि सांस्कृतिक संचितांचा ओलावा त्यांनी टिपला. तीच गुणवैशिष्ट्ये घेऊन त्यांनी केलेले ललितनिबंधलेखन हे मातीविषयीच्या जिव्हाळ्याचे प्रतीक आहे. तेथील निसर्गाची साथसंगत त्यांना लाभली ती त्यांनी 'सोबत'या ललित गद्यामधून चिरबद्ध करून ठेवलेली आहे. व्यापक प्रदेशाची स्मरणचित्रे 'नैर्ऋत्येकडला वारा','माझा गाव माझा मुलूख'व 'मातीचा वास' यासारख्या पुस्तकांतून समृद्ध अनुभवविश्वाच्या आधारे लिहिली. शासकीय सेवेच्या निमित्ताने काही काळ गोव्यात वास्तव्य असल्यामुळे आणि तेथील भूमीत त्यांच्या लेखनाला बहर आल्यामुळे 'जिवाभावाचा गोवा' त्यांनी समरतेने रंगविला. या लेखनाबरोबरच आपल्या कुटुंबातील जिव्हाळ्याच्या माणसांविषयी त्यांनी लिहिलेले 'लागेबांधे' हे व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक संस्मरणीय ठरले आहे. आई, वडील, भावंडे, घर आणि गाव या गोतावळ्यासंबंधीची हृद्य संस्मरणे कर्णिकांनी या पुस्तकात लिहिली आहेत. 'अबीर गुलाल' आणि 'स्मृतिजागर' या दोन व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकांतून आपल्या दीर्घ जीवनप्रवासात भेटलेल्या सुहृदांची विलोभनीय मैफल जमवून आणलेली आहे. ही माणसे केवळ साहित्य क्षेत्रातील नसून जीवनाच्या विविध क्षेत्रांतील आहेत. ती समृद्ध जीवन जगलेली आहेत. त्यांच्याविषयीचा अपार जिव्हाळा कर्णिकांनी येथे प्रकट केला आहे.

प्रख्यात नाटककार वसंतराव कानेटकर यांनी 'मी माझ्याशी' हे आत्मकथनात्मक पुस्तक लिहिले. ललितनिबंधलेखन हे त्यांचे खास क्षेत्र नव्हे तरीदेखील कानेटकरांनी आई, वडील आणि निकटवर्तियांची रेखाटलेली स्वभावचित्रे संस्मरणीय झालेली आहेत.

रवींद्र पिंगे यांनी ललित निबंधाच्या क्षेत्रात पृथगात्म शैलीमुळे विलोभनीय भावविश्व निर्माण केले. ते पुस्तकांच्या जगात रमतात, स्थलवर्णनात रमतात; तसेच श्रेष्ठ, मनस्वी व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात रमतात. त्यांनी लिहिलेली व्यक्तिचित्रे अविस्मरणीय स्वरूपाची झालेली आहेत. १९५५ साली 'मौज' साप्ताहिकात युसुफ मेहेरअल्लींची व्यक्तिरेखा सुरुवातीला लिहिली. 'शतपावली', 'देवाघरचा पाऊस', 'दिवे-लामणदिवे' आणि 'अंगणातले चांदणे' या चार संग्रहात साठ व्यक्तिचित्रणात्मक लेख पिंगे यांनी लिहिले. व्यक्तिचित्रणात्मक

तसेच प्रवासवर्णनात्मक लेखनात ते अधिक रमतात. 'पु. ल. प्रखर प्रज्ञाविलास' 'कुमारगंधर्वांचे शांत, तृप्त जग', 'बालगंधर्वांचा चंद्रास्त', 'डी. जी. : एक अवलिया', 'अमृता प्रीतम : निरंतर साहित्यसेवेचा कित्ता', 'धर्मानंद कोसंबी', 'जाईजुईची ताजी ताजी फुलं– आरती प्रभूंच्या ओंजळीतली', 'पोएट बोरकरांच्या अंगणातलं चांदणं', 'ज्ञानमातेला दंडवत', 'सॉमरसेट मॉम', 'अज्ञात हेमिंग्वे', 'पर्ल बक', आणि 'नानासाहेब गोरे सुकाणूवर होते' ही व्यक्तिचित्रे वाचल्यानंतर रवींद्र पिंगे यांच्या अनुभवसंपन्न आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्वाचेही दर्शन घडते. वाङ्मयीन विश्वाशी समरस झालेला हा लेखक आहे. त्याला स्थल–काल–प्रदेश यांच्या मर्यादा मान्य नाहीत. साहित्याबरोबर नाटक, संगीत या कलांवर निस्सीम प्रेम करणारा रसिकाग्रणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामावलेला आहे याची प्रचिती येथे येते. या लेखकाने पुस्तकांचे जग हे आपले मानले पुस्तकांवर उदंड प्रेम केले. पुस्तकांत माणसे असतात; त्या माणसांवर लिहिले. प्रज्ञावंतांविषयी आणि प्रतिभावंतांविषयी गुणगौरवार्थ लिहिले. डॉ. रा.चिं. ढेरे यांच्या 'विराग आणि अनुराग' मधील रवींद्रनाथ आणि खलील जिब्रान यांची व्यक्तिचित्रे त्यांचे वाङ्मय विशेष अधोरेखित करतात. डॉ. अनिल अवचटांनी विपुल प्रमाणात ललित निबंध आणि ललित गद्य लिहिले. ते स्वतःला सामाजिक कार्यकर्ते मानतात. त्यांच्या लेखनाला त्याच्या समाजमनस्क वृत्तीची जोड मिळालेली आहे. त्यांनी सामाजिक चळवळीच्या अंगाने लिहिले. त्या चळवळीस समर्पित भावनेने वाहून घेतलेल्या हमीद दलवाई या बिनीच्या कार्यकर्त्यांचे चरित्र लिहिले. समाजातील आर्थिक शोषण, विषमता, अंधश्रद्धा आणि स्त्रियांना मिळालेली अन्यायाची वागणूक यांविरुद्ध आपली लेखणी परजली. वैचारिकता त्यांच्या लेखनात शिगोशिग भरलेली होती. वाचकांच्या दृष्टीने हा सारा अंतर्मुखतेचा प्रवास आहे. या लेखनाशिवाय त्यांनी प्रसन्न स्वरूपाचे ललित गद्य लिहिले. ते निखळ आनंद देणारे आहे. त्यात सहजतेने प्रकट झालेले लालित्य आहे. त्यांची शैली निरलंकृत आहे. 'जगण्यातील काही' या त्यांच्या संस्मरणात्मक पुस्तकातील 'गुरुजी' हे व्यंगचित्र संस्मरणीय आहे.

डॉ. अनिल अवचट यांची 'शिकविले ज्यांनी', 'जिवाभावाचे' आणि 'कार्यरत' ही महत्त्वाची व्यक्तिचित्रात्मक पुस्तके आहेत. त्यांच्या अन्य पुस्तकात

घटना आणि प्रसंग यांच्या अनुषंगाने विविध प्रवृत्तींच्या व्यक्ती आलेल्या आहेत. व्यक्तिजीवनातील रसरशीतपणा, चैतन्य आणि कंगोरे या दृष्टीने ही व्यक्तिचित्रे उत्तम दर्जाची झालेली आहेत. व्यक्तिदर्शनाचा आदर्शच डॉ. अनिल अवचट यांनी निर्माण केला आहे. प्रांजळता आणि पारदर्शित्व हे त्यांच्या शैलीचे गुणधर्म त्यांच्या सर्वच व्यक्तिचित्रांत दिसतात. या दृष्टीने 'शिकविले ज्यांनी' या पुस्तकातील 'करमरकर, मी आणि खडक', 'महाजन सर, झाडं आणि मी', 'मी, धोंडे सर आणि शेती', 'थोरोचे विश्व', 'भेटत गेलेले गांधीजी', 'मनातले जोतीराव', 'रेगे सर', 'बेडेकर आणि मी', 'श्री पु.', 'तेंडुलकर', 'पु. लं. चं घर' आणि 'घडवणारे काही', ही व्यक्तिचित्रे न्याहाळावीत. ती कायमची मनात घर करून बसतात. आत्मभानातून घडलेले हे ललित लेखन आहे. यात कथन केलेल्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पापुद्रे तर डॉ. अवचट यांनी बारकाईने उलगडून दाखवले आहेतच. शिवाय त्यांच्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार कसा प्राप्त झाला आहे हे ही सांगितले आहे. त्यामुळे आपापतः आत्मकथनात्मक ललितनिबंधाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. यातील 'स्व' चा केंद्रबिंदू त्यांनी ढळू दिला नाही. या लेखनाची प्रेरणा आत्माविष्काराची आहे हे त्यातून अधोरेखित होते. डॉ. अवचटांच्या व्यक्तिमत्त्वाला आत्मपरिपोषाची आणि अभिरुचिसपंन्नतेची मिती मिळाली ती या सगळ्या व्यक्तींमुळे कधी प्रत्यक्ष वा कधी अप्रत्यक्ष कृतज्ञतेचा भाव या लेखनात भरून राहिलेला आहे. भावविवशतेचा सूर मात्र या निवेदनशैलीला त्यांनी येऊ दिलेला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बुद्धिप्रामाण्यवादाची धार आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा मनःपिंड या गुणांचे सर्वत्र दर्शन घडते.

'जिवाभावाचे' या व्यक्तिचित्रात्मक पुस्तकात डॉ. अवचट यांनी आपली आई, वडील, आजी, पत्नी, दोन्ही मुली, समाजकार्यातील निकटचे साथीदार, ज्यांच्यामुळे समृद्ध साहित्यसहवास लाभला आणि अभिरुची संपन्न झाली. अशा स्नेहपरिवाराविषयी अत्यंत जिव्हाळ्याने लिहिले आहे. एक महत्त्वाचे अंतःसूत्र म्हणजे या सर्वांनी डॉ. अवचटांना जीवभाव लावला. त्यांच्यामुळे त्यांचे जीवन परिपूर्ण आणि सुंदर झाले. या दृष्टीने 'सुनंदाला आठवताना', 'वडील आठवले ते', 'इंदूताईची गोष्ट', 'आजीयुग', 'दोघी मुली', 'माझा आनंदा!', 'उमा-विरूपाक्षांशी स्नेहबंध', 'सदाशिव', 'माधव-चित्रा', 'अरुणची सोबत', 'नरेंद्र

गेला.', 'कमलताई', 'किशोरीताई', 'प्रमोद', 'शाम' आणि 'रायकरांचे ऋण', ही सारीच व्यक्तिचित्रे लेखकाच्या हृदयस्थ भावनांचे पारदर्शी दर्शन घडवितात. यांत उत्कट जीवनदर्शन आहे; तशीच सहजतेने प्राप्त झालेली कलात्मकता आहे. भाषेला येथे कुठेही सजवावे, लागलेले नाही.

'कार्यरत' या पुस्तकात समकालीन आत्मकेंद्रित जगात वावरताना समाजमनस्क वृत्तीने जीवनाच्या वेगळ्या वाटा चोखाळणाऱ्या व्यक्ती डॉ. अवचट यांनी रेखाटल्या आहेत. काळ्या ढगाच्या या रुपेरी कडा आहेत असे मानायला हवे. यात प्रतिकूल परिस्थितीत अभंग जिद्दीने वावरणाऱ्या, कातकरी पाड्यात साक्षरतेचा प्रसार करणाऱ्या सुरेखा दळवी आहेत. तेवढ्यापुरते त्यांचे कार्य मर्यादित नाही. तेथील अनेक समस्यांना त्या भिडतात. विंचूदंशावर इलाज शोधणाऱ्या डॉ. हिम्मतराव बावस्करांचे व्यक्तिचित्र डॉ. अवचटांनी येथे रेखाटले आहे. तुंगभद्रा नदीच्या पर्यावरणाच्या नाशाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या एस. आर. हिरेमठांच्या धडपडीचे चित्र लेखकाने उभे केले आहे. दुष्काळी क्षेत्रात विधायक कार्य करणारे काका चव्हाण आणि अरुण देशपांडे येथे दिसतात. डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग या डॉक्टर दांपत्याने गडचिरोलीच्या सर्वतोपरी अभावग्रस्त भागात राहून आदिवासी लोकांच्या व्यसनमुक्तीचा ध्यास घेतला आहे. त्यांच्या समर्पित सेवेचा वेध डॉ. अवचट यांनी 'शोध आरोग्याचा' या लेखात घेतला आहे.

लालित्यपूर्ण लेखनातून वैचारिकता अशी आणता येते आणि वाचकाला अंतर्मुख करता येते याचा उत्तम नमुना म्हणजे डॉ. अवचट यांची प्रदीर्घ स्वरूपाची व्यक्तिचित्रे समाजाभिमुखता आणि कलात्मकता यांचा समतोल राखणारी व्यक्तिचित्रे लिहून या रचनाबंधाचा नवा आदर्श डॉ. अनिल अवचटांनी निर्माण केला आहे असे निःसंदिग्धपणे म्हणता येईल.

मारुती चितमपल्ली यांनी मराठी साहित्यक्षेत्रात वनविद्या आणि अरण्यवाचन यांच्या माध्यमातून वेगळ्या वाटा चोखाळल्या. तज्ज्ञ व्यक्तींचे बोट धरून ते वनविद्येकडे वळले. अरण्यवाटा शोधू लागले. प्राणिसृष्टी व पक्षिसृष्टी यांचा धांडोळा घेऊ लागले आणि आपल्या समृद्ध अनुभवविश्वाचे प्रत्ययकारी दर्शन घडविण्यासाठी त्यांना लेखनविद्या गवसली. सुरुवातीच्या काळात प्राचार्य नरहर

कुरुंदकर, व्यंकटेश माडगूळकर, गो. नी. दांडेकर, मुल्कराज आनंद, उमाकांत ठोमरे आणि राम पटवर्धन यांनी त्यांना लिहिते केले. व्यंकटेश माडगूळकरांनी तर ''चितमपल्ली खूप वाचा, अन लिहा. लिहीत जा. म्हणजे लिहायला येईल.'' हा स्फुल्लिंग त्यांना आयुष्यभर पुरला. डॉ. सलीम अली, जी. ए. कुलकर्णी आणि जे. कृष्णमूर्ती यांचा चितमपल्ली यांचा मनःकोश संपन्न करण्यात महत्त्वाचा वाटा आहे. प्रख्यात चित्रकार आलमेलकर आणि मारुती चितमपल्ली एकत्र वावरले. जंगलातून हिंडले. त्यामुळे चितमपल्लींचे व्यक्तिमत्त्व संपन्न झाले. आलमेलकरांच्या रंगरेषांच्या साथसंगतीमुळे चितमपल्ली यांच्या समर्थ शब्दकलेला नवी मिती लाभली. या समग्र साहित्यसहवासाबद्दल त्यांनी 'शब्दांचं धन' या आपल्या संस्मरणात्मक पुस्तकात ममत्वाने लिहिले आहे. या त्यांच्या पुस्तकातील व्यक्तिरेखा उठावदार झाल्या आहेत. 'चकवाचांदण' या आपल्या बृहद स्वरूपाच्या आत्मचरित्रातून पुढे त्यांच्याविषयी सविस्तर लिहिले आहे.

प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी 'आठवणीच्या गंधरेखा' हे संस्मरणात्मक लेखन केलेले आहे. आपल्या वाङ्मयीन प्रवासातील रमणीय वळणा-वाकणांचा आलेख त्यांनी येथे समरसतेने रेखाटला आहे. आपल्या आठवणीच्या ओघात त्यांनी समकालीन लेखक-कवींची स्वभावचित्रे रेखाटली आहेत. त्यांची प्रगल्भ जीवनजाणीव येथे व्यक्त झालेली आहे. त्याचप्रमाणे प्रसंगविशेषी त्यांच्या नर्मविनोदी शैलीचे दर्शन घडते. त्यांचे समकालीन कवी विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर यांच्याशी त्यांचे सौहार्द होते. त्यांच्या व्यक्तिरेखा त्यांनी रंगविलेल्या आहेत, त्या संस्मरणीय झालेल्या आहेत.

ग. दि. माडगूळकर हे कविप्रकृतीचे असले तरी त्यांनी सकस ललित गद्यलेखन केलेले आहे. त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेल्या व्यक्तिचित्रांचा संग्रह 'तीळ आणि तांदूळ' या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. वेगवेगळ्या निमित्ताने आपल्या निकटवर्तियासंबंधी त्यांनी अतिशय जिव्हाळ्याने लिहिले आहे. त्यांचा साहित्यक्षेत्राशी आणि चित्रपटक्षेत्राशी निकटचा सबंध आलेला असल्यामुळे अधिकांश व्यक्तिचित्रे त्यांच्यासंबधीची आहेत. 'एक दीपोत्सवी संध्याकाळ' या व्यक्तिचित्रात त्यांचे जवळचे स्नेही कविवर्य बा. भ. बोरकर चार-पाच स्वरचित कवितांचा नजराणा घेऊन कसे आले. या घटनेची रसमयतेने गदिमांनी आठवण

करून दिलेली आहे. त्या मंतरलेल्या दिवसात ते रसिकांना घेऊन जातात.

कवितेच्या क्षेत्रात नावाजलेल्या आणि कविता या वाङ्मयप्रकारावर जिवापाड प्रेम करणाऱ्या शांताबाई शेळके सव्यसाचित्वाने गद्यलेखन करताना दिसतात. कथा, कादंबरी, अनुवाद आणि ललित निबंध या वाङ्मयप्रकारात त्यांनी विपुल निर्मिती केली आहे. एकीकडे डॉ. के. ना. वाटवे यांच्यासारख्या व्युत्पन्न आणि रसज्ञ अशा संस्कृतच्या प्राध्यापकामुळे त्यांच्यावर अभिजात संस्कृत साहित्याचे संस्कार झाले, तर दुसरीकडे देशीकार लेण्याविषयी अभिमान बाळगणाऱ्या प्रा. श्री. म. माटे यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. 'नवयुग' साप्ताहिकात काम करीत असताना आचार्य अत्रे यांनी त्यांच्या शैलीला पैलू पाडले. 'धूळपाटी' या पहिल्या ललित निबंधसंग्रहात त्यांचा संवेदनशील स्वभाव, सृजनशील साहित्याविषयी त्यांना वाटणारी ओढ आणि जुन्या आठवणीत रमण्याची वृत्ती दिसून येते. 'आनंदाचं झाड', 'पावसाआधीचा पाऊस', आणि 'एकपानी' ललित निबंधसंग्रहांत हा प्रवास परिणत होत गेला. 'वडिलधारी माणसं' या त्यांच्या व्यक्तिचित्रांच्या पुस्तकात त्यांच्या वृत्तिविशेषांच्या एकरसात्मकतेचा आल्हाददायी प्रत्यय येतो. शांताबाईंना समृद्ध असे बालपण लाभले होते. ते त्यांना सतत प्रोत्साहन देणाऱ्या त्यांच्या वाचनाभिरुचीला वळण लावणाऱ्या प्रेमळ आईवडिलांमुळे. त्यांच्या व्यक्तिरेखा या पुस्तकात स्वतंत्रपणे रेखाटल्या आहेत. गुरुजनांविषयीचा आदर हा त्यांचा स्थायी भाव. या दृष्टीने प्रा. श्री. म. माटे गुरू जरी नसले तरी आयुष्याचे मार्गदर्शक म्हणून लाभलेले आचार्य अत्रे यांच्या या पुस्तकातील व्यक्तिरेखा लक्षणीय स्वरूपाच्या झाल्या आहेत.

प्रभाकर पाध्ये यांचा जीवनप्रवास पत्रकारितेतून वाङ्मयनिर्मितीकडे झाला. १९३५ पासून घडलेल्या राजकीय घटना, दुसरे महायुद्ध आणि त्यानंतरचा कालखंड यांचे डोळसपणे परिशीलन केल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या मनावर झाला. मार्क्सवादी विचारसरणीमुळे सुरुवातीला भारावून गेलेल्या प्रभाकर पाध्ये यांचा भ्रमनिरास झाला. परदेशातील भ्रमंतीतून त्यांनी प्रवासवर्णने लिहिली. शिवाय 'प्रकाशातील व्यक्ती', 'तीन तपस्वी', 'व्यक्तिवेध' आणि 'आगळी माणसे' ही निरनिराळ्या क्षेत्रांतील माणसांची व्यक्तिचित्रे लिहिली. 'व्यक्तिवेध' मध्ये प्रामुख्याने आपल्या देशातील तसेच परराष्ट्रातील राजकीय क्षेत्रातील महत्त्वाच्या

व्यक्ती आहेत. या व्यक्तिचित्रणात बहिरंगदर्शनापेक्षा अंतरंगदर्शनाला अधिक स्थान मिळालेले आहे.

आपल्या कथेतून गहिरा जीवनानुभव देणाऱ्या डॉ. विद्याधर पुंडलिक यांचा 'आवडलेली माणसे' हा व्यक्तिचित्रांचा संग्रह प्रसिद्ध झालेला आहे. कथेतून सूक्ष्म व्यक्तिचित्रण करणारे डॉ. पुंडलिक तितक्याच समरसतेने आणि वृत्तिगांभीर्याने ही व्यक्तिचित्रे रंगवितात. ती अत्यंत प्रभावी झालेली आहेत. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, डॉ. इरावती कर्वे, अनंत काणेकर, प्रा. श्री. पु. भागवत, इतिहास संशोधक त्र्यंबक शंकर शेजवलकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, साने गुरुजी, चिं. वि. जोशी आणि नूतन मराठी विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक ना. ग. नारळकर इत्यादींची त्यांच्या अंगच्या गुणवैशिष्ट्यांची सर्जनशील कलावंताच्या नजरेने नोंद घेणारी उत्कृष्ट व्यक्तिचित्रे डॉ. पुंडलिकांनी लिहिली आहेत. नंतरच्या आवृत्तीत आपली जडणघडण करणाऱ्या आईचे 'माई' हे व्यक्तिचित्र समाविष्ट केले आहे. तेही तितकेच हृद्य आहे. अनेक पापुद्र्यांसह व्यक्तिमत्त्व उभे करण्याची त्यांची हातोटी येथे दृग्गोचर होते.

आपल्या आयुष्यात आलेल्या विविध क्षेत्रांतील व्यक्तिचित्रे कविवर्य ना. धों. महानोर यांनी 'ऐसी कळवळ्यांची जाती' या पुस्तकात अत्यंत जिव्हाळ्याने लिहिली आहेत. समर्थ कवीप्रमाणेच आपण उत्कृष्ट व्यक्तिचित्रे रेखाटणारे लेखकही आहोत हे त्यांनी येथे सिद्ध केले आहे. ज्यांच्या सहवासात आपण घडत गेलो त्या विषयीचा कृतज्ञतेचा भाव येथे प्रकट झाला आहे. अलीकडे 'यशवंतराव चव्हाण आणि मी' हे व्यक्तिचित्रणपर पुस्तक लिहिले आहे.

प्रा. वसंत बापट यांनी 'जिंकुनी मरणाला' या व्यक्तिचित्रपर पुस्तकात आपल्याला अत्यंत भावलेल्या बालगंधर्व, आचार्य अत्रे, साने गुरुजी, बॅ. नाथ पै, आवाबेन देशपांडे आणि नाना नारळकर या व्यक्तींविषयी समरसतेने लिहिले आहे. ते शब्दप्रभू तर आहेतच. त्याचबरोबर हृदयस्थ जिव्हाळा, ओथंबलेपण कायम ठेवून लिहिणे हा त्यांचा शैलीधर्म आहे.

डॉ. सुभाष भेंडे यांनी आपल्यावर वाङ्मयीन संस्कार करणाऱ्या, साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात वाटचाल करीत असताना प्रभाव टाकलेल्या आणि

ज्यांचा सहवास सतत आल्हाददायी वाटला अशा सुहृदांविषयी 'ऐसी कळवळ्याची जाती' या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकात लिहिले आहे.

डॉ. सरोजिनीबाई वैद्य यांचा मनःपिंड समीक्षकांचा. पण त्यांच्या 'पहाटपाणी' आणि 'शब्दायन' या आत्मपर लेखनातील अंतःसूर आनंददायी आहे. 'शब्दायन' मध्ये नाट्यछटाकार दिवाकरांच्या प्रतिभाधर्माविषयी लिहीत असताना त्या अनुषंगाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकणारे व्यक्तिचित्रण जिवंत आणि रसरशीत झालेले आहे.

डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या 'कदंब' आणि 'अनुबंध' या ललितनिबंधसंग्रहात काही व्यक्तिचित्रे समाविष्ट झालेली आहेत. लेखन, वाचन आणि त्यासंबंधीचे सतत चिंतन हाच त्यांचा निदिध्यास. हाच त्यांच्या जीवनाचा मर्मबंध. या आत्मपर लेखनात आलेल्या व्यक्ती आप्तस्वकीय तशाच साहित्याच्या सौहार्दामुळे आलेल्या आहेत. 'कदंब' मध्ये 'स्वामी'कार (रणजित देसाई), 'पाठीवरचा हात' (वि.स.खांडेकर), 'अजून यौवनात मी' (अनिल), 'फुलवात मालवली' (कुसुमावती देशपांडे), 'सप्रेम द्या निरोप' (चिं. त्र्यं. खानोलकर), ही व्यक्तिचित्रे या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

'अनुबंध' मध्ये जी. ए. कुलकर्णी, प्रा. वा. ल. कुलकर्णी, रणजित देसाई, अरविंद गोखले, पंडित महादेवशास्त्री जोशी, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, प्रा. श्री. पु. भागवत, ग. रा. कामत आणि प्रा. के. ज. पुरोहित उर्फ शांताराम यांची व्यक्तिचित्रे डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी आत्मीयतेने आणि समरसतेने लिहिली आहेत. त्यांतून त्या त्या व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्वाचा आलेख उभा राहतो. शिवाय, त्या व्यक्तींच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर प्रकाश पडतो. 'स्व' चा स्वकीयांशी जडलेला दृढ अनुबंध उलगडून दाखविण्याच्या प्रेरणेतून हे लेखन घडलेले आहे.

डॉ. रामदास भटकळ यांनी 'जिगसॉ' आणि 'जिव्हाळा' या पुस्तकातून सकस स्वरूपाची व्यक्तिचित्रे लिहिली. ही सृजनशील लेखनाशी, प्रकाशन व्यवसायाशी, संपादनाशी तशीच विविध कलाक्षेत्रांशी निगडित अशी माणसे आहेत. अर्थात माणसाच्या कर्तृत्वशक्तीबरोबर त्याचे अपुरेपण टिपणे हे ओघाने

आलेच. रामदास भटकळ यांनी ही व्यक्तींची गुणगौरवगाथा होऊ न देता त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर कुशलतेने प्रकाश टाकला आहे. यात कुत्सितपणाचा भाग नसून माणसांच्या जीवनजाणिवांचे प्रगल्भ भान असलेले लेखकाचे मन येथे प्रकट झाले आहे. त्यांच्या लेखनात प्रांजळपणा आहे. पारदर्शित्व आहे. अभिव्यक्तीची धिटाई आहे. मानवी सामर्थ्याबरोबरच त्याच्या मर्यादांचे पुरेसे भान आहे. चिंतनशीलता आहे.

'जिगसॉ' या व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रहात रामदास भटकळ यांनी 'वारसा' या लेखातून मोकळेपणाने लिहिले. अपार जिव्हाळा त्यात भरून राहिलेला आहे. वडिलधाऱ्या व्यक्तींविषयी त्यांनी लिहिले, तसेच मित्र-मैत्रिणींविषयी आपुलकीने लिहिले. या लेखनात सहसा न आढळणारा निःसंकोचपणा आहे. 'कुलकर्णी सर', 'संभ्रम', 'हिरवं ऊन', 'लंबक', 'सख्खी मैत्रीण', 'अक्षरवेल', 'बिंब-प्रतिबिंब', 'बेबीताई', 'पुनर्मीलन', 'अनोळख' आणि 'पुण्याई' हे सारेच लेख. त्या त्या व्यक्तीचे अंतरंगदर्शन घडविणारे आहेत.

या भावबंधाचे चित्रण करताना एक मूलगामी प्रश्न त्यांच्यासमोर होता. ''ज्यांनी मला घडवलं आणि ज्यांच्या आयुष्यात मला काही स्थान होतं. अशा व्यक्तींची कोडी सोडवण्याचा जरी मी प्रयत्न करीत होतो तरी एकसंघ चित्रं घडेनातच. त्या चित्रांतील रिकाम्या जागा मी भरून काढू शकणार होतो का? आणि हे जमलं नाही तर स्वतःला तरी मी कसा समजून घेणार होतो?''

एक प्रथितयश प्रकाशक, अभ्यासक, संगीतोपासक आणि लेखक म्हणून नावलौकिक प्राप्त केलेल्या या अभिरुचिसंपन्न व्यक्तिमत्त्वाच्या मनात हीच अंतःप्रेरणा 'जिव्हाळा' हे पुस्तक लिहिताना असावी. 'जिव्हाळा' हे नाव सार्थ ठरावे अशी ही मराठी वाङ्मयक्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वे आहेत. ही माणसे मोठी आहेतच. पण त्यांचे मोठेपण अधोरेखित करणारी सिद्धहस्त लेखणी रामदास भटकळ यांच्याकडे आहे. जवळून पाहिल्यावर माणसाचे दोषच अधिक दिसायला लागतात. पण गुणात्मकतेचा भाग वस्तुनिष्ठपणे आणि नेमकेपणाने अधोरेखित केला तसेच मर्यादांचेही दर्शन घडविले तर त्या व्यक्तिचित्रणाला परिपूर्णता प्राप्त होते. याचा प्रत्यय 'जिव्हाळा' मधील व्यक्तिचित्रांचा धांडोळा घेताना येतो.

समर्पक शीर्षकांनी युक्त असलेले मराठीतील कवी–लेखकांवरील हे प्रदीर्घ लेख त्या त्या व्यक्तीचे दर्शन यथार्थपणे घडवतात. त्याचबरोबर त्यांनी निर्माण केलेला ऊर्जस्वल कालखंड आपल्या दृष्टिपथात येतो. 'वरदान', 'कलासक्त', 'वलय', 'नंदनवन', 'ऊनपावसाच्या शोधात', 'उंच जिथे माथा', 'कविवरा', 'आनंद गोविंदा', 'संधिकाल' आणि 'रणांगण : स्नेहबंधांचं' हे सारेच लेख संस्मरणीय आहेत.

आधुनिक कालखंडातील व्यक्तिचित्रणात्मक लेखनाची ही समग्र पाहणी नव्हे. विविधांगी लेखनातील काही दुवे जुळवून मराठीतील व्यक्तिचित्रणात्मक लेखन हाताशी लागते का हे पाहण्याचा केलेला हा अल्पसा प्रयत्न आहे. यापैकी पूर्वसूरींनी अनेकांचे यथार्थ मूल्यमापन केलेले आहे. शोधकबुद्धीने नव्या परिप्रेक्ष्यात काही लेखकांच्या लेखनाकडे पुन्हा पाहण्याची गरज आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड यातील प्रेरणा या सर्वस्वी निराळ्या आहेत. या सीमारेषेवर व्यंकटेश माडगूळकर यांनी रेखाटलेली 'माणदेशी माणसे' मौलिक स्वरूपाची आहेत. त्यांचे एक नाते त्यांनी उभ्या केलेल्या 'बनगरवाडी' शी आहे. कारण दोहोंमधील स्पंदनशीलता एकच आहे. दुसरे नाते पूर्वसूरींशी आहे.

प्रा. श्री. म. माटे यांच्यासारख्या द्रष्ट्या प्रज्ञावंताला आणि प्रतिभावंताला भविष्यकालीन क्षितिज स्पष्टपणे दिसत होते म्हणून स्वातंत्र्याचा उदय होण्यापूर्वीच १९४३ मधील सांगलीच्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून साहित्यिकांना आवाहन केले होते.

''आमच्या सर्व विचारवंतांचा मोहरा अगदी घसघशीतपणे स्वकीयांकडे वळला पाहिजे. परकीय देशांत जे जे झाले आहे. त्याची कलमे इकडे बांधावयाचे काम निश्चयाने बंद झाले पाहिजे. या कलमाशी आमची मूळ प्रकृती समरस होत नाही, अगदी कदाचित कोठे झाली तर बाटेपणा आल्याचे दुःख आम्हाला होते.''

त्याला जोडूनच त्यांनी पुढे केलेले आवाहन अधोरेखित करायला हवे.

'समाजाच्या थराथरांतून आपले मन सहानुभूतीने खेळत ठेवणे हा व्यापार जर आपण चालू ठेविला तर अगदी जिवंत वाङ्मये वाटेल तितकी निर्माण

होतील.' याचे भान व्यंकटेश माडगूळकरांदिकांनी ठेवले. वास्को येथे १९७५ साली भरलेल्या १४ व्या गोमंतक मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी आठवण करून दिली होती.

''रशियातील एक श्रेष्ठ कथालेखक तुर्जेनीव्ह यांनी रशियन कथेविषयी असे म्हटले आहे की, आम्ही सगळे गोगोलच्या ओव्हरकोट मधून बाहेर पडलो आहोत.'' ते पुढे म्हणतात, ''मला नेहमी वाटतं की आम्ही विशेषतः गावाकडील गोष्टी लिहिणारे लेखक, माटे मास्तरांच्या 'बन्सीधरा तू कोठे रे जाशील' या कथेतल्या भटक्या कातकऱ्यांच्या तळावरून आलो आहोत.''

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कथा, कादंबरी, कविता, ललित निबंध आणि अन्य साहित्यप्रकारात ग्रामीणता आली. ग्रामीणता हे विशेषण नसून ती जीवनशैली आहे. ग्रामीण जीवनातील अनुभूतीचा झरा हाच खरा असे या कालखंडात झालेल्या प्रत्ययकारी, कसदार लेखनाने सिद्ध केले. या दृष्टीने माणदेशी माणसे हा कृषिसंस्कृतीतील माणसांचा शोध घेणारा मैलाचा दगड ठरला. उद्धव शेळके, आनंद यादव, रा. रं. बोराडे, मनोहर तल्हार, चारुता सागर, सखा कलाल, भास्कर चंदनशिव आणि इंद्रजित भालेराव यांनी सर्वांगांनी या अनुभूतीचा क्षितिज विस्तार केला. वाङ्मयीन आकृतिबंधाच्या सीमारेषा पुसून समकाळात निर्माण झालेल्या नव्या जाणिवांचा शोध घेणे येथे महत्त्वाचे ठरते. हा प्रवाह आता पुढे खळाळत राहिला आहे.

ललित निबंध लेखनातील व्यक्तिचित्रांचा विचार करताना अवतीभोवतीच्या राजकीय वास्तवाचा, सामाजिक प्रेरणांचा, बदलत्या आर्थिक स्थित्यंतराचा आणि सांस्कृतिक पर्यावरणाचा विचार करणे अपरिहार्य आहे. समष्टिजीवनावर या सर्व घटकांचा संस्कार होतो. प्रभाव पडतो. त्याच्या परिणामातून व्यक्तिजीवन घडते, बदलते.

कुठल्याही प्रकारच्या लेखनाचा विचार करताना जुने आणि नवे असा सरधोपटपणे विचार करून चालत नाही. वाङ्मयीन अभिरुचीच्या वृद्धीसाठी जुने म्हणजे जुनाट, कालबाह्य असे म्हणून भागत नाही. नव्याचा स्वीकार करणारी स्वागतशीलता हवी. पण तिचा अतिरिक्त हव्यास काय कामाचा? अनुभूतीचा

ताजेपणा, प्रांजळता, प्रामाणिकपणा आणि तिच्या आविष्कारातील प्रवाहीपणा, कलात्मकता महत्त्वाची; असे लेखन काळाच्या कसोटीवर उतरते.

मराठीतील व्यक्तिचित्रांच्या संदर्भात विचार करताना आधुनिक कालखंडाकडे लक्ष केंद्रित करावे लागते. वि. द. घाटे यांच्या 'पांढरे केस, हिरवी मने' मधील 'आऊ' व 'भाईंचा इंडियन समर' ही उत्तम व्यक्तिचित्रे आजही आठवतात. ना. ग. गोरे हे शैलीसंपन्न साहित्यिक. त्यांच्या 'दिगंबर' या ललित निबंधातील अरिशिनेमी या कलाकारांची व्यक्तिरेखा ही अशीच चिरस्मरणीय आहे.

चिंतामणराव देशमुखांच्या भेटीवर आधारलेले त्यांचे 'एक शांत सुंदर पिकणे!' हे व्यक्तिचित्र आठवते. आपल्या राजकीय जीवनातील प्रवासी असलेल्या एस. एम. जोशी यांच्यावरील 'एसेमः एक विशेषनाम' हे व्यक्तिचित्र लक्षणीय स्वरूपाचे. पंडिता रमाबाईंवरील 'पंडिता रमाबाई : मुक्तीचा घंटानाद' हे व्यक्तिचित्र आठवणीत राहण्यासारखे. साने गुरुजींच्या मृत्यूनंतर त्यांनी लिहिलेले 'स्वप्नभाषण' हे अप्रतिम शब्दशिल्पच. आचार्य अत्रे यांच्या मृत्यूनंतर विजय तेंडुलकर यांनी 'माणूस' साप्ताहिकात त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे 'प्रचंड' हे व्यक्तिचित्र आठवते.

दुर्गाबाई भागवत यांच्या 'भावमुद्रा' या ललित निबंधसंग्रहातील 'ज्ञानशालेच्या द्वाराशी' या लेखातील एका पठाणाची व्यक्तिरेखा संस्मरणीय आहे. डॉ. इरावती कर्वे यांच्या 'भोवरा' या ललित निबंधसंग्रहातील 'आजोबा' हे महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचे व्यक्तिचित्र त्यांच्या स्वभावातील अनेक कंगोऱ्यांसह सिद्ध झालेले आहे. व्यक्तिचित्र कसे असावे याचा तो उत्कृष्ट नमुना आहे.

वि. वा. शिरवाडकर यांनी सलग, मोठे आत्मचरित्र लिहिले नाही. आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यावर त्यांनी 'विरामचिन्हे' हे संस्मरणात्मक पुस्तक लिहिले. त्याची संवर्धित आवृत्ती त्यांनी 'वाटेवरच्या सावल्या' या नावाने प्रसिद्ध केली. त्यात त्यांनी कधी वृत्तिगांभीर्याने तर कधी नर्मविनोदी वृत्तीने आपल्या अनुभवांचे चित्रण केले. काही व्यक्तींचे बारकावे वर्णन करणारी त्यांची त्यांतील व्यक्तिचित्रे अधोरेखित करावीशी वाटतात. यातून शिरवाडकरांच्या व्यक्तिमत्त्वावरही प्रकाश पडतो. शिवाय कवित्त्वशक्तीचेही दर्शन घडते.

याच पुस्तकात त्यांनी वि. स. खांडेकर (नंदादीप), आदिशक्तीची एक देदीप्यमान मिरवणूक (आचार्य अत्रे) आणि स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर (प्रॉमीथिअस), यांची व्यक्तिचित्रे त्यांनी अप्रतिम शैलीत रेखाटली आहेत. रमाकांत वेलदे या अवलिया माणसाचे स्वभावचित्र त्याच्या गुणदोषांसह शिरवाडकरांनी रेखाटले आहे.

'शोध कवितेचा' या पुस्तकात मंगेश पाडगावकर यांनी 'स्मृतीची चाळता पाने' यामध्ये आपल्या शैक्षणिक प्रवासाचा मागोवा घेतला आहे. या हृद्य संस्मरणात त्यांनी काही व्यक्तिचित्रे रंगविली आहेत. 'सर मी टिकलो बरं का?' मधील प्रा. वा. ल. कुलकर्णी यांची व्यक्तिरेखा उत्कृष्ट वठली आहे. त्यांच्या 'स्नेहगाथा' मधील सुहृदांची व्यक्तिचित्रे त्यांनी तन्मयतेने लिहिली आहेत.

'व्यक्तिचित्रांविषयी काही विचार' या सदरात आपण व्यक्तिचित्र म्हणजे काय? मराठीतील व्यक्तीचित्रलेखनाची परंपरा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये या अनुषंगाने आपण थोडक्यात इथपर्यंत विचार केला आहे. शिवाय मराठीतील काही व्यक्तिचित्रणांचा आणि त्या व्यक्तिचित्र लेखकांचाही स्थूल स्वरूपात एक दोन वैशिष्ट्यांत विचार केला आहे. यानंतर आपण 'मुलखावेगळी माणसं' या प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट असलेल्या व्यक्तिचित्रांची आशयसूत्रे थोडक्यात मांडली आहेत.

***

**रामा मैलकुली :**

'माणदेशी माणसे' हा व्यंकटेश माडगूळकर यांचा सोळा व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे. व्यक्तिदर्शन हाच या निवेदनात्मकतेचा गाभा आहे. व्यक्तीची नावे त्या त्या व्यक्तिचित्राला दिलेली आहेत. पण तंत्रशैलीच्या दृष्टीने विचार केला तर त्यांचे वळण आणि वाकण कथात्मक आहे. त्यात कथानक आहे. मुख्य केंद्रबिंदूभोवती कथा फिरत असली तरी गौण पात्रांच्या संयोगाने येथे कथानकाचा परिपोष होतो. या कथनशैलीत तटस्थपणे लेखकाचे निवेदन येते. पात्रांचे संवाद येतात. माणदेशाच्या या अभावग्रस्त कृषिसंस्कृतीत वावरणाऱ्या माणसांभोवती ही कथानके गुंफल्यामुळे तो प्रदेश आपल्या रंगगंधासह येथे

साकार होतो. वातावरणनिर्मिती हा या कथात्म व्यक्तिचित्रणातील महत्त्वाचा घटक आहे. पात्रांच्या तोंडची भाषा पूर्णतः ग्रामीण स्वरूपाची आहे. या बोलीमुळे त्या माणसांच्या जगण्याच्या शैलीचेही रंग खुलत जातात. अस्सल अनुभूतीची उत्कटता तिच्यात उतरल्यामुळे तिच्यात कृत्रिमतेचा लवलेश नाही. पात्रांविषयी सहानुभूती आणि कलावंताची अलिप्तता व्यंकटेश माडगूळकरांच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्वात आहे. कोणत्याही पूर्वग्रहाच्या आहारी न जाता सरळ जीवनानुभवाला भिडणे हा त्यांचा प्रतिभाधर्म आहे. वर्ण्य विषयाशी तादात्म्य साधताना ते स्वतः देखील त्या कथानकातील पात्र बनतात. माणदेशाच्या माणसांचे जीवन त्यांनी जाणून घेतले आहे. माणूस, त्यांची जीवनशैली, निसर्ग, लोकसंस्कृती यांची एकरसात्मकता झाल्यामुळे त्यांची पात्रे जिवंत आणि रसरशीत वाटतात.त्यांचे लेखन अल्पाक्षरी वाटते. मनुष्य स्वभावाच्या गाभ्याला सहजपणे भिडण्याची शक्ती त्यांच्या लेखणीत आहे. म्हणून अस्सल अनुभूतीचे देशीकार लेणे ते निर्माण करू शकले.

या पार्श्वभूमीवर 'रामा मैलकुली' या व्यक्तिचित्रातील अनुभूतीचा पोत तपासून पाहिला तर काय जाणवते? ही सामान्य व्यक्ती असून सामान्य वाटत नाही. चित्रमय शैलीत लेखकाने रंगवलेले हे व्यक्तिचित्र अनुभवताना सर्व रंगच्छटासंह रंगवलेले हे चित्रच वाटते. फक्त माध्यम निराळे.

''रामा मैलकुली'' या व्यक्तिचित्रातील निवेदक म्हणतो :

''शेवग्याचं शेलाटं झाड लावल्यावर त्या खोपटासमोर उभा राहिलो. बाहेरच्या बाजूला दगडावर बसून एक काळीशार बाई पिठानं भरलेली पितळी विसळत होती. आणि तिच्या खांद्यावर हात ठेवून पाच-सहा वर्षांचं शेंबडं पोरगं हातातल्या तांबड्या भाकरीचा तुकडा तोडून-तोडून खात होतं. मी आलेला पाहताच तोंडातला घास त्यांन झटकन गिळला आणि आईचा पदर ओढून बोलला, 'ए आये, कोण आलाया बग!''

यातून या परिसराचे चित्र उभे राहते. परिसरातील दारिद्र्याचे विदारक चित्रही लेखकाने रेखाटले आहे. रामा मैलकुलीच्या बाह्यांगाचे तसेच अंतरंगाचे प्रत्ययकारी चित्रण माडगूळकरांनी केले आहे. यात त्यांच्या शैलीचे कौशल्य

दिसून येते.

‘‘रामा दिसायला चारचौघासारखा नव्हता. रूपाच्या बाबतीत दैवानं त्याच्यावर गैरमर्जी केली होती. अंगापिंडानं थोराड असून त्याचा रंग अगदी ठार काळा होता. नाक डाव्या बाजूला वाकडं होतं आणि एक डोळा अधू होता. त्याच्या तोंडावरच्या कळेकडं पाहून कुणालाही असं वाटलं असतं की, दिलानं भला असलेला हा माणूस रूपानं गेला आहे आणि खाण्यापिण्याच्या बाबतीतही याची भलतीच आबाळ झाली आहे! कसल्यातरी रंगानं एक चिटकं फडकं त्यानं केवळ सवयीनं डोक्याला गुंडाळलं होतं. जागोजागी चिंध्या झालेली एक पैरण अंगात अडकवली होती आणि खालचं धोतर तर त्याला अगदीच तोटकं होतं. पिंढऱ्यावर बोटाएवढ्या शिरा उमटून दिसत होत्या. पायाच्या टाचा भेगाळल्या होत्या. वयानं तो फारसा दिसत नव्हता. ‘मग याचं लगीन झालंय की नाही? झालं असतं, तर खोपटात अस्तुरी दिसली असती. चार पोरं दिसली असती. राधू याची बहीण दिसते. तिच्या कपाळावरचं कुंकू पुसून गेलं होतं?...’’

अल्पाक्षरात लिहिणारे माडगूळकर येथे तपशिलांचे रंग भरतात. कारण त्यांच्या आशयाची ती मागणी असते. ही लवचीकता त्याच्या भाषाशैलीत आहे. येथे त्यांची दृष्टी त्यांच्यातील चित्रकाराचीदेखील आहे.

रामा मैलकुलीच्या संवादामधून त्याच्या कारुण्यमय जीवनाची निवेदकाला कल्पना येते.

‘‘कशाला देव परपंच? कायतरी करून हातातोंडाची गाठ घालायची! ढोरावानी जीव! काय अंगभर धडुता मिळतुया, का गोडधड खाया मिळतया? आमा गरिबांचं हे असंच! तरी बरं, आपला सोताचा काय खटाला न्हाई. एकलाच हाय.’’

‘‘लग्न का केलं नाहीस?’’ या निवेदकाच्या प्रश्नामुळे त्याची जखम चिघळते. आपल्या जीवनाची चित्तरकथा तो निवेदकाला ऐकवितो. धोंड्यावर नाव आणि आकडा एव्हाना घालून झालेला असतो. भूक लागल्यावर दोघे शिदोऱ्या सोडतात तेव्हा रामा मैलकुलीचे दारिद्र्य उघडे पडले. भुकेपोटी निवेदकाने दिलेल्या दोन भाकऱ्या चटणीच्या भुकट्याबरोबर तो संपवितो आणि राहिलेल्या भाकऱ्या पोरगं

खाईल दोन घास'' म्हणून ठेवून देतो.

रामा मैलकुलीची दर्दभरी कहाणी लेखकाने कलात्मक संयमाने सांगितली आहे. त्यात भावविवशतेचा सूर नाही. सहानुभूतीचा कंप मात्र ओतप्रोत भरलेला आहे.

## 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी'

हा वेगळ्या प्रकारचा लेख आहे. त्याला रूढार्थाने मृत्युलेख म्हणावे लागेल. साने गुरुजींचे जीवन हे राष्ट्रजीवनासाठी वाहिलेले समर्पित जीवन होते. सुरुवातीलाच आचार्य अत्रे यांच्यासारखा समर्थ साहित्यिक साध्या सोप्या भाषेत साने गुरुजींचे व्यक्तिचित्र समग्रतेने उभे करीत आहे.

''हे सात दिवस मी त्यांचा सारखा विचार करतो आहे. त्यांच्या जीवनाचा विचार करतो आहे. त्यांच्या मरणाचा विचार करतो आहे. त्यांच्या लेखनाचा विचार करतो आहे. त्यांच्या वेदनांचा विचार करतो आहे. त्यांच्या भाषणांचा विचार करतो आहे. त्यांच्या उपोषणांचा विचार करतो आहे. त्यांच्या बसण्याचा विचार करतो आहे. त्यांच्या उभे राहण्याचा विचार करतो आहे. संकोचाच्या भावनेने सदैव अवघडलेली त्यांची ती आकृती माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे. ओठांच्या दोन्ही कोपऱ्यातून डोकावणारे त्यांचे ते ओशाळे हसू अजून माझ्या दृष्टीपुढे आहे. स्नेहभावाने डबडबलेल्या त्यांच्या डोळ्यांच्या ओल्या कडा अजून मला दिसताहेत. त्यांचे ते पुटपुटणे, त्यांचे कण्हणे, त्यांचे ते सुस्कारे आणि त्यांचे ते हातवारे सारे सारे मला आठवते आहे.'' विशेष काही न सांगता त्यांचे शब्दचित्र –व्यक्तिचित्र स्वभावचित्र समांतर प्रक्रियेत उभे राहिले आहे. त्यांच्या आयुष्याचे प्रयोजन येथे न सांगता येथे अधोरेखित झाले आहे. ही सारी किमया आहे ती आचार्य अत्रे या शब्दप्रभू साहित्यिकाची.

साने गुरुजी आणि आचार्य अत्रे यांची डोळाभेट झालेली आहे. त्यांचे वाङ्मय अत्रे यांनी आवडीने वाचलेले आहे. त्यांच्या जीवनाचा अन्वयार्थ अनेकांनी अनेक तऱ्हांनी लावला. अत्रे यांनी तो आपल्या आकलनानुसार लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कवित्वशक्तीवर प्रकाश टाकताना ते मातृहृदयाचे कवी होते असे आचार्य अत्रे यांना वाटते. मातृप्रेमात ममता असते; तशीच समता

असते. साने गुरुजी यांचे व्यक्तिमत्त्वही असेच आहे. निरूपणात्मक शैलीत या वात्सल्याचे वर्णन आचार्य अत्रे यांनी केले आहे. याच वृत्तिप्रवृत्तींतून त्यांच्या काव्याचा आणि वाङ्मयाचा जन्म झाला. देशाचे पारतंत्र्य नष्ट झाले पाहिजे, समाजातील सारी विषमता आणि दैन्य नष्ट व्हायला हवे. जनतेच्या जीवनातील दलदली नाहीशा झाल्या पाहिजेत. विषारी तण जळून गेले पाहिजे. अज्ञान आणि भ्रम नाहीसा झाला पाहिजे. जीर्ण-शीर्ण रूढी नष्ट व्हायला हव्यात.

गुरुजींचे सारे सामर्थ्य त्यांच्या अश्रूंत होते. आपला 'दुबळेपणा' व 'रडकेपणा' या विशेषणांनी उपहास केला गेला याचे त्यांना वैषम्य वाटे. पण अश्रूंच्या सामर्थ्यामुळे कश्मल  कसे घालविता येते. याचा आदर्श साने गुरुजींनी निर्माण केला. हे उदाहरणांनिशी आचार्य अत्रे यांनी दाखवून दिले आहे. ही सृष्टी म्हणजे परमेश्वराने लिहिलेले महाकाव्य असे साने गुरुजींना वाटते. त्यांच्या एकूण वाङ्मयाच्या परिशीलनाच्या आधारे आचार्य अत्रे यांनी ते पटवून दिले आहे. येथे ते साने गुरुजींच्या आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या गाभ्याला स्पर्श करतात असे वाटते. शब्दप्रभू आचार्य अत्रे यांच्या शैलीची ही विलोभनीय रूपकळा आहे. त्यांची काव्यस्फूर्ती ही त्यांच्यापुरती सीमित नसून समष्टिसुखासाठी होती असे आचार्य अत्रे यांनी प्रतिपादन केले आहे. तुकारामानंतर जनतेचा एवढा मोठा महाकवी झाला नाही असे त्यांना वाटते.

गरीब आणि श्रमजीवी जनतेची सर्व दुःखे आणि दुखणी दूर व्हावीत ही साने गुरुजींच्या जीवनातील तळमळ होती. ''माझ्या वाङ्मयाला हात लावाल, तर माझ्या हृदयाला हात लावाल'' असे ते म्हणत असत. त्यांच्या व्यक्तित्त्वाचे आणि वाङ्मयाचे असे अभिन्न नाते होते. समाजपुरुषांशी एकरूप झालेल्या साने गुरुजींचे प्रेरणास्रोत कोणते होते, भारतीय संस्कृतीचा आत्मा त्यांना कसा गवसला, सत्याग्रहाची दीक्षा त्यांनी कोठून घेतली. सौंदर्यप्रेमाचा मंत्र ते कुणाकडून शिकले आणि सेवाधर्माचा संस्कार त्यांनी कोठून घेतला हे आचार्य अत्रे यांनी अप्रतिम शैलीत विशद करून सांगितले आहे, ''जीवांचे मैत्र जडावे, स्नेहभाव उत्पन्न व्हावा, निर्भयता आणि स्वाभिमान निर्माण व्हावा'' या एक ध्येयाने प्रेरित होऊन साने गुरुजींनी आपल्या वाणीची पेरणी केली असे आचार्य अत्रे म्हणतात.

''शुद्ध, निर्हेतुक आणि आत्यंतिक प्रेम ही साने गुरुजींच्या जीवनाची प्रेरणा होती. या प्रेमाखातर वाटेल तो त्याग करण्याची त्यांच्या मनाची सिद्धता होती. दीपशिखेवर स्वप्राणाची आहुती ओतणाऱ्या पतंगाच्या जातीचे त्यांचे प्रेम होते. जीवन हा एक महान यज्ञ आहे हे त्यांचे तत्त्वज्ञान होते.'' असे आचार्य अत्रे यांना वाटते. त्यांची भाषाशैली प्रपातासारखी ओघवती आहे. अमोघ शब्दकळेचे वरदान त्यांना लाभलेले होते. जेथे सद्गुण दिसतात तेथे नतमस्तक होण्याची त्यांची वृत्ती होती. साने गुरुजींची जीवनस्वप्ने आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील भावकोमलता जाणून घेण्याची संवेदनशीलता त्यांच्याकडे होती.

सानेगुरुजींनी आत्मसमर्पण का केले याची मीमांसा आचार्य अत्रे यांनी आपल्या परीने केली आहे. समाजातील जातीयता, प्रांतीयता आणि ध्येयशून्यता नष्ट करण्यासाठी साने गुरुजींनी जन्मभर प्रयत्न केले. पण ते फलद्रुप झाले नाहीत म्हणून त्यांना कमालीचे नैराश्य प्राप्त झाले असे त्यांना वाटते. या लेखाचा शेवट त्यांनी अतिशय हळुवारपणे केला आहे. साने गुरुजी देहरूपाने जरी गेले असले तरी त्यांचे वाङ्मय मातेच्या वात्सल्याने अनंत काळापर्यंत महाराष्ट्रातील तरुण पिढीचे संगोपन करीत राहील अशी श्रद्धा ते बाळगून आहेत.

आचार्य अत्रे यांनी आपल्या वृत्तपत्रीय कारकीर्दीत अनेक महापुरुषांवर मृत्युलेख लिहिले. व्यक्तीची महत्ता समर्पक शब्दात अधोरेखित करणे हा त्यांचा स्थायी भाव आहे. त्यांनी लिहिलेल्या या मृत्युलेखामध्ये त्यांच्या शैलीचे सर्व गुणधर्म प्रतिबिंबित झाले आहेत. सर्वत्र समाज स्वार्थाने बरबटलेला असताना ध्येयमूर्ती जपणारा, उद्याच्या उज्ज्वलासाठी तळमळणारा, धडपडणाऱ्या मुलांना आपल्या कर्तृत्वाने, वाणीने व लेखणीने त्राण देणारा आणि प्राणत्यागही करणारा हा माणूस मुलखावेगळा होता. 'माणूस' घडविणे हेच त्याचे एकमेव ध्येय होते. त्यासाठी त्याची सारी जीवनसाधना होती.

''मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी'' हे आचार्य अत्रे यांनी या व्यक्तिचित्राला दिलेले शीर्षकही अर्थपूर्ण आहे. साने गुरुजींच्या समर्पित जीवनाला ते कवेत घेणारे आहे.

## निळू मांग

अण्णाभाऊ साठे यांच्या ''निळू मांग'' या व्यक्तिचित्राचा विचार करण्यापूर्वी या लेखकाची जीवनधारणा आणि लेखनप्रेरणा याविषयी संक्षिप्त विवेचन करणे आवश्यक वाटते. अण्णाभाऊ साठे यांनी ज्या दलित आणि शोषित समाजाचे दुःख, वेदना आणि संघर्ष यांचे चित्रण केले त्यातून ते स्वतः गेलेले होते. अर्थातच अनुभूतीची धार या लेखनाला लाभली होती. १९४९ मध्ये 'मशाल' या साप्ताहिकात त्यांची 'दिवाळी' ही कथा प्रसिद्ध झाली. तेथून ते लिहीतच राहिले. संघर्ष हाच त्यांच्या जीवनाचा स्थायिभाव होता. अस्पृश्यता ही काय चीज असते ही त्यांनी स्वतः अनुभवलेली होती. प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना औपचारिक शिक्षण घेता आले नाही. प्रखर जीवनानुभूती हीच त्यांची शाळा ठरली. तीच त्यांची प्रयोगशाळाही ठरली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीच्या मुशीतून त्यांची साहित्यसंपदा निर्माण झाली. त्यांनी विपुल लेखन निर्मिती केली. पस्तीस कादंबऱ्या आणि तेरा कथासंग्रह लिहिले. तमाशा आणि नाटके लिहिली. ''माझा रशियाचा प्रवास'' हे प्रवासवर्णन लिहिले.

आपल्या लेखनप्रेरणांविषयी अण्णाभाऊ साठे म्हणतात, ''मी जे जीवन जगतो. पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही... माझी सारी पात्रे या ना त्या नात्याने माझ्या आयुष्यात येऊन गेली आहेत. माझी माणसं वास्तवातील आहेत. जिवंत आहेत. मुंबईत ओझेवाला, हमाल, नाका कामगार, मिल कामगार म्हणून ओढगस्तीचे जीवन अण्णाभाऊ साठे यांना भोगावे लागले. त्याचेच प्रतिबिंब त्याच्या पात्रचित्रणात पडलेले दिसून येते.''

'निळू मांग' ही व्यक्तिरेखा अण्णाभाऊ साठे यांनी सोप्या भाषेत साकार केली आहे. छोट्या वाक्यातून त्यांचे निवेदन पुढे सरकते. त्या व्यक्तिरेखेचे सर्व कंगोरे त्यांच्या चित्रणातून साकार होतात.

थेट अनुभवाला भिडणारे निवेदन येथे सुरुवातीलाच येतेः

''तोफ तयार झाली. गोळा भरला होता. बत्तीवाला बत्ती घेऊन पुढं आला आणि तो साजूरचा निळू मांग हातात काळी टोपी घेऊन तोफेकडे चालू लागला.

त्याचं प्रत्येक पाऊल मजबूत पडत होतं. तो निर्भय होता. आता आपण मरणार आहोत हे त्याच्या गावीच नव्हतं. त्याला कसलीच भीती नव्हती. तो वर सरळ तोफेशी जाऊन उभा राहिला.''

वरिष्ठ अधिकारी कनवाळू स्वरात निळूला उद्देशून म्हणतो, ''आता तू प्रभूकडं जाणार, जर तुला बोलायचं असेल तर बोलून घे. आता तू मरणार. जगातून जाणार. तुझा शब्द आता उमटणार नाही. बोल, काही इच्छा असेल तर सांग.''

आपल्याला तोफेच्या तोंडाशी देणारी ही माणसे आपल्या आयुष्याच्या शेवटच्या घडीला अशी सहानुभूतीच्या स्वरात बोलतात याचे निळू मांगाला आश्चर्य वाटले.

अण्णाभाऊ साठे यांनी मोजक्या शब्दांत निळू मांगाचे शब्दचित्र उभे केले आहे.

''साजूर गावात निळू मांग एक सज्जन, गरीब माणूस म्हणून ओळखला जात होता. प्रत्येक माणूस निळूला मान देत होता. निळू कोणाची थुंकी ओलांडत नव्हता, कुणाच्या पाचोळ्यावर पाय देत नव्हता. भरपूर उंची, अंगात भरपूर बळ, रंगानं सावळा नि चेहऱ्यानं गावात तो उजवा होता. त्याच्या वयाला नुकतंच बाविसावं वर्ष लागलं होतं. पण तो शांत होता. आई, काळू, नानी, वहिनी, आक्का असं म्हणून तो गावचा लाडका झाला होता. त्याला फक्त आई होती. आईनंच त्याला जगवून वाढवला होता. लहानापासून वृद्धांपर्यंत सर्वच लोक निळूला चांगला माणूस म्हणत होते. अब्रूदार म्हणून त्याची गावात ख्याती होती.''

व्यंकटेश माडगूळकरांचा 'रामा मैलकुली' या व्यक्तिचित्रातील वर्णन-शैलीशी येथे काहीसे साधर्म्य दिसते. साजूर गावच्या शेत-शिवाराचे वर्णन लेखकाने येथे केले आहे. निवेदन आणि पात्रसंवाद यांच्या संयोगातून वातावरण निर्मिती करणे लेखकाला चांगल्या प्रकारे साधलेले आहे. ग्रामीण परिसरातील दलित वस्तीचे हे चित्र आहे.

भिमा पाटलाच्या मक्याच्या शेतीची राखण करण्याचे काम निळू मांगाकडे

येते. तो ते इमानइतबारे करतो. त्याचे अनेक तपशील या व्यक्तिचित्रणात येतात.

या व्यक्तिचित्राला कथात्म वळण मिळते. संघर्षाची धार कथानक प्रवाहाला प्राप्त  झाली आहे.

''रात झाली होती. गावात प्रत्येक वस्तीवर जाळ धुमसत होता. निळूनं आपल्या वस्तीवर बाबा महाराला बसवला होता. नि आपण गावात गेला होता. आता निळ्या हजेरीला धावत गेला असंल, आपण जाऊन मांगाचा काटा काढावा या विचारानं रामू सुतार निळूच्या वस्तीकडं गेला. पण बाबा अंगावर घोंगडं घेऊन पाठमोरा बसला होता. हा निळ्याच आहे असं समजून सुतारानं पळ काढला. हजेरी देऊन निळू येताच बाबा आपल्या घरी गेला. चार दिवस तसेच गेले.''

कथानक प्रसंगातील अन्य ठिकाणच्या संघर्षाचे चित्रण येथे प्रत्ययकारी शब्दांत केले गेलेले आहे. उदा.

''निळू मांग अर्धा गाव जाळून फरारी झाला होता. रानात फिरत होता. त्याने कुऱ्हाड घेऊन डोंगर धरला होता. त्या भागातील सर्व फरारी त्याला मिळाले होते. हे सर्व एकजिवानं डोंगरात राहत होते. प्रत्येक चोर चोऱ्या करून घर भरत होते. नि नाव निळूचं होत होतं. त्या भागात जेवढा गुन्हा होत होता तो निळूच करीत आहे. अशी सरकारात नोंद होत होती. सरकार निळूवर दात खात होतं. धरणं सुटलं होतं. बंदुका त्याचा शोध घेत होत्या.''

अशाच दुसऱ्या एका प्रसंगाचे चित्रण लेखकाने केले आहे.

''निळू निर्भय होता. भेडसगावचा खजिना लुटून आल्यापासून तर तो जिवावर उदार झाला होता. तो दररोज मशाल घेऊन गावात शिरत होता. भयाण रात्री मशालीच्या प्रकाशात तो भयंकर उग्र चेहरा पाहून लोक गांगरत होते. दाराच्या फटीतून निळूला पाहत होते आणि 'देवा ही पीडा पुढं घेऊन जा.' म्हणून देवावर भार घालीत होते. निळूनं गावावर जबर दहशत बसवली होती. तो मनात म्हणत होता, 'मी गरीब म्हणून दिवस काढले. रामराम केला. दूर बसून तंबाखू मागून घेतली. दूर बसून ती खाल्ली. पण गावानं त्याचा गैर अर्थ लावला. मला दुबळा समजून तुरुंग दाखवला. आता मी त्यांना मसणवटा दाखविणार.'

या प्रसंगमालिकांमधून अण्णाभाऊ साठे यांनी निळू मांगाच्या व्यक्तिरेखेतील सर्व छटा हुबेहूब रेखाटल्या आहेत.

सरकारी खजिना लुटून राजद्रोह करणारा निळू मांग हा भयंकर गुन्हेगार मानला जात होता. त्याला क्षमा नव्हती.

येथून पुढे या व्यक्तिचित्रणाला निराळीच कलाटणी मिळते; तो न्यायमूर्तींना सांगतो, ''सरकार, मायबाप मी निळ्या मांग. मी साजुरात तंबाखू मागून खाणारा. तुम्ही माझी किंमत तोफेच्या गोळ्याच्या किंमतीची ठरवल्याबद्दल मी तुमच्या पायावर डोकं ठेवतो.''

तोफेपुढं उभे राहून निळू मांग गतायुष्याचे अवलोकन करीत उद्‌गारतो, ''सायब, मी काय बोलू? आता मी मरणार. बोलण्यासारखं माझ्याकडं काईच न्हाय. तुमी मला लवकर वाटेला लावा. संपू द्या. एकदाची ही कटकट.''

निळू मांगाची शिक्षा रद्द होते. त्याच्या धैर्यामुळे आणि मृत्युला कवटाळण्याचा बेगुमान वृत्तीमुळं न्यायमूर्ती चक्रावतात. साजुरात पतरल्यानंतर निळूने कोयना नदीला उद्देशून काढलेले उद्‌गार त्याला वेगळ्या उंचीवर नेतात.

''आई, ह्यो निळ्या जगला. मेला असता तर हे तुझं पाणी मला अंतरलं असतं. आता मी सरळ माणसासारखा वागंन, माणसासारखा जगंन.''

सामान्य माणसाला असामान्यत्व प्राप्त करून देण्याची किमया लेखकाच्या लेखणीत असते, ''निळू मांग'' या व्यक्तिचित्रातून ते अधोरेखित झाले आहे. वास्तव जीवनदर्शनाचा उत्कृष्ट नमुना म्हणून या व्यक्तिचित्राकडे अंगुलिनिर्देश करता येईल.

## मोरणी

बाळूताई खरे यांनी विभावरी शिरूरकर हे टोपणनाव धारण करून १९३३ मध्ये 'कळ्यांचे निःश्वास' हा कथासंग्रह लिहिला. स्त्रीमुक्तीची चळवळ सुरू होण्यापूर्वी स्त्रीमनाचा वेध घेऊन त्याचा अंतःसूर धीटपणे व्यक्त करणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या. प्रौढ कुमारिकांचे प्रश्न आणि त्यांच्या मनातील आंदोलने यांना

त्यांनी मुक्तपणे वाट करून दिली. मराठी साहित्य विश्वातील हा महत्त्वाचा टप्पा ठरला. ''हिंदोळ्यावर'', ''विरलेले स्वप्न'' या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. नवमतवादी विचारसणीचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. त्यांचे वडील अनंतराव खरे, तसेच लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे आणि प्रा. श्री. म. माटे यांच्या विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता.

''मोरणी'' ही समस्याप्रधान कथा आहे. सद्यःकालीन प्रखर वास्तव त्या कथेत आलेले आहे. पुरुषाच्या पाशवी वासनेमुळे स्त्री त्याची शिकार होते. त्यामुळे स्त्री सामाजिक अवहेलनेची विषय होते. कुटुंबात आणि समाजात वावरताना अशा प्रकारच्या स्त्रियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. याबाबतीत पुरुष दोषी की स्त्री दोषी असाही प्रश्न कधी कधी निर्माण होतो. अशा विचित्र कात्रीत सापडलेल्या स्त्रीचे प्रातिनिधिक पात्र कल्पून लेखिकेने तिची करुण कहाणी समाजासमोर मांडली आहे.

मोरणीला, स्त्री-सुधारगृहात आणले जाते. त्यावेळची मोरणीची मनःस्थिती, तिच्या मनातील प्रक्षोभ आणि अवतीभोवती जगाकडे पाहणारी जळजळीत नजर खूप काही सांगून जाते.

तिच्या दुर्दैवी कहाणीमागे एक प्रकारची गूढता व्यापून राहिली होती.

या कथेचा केंद्रबिंदू असलेल्या मोरणीकडे लेखिकेने आपले सारे लक्ष केंद्रित केलेले आहे. ''मोरणी, तू कोणाबरोबर निघून गेलीस?'' ''कोणत्या गावाला गेलीस? कशी गेलीस?'' या प्रश्नांची सरबत्ती तिच्यावर होते. यावरून एकूण परिस्थितीचा अंदाज येतो.

मोरणीच्या एकाकीपणाचे चित्र येथे रेखाटले आहे.

''मोरणी एकटी बसे; नाही तर घुंघट घेऊन डोळे मिटून पडून राही. सगळ्या बायकांना मोरणीचे वागणे हा विषयच होऊन गेला होता. त्या बोलत, टोचून बोलत, फिदीफिदी हसत, पण मोरणी ते काही स्वतःला स्पर्शूच देत नसे. मला भीती वाटे की ही पळून जाणार. तिच्यावर सर्वांचीच सक्त नजर होती.- खुल्या अब्रूदार समाजातही जशी बोहोचक व्यक्ति-व्यक्तींची असते तशी आणि पहारेकऱ्यांची असते तशीही.''

मोजक्या आणि नेमक्या शब्दांत सामाजिक, मानसिकतेचे चित्र लेखिकेने रेखाटले आहे.

मोरणीच्या मनोवृत्तीचे चित्रण करताना निवेदिकेने म्हटले आहे.

''कमालीच्या शिस्तीत राहणाऱ्या मोरणीला रागावणार तरी कशावरून? ती लिहिणे, वाचणे तरी किती चटकन शिकली! ती आपले काम काडीइतके चुकत नसे. ती तोंडात चूळ घेऊन बसली होती एवढेच ना? ती पळून जाईल? पण छे! ती पळूनही जाणार नव्हती असे माझ्या लक्षात आले. मनी पळून जायचा प्रयत्न करीत होती, तेव्हा राक्षसाच्या बळाने तिचे मनगट पकडून मोरणीने तिला माझ्यापुढे आणून म्हटले, ''पळून जात होती! सांभाळा!''

मोरणी पंधरा वर्षांची होती तेव्हाही चलाख चुणचुणीत होती. शेती हाच जीवनाधार असलेल्या घरात ती आणि आई दोघीच राहत होती. मोरणी काळी-सावळी खरी, पण तिचे नाक, जिवणी आणि डोळे रेखीव होते. कुणालाही मोहात पाडील असे तिचे रूप. तिच्या आईला-सगुणीला -तिच्या रूपाबद्दल खूप अभिमान वाटायचा.

लेखिकेने तिचे व्यक्तिचित्र येथे समरसून उभे केलेले आहे.

मोरणीने आपल्यावर झालेला बलात्कार प्रसंगाचे निःसंकोचपणे वर्णन केले आहे. बळजबरीने आपल्या कुठे कुठे नेले, काय काय हाल केले हे तिने सांगितले आहे.

या समस्येतून बाहेर पडण्याचा मोरणीने खूप प्रयत्न केला. सामाजिक अन्यायाची चीड घेऊन वावरणाऱ्या राजकीय पुढाऱ्याशी निवेदिकेने संपर्क साधला. स्मरणपत्रे गेली. पण त्या महान पुढाऱ्याला उत्तर द्यायला उसंत मिळाली नाही. या उपहासात्मक वाक्यातून लेखिकेने राजकीय पुढाऱ्यांच्या दांभिक वृत्तीवर प्रकाश टाकला आहे.

पुढील निवेदनातून मोरणीच्या व्यक्तिचित्रातील उच्चबिंदू साधला आहे. ती किती मनस्वी वृत्तीची आहे याची त्यावरून कल्पना येते.

''पण मोरणी मानी होती. ती लवली नाही. वाकली नाही. ''सच्छिल

गृहिणीचे मानाचे स्थान मिळत नसेल तर ते मला नकोच आहे.' या बाबतीत तिने कधीच तडजोड कधीच पत्करली नाही. ती ज्या तन्मयतेने आईबरोबर राबली तितक्या तन्मयतेने ती घरात काम करीत असे. चोख, शिस्तीने, अबोलपणे– अन्तकरणाचा नि स्त्रीत्वाच्या भावनांचा तुकडा पुरा कापून! जोगिणीसारखी! आणि गृहातील त्या तडजोड करणाऱ्या सर्वांच्या माना तिच्या शब्दापुढे नमत!''

या व्यक्तिचित्राला दोन मिती लाभलेल्या आहेत. अभावग्रस्त कृषिसंस्कृतीची एक मिती असून दुसरी मिती त्या असहायतेचा लाभ उठवून आपली उद्दाम वासनापूर्ती करून घेणाऱ्या पाशवी प्रवृत्तीची. या परिस्थितीच्या पेचात स्त्री भरडली जाते. तिचे मूक आक्रंदन चालूच राहते. अंतर्मुखतेचा अनुभव देणारे वास्तववादी व्यक्तिचित्र विभावरी शिरूरकर यांनी येथे रेखाटले आहे.

## जमीला जावद

हमीद दलवाई यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. ते महत्त्वाचे समाजसुधारक होते. त्यासाठी अनेक आव्हाने त्यांना स्विकारावी लागली. सतत संघर्ष करावा लागला. स्वसमाजाचा द्रोह पत्करावा लागला. ते बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत होते. ते समाजमनस्क होते. तसेच अभिरुचिसंपन्न वाचक होते. अनेक विषयांत त्यांना गोडी होती. ते संवेदनशील लेखक होते. त्यांनी 'इंधन' ही कादंबरी लिहिली. त्याचे 'लाट' आणि 'जमीला जावद आणि इतर कथा' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. सामाजिक चळवळीत हिरिरीने त्यांनी भाग घेतल्यामुळे त्यांचे लेखनाकडे दुर्लक्ष झाले. पण त्यांचे जे साहित्य आज उपलब्ध आहे. त्यावरून त्यांच्या वाङ्मयीन गुणवत्तेची कल्पना येते. आपल्या परिसरातील मानसिकता, अंधश्रद्धा आणि रूढी यांविषयी वाचकाला विचारसन्मुख करायला लावणारे कथात्म साहित्य त्यांनी निर्माण केले.

'जमीला जावद' या दलवाईंच्या कथेतील केंद्रवर्ती व्यक्तिरेखा 'जमीला जावद' ही आहे. सुरुवातीच्या निवेदनातून तिच्या बहिरंगाची सर्वसाधारण कल्पना येते. ''जमीला जावद दिसायला फारशी सुंदर नव्हती, परंतु नखे रंगवलेला, बॉबकट केलेला, लिपस्टिक लावलेला, उंच टाचांचे बूट घातलेला आणि उंची

वस्त्रे परिधान केलेला तिचा देह किमान आकर्षकता निर्माण केल्याखेरीज राहत नसे. तिला व्यक्तिमत्त्व असे नव्हतेच. तिच्या सफाईदार इंग्रजीने, बोलायच्या विलक्षण मधुर पद्धतीने आणि सुहास्य वदनाने तिला ते प्राप्त झाले होते. त्यातून घडवले गेले होते. तिला याची जाणीव होती आणि ती या तीन गोष्टींना सतत जपत होती; त्या कायम ठेवून वागत होती.''

लेखकाने कौशल्यपूर्वक जमीला जावद हिच्या बहिरंगाबरोबरच तिचा अंतरंगशोध घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे. ती वाट मोकळी केली आहे हे लक्षात येते.

नव्याने ताब्यात घेतलेली केबिन आपल्या इच्छेनुसार आणि आवडीनुसार सजविण्याचा ती प्रयत्न करते. एकूण झोक-नोक पाहता त्यात दिखाऊपणाचा भाग अधिक असतो. निवेदकाला याविषयीची प्रतिक्रिया ती विचारते तेव्हा तो जेव्हा या रुक्ष सरकारी खात्यात तुम्ही या सजावटीने खरं म्हणजे नवे रंग भरले आहेत असे उत्तर देतो तेव्हा ती नुसतीच हसते.

''काही दिवसांनी वसंताची चाहूल लागली आणि जमीला जावदचा सारा नूर जणू पालटून गेला. झाडाझुडपांना फुटणाऱ्या पालवीसारखे तिच्या स्वभावाचे रंग खुलून जाऊ लागले. वाऱ्याने थरथरणाऱ्या पर्णांच्या हालचालींची गती तिच्या पायांना लाभू लागली. हवेतल्या ओसरणाऱ्या गारव्यासरशी तिची वृत्ती अधिक स्नेहार्द बनली.''

या निसर्गानुभूतीच्या साहचर्याने काव्यात्म संवदेनशीलतेने फुलून आलेल्या भाषाशैलीत लेखकाने तिच्या बदललेल्या आणि बहरलेल्या मनोवृत्तीच्या गहिऱ्या रंगाचे विलोभनीय दर्शन घडविले आहे. व्यक्तिचित्रणाबरोबरच पकड घेणाऱ्या निवेदनशैलीच्या बाबतीत हा लेखक किती कुशल आहे याची प्रचिती येते.

निवेदकाशी तिला आपले हृदगत सांगण्यासाठी सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करावेसे वाटतात. ऑफिसमध्ये रुजू झालेल्या दिवसापासून तिला दैनंदिनी लिहिण्याचा छंद जडलेला असतो. निवेदकाला जाणवलेल्या तिच्या व्यक्तित्वातील प्रसन्नतेचा ठसा तिच्या डायरीच्या पानापानांतून ओसंडत असतो. शोफर अब्दुलासाठी तिने त्यातील काही परिच्छेद वाहिलेले असतात. आपल्याला

पुरुषाच्या सहवासाचे, त्याचे आकर्षण निर्माण झाल्याची जाणीव तिला होत असते. आपल्या वैषयिक इच्छा-आकांक्षांचे प्रतिबिंब आपल्या या भावनांत उमटल्याची स्पष्ट कबुली तिने दिलेली असते. कम्युनिस्ट असलेल्या आणि एका युनियनचा सेक्रेटरी असलेल्या फैझशी तिची मैत्री जमलेली असते. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झालेले असते. समाजसंबंध खात्याने भरवलेल्या कुठल्या तरी परिषदेत त्याच्याशी तिचा परिचय झालेला असतो आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे ती भारलेली असते. तिने फैझशी लग्न करण्याचा निर्णय घेतलेला असतो. त्याला तिच्या वडिलाचां सक्त विरोध असतो. शोफर अब्दुल याच्यामार्फत ते तिच्यावर पाळत ठेवत असतात. ते त्याच्यावर मारेकरी घालतात. फैझ जखमी होतो. त्यातून तो बरा झाल्यावर दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतलेला असतो. पण अपयशी झालेल्या भावनेने जमीला जावद आपल्या घराकडे परतते. तिचा प्रियकर फैझला अनिष्ट राजकीय हाचालींच्या आरोपावरून प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या आरोपावरून अटक झालेली असते. जमीला जावद हिच्या साऱ्या सुखस्वप्नांचा चुराडा झालेला असतो. तिच्या मनोवृत्तीतील सारे चैतन्य लोप पावलेले असते.

मुस्लीम समाजात असलेल्या जाचक बंधनांमुळे जमीला जावद आणि फैझ यांच्या विवाहाला विरोध तसेच विशिष्ट राजकीय परिस्थितीच्या पेचामुळे फैझला होणारी कैद हे या कथेतील संघर्ष प्रसंग. त्यांचे प्रत्ययकारी चित्रण 'जमीला जावद' या कथेत हमीद दलवाई यांनी केले आहे. जमीला जावद ही व्यक्तिरेखा उठावदार झालेली आहे.

## यंकटअण्णा

भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या दहा-पंधरा वर्षानंतर राजकीय परिस्थितीत झालेला बदल स्पष्टपणे दिसू लागला. ग्रामपंचायतींच्या रूपाने गावचा कारभार चालविण्याची संधी स्थानिक जनतेला मिळाली. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही. ग्रामीण जीवन राजकारणग्रस्त झाले. सत्तास्पर्धे साठी हेवेदावे, तंटे-बखेडे वाढले. व्यक्तिजीवनात तसेच समाजजीवनात संघर्षाचे प्रसंग वाढले. सामाजिक आणि आर्थिक स्थित्यंतरामुळे मानसिकतेत आणि जीवनशैलीत फरक होत गेला. याचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात पडू लागले.

निवेदनशैली, संवाद, व्यक्तिचित्रण आणि अनागर भाषा यांच्या संयोगातून या बदलत्या ग्रामीण परिसराचे वास्तववादी चित्रण होऊ लागले. जीवनातील ताणतणाव आणि भावनात्मक आंदोलने कथा-कादंबरीत दिसू लागली.

या एकूण पार्श्वभूमीवर कथाकार व. बा. बोधे यांचे 'यंकटअण्णा' हे व्यक्तिचित्र अभ्यासायचे आहे.

१९६० च्या आसपासचा हा काळ आहे. गावचे सरपंच असलेले व्यंकटराव पाटील. सारा गाव त्यांना आपुलकीने यंकटअण्णा म्हणायचा. ते जसे सरपंच तसेच पोलीसपाटीलदेखील होते. अस्सल रांगड्या वृत्तीचे तसेच प्रेमळ.

यंकटअण्णांच्या बहिरंगाचे आणि अंतरंगाचे चित्र मोजक्या शब्दांत व. वा. बोधे यांनी रेखाटले आहे. त्यावरून त्यांच्या स्वभावविशेषांची कल्पना येते.

''मराठी चित्रपटातील दादा साळवींची सुधारलेली आवृत्ती म्हणजे यंकटअण्णा लय रुबाबदार दिसत. बलदंड प्रकृती. सोन्या बेडकागत गालफाडं वर आलेली. अंग धोदरलेले. नेहरू शर्ट, धोतर, डोक्याला टोपी असा अण्णांचा साधा वेष असायचा. जगणं ऐसपैस. आवाज बुलंद पहाडी. बोलायला लागले की माईकची गरज त्यांना भासत नसे. अस्मानकडा ढासळल्यासारखा आवाज कडाडत यायचा.''

त्याचे आणखी एक गुणवैशिष्ट्य लेखकाने अधोरेखित केले आहे.

''नाना पाटलांच्या पठडीत ते वाढले असावेत. पण क्रांतिकारकाचा आव त्यांनी कधी आणला नाही. हा देश नाना पाटलांचा आहे. उभी हयात देशासाठी वेचलेल्या सत्त्वशील माणसांची आहे; अशीच त्यांची धारणा होती. नाना पाटलांसारखी अण्णांची ग्रामीण भाषेवर हुकूमत होती.''

सज्जन माणसांनाही गावात काही विरोधक असतात तसेच यंकटअण्णालाही होते. तसेच डॉ. पोरे यांच्यासारखे मित्रही होते. गावात फासेपारधी भिक्षा मागायला आले तर त्यांना तुम्ही चोरीबिरी कराल तर एकेकाला तुरुंगात टाकीन असे ते म्हणायचे. अण्णा सुधारणावादी होते. ते काळाच्या पुढे होते. गावात शिक्षणप्रसार व्हावा असे मानणाऱ्यापैकी ते एक होते. ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र ऑफीस असावे, क्रीडांगण असावे, लोकांच्या करमणुकीसाठी ग्रामपंचयातीत रेडिओ असावा. एखादे

वाचनालय असावे असे त्यांना वाटायचे. गावात त्यांना मान होता. प्रतिष्ठा होती. माळकऱ्यांवर त्यांचा राग होता. कीर्तनकारांच्या विसंगत वागणुकीची त्यांना चीड यायची. तरुण मुले वाह्यातपणे वागली तर ते त्यांना बुटाने मारत. त्यांचा वचक होता. गावातील दारूचा व्यवसाय त्यांनी बंद केला. मांग-रामोशांना त्यांनी वठणीवर आणले. त्यांच्यावर टीका करणारे काही महाभाग होते. पण कोणाची भीडमुर्वत न बाळगता ते स्वयंप्रेरणेने  जगत राहिले. गावचे पाटील असूनही स्वतःच्या म्हशी ते स्वतः पाण्यात घालत. बैलगाडी जुंपत. खांद्यावर आसूड टाकून बाजाराला जात. कुणाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी शाळा उभारली. तीन खोल्या उभारल्या गेल्या. एक वर्ग शेवटपर्यंत लिंबाच्या झाडाखालीच भरत राहिला.

मारुतीच्या देवळापुढे एक छोटी खोली बांधून त्यात ग्रामपंचायतीचा रेडिओ ठेवला होता. गावचे खटले ते सहजतेने निकालात काढीत. गावासाठी त्यांनी वाचनालय सुरू केले. निवेदक म्हणतो.

''अण्णांचा मळा हा माझ्या लेखी कौतुकाचा विषय होता. १९५० पासून १९७५ पर्यंत पाटालांचा मळा जसा फुलत राहिला. तसे पाटीलही फुलत राहिले. गाव पाटलांना मानायचं. त्यांनी फेकलेला शब्द गाव सोनं झेलल्यागत झेलायचं''

अनेक प्रकारच्या भाज्या यंकटअण्णांनी आपल्या मळ्यात फुलविल्या. अण्णा हे केवळ बांधावरचे शेतकरी नव्हते. स्वतः ते शेतीत राबणारे होते. मेथी, वांगी, गाजरे, आणि पपया भरून ते बैलगाडी कोरेगावला नेत. त्यावर त्यांनी भरपूर पैसा कमावला. पण कधी चैन केली नाही. गावची जत्रा असली की यंकटअण्णांना झोप लागत नसे. सगळ्यांना जमवून ते उत्साहाने जत्रेत भाग घ्यायचे. चैतन्य निर्माण करायचे. पैलवानाचे लाड पुरवायचे. तामसगिरांना जेवण मिळावे म्हणून प्रयत्नशील असायचे.

अनेक तपशिलांनी भरलेले यंकटअण्णाचे हे व्यक्तिचित्र रंगतदार झाले आहे. अनलंकृत शैलीत व. बा. बोधे यांनी ते अत्यंत आत्मीयतेने आणि समरसतेने रेखाटले आहे. ते अतिशय हृद्य झाले आहे. ग्रामीण बोलीतील संवाद आल्यामुळे तो परिसर आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

''अजून शंभर वर्षे तरी गाव यंकटअण्णांना विसरू शकणार नाही.'' या

शब्दांत केलेला या व्यक्तिचित्राचा शेवट खूप काही सांगून जातो.

## दगडूमामा

उत्तम कांबळे हे अनुभवी संपादक, विचारवंत आणि साहित्यिक आहेत. त्यांची समाजमनस्क वृत्ती त्यांनी केलेल्या विविधांगी लेखनातून दिसून येते. त्यांचे वास्तवाधिष्ठित लेखन अंतर्मुख व्हायला लावणारे आहे.

व. बा. बोधे यांच्या यंकटअण्णा या व्यक्तिचित्राप्रमाणे 'दगडूमामा' हेही एक प्रभावी व्यक्तिचित्र आहे. या व्यक्तिचित्रातील निवेदन आणि संवाद नागर भाषेतील आहेत. प्रवाही निवेदन हा या व्यक्तिचित्राचा गुणविशेष आहे.

''दगडूमामा'' च्या व्यक्तिरेखेत रहस्यमयता भरून राहिली आहे. कोणत्या कारणाने तो गुन्हेगारीकडे वळला याविषयीचे स्पष्ट निवेदन या कथात्म व्यक्तिचित्रात आलेले नाही. फ्लॅशबॅक पद्धतीने या कथेतील निवेदन आलेले आहे. निवेदकाने दगडूमामाचे प्रेत ओळखलेले असते. पण त्यासंबंधी तो काही बोलायला धजत नाही. वसतिगृहात पडल्या पडल्या त्याला अपराधीपणाची जाणीव होते. त्याची अस्वस्थता वाढते. दगडूमामाच्या गतजीवनाचा पट त्याच्यासमोर उभा राहतो. त्याच्या स्वभावातील गुण आणि दुर्गुण त्याला कळलेले असतात. मानवी जीवनातील अनाकलनीयता दगडूमामाच्या व्यक्तिजीवनातून दिसून येते. निवेदकाच्या आई-वडिलांच्या भांडणात दगडूमामा मध्ये पडतो. त्याच्या आईवर हात टाकणाऱ्या वडिलांना तो आवरतो. त्यामुळे त्यांच्या जीवनाचा मार्ग निर्वेध होतो. नात्याने तो त्याच्या आईचा भाऊ नसून त्याच्या सत्कृत्यामुळे तो तिचा भाऊ झालेला असतो. निवेदकाचा तो मामा ठरतो. त्याच्या अभ्यासासाठी तो खूप प्रोत्साहन देतो. ''खूप मोठा हो'' असे तो सांगतो. पण त्याचे वैयक्तिक जीवन अनेक प्रकारच्या विसंगतींनी व्यापलेले आहे. मानवी जीवनाची हीच खरी शोकांतिका आहे. हे विदारक सत्य दगडूमामाच्या व्यामिश्र स्वरूपाच्या व्यक्तिरेखेतून उत्तम कांबळे यांनी दाखवून दिले आहे.

या व्यक्तिचित्रात एके ठिकाणी त्याची व्यक्तिरेखा अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायकाच्या व्यक्तिरेखेसारखी आहे असे लेखकाने म्हटले आहे. ते

तंतोतंत खरे आहे. दगडूमामाच्या अंतरंगातील सरळ भाव, बेगुमान वृत्ती आणि दुसऱ्यांना दहशत वाटायला लावणारे वर्तन मुलखावेगळे आहे. निवेदकाच्या वडिलांना कसाबासारखा वागताना अडविणारा दगडूमामा, सर्वत्र दरोडे घालणारा पण गरिबांना न सतावरणारा दगडूमामा अशी त्याची विविध रूपे लेखकाने तपशिलात जाऊन रंगविली आहेत.

त्याच्या बहिरंगाचे चित्रही लेखकाने रंगविले आहे.

''दगड्या अंगापिंडाने दगडासारखाच. पहिलवान शोभावा असा. त्याची उंची फार नव्हती. डोळे बारीक होते. बहुतेक वेळेला ते लालेलाल असायचे. त्याच्या चेहऱ्यावर उजव्या बाजूच्या गालावर मोठा आवळा होता. पत्ते खेळताना तो या आवळ्यावर पत्ते घासून विचार करायचा. दोन्हीही गाल फुगलेले. नाक किंचित नकटं. ओठावर पिळदार मिशा. डाव्या गालावर कसला तरी व्रण. दोन्हीही हातांच्या बोटांची नखं वाढलेली. गळ्यात भला मोठा ताईत. पाहताक्षणीच धाक वाटावा असा त्याचा चेहरा होता. दगडूमामाला ना घर ना दार. आई-वडील लहानपणीच देवाघरी गेलेले. घरात दगडूमामा एकटाच राहायचा. भरपूर दारू प्यायचा. मटण खायचा. दुपारी आणि संध्याकाळी पत्ते खेळायला समाजमंदिरात यायचा. जुगार खेळण्यासाठी लोकांकडे पैसे नसले, की तो स्वतः उधारीवर पैसे द्यायचा. तीन पत्त्यांच्या, पाच पत्त्यांच्या आणि रमीच्या डावात तो तासन्‌तास रंगायचा.''

या प्रत्ययकारी वर्णनातून बहिरंगाबरोबर त्याच्या जीवनशैलीची ओळख पटते. व्यक्तित्वातील रांगडेपणा कळतो.

व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी माणसे मधील कोंडिबा गायकवाड या व्यक्तिरेखेशी समांतर जाणारी ही व्यक्तिरेखा आहे.

## मुंबईचा चित्रकार

अरुण खोपकर हे अनुभवसंपन्न पत्रकार, लेखक, तसेच अभिरुचिसंपन्न कलासमीक्षक आहेत. साहित्याशी निगडित असलेल्या चित्रकला, शिल्पकला

आणि संगीत या अन्य कलांचा आंतरसंबंध समजून घेतल्याशिवाय साहित्य समृद्ध होत नाही. याचे भान त्यांना आहे. 'मुंबईचा चित्रकार' मधील सुधीर पटवर्धन या चित्रकाराचे व्यक्तिचित्र रेखाटताना या विषयाची पार्श्वभूमी त्यांनी ज्या प्रगल्भ जीवन जाणिवेतून सांगितली आहे. तिच्यामधून साहित्य, चित्रकला व अन्य कला यांच्या संवर्धनप्रक्रियेला पोषक असे सांस्कृतिक पर्यावरण लागते असे सिद्ध होते. ही मूळ मीमांसा त्यांनी संक्षिप्त स्वरूपात केलेली असली तरी ज्या समकालीन परिप्रेक्ष्यात सुधीर पटवर्धनांसारखा चित्रकार चित्रकलेतील नवीन प्रवाह आत्मसात करून आत्मविश्वासाने उभा राहिलेला आहे. त्याची तोंडओळख करून घेणे आवश्यकच होते. मुंबई हे केवळ महानगर नाही; विविध उद्योगधंद्यांचे ते केंद्र खरे; पण भौतिक विकासाची ती पोतडी नाही. नव्या विचारांचे स्वागत करणारे ते महाद्वार आहे. नवचित्रकलेची अभिवृद्धी ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रेरणांमधून झाली आहे, त्या घटकांचा थोडक्यात ऊहापोह करून अरुण खोपकरांनी सांस्कृतिक पर्यावरणाचे चित्र उभे केले आहे.

या पुस्तकातील अन्य व्यक्तिचित्रांप्रमाणे सुधीर पटवर्धन या नामवंत चित्रकाराचे हे व्यक्तिचित्र नाही; पण वस्तुचित्र जरूर आहे. भारतीय साहित्य-परंपरेत अपूर्ववस्तुनिर्माणक्षमता हे प्रतिभेचे व्यवच्छेदक लक्षण मानलेले आहे. त्याच्याशी असे कोन साधून 'वस्तुचित्र' म्हटले आहे. साधनांच्या बळावर चित्रकला उभी राहत नाही. साधनेच्या बळावर ती सक्षम होते. सामाजिक परिणाम असलेली स्वतंत्र प्रज्ञाप्रतिभेतून आलेली सुधीर पटवर्धनांची चित्रकला अरुण खोपकरांना अनन्यसाधारण वाटते. अनेक वर्षांच्या सौहार्दामुळे आणि त्यांच्या जीवनातील चढउतार लेखकाने जवळून पाहिल्यामुळे त्याला हे व्यक्तिदर्शन घडविणे शक्य झालेले आहे.

अरुण खोपकरांनी सुधीर पटवर्धनांचा थोडक्यात जीवनवृत्तांत सांगितलेला आहे. पटवर्धन हे पेशाने डॉक्टर, त्यातही पुन्हा क्ष-किरणतज्ज्ञ डॉक्टर. त्यांचा व्यवसायानुभव आगळ्या-वेगळ्या प्रकारे येथे व्यक्त होतो. शरीरचित्रणाबरोबर सामाजिक संदर्भ, चित्रांतून प्रतिबिंबित व्हायला लागतो. त्यांच्यावर मार्क्सवादी विचारसणीचा प्रभाव आहे. 'सायकोॲनालिसिस' सारख्या मानवी मनाचे दर्शन घडविणाऱ्या शास्त्राची जाण आणि जाणीव त्यांना आहे. वधिष्णू कलाजाणिवेच्या

वातावरणात पटवर्धनांची कला वाढीस लागली. भूपेन खक्कर, नलिनी भालानी, जोगेन चौधरी, गुलमहंमद शेख आणि व्हिवान सुंदरम् यांच्यासारखे चित्रकार याच काळात आपला विशेष आणि सामायिक कलाविष्कार करत होते. जहांगीर आर्ट गॅलरीत अनेक चित्रकारांचे प्रदर्शन या काळात भरले. याचा उल्लेख अरुण खोपकर यांनी सूत्रमय आणि समर्पक शब्दात केला आहे.

''विविध रेषा एका बिंदूत मिळाल्या आणि तो बिंदू भारतीय आधुनिक कलेचा एक शिखरबिंदू ठरला.''

सुधीर पटवर्धनांच्या चित्रकलेतील निसर्ग कसा आहे? हा १९८० च्या आसपासचा मुंबईच्या यांत्रिक संस्कृतीतील निसर्ग आहे. बेंद्रे, रामकुमार, लक्ष्मण श्रेष्ठ, सबावाला आणि पद्मसी यांच्या निसर्गापेक्षा तो वेगळा आहे. मागच्या कालखंडातील हिंस्त्र भांडवलाने लचके तोडणारा निसर्ग होता. तो दूषित होता. विषारी होता. निसर्गाच्या चित्रांबरोबर नगरचित्रेही सुधीर पटवर्धनांनी रेखाटली. अशा प्रकारच्या चित्ररेखाटनासाठी अखंडित पायपीट करावी लागते. त्यांच्या चित्रांतून ती जाणवते. कधी पहाटेचा प्रकाश कधी माध्यान्हीचा तर कधी मावळत्या सूर्याच्या किरणांचे रेखाटन येथे आढळते. कालचक्राला छेद देणारी ही चित्रकला कथनकलादेखील आहे. आधुनिक चित्रकला घनतेचा अनुभव देते. सेझानच्या शोधाचा पटवर्धन विविध प्रकारे वापर करू लागले. त्यांनी तो प्रवाह चांगल्या प्रकारे आत्मसात केला. कष्टकऱ्यांना मानाची जागा देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. हा मार्ग त्यांनी विषयातून न शोधता, घरातून आणि चित्रकलेच्या अभ्यासातून शोधला.

त्रैमितिक जग आणि कालाची चौथी मिती यांचे एकसमयावच्छेदे चित्रण ते करतात. क्वांटम् मेकॅनिक्समध्ये येणाऱ्या वेव्ह आणि पार्टिकलच्या द्वैतांसारखे त्याचे स्वरूप १९ व्या शतकाच्याअखेरीस आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी पाश्चात्त्य चित्रकलेत हे द्वैत येऊ लागले होते. सेझानने त्या दिशेने अनेक प्रयोग केले. पटवर्धनांच्या ऐंशीच्या दशकातल्या चित्रांपैकी असणाऱ्या अनेक प्रेरणांपैकी सर्वात महत्त्वाची प्रेरणा ही सेझानची होती असे लेखकाला वाटते.

सुधीर पटवर्धनांच्या चित्रांचे अवलोकन केल्यानंतर अरुण खोपकरांना त्यातून

चित्रवृत्ती आणि शिल्पवृत्ती तर जाणवतेच. शिवाय स्पर्शवृत्ती जाणवते. त्यांच्या चित्राला स्पर्श करावासा वाटतो. पटवर्धनांनी टेराकोटावर केलेले काम हा या शोधातील आणि विकासप्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या चित्रकाराला इतिहासाचे भान आहे. त्यांच्या चित्रांत समानतेचा आग्रह आहे. हा समाजाभिमुख कलाकार आहे असे अरुण खोपकरांचे प्रतिपादन आहे. पद्माकर कुलकर्णी यांच्या लोकवाङ्मयगृहाने प्रकाशित केलेल्या सुधीर पटवर्धनांच्या चित्रांवरील पुस्तकात संतसमागमाचे अंतःसूत्र अधोरेखित केले आहे.

सुधीर पटवर्धनांच्या व्यक्तिमत्त्वाशी आणि कलातत्त्वांशी समरस होऊन जाणकारीने लेखकाने साकार केलेले हे शब्दचित्र आहे.

## हिरा

इंद्रजित भालेराव यांची मूळ प्रकृती कवीची आहे. कृषिसंस्कृतीशी पूर्ण एकरूप होऊन त्यांनी कविता लिहिली. अस्सल अनुभूतीची ती कविता आहे. ग्रामजीवन रेखाटणे हा त्यांच्या अनुभूतीचा गाभा. तेथील मातीशी आणि माणसाशी ते पूर्णपणे एकरूप होतात. ते कल्पनाविश्वात रमणारे नाहीत. प्रखर वास्तवाला भिडून जिव्हाळ्याविषयी लिहिणे हा त्यांचा स्थायिभाव. कवितेप्रमाणेच त्यांनी लिहिलेले कसदार गद्यलेखन वाचकांच्या पसंतीला उतरले. 'भिंगुळवाणा' ही कादंबरी त्यांनी लिहिली. 'घरीदारी' हा त्यांचा व्यक्तिचित्रांचा संग्रह 'गाई घरा आल्या' हे त्यांचे ललित गद्यात्मक पुस्तक प्रसिद्ध झाले.

या पुस्तकातील 'हिरा' हे व्यक्तिचित्र काळजाला स्पर्श करणारे आहे. अभावग्रस्त अशा कैकाड्यांच्या वस्तीतील हिरा ही मुलगी. निरागस वृत्तीची. तिला आवडीचा पदार्थ खायला मिळणे दुरापास्त. आईवडील तिचे कोणत्याही प्रकारचे लाड पुरवू शकत नाहीत. कैकाड्यांच्या पालातील हालअपेष्टा सहन करीत जीवन कंठणे तिच्या वाट्याला येते. तिच्याविषयी निवेदकाला वाटणारी अनुकंपा, त्यामुळे तिच्याशी जुळून आलेले भावबंध आणि समाजकंटकांनी पाल नष्ट केल्यावर तिची होणारी ताटातूट आणि त्यांनतर निवेदकाच्या जिवाची होणारी घालमेल ही सारी प्रसंगचित्रे इंद्रजित भालेराव यांनी आपल्या ओघवत्या शैलीत,

प्रांजळपणे रेखाटली आहेत. त्यातून हिराची व्यक्तिरेखा उठून दिसते. मराठीतील एक संस्मरणीय व्यक्तिचित्र म्हणून 'हिरा'चा उल्लेख करावा लागेल.

अवतीभोवतीच्या वातावरणाचे रंगरूप असलेली, वृत्तिविशेषांसह सामोरी येणारी आणि अंतरंगातील भाव सूचित करणारी हिरा पहिल्यांदा भेटते ती या स्वरूपात. ''एके दिवशी हा खेळ सुरू असताना सावळ्या रंगाची, विस्कटलेल्या केसांची, मळका-फाटका झगा घातलेली, हरिणीसारख्या डोळ्यांची आणि सावळ्या रंगामुळं अधिकच उठून दिसणाऱ्या पांढऱ्या दातांची एक सात-आठ वर्षाची, म्हणजे माझ्याच वयाची एक मुलगी हा सगळा खेळ दूर उभा राहून पाहत होती. तिला रांगेत उभं रहावंसं वाटत होतं. खेळात सामील व्हावंसं वाटत होतं. का कुणास ठाऊक मलाही तिनं खेळातं सामील व्हावं, असं तीव्रतेने वाटलं. इतक्यात पलीकडून 'हिरे' अशी हाक आली आणि झिंज्या उडवीत ती मुलगी हाकेच्या दिशेनं पळाली. ती कैकाड्यांची मुलगी आहे आणि तिचं नाव हिरा आहे हे या प्रसंगावरून माझ्या आपोआपच लक्षात आलं. कैकाड्यांच्या पालातून तिला हाक आली होती. सुगीचे दिवस तोंडावर आलेले पाहून हे कुटुंब इथं आलं होतं. वर्षभराची कमाई याच मोसमात त्यांना करून घ्यायची होती. त्यासाठी नक्कीच दोन महिने त्यांचा मुक्काम इथं असणार. त्यासाठी तात्पुरतं पालही त्यांनी उभारलं होतं.''

अनुभवविश्वाला आवश्यक असलेली सामग्री, मांडणीचा साक्षेप आणि माणुसकीचा ओलावा असलेली भाषाशैली इंद्रजित भालेरावांपाशी असल्यामुळे सुरुवातीला या व्यक्तिचित्रात रंग भरत जातात. आणि पुढील निवेदन प्रवाहामुळे हे व्यक्तिचित्र अधिकाधिक सुस्पष्ट होत जाते. 'हिरा' हे केवळ व्यक्तिचित्र नाही. त्याला कथात्म वळण आहे. घटना-प्रसंगामधून कथानक पुढे सरकते.

या व्यक्तिचित्रातील एक हृदयद्रावक प्रसंग असा आहे की हिरा निवेदकाच्या उकंड्यावर कचरा विचकत असते. तिला काय शोधतेस म्हणून विचारल्यावर ती शेंगदाणे शोधत असल्याचे सांगते. निवेदक धावतच घरी येतो. चड्डीचे दोन्ही खिसे भरतो. सर्वांच्या नकळत शेंगदाणे हिराला नेऊन देतो. त्याची आई त्याच्यावर एकदा खेकसतेदेखील. 'आता पुन्हा शेंगा खाऊ नकोस! रात्री पोट दुखायलंय

म्हणून उठलास तर मी मारीन!' नंतर शेंगा फोडणी सुरू असेपर्यंत निवेदक रोज शेंगा चोरून हिराला नेऊन देत असतो. एकदा खरा प्रकार उघडकीस येतो. वहिनी पुढे म्हणतात, ''बायकोची लई माया येती नाही का? रोज शेंगा नेऊन देता, बरं हाय मातर!'' निवेदक सांगतो.

''अगोदरच हिरीचं आणि माझं दिवसभर सोबत राहणं. ती शाळेत नसून जातीची नसून इतकं जवळ येणं हा चेष्टेचा विषय झाला होता. आता तर सरळ–सरळ वहिनी मला हिरीचा नवरा म्हणून चिडवू लागली. यात आई–बहिणीही सामील झाल्या. रात्रीच्या गप्पांत विनोदासाठी माझा वापर होऊ लागला.''

पण निवेदक आणि हिरा यांमधील प्रेमाचे अनामिक नाते मुलखावेगळे होते. ते केवळ निवेदकालाच माहीत होते. लौकिक पातळीवर त्याला नवरा–बायकोच्या नात्याने ओळखणे चुकीचे होते असे त्याला वाटते. शेंगांबरोबर तो हिराला खारवड्या, कुरवड्या, पापड, ऊस, वाळकं, टहाळ इ. आदिवासींना न मिळणाऱ्या वस्तू आणून देत असतो. आई–वडिलांच्या समक्ष हिरा निवेदकाला मध आणून देत असते. कधी हिराचा बाप मासे, खेकडे व खडोळ्या पकडून आणत असतो. सगळेजण मिळून ते भाजून खात असतात.

एकदा एक दुर्धर प्रसंग कैकाड्यांच्या पालावर कोसळतो. काही व्रात्य मुले पालातील सामान बाहेर फेकतात. सगळे पाल नष्ट करून टाकतात. हिराच्या आई–वडिलांचा संसार उघड्यावर पडतो. फुकटात मागितलेली खेळणी हिराच्या आईने दिली नाहीत. त्याचा हा परिणाम असतो. हिराच्या पालावर रडारड चाललेली असते. कुणीही समजून घेण्याच्या मनःस्थितीतत नसतो. निवेदक सकाळी उठून पाहतो तेव्हा हिराच्या घराची राखरांगोळी झालेली त्याला दिसते. रातोरात हिरा आणि तिच्या आईवडिलांना गाव सोडून जावे लागते.

हिराच्या आठवणीने निवेदकाचे हातपाय गळून जातात. तिची आता कायमची ताटातूट होणार या विचाराने तो मुसमुसून रडतो. आईला वाटते याला काही तरी झालंय. वेदेनेने हा रडत आहे. पण वस्तुस्थिती निराळी असते.

या व्यक्तिचित्राचा शेवटही कारुण्यजनक स्वरूपाचा झालेला आहे. मानवी करुणेचे हृद्य आणि परिणामकारक चित्र या व्यक्तिचित्रात लेखकाने रेखाटले आहे.

लेखकाचे व्यक्तिमत्त्वही येथे प्रकट झाले आहे. प्रेम आणि सहानुभूती त्यात सामावलेली आहे.

## बाबा मास्तर

दि. बा. पाटील यांनी बाबा मास्तरांचे व्यक्तिचित्र उत्तमरीत्या रेखाटले आहे. कुणाच्याही मनात आदराची भावना निर्माण व्हावी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. लेखकाने सुरुवातीला त्याच्या बहिरंगाचे आणि स्वभावाचे थोडक्यात चित्र रेखाटले आहे.

''स्वभावानं अत्यंत नम्र व मितभाषी असलेले बाबा मास्तर एकदम किरकोळ शरीरयष्टीचे होते. सर्वसाधारणपणे पावणेसहा फूट उंचीचे, डोक्यावर सदैव पांढरी टोपी घालायचे. दाढीमिशा गुळगुळीत केलेल्या. म्हातारपणाचं वय झाल्याने गालफाडे आत ओढलेली. त्यामुळे डोळ्यांखालची ढोपरे वर दिसायची. डोळ्यावर डबल भिंगाचा काळसर दांडीचा चष्मा असायचा. अंगावर पूर्ण बाह्यांचा तीन बटणांचा लांब खाली गुडघ्यापर्यंत आलेला शर्ट. त्या शर्टाची गळ्याजवळची बटणे लावलेली असयची. खाली थोडीशी घळघळीत विजार. पण ती घोट्यापर्यंत वर उचललेली. पायात एकाच आडव्या पट्ट्याचं काळं चप्पल. स्वारी मध्यमवर्गीयांच्यात शोभून दिसणारी वाटायची. कारण त्यांच्या डाव्या हातात सदैव उघडलेली काळी छत्री असायची. ती उन्हाळ्या पावसाळ्यात त्यांच्या डोक्यावर धरलेली दिसायची. उजव्या हातात दोन बंदांची पांढरी पिशवी असायची. त्या पिशवीत नेहमी एखादं वर्तमानपत्र आणि एक दोन पुस्तकं असायची.''

त्यांच्याकडचे वर्तमानपत्र कुणी वाचायला मागितले की ते तत्काळ द्यायचे. ते वाचून पूर्ण होईपर्यंत थांबायचे. त्यांना घाई अशी नव्हतीच. शिवाय आपल्याकडील वर्तमानपत्र दुसऱ्याने वाचल्याचेच त्यांना समाधान वाटायचे. रिकामटेकड्या फुकट्या वाचकांवर ते कधी रागवत नसत.

या एकंदर वर्णनातून मागचा विशिष्ट कालखंड उभा राहतो. मध्यमवर्गीयांच्या गरजा त्या काळात मर्यादित होत्या. साधेपणाने जीवन जगावे असा संकेत पाळला

जात असे. ध्येयवादी जीवनदृष्टीचा प्रभाव त्या काळावर होता. मध्यमवर्गीय जीवनशैलीचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्तिरेखा म्हणून बाबा मास्तरांकडे पाहता येईल. त्याचे यथातथ्य चित्रण ''बाबा मास्तर'' या व्यक्तिचित्रात लेखकाने केले आहे. हे वाचताना मागच्या पिढीतील वि. द. घाटे यांचे ''एक कारकून'' हे व्यक्तिचित्र आठवते.

बाबा मास्तरांनी आपले आयुष्य मराठी शाळेत शिक्षकी पेशात घालवल्यामुळे ते नेमस्त व निष्पाप वृत्तीचे दिसायचे. वार्धक्यामुळे त्यांच्या पाठीला थोडेसे कुबड आल्यासारखे वाटायचे. चाकोरीबद्ध जीवन जगलेल्या मास्तरांचे मूळचे नाव बर्हिजी पाटील होते. पण लोक त्यांना आपुलकीने बाबा मास्तर म्हणायचे. पुस्तकांशी त्यांची घनिष्ट मैत्री होती. त्यांच्या घरासमोरच्या शेतात नारळीची बाग होती. विविध प्रकारच्या फुलझाडांची त्यांनी लागवड केली होती. ही बाग म्हणजे बागेत येणाऱ्या मुलांचा ''पिकनिक पॉईंट'' होता. सारी मुले पाणी पिण्यासाठी बाबा मास्तरांकडे यायची. संतप्रवृत्तीच्या बाबा मास्तरांनी ग्रंथ प्रसारासाठी ''श्रीशिवाजी वाचनालय'' सुरू केले होते. त्याला फारसे सरकारी अनुदान मिळत नसे. म्हणून लग्न समारंभाच्या ठिकाणीही ते देणग्या मिळविण्यासाठी जात असत. अशा प्रकारे मोठ्या जिकीरीने बाबा मास्तरनी वाचनालय चालवले होते. त्यांनी भाड्याच्या खोलीत वाचनालय सुरू केले. त्यांचे ग्रंथालयाचे स्वप्न साकार होऊ शकले नाही.

बाबा मास्तरांनी सुरू केलेल्या वाचनालयाच्या निमित्ताने निवेदकाने समांतरपणे आपला वाचनाचा प्रवास आणि प्रगतीचा विकास यासबंधीचे निवेदन केले आहे ते अत्यंत वाचनीय आहे. अनेकांना ते आपल्या मंतरलेल्या दिवसांत फिरवून आणील. अनेक आठवणींची ओंजळ निवेदकाने येथे समरसतेने रिकामी केलेली आहे. वाचनाभिरुची वाढविणारा निवेदक स्वतःच ग्रंथपाल झालेला आहे. लेखक झालेला आहे. तो कृतज्ञतेने उद्‌गारतो, ''बाबा मास्तरांनी गावाला सुसंस्कृत चेहरा दिला...त्यांच्या चांदोबानेच भविष्यात माझ्यासारखा साहित्यिक घडला...त्यांचे या गावावर फार मोठे उपकार आहेत.''

एका सरळमार्गी जीवनाचे तन्मयतेने रेखाटलेले हे व्यक्तिचित्र अतिशय हृद्य झालेले आहे. मूल्ये हरवलेल्या व्यामिश्र जगाचा स्पर्श बाबा मास्तरांच्या

जीवनमार्गाला झालेला नाही. त्यांच्या आयुष्याची सरळरेषा सरळच राहिलेली आहे. निरलंकृत भाषाशैलीदेखील प्रभावी कशी ठरू शकते. याचा उत्तम नमुना म्हणून ''बाबा मास्तर'' या व्यक्तिचित्राकडे बोट दाखवता येईल.

## दादासाहेब वस्ताद

दि. बा. पाटील यांच्या बाबा मास्तरांच्या व्यक्तिरेखेप्रमाणेच सयाजीराजे मोकाशी यांची ''दादासाहेब वस्ताद'' मधील दादासाहेब वस्ताद या पैलवानाची व्यक्तिरेखा प्रभावी झाली आहे. ग्रामीण परिसर म्हणताच तेथील ग्रामरचनेचे काही महत्त्वाचे घटक असतात. गावचा सरपंच, पाटील, शिक्षक, वैद्य इत्यादी. त्याचप्रमाणे गावातील पैलवान हासुद्धा ग्रामीण संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण घटक असतो. कृषिसंस्कृतीतील लोकरचनांचा भाग म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. दादासाहेब वस्ताद. हा असाच सामर्थ्यवान गडी. आडदांड देहाचा; पण कनवाळू वृत्तीचा. गावाचे भले व्हावे, गावात स्वच्छता राहावी म्हणून तो कसा झटतो याचे अनेक तपशील या व्यक्तिचित्रात येतात. हे व्यक्तिचित्र जिवंत आणि रसरशीत झाले आहे.

त्याचा भाऊ रामू पैलवान याच्या डोक्यावर मध्यभागी कुऱ्हाडीचा वार केला जातो. तो गतप्राण होतो. अशावेळी धाडसी वृत्तीचे दादासाहेब वस्ताद पुढे सरसावतात. तेव्हा पंतसरकार असे आवाहन करतात. ''वस्ताद, आता मागचं सगळं विसरा. या नव्या पोरांना नवी दिशा द्या. रागापेक्षा संयमाने वागायला शिकवा. साऱ्या समाजाचा फायदा होईल.''

दादा वस्तादांनी त्या आवाहनाला प्रतिसाद दिला आणि आपले पुढील आयुष्य समाजासाठी वाहून घ्यायचे ठरविले.

दादा वस्तादांची व्यक्तिरेखा निवेदकाच्या प्रत्ययकारी वर्णनातून स्पष्ट होत जाते.

''दादा वस्ताद दिसायला गोरेपान, भरलेली शरीरयष्टी, भरदार मिशा, डोईवर डाळिंबी रंगाचा रेशमी फेटा. अंगात काव लावलेला तांबडा सदरा, पायघोळ

धोतर, नजर भेदक रागावले तर ते लालबुंद होत. अंगात अचाट ताकद, शरीर व्यायामाने कमावलेले. गावोगावच्या फडात हमखास कुस्ती करणारा पैलवान म्हणून ख्याती अन् कुस्त्यांचा फड मोडताना वस्ताद पुड्या ऊस पिळून रस काढत. हे बघून लोक गप्प होत व वस्तादाच्या ताकदीचे कौतुक करत. घरी परतत मग डफडं पिपाणी वाजत–गाजत पंच मंडळी देवळाकडे येत असे. ग्रामदैवताचं चांगभलं गाजवून खिरीचा प्रसाद खाऊन रात्रीचा तमाशा उभा राहत असे.''

दादा वस्तादांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचे निवेदकाने तपशीलवार वर्णन केलेले आहे. पाण्याशिवाय प्रातःविधीला जाणाऱ्या लोकांना ते योग्य धडा शिकवीत. लोकांना त्यांनी स्वच्छतेची आवड लावली. लोकांच्या अडीअडचणीला दादा वस्ताद धावून येत. होतकरू मुलांना शिकायला मदत करत. नांदायला निघालेल्या मुलीसाठी मदत करत. नांगर घ्यायला, कालवड घ्यायला मदत करत.

त्यांची सामाजिक बांधिलकीची ही जाणीव प्रशंसनीय होती. ते म्हणत, ''हे सारे वैभव माझ्या वाडवडिलांचे आहे. त्यांनी मला गोर–गरिबांना वाटायला सांगितलं आहे. हे सारं तुमचंच आहे. मी आपला हे सांभाळणारा कारभारी आहे.''

वस्तादांची वडिलोपार्जित मोठी जमीन होती. त्या इनामामधून पंढरपूरला रेल्वे जाई. तिला ''देवाची गाडी'' म्हटले जाई. त्यांनी तर एकदा दहा मिनिटे गाडी थांबविली. आपल्या शेतातील उसाचा रस वारकऱ्यांना पाजला. वर्षातून चार–पाच महिने वस्ताद गावोगावांचे कुस्त्यांचे फड करीत. तरुण पोरांना घेऊन पूर्वेला पुसद, यवतमाळपर्यंत जात. तर कधी मुधोळ, तंजावर, बेल्लारीला तर कधी देवास, कोटा आणि ग्वाल्हेरला जात. तर कधी पुसदच्या तालमीत पोरांना शिकवीत. माई गेल्यावर वस्तादांना अतिशय दुःख झाले. वाडा उघडा पडल्याची त्यांना जाणीव झाली. पण समाजसन्मुख वृत्तीचे वस्ताद सामाजिक कार्यात मग्न झाले. त्यांनी गावची ग्रामपंचायत बिनविरोध केली. राजकारण्यांच्या विरोधाला न जुमानता मोठी तालीम उभारली.

या व्यक्तिचित्राचा शेवटही परिणामकारक झालेला आहे.

''आजही तो वाडा दादा वस्तादांची आठवण सांगत बसतो. कुणी म्हणत,

या वाड्यात वस्ताद आजही वास करतात.'' लोक म्हणतात, ''एक देवमाणूस गेला. राजासारखा वागला, जगला आणि माणसांच्या काळजात ठसला.''

– वस्तादांच्या नावाने तेथे आता व्यायामशाळेऐवजी कन्याशाळा भरते.

## डोकेवाला संशोधक – दादाजी खोब्रागडे

व्ही. एन. शिंदे यांनी दादाजी खोब्रागडे या कृषिविषयक संशोधन करणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र ''डोकेवाला संशोधक'' दादाजी खोब्रागडे या शीर्षकाखाली रेखाटले आहे. महाराष्ट्रात गेल्या काही दशकांत शेतीविषयक अनेक प्रयोग झाले. भात, गहू, ज्वारी, बाजरी इत्यादी अन्नधान्यांच्या संकरित बी–बियाण्यामुळे कृषिविषयक उत्पादन वाढले. उसाच्या बाबतीत असेच प्रयोग झाले. भारतासारख्या विकसनशील देशात हे सारे होणे आवश्यक होते. पीक कमी आणि खाणारी तोंडे वाढलेली. या दोहांचा मेळ बसेना. महाराष्ट्रात हरितक्रांती झाली खरी; पण त्यासाठी अनेकांना अहर्निश कष्ट करावे लागले. अशाच संशोधकांपैकी दादाजी खोब्रागडे हे महत्त्वाचे नाव. त्यांना लेखक ''डोकेवाला संशोधक'' म्हणतो. अशा ''एकला चलो रे'' या मार्गाने वाटचाल करणाऱ्या व्यक्तींनी जनजीवनाला आकार दिलेला असतो. व्ही. एन. शिंदे यांनी हे सारे समरसतेने दाखवून दिलेले आहे.

या व्यक्तिचित्राला ''चरित्रलेखन'' म्हणणे अधिक सयुक्तिक होईल असे वाटते. कारण दादाजी खोब्रागडे यांच्या वृत्तिविशेषांपेक्षा कृतिशील जीवनाकडे लेखकाने लक्ष केंद्रित केले आहे. १९८१ साली दादाजींनी आपल्या शेतात ''पटेल–३'' हे भाताचे संकरित वाण लावायला सुरुवात केली. त्याहून अधिक उत्पादन देणारे वाण त्यांचे मेहुणे भीमराव शिंदे यांच्या शेतात लावले. त्याचे नामकरण ''एचएमटी'' असे करण्यात आले. हा प्रयोग सलग चार–पाच वर्षे सातत्याने चालला होता. तेव्हा कुठे त्यांना यश आले. पुढील सहा वर्षांत त्यांनी नांदेड हिरा (१९९४), विजय नांदेड (१९९६), दीपक रत्ना (१९९७), आणि डी. आर. के. (१९९८), हे वाण तयार केले. विदर्भ, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि ओरिसा राज्यात या वाणांची लागवड होऊ लागली. कृषी विद्यापीठाने एचएमटी वाण हा आपला म्हणून नोंदवला आणि तो बाजारात बियाणे रूपाने

आणला. २०१० मध्येही दादाजी शेतात काम करीत होते. सर्व चॅनेलवर फोर्ब्जच्या प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत त्यांचे नाव झळकल्याची बातमी दाखवली जात होती. प्रसिद्धी माध्यमाच्या प्रतिनिधींनी त्यांचे लक्ष या बाबीकडे वेधले. पण दादाजींना त्यात स्वारस्य नव्हते. महाराष्ट्र शासनाने ''कृषिभूषण'' हा पुरस्कार देऊन गौरव केला. त्यानंतर दादाजींनी आपल्या प्रयोगासाठी अधिक शेती मिळावी अशी मागणी केली. त्यांना फक्त दीड एकर शेती देण्यात आली. त्यांना आजमितीला सव्वाशेहून अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. मात्र त्यांनी वीस एकर शेतीची केलेली मागणी अखेरपर्यंत पूर्ण झाली नाही. पण हे कर्मयोगी संशोधक नव्या वाणांच्या शोधात राहिले.

त्यांच्या जीवनाचा उत्तरार्ध अत्यंत हलाखीचा गेला. त्यांची प्रकृती ढासळली. उपचारासाठी त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. त्यांच्या निधनानंतर एचएमटी भाताचा कर्ता कोण हे कळले. दादाजी गेल्यावरच त्यांचे महत्त्व सर्वांना उमजले.

एका मुलखावेगळ्या संशोधकाची जीवनकहाणी व्ही. एन. शिंदे यांनी येथे सांगितली आहे.

***

दि. १ जून, २०२०

– डॉ. सोमनाथ कोमरपंत,
गोवा

# रामा मैलकुली

**– व्यंकटेश माडगूळकर**

---

सर्व्हिस मोटारीतून खाली उतरलो आणि गावात शिरलो. व्हरलवाडा शोधून काढायला वेळ लागला नाही, पण रामाचं घर नेमकं मिळण्यासाठी कुणालातरी विचारायला पाहिजे होतं. पोराठोरांना विचारूनही फायदा नव्हता. म्हणून खिंडारं ओलांडत कुणी जाणता माणूस दिसतो का, ते पाहू लागलो.

काडानं शेकारलेल्या एका खोपटाच्या पुढच्या बाजूला फाटक्यातुटक्या पायताणांच्या पसाऱ्यात एक म्हातारा दिसला. खाली बघून तो तुटक्या पायताणाला सळ घालीत होता. मी जवळ जाऊन उभा राहिलो, तरी त्याला दाद नव्हती.

''बाबा, रामा व्हरलाचं खोपाट कोणतं?''

काम थांबवून त्यानं वर पाहिलं. डाव्या हाताची दोन बोटं ओठावर ठेवून, तोंड बाजूला करून थुंक टाकली आणि डोळे झाकून हनुवटीला झटका देत तो म्हणाला,

''कोन म्हनालासा?''

''रामा व्हरल!''

''व्हय, पण रामा कंचा? खंडूचा रामा का त्यो धोंडी म्हातारीचा?''

होय, साऱ्या व्हरलवाड्यात रामा अनेक असण्याचा संभव होता, पण मला केवळ रामाचं 'रामा' नावच माहिती होतं. त्यावरून बोध व्हावा कसा?

''ते काही ठाऊक नाही. तो रामा मैलकुल्याचं काम बघतो बघा!''

''हा, असं बोला की! तुमी कुटनं आटपाडीकडनं आला?''

''होय.''

''सडकचं काम बघनारं अम्मलदार हायसा?''

''होय.''

''हा, असं जावा या बोळातनं. त्यो शेवग्याचा डहाळा दिसतुया, ततं हाय रामाचं घर'' आणि पुन्हा खाली मुंडी घालून त्यानं आपलं काम सुरू केलं. मी बोळातून आत शिरलो.

शेवग्यांच शेलाटं झाड लागल्यावर त्या खोपटासमोर उभा राहिलो. बाहेरच्या बाजूला दगडावर बसून एक काळीशार बाई पिठानं भरलेली पितळी विसळत होती आणि तिच्या खांद्यावर हात ठेवून पाच-सहा वर्षांचं शेंबडं पोरगं हातातला तांबड्या भाकरीचा तुकडा तोडून-तोडून खात होतं. मी आलेला पाहताच तोंडातला घास त्यानं गटकन गिळला आणि आईचा पदर ओढून बोलला, ''ए आये, कोण आलाया बग!''

आईन वळून पाहिलं. जुनेऱ्याचा बुरखा तोंडावरून सर्रकन ओढून घेतला आणि ठणठणीत आवाजात विचारलं, ''काय वं?''

''रामा मैलकुली इथंच राहतो ना?''

''व्हय, व्हय आताच मोटारीकडं गेलाया. कोण अम्मलदार येणार हाय!''

''होय का? मी आलो त्याच्याकडे आणि तो गेला मोटारीकडे!''

तिनं डोळे विस्फारले. अम्मलदार घराकडे आले, या जाणिवेनं ती गोंधळली. पोराच्या उघड्या पाठीवर धपका घालून खासगी आवाज काढून बोलली. ''जा रं. मोटारपाशी. मामाला म्हनावं, अम्मलदार आल्याती.''

पोरगा लाजला आणि आईच्या पाठीमागे दडत म्हणाला, ''आऽ मी न्हाय जा!''

पण एवढ्यात मुंडाशाचं टोक खोचीत रामा तरातरा आलाच. कपाळाला हात लावून म्हणाला, ''म्हाराऽऽज''

''रामराम. तूच का रामा?''

''व्हय जी, मीच. मिस्तरीनं कालच सांगितलं हुतं तुमी येणार, म्हनून मोटारीपाशी बघाय गेलु हुतो.''

''मग चलतोस ना? दिवस वर आलाय चांगला.''

''व्हय, चला की! भाकरी बांध गं. टेका की.''

रामाचं खोपट भारीच बुटकं होतं. आत वाकून शिरून मी बाहेरल्या छपराच्या मेढीला टेकून बसलो. रामा धांदलीनं पुन्हा कुठंसा निघून गेला!

आतल्या अंधाऱ्या जागेत रामाची बहीण काही करू लागली. पोरगा वरचेवर डोकावून माझ्याकडे पाहत असावा.

खालची जमीन खडबडीत होती. कुठं खड्डे पडले होते, तर कुठं मुरमाचे धोंडे वर आले होते. बाहेरल्या बाजूलाच पाण्याचा रांजण रोवला होता. त्याच्यावर लाकडाचं झाकण होतं. पलीकडे चिपाडाचा आणि काटक्याकुटक्यांचा ढीग होता. रानशेणी होत्या.

एका कोपऱ्यात शेळी बांधली होती. तिची ढोपरं निघाली होती. पुढे टाकलेल्या बाभळीच्या डहाळ्यावर ती धडपडत होती आणि नाकानं आवाज करीत होती.

गेला तसा गडबडीनं रामा पुन्हा आला. बहिणीला म्हणला, ''अगं राधू आटप. कवाच्यान बसून ऱ्हायल्यात अम्मलदार. आपल्या गरिबाच्या खोपटात कोन येतंया?'' माझ्याकडे वळून तो पुढे म्हणाला, ''झालंच जी, भाकरी घेतल्यावर निघूच!'' राधूनंही तत्परतेनं भाकरीचं फडकं भावाच्या हातात दिलं.

''माजं काय, तुजंच आवरायचं न्हाई. येताना ढाळा आन शेरडीला.''

''व्हय व्हय!'' भाच्याच्या पोटावर रामानं एक चापट मारली. त्याच्या धुळीनं भरलेल्या तोंडाचा मुका घेतला.

''हं, चला आता. चाली चाली मेटकवाडीपतूर जाऊ''

दोघंही गावाबाहेर पडून सडकेला लागलो. माझ्या हातात ओझं होतं. रामाला ते प्रशस्त वाटलं नाही.

''काय शिवन्यासारकं न्हाई नव्हं?''

''का रे?''

''माझ्यापाशी द्या की नसलं तर मोकळाच हाय मी?''

''दशम्या आहेत. रंगाचा डबा आहे.''

''हां, मगं फराळाचं घ्या काढून आन् बाकीचं द्या माझ्यापाशी''

''काही जरुरी नाही. मला चालतं. घे.''

रामाला अपूर्वाई वाटली. त्याचा चेहरा थोडा ओशाळलाही

''आमी कसं शिवावं जी?''

''माझी हरकत नाही. घे तू. शिवाशीव पाळत नाही मी!''

रामा थोडा गप्प झाला. मग म्हणाला, ''द्या, मी घेतू!''

रामा दिसायला चारचौघांसारखा नव्हता. रूपाच्या बाबतीत दैवानं त्याच्यावर गैरमर्जी केली होती. अंगापिडानं थोराड असून रंग अगदी ठार काळा होता. नाक डाव्या बाजूला वाकडं होतं आणि एक डोळा अधू होता. त्याच्या तोंडावरच्या कळेकडं पाहून कुणालाही असं वाटलं असतं की, दिलानं भला असलेला हा माणूस रूपानं गेला आहे आणि खाण्यापिण्याच्या बाबतीतही याची भलती आबाळ झाली आहे! कसल्यातरी रंगाचं एक विटकं फडकं त्यानं केवळ सवयीनं डोक्याला गुंडाळलं होतं. जागोजागी चिंध्या झालेली एक पैरण अंगात अडकवली होती आणि खालचं धोतर तर त्याला अगदीच तोटकं होतं. पिंढऱ्यावर बोटाएवढ्या शिरा उमटून दिसत होत्या. पायाच्या टाचा भेगाळल्या होत्या. वयानं तो फारसा दिसत नव्हता. 'मग याचं लगीन झालंय की नाही? झालं असतं, तर खोपटात अस्तुरी दिसली असती. चार पोरं दिसली असती. राधू याची बहीण दिसते. तिच्या कपाळावरचं कुंकू पुसून गेलं होतं. मघा?....' मनात प्रश्न येत

होते. रामा खाली पाहून चालला होता. काही वेळ गेला आणि त्यानं जाणीव दिली, ''मैलाचा धोंडा आला बघा.''

फर्लांगावर आणि मैलाच्या धोंड्यावर आकडे टाकायचे होते. नावं घालायची होती. रंग आणि कुंचला घेऊन मी धोंड्यासमोर बसलो. रामाही जवळच खडे बाजूला करून बसला. कामाबरोबर बोलणंही चालू झालं.

''हं, काय रामा? कसं काय तुझं?''

''जी, बरंच चाललंया म्हणायचं''

''विव्हळतोस बरा!''

''खरं म्हंजे इवळाय नगं. परमेश्वर दील त्येच्यावर ऱ्हायाला होवं.''

''चोख बोललास, पण विव्हळणं काही सुटत नाही. खरं ना?''

चार-दोन शब्दांतच मी रामाच्या जिव्हारापर्यंत गेलो. माझ्या अम्मलदारीला बिचकणाऱ्या रामाचीही भीड मोडली. स्वतःची दुखणीभाणी तो मला सांगू लागला.

''आपली पिढीजात व्हरलकी सोडून रामा सरकारी नोकरीकडे का वळलास?''

''कशाचा धंदा आलाय त्यो? कातडं मुलकाचं म्हाग झालंया. आन् रोख पैसा देतुया कोन? बयत्याच्या कामाखाली जीव जायचा. त्यात गावात इतकं व्हरल आमी. एकाएकाच्या वाट्याला चार-दोन घरं येणार. त्येच्यावर कसं भागावं? पोटाचा डबरा कसा भरायचा?''

''खरं आहे.''

''तवा इच्यार केला की, सरकारी नौकरी करावी. सडकंची वज राखण्याचं काम बरं हाय.''

''पगार काय मिळतो तुला?''

या प्रश्नावर रामा हसला. ''थट्टा करता व्हय गरिबाची? तुमास्नी ठावं न्हाई? अम्मलदार तुमी ततल्या कचेरीतलं!''

''वेडा काय रामा तू? अरे, कसला अम्मलदार? मीही तुझ्यासारखाच

एक. उक्तं काम घेतलंय मी हे नंबर घालण्याचं. पोटापाण्यासाठी काहीतरी करायचं!''

''असं का असंना. पण तुमी आमस्नी अम्मलदारच. ठावं न्हाई म्हणता, तर सांगतू. महिन्याला बारा रुपये मिळत्याती.''

''ठीक चालतो का त्याच्यात प्रपंच?''

रामानं एकवार बाजूला तोंड करून तमाखूची चिमूट दाढेखाली सोडली आणि हात झाडून तो पुन्हा बोलू लागला, ''कशाचा देवा परपंच? कायतरी करून हातातोंडाची गाठ घालायची! ढोरावानी जीव! काय अंगभर चांगला धडुता मिळतुया का गोडधोड खाया मिळतंया! आमा गरिबांचं हे असंच! तरी बरं, आपला सोताचा काय खटाला न्हाई. एकलाच हाय.''

''का बरं रामा? लगीन केलंस का नाही?''

माझ्या या प्रश्नानं रामाची जखम दुखावली. चिघळली असावी. डोक्याचं मुंडासं काढून त्यानं खाली ठेवलं आणि हातात एक खडा घेऊन जमिनीवर रेघोट्या मारता-मारता तो बोलला, ''काय सरळ न्हाई झालं दादा!''त्याच्या स्वरावरूनच त्याच्या वेदना कळत होत्या. तोडावरही उदासीनता दिसत होती. मला वाटलं, मी उगीच बोललो. सावरून घेण्यापायी म्हणलो. ''आपलं बोलण्यावरनं बोलणं निघालं म्हणून विचारलं हं, नाहीतर तू म्हणायचास, रिकाम्या चौकशा कशाला?''

रामानं मुंडी हलविली आणि दिलगिरीनं तो बोलला, ''छा! छा! भलतंच! मी गप झालु अशासाटना की, का आपलं करम सांगावं! समदी चित्तरकथा हाय दादा माजी!''

''का बरं? सांगशील तर!''

''लगीन झालं त्याला पाच सालं झाली. पन धड सा महिनंसुदीक अस्तुरी ऱ्हायली न्हाई. बेपत्ता झाली! ''

''म्हणजे?''

''आपलं करम दादा! ती हुती तकडची सांगलीच्या बाजूची. रूपानं धा

जनींत उठून दिसावी अशी. माझ्या खोपटात कसं ऱ्हावं तिनं? मी ह्यो असला येडाबाबडा मानूस. संसारही आपला नाचरगती. तेल हाय, तर मीठ न्हाई; मीठ हाय, तर मिरची न्हाई असं सदुनीक. ल्या-नेसाया चांगली कापडं न्हाईती, का खायला गोडधोड न्हाई. तिच्या काय मनाला येईना त्या गोष्टी. धड सबूद बोलायची न्हाई. रुसून-फुगून बसायची. दादा, मलाबी कळायचं समदं; पण का करायचं? ढोरागत राबलं, तरी काय मिळकत करनार आपन?''

रामा अगदी तळमळून बोलत होता. त्याच्या मनाची कवाडं खोलली गेली होती. मीही द्रवल्या मनानं ऐकत होतो.

''समजूत काडाय जावं तर म्हणायची, 'चल म्हमईला, गिरनीत काम कर आन् बक्कळ पैका मिळव. माजी हौस पुरवं.' मला काय आपला मुलूक सोडून जावं वाटंना.''

एका धोंड्यावर नाव आणि आकडे घालून झाले होते. मी उठलो. रंगाचा डबा वगैरे साहित्य घेऊन रामाही उठला आणि पुन्हा चालता-चालता त्यानं आपली हकिगत सांगितली.

''खरं का नाही, तुमीच सांगा? आपलं गाव, घर, नात्यागोत्याची मानसं सोडून कुटं जावं देसांतराला? असं करता-करता एकदा माझ्या म्हागारी गेली निगून. पुना काय पत्त्या न्हाय का मुद्या न्हाय.''

''मग तू काही शोध केला नाहीस का? चार माणसांकडनं समजूत घालून आणायची माघारी''

''मी न्हाई केली वासपूस! आपल्याजवळ ऱ्हान्याची तिची जर विच्छा न्हाई, तर कशाला जोरा करायचा? जाऊदेल म्हणालो, कुटंबी सुकात असली म्हंजे झालं!''

या जुन्या आठवणीनं रामा चांगलाच कष्टी झाला. मीही अधिक बोललो नाही. सूर्य बराच वर आला होता. भूक आणि तहान दोन्हीही जाणवू लागली होती. बोलण्यानं वाट ओसरली होती. तरी पायही शिणले होते.

''रामजी, समोर विहीर दिसते. सावलीत बसून जेवण करू, घटकाभर बसू

आणि पुन्हा लागू कामाला.''

''व्हय जी. भुका लागल्या असतील तुमास्नी. चला!''

शेजारच्या मळ्यातल्या विहिरीवर गेलो. रामानं ढोरांना पिण्यासाठी काढलेल्या पाटाच्या पाण्यात हातपाय धुतले. मी विहिरीत उतरून धुतले. धारेवर वडाच्या सावलीत दोघांनीही शिदोऱ्या सोडल्या.

रामाच्या बहिणीनं तळहातासारख्या जाड व्हंडीच्या तांबड्या दोन भाकरी दिल्या होत्या. त्यांच्या पोटी तांबड्या चटणीचा भुकटा होता.

माझ्या आईनं चार मऊसूत चपात्या तुपानं माखून दिल्या होत्या. त्यांच्याबरोबर मोकळं पिठलं होतं, लिंबाचं लोणचं होतं, लसणाची चटणी होती. डबा उघडताच त्याचा खमंग वास सुटला.

मी त्यातलं थोडं रामाला देऊ लागलो. तो 'नगं-नगं' म्हणू लागला.

मी म्हणालो, ''रामजी, अन्नाला नाही म्हणू नये. घे.''

''तसं नव्हं दादा, तुमी एकल्यापुरतं आनल्यालं. वाटचालीनं भुकेला असाल. माजी माज्यापाशी भाकरी हाय, तर का?''

मी बळे-बळे त्याला वाढलंच. दोघेही जेवू लागलो. हां-हां म्हणता रामानं त्या दोन भाकरी चटणीच्या भुकट्याबरोबर संपविल्या आणि मी दिलेलं फडक्यातं गुंडाळून ठेवून दिलं.

''रामजी, हे रे काय? ते ठेवलंस कशासाठी?''

''थोडं खाल्लं की दादा. उलीसं ठेवलंया पोरापायी. असलं कुटलं मिळतंया आमास्नी? पोरगं खाईल दोन घास, म्हणून ठेवलं. आता त्या पोरावर समदी मदार ठेवलीया बघा. त्यो जवा कर्तासवर्ता हुईल, तवा जरा बरं दिस येत्याल. तवर हे असंच. त्येला चार सबूद कळन्यासाठी साळंतबी घालीन म्हंतूया. भनीचा दाल्ला खराचला तवा माझ्या गळी पडून 'आता माजं कसं हुयाचं' म्हणून रडाय लागली तवा मी म्हणालो, बया, माझ्यापशी ऱ्हा. मला तरी आता कोण हाय?''

वाफ्यातलं पाणी रामा ओंजळीनं प्यायला, ढेकर देऊन तमाखू खाण्यासाठी

बसला. मी अद्याप जेवतच होतो. तळव्यातली तमाखू बोटानं चोळीत रामा म्हणाला, ‘‘दादा, इचार आला म्हंजे आक्रीत वाटतं. आता तुमाला वय किती?’’

‘‘वीस वर्षं झाली रामजी!’’

‘‘मलाबी इस आन् आट झाली. पर तुमी झाला अम्मलदार आन् आमी मातूर ऱ्हायलो हे असं. जलमभर असंच दळिंद्री ऱ्हाऊन आमी मसणवाटंला जायचं. मनात म्हनतो, देवा चांडाळा, का रे असं?’’

रामाला द्यायला देवापाशी उत्तर नव्हतं; माझ्यापाशीही नव्हतं! मी केवळ ऐकत होतो.

‘‘तुमी म्हनाल रामजी, गड्या तू साळा शिकला न्हाईस. पन दादा, साळा शिकावी आन् पोटाला काय खावं जी? चार वर्सांचं झालं की, कुनाची गुरं राकुळी घेऊन त्येंच्या म्हागं रानोमाळ हिंडावं लागतं. तवा घरी भाकर मिळती. मग हे जमावं कसं?’’

माझं जेवणं आटोपलं. थोडा वेळ विश्रांती घेऊन पुन्हा काम चालू करायचं होतं. संध्याकाळपर्यंत होईल तेवढं करायचं. संध्याकाळी सकाळी आटपाडीहून गेलेली सर्व्हिस विट्याहून परत आली की, तिला हात दाखवून थांबवायचं आणि पुन्हा घर गाठायचं!

‘‘वाईच कलंडा दादा. ऊन खाली झाल्यावर जाऊ पुना.’’ असं म्हणून रामानं पैरण आणि मुंडासं काढून उशाला घेतलं. बांधाच्या हिरवळीवर तो आडवा झाला, घोरूही लागला.

झाडाच्या खोडाला पाठीची आटण देऊन मी बसून राहिलो. पाहू लागलो की, रामाचं गणित सुटतं का!

(‘माणदेशी माणसं’ मधून)

❑❑❑

# मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी

**– प्र. के. अत्रे**

---

साने गुरुजींना जाऊन आज सात दिवस झाले. हे सात दिवस मी त्यांचा सारखा विचार करतो आहे. त्यांच्या जीवनाचा विचार करतो आहे. त्यांच्या मरणाचा विचार करतो आहे. त्यांच्या लेखनाचा विचार करतो आहे. त्यांच्या वेदनांचा विचार करतो आहे. त्यांच्या भाषणाचा विचार करतो आहे. त्यांच्या उपोषणाचा विचार करतो आहे. त्यांच्या बसण्याचा विचार करतो आहे. संकोचाच्या भावनेने सदैव अवघडलेली त्यांची ती आकृती माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे. ओठांच्या दोन्ही कोपऱ्यातून डोकावणारे त्यांचे ते ओशाळे हसू अजून माझ्या दृष्टीपुढे आहे. स्नेहभावाने डबडबलेल्या त्यांच्या डोळ्यांच्या त्या ओल्या कडा अजून मला दिसताहेत. त्यांचे ते पुटपुटणे, त्यांचे कण्हणे, त्यांचे ते सुस्कारे आणि त्यांचे ते हातवारे सारे सारे मला आठवते आहे.

पुष्कळ वर्षांपासून मी त्यांना बघत होतो आणि त्यांचे वाङ्मय आवडीने वाचत होतो. पण त्यांची प्रत्यक्ष ओळख होऊन अशी आठच वर्षे झाली. या आठ वर्षात फारच थोड्या वेळां आम्ही भेटलो असू आणि भेटल्यावरही फारच थोडा वेळ एकत्र बसून बोललो असू. आणि भेटल्यावरही फारच थोडा वेळ एकत्र बसून बोललो असू. आरंभी आरंभी ते डोळ्याला डोळाही देत नसत. वर तरी पाहात, नाही तर खाली तरी पाहात. आणि फारच थोडे बोलत.

उगाच वायफळ काय बोलायचे? उपचाराचे बोलणे त्यांच्याजवळ अजिबात नसे. ते नुसते हसत किंवा तसेच स्तब्ध राहात. न बोलणे हेच मुळी त्यांचे बोलणे. कधी कधी मान खाली घालून दोन्ही हातांनी ते माझा हात दाबून धरत आणि अंग घुसळून मनमोकळेपणाने हसत. एवढे झाले म्हणजे संपले त्यांचे संभाषण. त्यांना बोलावयाला लावणे जसे अवघड, तसे त्यांच्याशी बोलणेही पण फार अवघड. त्यांच्या संकोचवृत्तीने दुसऱ्याला संकोच वाटे. आणि त्यांच्या अबोल्याने त्यांच्याशी बोलणारा माणूसच एकदम ओशाळा होऊन मध्येच गप्प बसे. पंढरपूरच्या प्राणांतिक उपोषणाच्या नवव्या दिवशी मी त्यांना भेटलो. मी त्यांना पाहिले. त्यांनी मला पाहिले. डोळेभेट झाली. आणि दोघांच्या डोळ्यांतून एकदम अश्रू वाहू लागले. माझी चिंता त्यांना कळली. त्यांचे प्रेम मला समजले. हीच त्यांची भाषा आणि हेच त्यांचे बोलणे. समक्ष भेटीपेक्षा ते पत्रांतून अधिक बोलत. त्यांच्या वाणीपेक्षा त्यांची लेखणी जास्त बोलकी होती.

पण एरव्ही अबोल आणि गोगलगाय असणारे गुरुजी सभेच्या व्यासपीठावर चढले म्हणजे मात्र सिंहासारखी गर्जना करू लागत. आणि त्यांच्या गर्जनेने व्यासपीठ आणि सभा गदगदा हाले. लाजाळूच्या वेलीला सूर्यफुले आली आहेत असे वाटे. जनताजनार्दनाचे दर्शन झाले म्हणजे अंगात कसल्या तरी दिव्य शक्तीचा संचार होई आणि त्यांच्या मुखातून साक्षात् उपनिषदांची गंगा धोधो वाहू लागे. ह्या सर्व गोष्टींचे स्मरण मी गेले सात दिवस करतो आहे. हजारो-लाखो माणसांपेक्षा गुरुजी फार वेगळे होते, हे तर उघडच आहे. तुम्ही-आम्ही ज्या जगात राहतो, त्यापेक्षा गुरुजींचे जग फार निराळे होते. म्हणून गुरुजी कोण होते याचा पुष्कळांना भ्रम पडलेला आहे. राजकारणी लोक म्हणतात, गुरुजींना राजकारण कळत नव्हते. साहित्यिक विचारतात, गुरुजींचा साहित्याशी काय संबंध? आणि स्वतः गुरुजी म्हणत की, मला लेखणीच्या लालित्यापेक्षा झाडूंचे लालित्य जास्त आवडते. कोणी म्हणतात, गुरुजी रडे होते. कोणी म्हणतात, गुरुजी कम्युनिस्ट होते. इतक्या साधेपणाने राहणाऱ्या, सरळपणाने वागणाऱ्या आणि सोपे बाळबोध लिहिणाऱ्या निर्मळ आणि प्रेमळ माणसांचे जीवन आज पुष्कळांना कोडे होऊन बसले आहे आणि त्यांच्या मरणाने तर हे कोडे जास्तच अवघड झाले आहे.

पण गुरुजी कोण होते हे समजल्यावाचून त्यांच्या जीवनाचे कोडे कोणालाही उलगडणार नाही. वर वर पाहाणाऱ्यास त्यांच्या जीवनात जो विरोध दिसतो आणि जी विसंगती भासते त्याचे कारण गुरुजींच्या अंतरंगात काय आहे हे पाहण्याचा त्यांनी कधीच प्रयत्न केला नाही. तसे पाहता गुरुजींच्या जीवनात न कळण्यासारखे असे काहीच नव्हते. स्वच्छ पाण्याने भरलेल्या एखाद्या डोंगराच्या टाक्यांत त्यांचा तळ जसा स्पष्टपणे दिसतो, तसे गुरुजींच्या भाषणात आणि लेखनात त्यांच्या हृदयाचे प्रतिबिंब स्वच्छपणे दिसत असे. गुरुजी कोण होते ह्याबद्दल मला स्वतःला कधीही शंका पडली नाही. किंवा त्यांच्यासंबंधी माझा कधी गैरसमजही झाला नाही. चारच शब्दांत गुरुजींचे वर्णन करावयाचे झाल्यास मी असे म्हणेन की, गुरुजी मातृहृदयाचे कवी होते. तुळशीदास, मीराबाई, कबीर आणि तुकाराम ह्यांच्या रक्तांत जे काव्य होते, तेच गुरुजींच्या पिंडात होते. त्याच घराण्यात आणि परंपरेत गुरुजींचा जन्म झाला असे म्हणावयास हरकत नाही. गुरुजी हे काही नुसते शब्दांचे मास आणि यमक जुळविणारे टांकसाळी कवी नव्हते. गुरुजी हे हृदयाचे आणि वृत्तीचे कवी होते. केवळ काव्य लिहिणारे ते कवी नव्हते. काव्य जगणारे आणि काव्य निःश्वसणारे ते जिवंत प्रतिभेचे कवी होते. मानवतेवर मातेप्रमाणे प्रेम करणे ही त्यांच्या जीवनातील काव्याची प्रेरणा होती. सर्व नद्यांमध्ये गंगा जशी पवित्र, तसे सर्व प्रेमामध्ये मातेचे प्रेम हे महन्मंगल. किंबहुना मातृप्रेम हीच सर्व प्रेमाची गंगोत्री. या गंगोत्रीत साने गुरूजींनी आपल्या प्रतिभेचे कलश भरून घेतले म्हणूनच त्यांना आपल्या जीवनात एवढे महाकाव्य निर्माण करता आले. आईच्या दृष्टीने ते जगाकडे पाहात आणि आईच्या अंतःकरणाने ते मानवतेवर प्रेम करीत; आईला ज्याप्रमाणे आपल्या निरनिराळ्या मुलांमध्ये भेद दिसत नाही. त्याप्रमाणे हा हिंदू, तो मुसलमान, हा ख्रिस्ती, तो हरिजन, हा मद्रासी, तो बंगाली, हा मराठी, तो पंजाबी असा गुरुजींनाही या देशात राहणाऱ्या लोकांमध्ये कधी भेदाभेद दिसला नाही. आईला सर्व मुले जशी सारखी, तशी गुरुजींनाही सर्व माणसे सारखी वाटत. मुले मोठी झाली, शिकून कर्तीसवरती झाली म्हणजे मग आई त्यांच्याकडे विशेष लक्ष न देता ज्याप्रमाणे पाळण्यातल्या मुलांवर, रांगणाऱ्या किंवा चालावयाला शिकणाऱ्या मुलांवर आपले प्रेमसर्वस्व खर्च करते, त्याप्रमाणे समाजातील सुशिक्षित, सुसंस्कृत आणि प्रौढ माणसांपेक्षा निरक्षर,

उपेक्षित नि बहिष्कृत लोकाबंद्दल गुरुजींना साहजिकच जास्त प्रेम आणि आस्था वाटे. आपल्या दुखणाइत मुलांची आई ज्याप्रमाणे शुश्रूषा करते, त्याप्रमाणे समाजांतील अनाथांना, अपंगांना, दरिद्र्यांना आणि भुकेलेल्यांना कडेवर उचलून घ्यावे. आपल्या अश्रूंच्या वर्षावाने त्यांची दुःखे धुऊन काढावीत, त्यांना पोटभर जेवू घालावे, त्यांना अंगभर कपडा लेवावा असे गुरुजींना मनापासून वाटे.

लहान मुलांवरील गुरुजींच्या प्रेमाचे तर वर्णनच करता येत नाही. प्रौढांच्या सानिध्यात लाजाळूप्रमाणे संकोच पावणारे गुरुजी, मुलांच्या सहवासात सूर्य-विकासी कमळाप्रमाणे उचंबळू लागत. त्यांना पाहून मुलांना आपली आई भेटल्याचा आनंद होई आणि हृदयाची कपाटे उघडून, ती आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी त्यांच्याशी करू लागत. महाराष्ट्रातल्या हजारो मुलांशी त्यांची मैत्री होती आणि शेकडो मुलांशी त्यांचा पत्रव्यवहार होता. मुलांना स्वयंपाक करून जेवू घालावे. दुखण्याभाकण्यात त्यांची शुश्रूषा करावी, थोरांच्या नि शूरांच्या गोष्टी सांगून त्यांना पराक्रमी करावे याचा गुरुजींना निदिध्यास लागून राहिलेला होता. मातेच्या प्रेमाचे आकलन झाल्यावाचून गुरुजींच्या जीवनकाव्याचे रहस्य कोणालाही उमगणार नाही. मातृप्रेमाने गुरूजींचे हृदय एकसारखे ओसंडत होते. म्हणूनच त्यांच्या वाणीतून आणि लेखणीतून बाहेर पडणारे प्रत्येक अक्षर अन् अक्षर पावित्र्याने आणि मांगल्याने ओथंबून निघाले.

साने गुरुजींच्या अंतःकरणात मातेचे वात्सल्य होते. म्हणूनच जनतेची त्यागपूर्वक आणि निःस्वार्थी सेवा करण्याचे त्यांना वेड लागले. जनसेवेच्या एकमेव विचाराने त्यांचे जीवन व्यापलेले होते. त्याच वृत्तीतून त्यांच्या काव्याचा आणि वाङ्मयाचा उगम झाला. देशाचे पारतंत्र्य नष्ट झाले पाहिजे. समाजातली सारी विषमता आणि दैन्य दूर झाले पाहिजे. जनतेच्या जीवनातल्या दलदली हटल्या पाहिजेत. सर्व बुरसटलेल्या रूढींचा विध्वंस झाला पाहिजे. नको सरंजामशाही, नको जमीनदारी, नको खोती आणि खाजगी नफेबाजी, नको पिळवणूक अन् मिरासदारी, उदात्त विचारांचा आणि उदार भावनांचा समाजावर पाऊस पडला पाहिजे. जनतेच्या बुद्धीला धक्के बसले पाहिजेत. जीवनात चहूंकडे उठाव झाला पाहिजे आणि त्याच्यातून नवसमाज निर्माण झाला पाहिजे. हे एकच विशाल स्वप्न गुरूजींच्या डोळ्यांसमोर तरळत होते. ते स्वप्न साकार व्हावे एवढ्यासाठी

ते आपल्या वाणीचा आणि लेखणीचा उपयोग करीत होते. बाकीचे कवी आणि लेखक स्वतःच्या वीतभर जगात आपल्या टीचभर कल्पनांची कृत्रिम जाळी विणीत बसले होते; तर गुरुजींची वाणी नि लेखणी तमाम जनतेची प्रतिनिधी बनून तिच्या उद्धारासाठी साऱ्या महाराष्ट्रभर विजेप्रमाणे कडाडत फिरत होती. बाकीचे कवी आणि लेखक आपापल्या खोलीची दारे बंद करून स्फूर्तीची आराधना करीत आढ्याकडे डोळे लावून बसले असता जनतेच्या विराट आत्म्याला भेटण्यासाठी गुरुजींचा आत्मा समाजाच्या प्रत्येक क्षेत्रांतील निरनिराळी जीवने तपाशीत भटकत होता. तो मुंबईच्या चाळीतून फिरत होता. दहा हात लांबी रुंदीच्या खोलीत सहा-सहा कुटुंबे कशी राहतात ते पाहात होता. साताऱ्यापासून खानदेशपर्यंत शेतकऱ्यांच्या शेताझोपड्यांत तो घुसत होता. खंडोगणती धान्य पिकविणारी ती धरित्रीची लेकरे उपाशी का? त्याच्या सोन्यासारख्या मुलांबाळांना आठ-आठ दिवस आंब्याच्या कोयींवर व चिंचोक्यांवर राहावयाची पाळी का? सहानुभूतीचा प्रचंड सागर गुरुजींच्या अंतःकरणात हेलावत होता. समाजात जेथे जेथे त्यांना दुःख पाहावयास मिळे, दैन्य दिसे, अज्ञान सापडे, तहान-भूक आढळे, तेथे तेथे त्यांच्या हृदयाचे बांध आपोआप फुटत आणि त्यांच्या अश्रूंचे आणि सहानुभूतीचे धबधबे धोधो वाहू लागत. सहानुभूतीने थबथबलेल्या हृदयाने आणि अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी गुरुजी समाजात हिंडत असत.

गुरुजींचे सर्व सामर्थ्य त्यांच्या अश्रूत होते त्यांच्या सहानुभूतीत होते. अश्रू हाच त्यांचा नारायण होता. माझ्या अश्रूनी मी पर्वताला बुडवीन, वज्राचा चुरा करीन, पाषाणाचे नवनीत बनवीन असा त्यांना विश्वास वाटत होता. आणि तसे त्यांनी करूनही दाखविले. शेकडो वर्षे अस्पृश्यांना बंद असलेली पंढरपूरच्या विठोबाच्या मंदिराची दारे गुरुजींच्या अश्रूंच्या पुरांत विरघळून गेली. बडव्यांच्या काळजातल्या दगडांचे लोणी झाले. गांधी हत्येनंतर महाराष्ट्राच्या अंतःकरणात निर्माण झालेली हिंस्त्र कलुषता गुरुजींनी आपल्या अश्रूनी धुऊन काढली. विद्यार्थ्यांच्या जनसेवेवर येऊ पाहणारे संकट गुरुजींच्या डोळ्यांतल्या नुसत्या अश्रूंच्या दर्शनाने मागल्या मागे पळून गेले. अश्रूचे एवढे सामर्थ्यं असताना जग त्यांचा तिरस्कार करते आणि दुबळेपणा नि रडकेपणा अशा विशेषणानी त्यांचा उपहास करते ह्यांचे गुरुजींना फार वाईट वाटे. वैराण वाळवंटात बागबगीचे आणि

मळे पिकविण्याचे सामर्थ्य अश्रूमध्ये आहे. जगामध्ये सर्व अपूर्णता नष्ट करून त्याला पूर्णतेच्या परमोच्च पदावर पोहोचविण्याची शक्ती अश्रूमध्ये आहे. अश्रूचा बिंदू हाच जीवनग्रंथांचा पूर्णविराम आहे. हे अश्रूचे ओजस्वी उपनिषद् गुरुजींनीं भारताला देऊन ठेवलेलें आहे. गुरुजी हे अश्रूंचे महाकवी होते. त्यांच्या सर्व वाङ्मयात सहानुभूतीच्या शुद्ध, पवित्र आणि निर्मळ रसाखेरीज दुसरा कोणताही रस आढळणार नाही.

ही सृष्टी म्हणजे परमेश्वराने लिहिलेले एक महाकाव्य आहे. प्रत्येक प्राणी आणि त्यांचे जीवन हे त्या महाकाव्याचे एक मधुर कडवे आहे असे गुरुजींना वाटे. मनुष्याच्या जगातील विषमता, अधमता आणि कुरूपता नष्ट होऊन माणसे फुला-पाखरांप्रमाणे सुखी, सुंदर आणि स्वतंत्र व्हावीत अशी तळमळ त्यांना लागली होती. गुरुजी हे सौंदर्याचे महान् उपासक होते. निसर्गातील सौंदर्यांचे संशोधन करण्याचे त्यांना लहानपणापासून जबरदस्त वेड होते. फुलांच्या आणि प्राण्यांच्या सृष्टीत सदैव तादात्म्य पावलेला असा वेडा कवी आम्ही आमच्या आयुष्यात तरी दुसरा पाहिलेला नाही. गोविंदाग्रजांच्या काव्यातील 'अंजन कांचन करवंदी' चा उल्लेख ऐकला की त्यांच्या अंगावर रोमांच उठत. वासुदेव शास्त्री खऱ्यांचे 'आंबे नारळी पोफळी' हे काव्य त्यांनी वाचले की त्यांचे हृदय सद्गदित होत असे. कोणत्या ऋतूंत कोणती फुलें फुलतात, कोणते पक्षी गातात, कोणती पिके होतात हे आजकालच्या किती कवींना ठाऊक आहे? गुरुजींना त्याची खडा न् खडा माहिती होती. वसंत ऋतूत कुड्याच्या झाडांना कशी फुले येतात, लाल लाल पळस कसे फुलतात, पाने नसलेली पांढऱ्या चाफ्याची झाडे कशी बहरतात, बकुळीच्या बारीकशा फुलांत मध कसा आढळतो आणि फूल उचलले की त्यांतून दोन-चार मुंग्या तरी कशा बाहेर निघतात, 'पेरते व्हा, पेरते व्हा' असे पक्षी कसे ओरडतात, रस्त्याच्या थंडगार धुळीत साप कसे येऊन पडतात हे सर्व सर्व गुरुजींना माहीत होते. खानदेशातील आंबराया मोहरल्या आणि त्यांच्यावर पिवळा, शेंदरी आणि निळा मोहर दिसू लागला म्हणजे गुरुजी आनंदाने नाचू लागत. मोहरलेले आंबे म्हणजे वनदेवतेच्या दिवाणखान्यातील जणु काही पुष्पपात्रे असे त्यांना भासे. पावसाळ्यात गुलबक्षीना कसा बहर येतो, कचेळ्याची आणि नागद्रोणीची फुले कशी फुलतात, आघाडा कसा उगवडतो, शरद ऋतूंत

तळी आणि सरोवरे कमळांनी कशी भरून जातात हा प्रत्येक ऋतूंतील सौंदर्याचा बारीकसारीक तपशील गुरुजींनी आपल्या डोक्यात भरून ठेवला होता.

अंगणातील तेलाची वाटी कावळा चोचीत धरून कसा पळवून नेतो, विहिरीतले कासव हळूच खालून येऊन बेडकाला कसे खाऊन टाकते, देवकाशेजारच्या वडाच्या झाडावर चोचीत मेलेला साप धरून गरुड कसा बसतो, कबऱ्या आणि खरबुज्या रंगाच्या चिमण्या अंगणातल्या केळीजवळ कशा खेळतात, त्यांच्यातल्या नराचे पंख लालसर असून त्याच्या गळ्याभोवती काळी रेषा कशी असते, आणि लठ्ठ पोटाच्या गंभीर माद्यांचा रंग कसा पिवळसर होतो हे निसर्गातील सारे सूक्ष्म अवलोकन गुरुजींनी करून ठेवले होते. त्यामुळे निसर्गावर त्यांचे इतके प्रेम जडले होते की, कावळ्याला दगड मारावयाचे सुद्धा त्यांना धैर्य होत नसे. चुकून लहानसा किडा त्यांच्या हातून चिरडला की त्यांना चुकचुक लागून राही. लहानसे फूल, गवताचे पान किंवा किडा जन्माला येण्यापूर्वी किती वर्षे त्यांची उत्क्रांती होत असली पाहिजे. ह्याची त्यांना जाणीव होई आणि इतक्या वर्षांचे निसर्गरचनेचे हे थोर कार्य आपल्या किंवा कोणाच्याही हातून नाश न पावावे ह्याबद्दल ते सावधगिरी बाळगीत. गुरुजींना अहिंसेचा धडा गांधीजींनी नाही शिकवला निसर्गप्रेमाने शिकवला.

फुलपाखरांच्या पाठीमागे धावावे, त्यांच्या अंगावरची नक्षी बघावी. कोकिळेच्या आवाजाचा वेध घेऊन तिला शोधीत फिरावे, निळ्याभोर आभाळाचे रूप डोळ्यांत साठवावे, रात्रीच्या वेळी झाडा-कुरणांतून चाललेली काजव्याच्या प्रकाशाची कवायत पाहावी, याचा गुरुजींना, हव्यास लागून राहिलेला होता. आकाशातील अनंत नक्षत्रे पाहून, ''देवाच्या घरचा हा प्राजक्त तर कोणी हलविला नसेल ना.'' असा त्यांना भ्रम पडे. पहाटे समुद्रकिनाऱ्यावर भरती येऊन गेली आणि ओलसर वाळवंटावर चंद्राचा प्रकाश पडला म्हणजे चोहोकडे चांदी सोडली आहे असे त्यांना वाटे. ही चांदी भरून घ्यावी अशी त्यांना इच्छा होई. एखाद्या डोंगराच्या पठारावर अनंत क्षितिजाकडे ते टक लावून तासन् तास बसत. त्यावेळी सृष्टीमाता आपल्याला विशाल पाळण्यात घालून जोजवीत आहे असा त्यांना भास होई. सूर्योदयाचे आणि सूर्यास्ताचे दृश्य बघून परमेश्वराने आभाळात सोन्याच्या बँका उघडल्या आहेत असे त्यांना वाटे. वाऱ्याच्या सोसाट्यात उभे राहावे,

भूमातेच्या मांडीवर बसावे, लोळावे, तिच्या धुळीचा अबीरगुलाल सर्वांगाला लावावा, मुसळधार पावसात स्वतःला ओलेचिंब भिजवून घ्यावे. समुद्राच्या लाटांचे तडाखे अंगावर घ्यावेत आणि त्याच्या तुषारांचे आणि फेसाचे अंतर्बाह्य मंगल स्नान आपल्याला घडावे हा गुरुजींना रात्रंदिवस निदिध्यास लागून राहिला होता. अरबस्तानातील रात्रीच्या वेळच्या अनंत निःस्तब्ध आकाशानेच पैगंबराच्या तोंडून कुराण वदविले. भारतातल्या नद्यांनी, पर्जन्याधारांनी नि अरण्यांनीच वेदांना आणि उपनिषदांना जन्म दिला. निसर्गाच्या हृदयात शिरून त्यांच्या अतरंगातले सौदर्यांचे सारे झरे गुरुजी आयुष्यभर घटाघटा प्याले. म्हणूनच त्यांना आपल्या जीवनात अमर काव्य निर्माण करता आले!

गुरुजींची काव्यस्फूर्ती ही त्यांच्या स्वतःपुरती मर्यादित नव्हती. ती सामुदायिक झालेली होती. देशात ज्या ज्या प्रचंड घटना घडत होत्या आणि समाजात ज्या ज्या क्रांतीच्या लाटा उठत होत्या त्यांचे आघात गुरुजींच्या हृदयावर होत होते. त्यांची स्पंदने गुरुजींच्या आत्म्यामधून थरथरत होती. महाराष्ट्रातील लेखक जनतास्वातंत्र्याच्या आंदोलनाशी समरस होऊ शकले नाहीत, ह्यांचा गुरुजींना फार विषाद वाटे. गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातंत्र्याच्या महान युद्धात आणि बेचाळीस सालच्या अखेरच्या क्रांतिकारक आंदोलनात रामायण आणि महाभारत निर्माण होण्याइतके समरप्रसंग भरलेले आहेत असे त्यांना वाटे. या क्रांतियुद्धात जे जे अभिमन्यू आणि विश्वासराव बळी पडले, त्याची रोमहर्षक चरित्रे आबालवृद्धांना सांगत गुरुजींनी साऱ्या महाराष्ट्रामध्ये संचार केला. नंदुरबारचा कोवळा शिरीषकुमार, माथेरानचा कोवळा बिब्यावाघ कोतवाल, नऊ गोळ्या खाणारा वडूजचा परशुराम पहिलवान, फासावर चढलेला कराचीचा हेमू आणि नागपूरचा विष्णू ह्या हुतात्म्याच्या बलिदानाचे पोवाडे गुरुजी जेव्हा आपल्या काव्यात्मक वाणीतून गाऊ लागत तेव्हा वीस-वीस पंचवीस-पंचवीस हजार लोकांच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाझर वाहू लागत. मृतांना उठवणारे, पाषाणांना विरघळवणारे, पर्वतांना वाचा फोडणारे आणि आकाशाला गहिवरणारे जेवढे प्रसंग या देशात घडले तेवढ्या - तेवढ्यांची नोंद गुरुजींनी आपल्या वाङ्मयात करून ठेवलेली आहे.

तुकारामानंतर जनतेचा एवढा महाकवी या महाराष्ट्रात होऊन गेला नाही.

गुरुजींचा उद्‌गार हा जनतेचा उद्‌गार होता. म्हणूनच गुरुजीचें काव्य हे कोटी कोटी जीवांचे वृंदगान झाले. गुरुजी म्हणत, ''मोठमोठ्या साहित्यिकाप्रमाणे माझ्या वाङ्‌मयात हिरे-मोती आढळणार नाहीत. पुष्कळांना ते पै किमतीचे वाटेल. पण भूक लागली असता हिरे उपयोगी पडत नाहीत. त्यावेळी पै किंमतीचे डाळेमुरमुरेच पृथ्वीमोलाचे वाटतात.'' गरीब आणि श्रमजीवी जनतेची सर्व दुःखे आणि दुखणी दूर व्हावीत ही गुरुजींच्या जीवनातली एकच तळमळ होती. ती तळमळ गुरुजींनी आपल्या वाङ्‌मयात ओतली आहे. म्हणून त्यांनी लिहिलेल्या प्रत्येक अक्षराअक्षरांत आणि ओळीओळींत त्यांचे हृदय प्रकट झाले आहे. 'माझ्या वाङ्‌मयाला हात लावाल, तर माझ्या हृदयाला लावाल' असे ते म्हणत, असे फार थोडे आणि भाग्यशाली कवी नि लेखक जगात असतात की, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यांच्या काव्यात आणि वाङ्‌मयात होते. साने गुरुजींचे वाङ्‌मय मात्र असे आहे की, वाक्यावाक्यांत आणि कडव्याकडव्यांत तुम्हांला गुरुजींच्या निर्मळ आणि पवित्र मूर्तीचे दर्शन होईल. समाजपुरुषाशी साने गुरुजी इतके समरस झाले होते की, सागराप्रमाणे सर्व नद्या, झरे आणि ओहळ त्यांनी आपल्या विशाल व्यक्तिमत्त्वामध्ये शोषून घेतले होते. कोकणातल्या आणि देशातल्या खेड्यापाड्यामध्ये हिंडून तेथील, म्हाताऱ्या बायाबापड्यांकडून त्यांनी कहाण्या, उखाणे, ओव्या, गाणी, गोष्टी, आख्यायिका आणि दंतकथा ह्यांची प्रचंड संपत्ती गोळा करून आणली. महाराष्ट्रामधल्या निरनिराळ्या धंदेवाल्यांशी दोस्ती बांधून त्यांच्या धंद्यातील सारी शब्दसंपदा त्यांनी आपल्या खांद्यावर वाहून आणली. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वर-तुकारामांचे अभंग ह्या विस्तीर्ण सारस्वतसागरात अवगाहन करून त्यांच्या तळात आढळलेली सर्व रत्ने आणि मौक्तिके त्यांनी वेचून आणली. महात्माजींपासून त्यांनी सत्याग्रहाची दीक्षा घेतली. रवींद्रांपासून ते सौंदर्यप्रेमाचा मंत्र शिकले. विनोबांपासून भारताच्या संस्कृतीचे हृदय त्यांनी समजावून घेतले. सेनापती बापटांपासून त्यांनी झाडूचे तंत्र उचलले. अशा प्रकारे कोकणामध्ये दापोली तालुक्यात उगम पावलेली गुरुजींच्या जीवनाची सरिता दऱ्याखोऱ्यातल्या ओहळांचे, पानाचे आणि फुलांचे अर्घ्य घेत घेत, प्राचीन सारस्वताच्या अभ्यासाने समृद्ध होत आणि आधुनिक काळातील मोठमोठ्या पर्वतांच्या पायांचे प्रक्षालन करीत करीत सर्व महाराष्ट्रभर पसरली

आणि लक्षावधी लोकांच्या वैराण नि खडकाळ आयुष्यात तिने शांतीची आणि समाधानाची पिके पिकवून सर्वत्र आनंदीआनंद करून टाकला. वेदांमध्ये वाणीचे वर्णन केले आहे की, ''वाणी ही राष्ट्राची आहे. सर्व लोकांचे संगमन करणे हे तिचे कार्य आहे.'' गुरुजींच्या वाणीने आणि वाङ्मयाने हेच अवघड कार्य महाराष्ट्रात केले. समाजातील भेदाची, द्वेषाची आणि सुडाची सर्व भावना नष्ट व्हावी आणि परस्परांत ''जीवांचे मैत्र जडावे. स्नेहभाव उत्पन्न व्हावा, निर्भयता आणि स्वाभिमान निर्माण व्हावा.'' या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन गुरुजींनी आपल्या वाणीची पेरणी केली.

शुद्ध, निर्हेतुक आणि आत्यंतिक प्रेम हीच गुरुजींच्या जीवनाची प्रेरणा होती. या प्रेमाखातर वाटेल तो त्याग करण्याची त्यांच्या मनाची सिद्धता होती. दीपशिखेवर स्वप्रणाची आहुती ओतणाऱ्या पतंगाच्या जातीचे त्यांचे प्रेम होते. जीवन हा एक महान यज्ञ आहे हे त्यांचे तत्त्वज्ञान होते. सृष्टीतील प्रत्येक वस्तू सतत आपले सर्वस्व दुसऱ्यांना देत असते. चंद्र-सूर्य प्रकाश देतात. निर्झर-सरिता जीवन देतात. लता-वृक्ष फुले आणि फळे देतात. जगताच्या सुखासाठी सर्वस्वाचे अर्पण करणे आणि वेळ पडल्यास हवन करणे यातच जीवनाची खरी पूर्तता आहे असा गुरुजींचा विश्वास होता. त्याचमुळे जीवनाइतके मरणाचेही त्यांना आकर्षण वाटत होते. किंबहुना जीवनाएवढेच मरणावरही त्यांचे प्रेम होते. जीवनातले सौंदर्य आणि रमणीयता केवळ मरणामुळेच निर्माण झाली आहे असे ते म्हणतात. मरण म्हणजे माहेरी जायचे. जगन्माउलीला भेटावयाचे. अनंतात जाऊन येथेच्छ डुंबायाचे. जिवाशिवाची भेट करून देणारी मरण ही एक पौर्णिमा आहे. मरण म्हणजे प्रियकराला भेटायला जायचे. मरण म्हणजे गंमत, खेळ, त्यासाठी रडावयाचे काय कारण आहे? मरण ही जीवनाची परीक्षा आहे. जो मरतांना रडतो त्यांचे जीवन रडके. जो मरताना हसतो त्याचे जीवन कृतार्थ. महान ध्येयासाठी हे देहाचे मडके हसत हसत फोडावयाला जो तयार होतो तोच भारतीय संस्कृतीचा उपासक, असे मरणाचे सुंदर महाकाव्य गुरुजींनी किती तरी वर्षे आधी लिहून ठेवले होते. जे काव्य त्यांनी लिहिले तेच त्यांनी खरे करून दाखविले. 'मरणांत खरोखर जग जगते' असली मरणावर नुसत्या शब्दांची काव्ये लिहिणारे कवी ह्या महाराष्ट्रात आजवर पुष्कळ होऊन गेले असतील. पण 'आपुले मरण स्वतःच्या

डोळ्यांनी' पाहणारे तुकारामासारखे आणि मरणाच्या गळ्यात दोन्ही हात घालून त्याचे कडकडून चुंबन घेणारे साने गुरुजींसारखे महाकवी शतकाशतकांमधून एकदाच जन्माला येतात. चंद्रावरच्या सशाची एक काव्यमय गोष्ट गुरुजींनी सांगून ठेवली आहे; सशाची सत्त्वपरीक्षा करावयाला देव आला. देव म्हणाला, 'मला खायला दे.' ससा म्हणाला, 'काय देऊ? माझे या जगांत काय आहे? हे माझे शरीर आहे. ते मी आगीत टाकतो, ते खा' सशाने आगीत उडी टाकली. पण तो जळेना, भाजेना. तेव्हा देव सशावर प्रसन्न झाला, आणि सर्व जगाला दिसेल असे त्याचे चित्र त्याने चंद्रावर काढून ठेवले. समाजातील जातीयता, प्रांतीयता आणि ध्येयशून्यता नष्ट करण्याकरिता गुरुजींनी जन्मभर प्रयत्न केला. गुरुजी हताश झाले. जणू काही समाजपुरुष त्यांची सत्त्वपरीक्षाच पाहत होता. गुरुजींनी सशाप्रमाणेच एकदम मरणाच्या आगीत उडी मारली आणि स्वतःचे शरीर जाळून घेतले. त्या चंद्रावरल्या सशाप्रमाणे गुरुजी अमर झाल्यावाचून राहणार नाहीत. देवाला प्रसन्न करण्यासाठी एका मुलाने आपल्या आईला ठार मारले आणि तिचे काळीज हातात घेऊन तो पळत पळत देवाकडे जात असता वाटेत ठेच लागून पडला. तेव्हा त्याच्या हातातल्या काळाजातून मातेचे हृदय एकदम उद्‌गारले, ''बाळ, तुला लागले तर नाही ना?'' समाजातल्या उन्मत्त झालेल्या दैत्यशक्तींनी साने गुरुजींचा आज बळी घेतला असला, तरी त्याच्या अमर वाङ्‌मयात जिवंत असलेले त्यांचे मातेचे हृदय यापुढे समाजाचे सारे अपराध विसरून त्यांच्या प्रत्येक अधःपतनाच्या वेळी त्याला उचलून कडेवर घेत जाईल आणि त्यांच्या डोळ्यांतले अश्रू पुसून नि त्यांच्या जखमेवर फुंकर घालून ममतेने विचारीत राहील की, ''बाळ तुला फार लागले नाही ना?'' साने गुरुजींचे वाङ्‌मय मातेच्या वात्सल्याने अनंत काळपर्यंत महाराष्ट्रातील तरुण पिढीचे संगोपन करीत राहील यात मुळीच संशय नाही.

('मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी : साने गुरुजी' मधून)

❑❑❑

# निळू मांग

**– अण्णाभाऊ साठे**

तोफ तयार झाली. गोळा भरला होता. बत्तीवाला बत्ती घेऊन पुढं आला आणि तो साजूरचा निळू मांग हातात काळी टोपी घेऊन तोफेकडं चालू लागला. त्याचं प्रत्येक पाऊल मजबूत पडत होतं. तो निर्भय होता. आता आपण मरणार आहोत हे त्याच्या गावीच नव्हतं. त्याला कसलीच भीती नव्हती. तो वर सरळ तोफेपुढं जाऊन उभा राहिला.

सर्व साहेब दुचित झाले. त्यांनी एकमेकांकडे नजर टाकली. गंभीर चेहरे केले. काहीतरी बोलावं असं त्यांना वाटू लागलं. हा निळू मांग आता तोफेच्या तोंडी जाणार याची काळजी वाटू लागली. अखेर एक वरिष्ठ अधिकारी दुःखी स्वरात म्हणाला, 'प्रभू तुझ्या आत्म्याला शांती देवो. तुला क्षमा करो. आता तू प्रभूकडं जाणार. जर तुला काय बोलायचं असेल तर बोलून घे. आता तू मरणार. जगातून जाणार. तुझा शब्द उमटणार नाही. बोल, काही इच्छा असेल तर सांग.'

हे ऐकून निळूला नवल वाटलं. मनाशी तो पुटपुटला, मला तोफेच्या तोंडी देऊन मोकळी होणारी ही माणसं आता या शेवटच्या घडीला माझं इतकं कौतुक का करीत आहेत? मी यांचा इतका लाडका कधी होतो? आणि उघडपणे म्हणाला, 'म्हंजी साहेब, मी आता मरणार आणि मी मरता मरता बोलावं असं

तुमचं मत हाय; पण कुणासंग बोलू? माझी घोडी तिकडं उभी हाय. माझी माणसं तिकडं उभी हायती नि मी बोलायचं म्हंजी वाईच जडच हाय. मला वाईच इचार करू द्या.'

आणि निळू विचार करू लागला.

आपण खुरप्याच्या अणीपासून थेट तोफेच्या तोंडापर्यंत कसं आलो याचाच तो विचार करू लागला. मला कुणी नि का आणलं? या प्रश्नाचं निळू उत्तर शोधू लागला.

साजूर गावात निळू मांग एक सज्जन, गरीब माणूस म्हणून ओळखला जात होता. प्रत्येक माणूस निळूला मान देत होता. निळू कोणाची थुंकी ओलांडत नव्हता, कुणाच्या पाचोळ्यावर पाय देत नव्हता. भरपूर उंची, अंगात भरपूर बळ, रंगानं सावळा नि चेहऱ्यानं गावात तो उजवा होता. त्याच्या वयाला नुकतंच बाविसावं वर्ष लागलं होतं. पण तो शांत होता. आई, काकू, नानी, वहिनी, अक्का असं म्हणून तो गावचा लाडका झाला होता. त्याला फक्त आई होती. आईनंच त्याला जगवून वाढवला होता. लहानांपासून वृद्धापर्यंत सर्वच लोक निळूला चांगला माणूस म्हणत होते. अब्रूदार म्हणून त्याची गावात ख्याती होती.

साजूर गाव कोयनेच्या काठावर वसला होता. नदीकाठी मका, ऊस ही पिकं मी म्हणत होती. कष्ट करून माणसं– गरीब माणसं पण श्रीमंत होती.

साजुरात चिमाजी आणि भिमाजी हे दोन भाऊ पाटील घराण्यात जन्माला येऊन आपापसात भांडत होते. शेवटी त्यांनी गावचे पंच जमवून आपल्या जमिनीची वाटणी करून घेतली होती, पण त्यांचं वैर कायम होतं. धाकटा भिमा भ्याला होता. जरी आपण आपला हिस्सा वाटून घेतला तरी हा थोरला चिमाजी आपल्या हाती काहीही पडू देणार नाही असं त्याला वाटत होतं. म्हणून तो एक चांगला राखण्या हुडकत होता.

भिमाचं उभं पीक नाहीसं होत होतं. उभा मका लुटला जात होता. हळद चोरीला जात होती नि त्यांचं कुणीच मनावर घेत नव्हतं. तो भिमा हैराण झाला होता. तो लुटला जात होता. त्याला कुणीतरी एक खंबीर राखणदार हवा होता.

सकाळ झाली होती. साजूर गाव जागा होऊन आपल्या रोजच्या उद्योगाला लागला होता. नदीकडं माणसं घागरी घेऊन पळत होती. पाणवठ्यांची पांद माणसांनी भरली होती. कावडी करकरत होत्या. निळू घागर भरून घराकडं निघाला होता. वाटेत भिमा भेटला. निळूचा तो प्रचंड देह पाहून थांबला आणि विचार करून म्हणला,

'निळू, माझा मका राखणीला घेतोस का?'

'काय देणार?' निळूं खांद्यावर घागर घेऊन म्हणाला, 'मला काय, कुणाचं बी कामच करायचं हाय'

'मी तुला मणभर मकं नि मणभर भात घालीन. बोल, कबूल हाय का?'

'कबूल!' निळूला आनंद झाला. उगीच उंडगं फिरण्यापरीस काहीतरी काम करावं म्हणून त्यानं भिमा पाटलाचा मका राखणीला घेतला. बोलणं-सर्व काही ठरलं. मणभर मकं नि मणभर भात मिळणार याचा निळूला आनंद झाला.

निळूला नुकतीच गुन्हेगार म्हणून नव्या कायद्यानुसार तीन वेळची हजेरी लागली होती; पण 'चांगला माणूस' म्हणून गावानं शिफारस केल्यानं त्याला एक वेळची हजेरी द्यावी लागत होती.

निळू गरीब होता. रात झाली की घराबाहेर पडतच नव्हता नि पडलाच तर शेजारी असलेल्या महारवाड्यात जाऊन बाबा महाराला भेटत होता. त्याच्या घरी बसत होता. बाबाचा निळूला मोठा आधार होता. तो बाबाचा शब्द मोडत नव्हता. उभ्या गावात सर्व जण बाबाला शहाणा समजत होते.

शिवारात मका ताल मारीत होता. आता हुरडा झाला होता. गावात मक्याचे बिरंबे दिसत होते. पोरंबाळं कणसं खात होती. पावसाळा संपताच लोकांपुढे नवं अन्न आलं होतं. माणसं मक्याच्या भाकरी कपाळाला लावून खात होती.

निळूनं नदीकाठी भिमा पाटलाच्या मक्यात खोप घातली होती. खोपीपुढं जाळ केला होता नि राखणदार म्हणून मक्याची राखण करीत होता.

निळूनं भिमा पाटलाचा मका राखणीला घेतल्यामुळं गावात लोक म्हणत होते की, ''निळूनं हे बरं केलं नाही. दोन हत्तीच्या लढतीत गरीब उगंच पडला.

याचा परिणाम वाईट होणार.''

निळू एक वेळ हजेरी देऊन मक्याची राखण करीत होता. हातात कुऱ्हाड घेऊन रात्रभर त्या मक्याच्या शेताभोवती पहारा करीत होता. त्यानं त्या शेतात खोपीपुढं आगठी काढली होती. एखादं कणीस भाजून ते खात खात तो राखण करीत होता. त्याच्या खोपीपासून थोड्या अंतरावर चिमा पाटलाची वस्ती होती. तो आणि त्याचा दोस्त रामू सुतार हे दोघं रात्रभर बसून चिमाच्या मक्याची राखण करीत होते. भिमाचा मका निळू मांगानं राखणीला घेतल्यामुळं चिमाजीला राग आला होता. तो भिमावर सूड घ्यायची वाट पाहत होता आणि रामू सुताराला 'काय करावं?' याचा सल्ला विचारत होता.

आणि निळू भिमा पाटलाच्या शेतात तयार होता. सावध होता. निळूवर चालून जाणं कुणालाच शक्य नव्हतं. त्याची कुऱ्हाड काय करील याचा नेम नव्हता. निळूचा तो देह पाहून चिमाजी टरकत होता, पण निळूवर कसा तरी सूड घ्यावा असं त्याला वाटत होतं.

दिवस मावळत होता. निळूला हजेरी देण्यासाठी जाणं भाग होतं. तो गावाकडं निघाला होता. निळू गावाकडं चाललेला पाहताच चिमानं हाक मारली. तो म्हणाला,

'ए निळू मांग, ये की लेका. अगदी शेताचा मालक असल्यावाणी राखण करीत बसलायास. कुठं निघालास? ये, पान खाऊन जा.'

'नको. हजेरी देऊन येतो.' निळू काकुळतीला येऊन म्हणाला, 'वाईच मक्याकडं नजर असू द्या. आता हजेरी देऊन येतो.'

'जा, पण लवकर ये,' चिमा म्हणाला आणि निळू गावाकडं गेला.

निळू दूर जाताच रामू सुतार हसला. चिमा पाटलाला आनंद झाला. रामू म्हणाला,

'पाटील निळ्याची राखण करू का?'

आणि चिमांन त्याला होकार देताच त्यान पोतभर कणसं मोडली. काही भाजून खाल्ली नि बाकीची घरी घेऊन गेला.

सकाळी मक्याची कणसं चोरीला गेलेली पाहून निळूला वाईट वाटलं. तो भिमाकडं जाऊन म्हणाला, ‘रात्री हजेरीला गेलो नि चोरांनी मला दगा दिला. पोतंभर मका गेला.’

‘ठीक झालं. पण आता सावध ऱ्हा.’ भिमान निळूला सूचना केली.

मग निळू बाबा महाराकडं गेला. सर्व हकीकत सांगून म्हणाला, ‘मी हा मका राखणीला घेऊन चूक केली. आता काय करू? मी रोज हजेरी देण्यासाठी जाणार नि घरचं चोर मका फस्त करणार’

बाबा महारानं निळूला धीर दिला. तो म्हणाला, ‘आजपासून मी येतो मळीला, तू हजेरी देऊन येईपातूर मी पहारा करीन, मग रातभर तू पहारा कर.’

हे ऐकून निळूला आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी जेव्हा निळू हजेरी देण्यासाठी गावात निघाला तेव्हा पुन्हा चिमाजी पाटलानं त्याला हाक मारली नि निळू जवळ येताच रामा सुतार म्हणाला,

‘काय निळू मांग, राती नांगीसरावर मकीसरानं तप केलं तवा कुठं होतास?’

निळू हसला नि गावात गेला. त्याच्या खोपीपुढं बाबा महार पहारा करीत बसला होता. त्याला पाहून सुतार चरफडून गप्प बसला.

निळूनं हजेरी दिली. येता येता त्यानं चिमा पाटलाचा धडकाच मेंढा घेतला. सुताराची नवी जडणीची गाडी घेतली नि महारवाडा गाठला. मेंढा नि गाडी बाबाच्या दारात ठेवून तो मळीला आला नि म्हणाला.

‘बाबा, तुझ्या दारात सुताराची नवी गाडी नि पाटलाचा मेंढा उभा हाय. तू लवकर जा. मेंढा मारून ती गाडी चुलीला लाव. मेंढा शिजव नि मला घेऊन ये. पळ जा.’

बाबा गेला, त्यानं मेंढा मारला. गाडी निखळून जाळली. मेंढा रांधला आणि त्यातलं मास घेऊन तो रात्री मळीला आला. मग निळून पोटभर मांस खाल्लं. ढेकर दिला नि बाबा पुन्हा घरी गेला.

सकाळ झाली. रामू सुतार बोंबलत आला आणि तो चिमाजी पाटलाला म्हणला,

'पाटील, मी रात्री खालसात निघालो. लोकांची तीनशाची गाडी गेली आणि तुमचा मेंढाबी गेला.'

हे ऐकून चिमाजीची पाचावर धारण बसली. त्याला निळूचा संशय आला. दोन दिवस गेले.

रात झाली होती. गावात प्रत्येक वस्तीवर जाळ धुमसत होता. निळूनं आपल्या वस्तीवर बाबा महाराला बसवला होता नि आपण गावात गेला होता. आता निळ्या हजेरीला धावत गेला असंल. आपण जाऊन मागांचा काटा काढावा या विचारानं रामू सुतार निळूच्या वस्तीकडं गेला. पण बाबा अंगावर घोंगड घेऊन पाठमोरा बसला होता. हा निळ्याचं आहे असं समजून सुतारानं पळ काढला. हजेरी देऊन निळू येताच बाबा आपल्या घरी गेला. चार दिवस तसेच गेले.

एका सकाळीच रामू सुतार निळूकडं आला. त्याच्या आगटीजवळ बसला नि म्हणाला,

'काय निळू, कडक राखण करतोस?'

'लोकांची नोकरी हाय ही' निळू म्हणाला, 'पण ए सुतार, परवा गाडीसरावर मेंढीसरानं तप केलं तवा तू कुठं र व्हतास?'

हे ऐकून सुतार चरकला. आपली नवी गाडी नि पाटलाचा मेंढा मांगानंच गारद केला अशी त्याची खात्री झाली. तो काहीच बोलला नाही. गुमान उठून चिमा पाटलाकडं गेला, निळूचा बोल त्यानं पाटलाला सांगितला.

मांगानं दगा दिला. आपला मेंढा मारला. सुताराची गाडी जाळली. आता निळूचा बंदोबस्त केलाच पाहिजे, असा विचार करून त्यानं निळूच्या नावाची फिर्याद नोंदवली. गावातील पाच साक्षीदार उभे केले. निळूला अटक झाली. खटला उभा राहिला. पाटलानं वकिलाची फौज उभी केली. कायद्याची उलथापालथ होऊन शेवटी निळूला तीन महिन्याची सजा लागली. तीन महिने खडी फोडायला निळू तुरुंगात गेला. विनाकारण गेला.

निळूनं तीन महिने तुरुंगात काढले आणि तो घरी आला तेव्हा तो जळत-कढत आला. ज्यांनी ज्यांनी त्याच्याविरुद्ध साक्षी दिल्या होत्या. त्यांचा तो कर्दनकाळ होऊन आला. निळूत झालेला तो भयंकर बदल पाहून गावकरी टरकले. साक्षीदार भयभीत झाले. पोटात सुई जावी तसे ते चमकू लागले.

निळू काहीच बोलला नाही. तो खात होता. गावातील लोकांनी 'कसं काय निळू' म्हणून त्याची विचारपूस केली. पण निळू कोणाशीच बोलला नाही.

आठ दिवस गेले नि एका रात्री एकाच वेळी पाच साक्षीदारांची घरं एका ओळीनं पेटली. अगदी ढणढणत राहिली नि त्यांनी दुसरी पंधरा पोटात घेतली. एका रात्रीत वीस घरांची राख झाली.

पुन्हा चार दिवस गेले नि पुन्हा चार घरांनी पेट घेतला. त्याच्या जाळानं आजूबाजूची दहा घरं जाळून टाकली. गाव भयभीत झाला. ओसाड झाला. सर्वत्र राख दिसू लागली.

ही निळू मांगाची करणी म्हणून गाव बोलू लागला. चिमा पाटलांची पाचावर धारण बसली. त्याच्या तोंडचं पाणी पळालं आणि एके दिवशी त्याच्याही घराला आग लागली. गावात हाहाकार उडाला. 'आता गावात घर शिल्लक राहत नाही.' असं माणसं बोलू लागली. सुताराचं घर तर पहिल्याच दमात जळालं होतं. त्याला निळूनं सांगावा दिला होता की, 'दुसरं घरं बांधू नको, तू जेवढी घरं बांधशील ती सारी अशीच जळणार आहेत.' नि तो सांगावा ऐकून सुतार एक खोप घालून बसला होता.

निळू मांग अर्धा गाव जाळून फरारी झाला होता. रानात फिरत होता. त्यानं कुऱ्हाड घेऊन डोंगर धरला होता. त्या भागातील सर्व फरारी त्याला मिळाले होते. ते सर्व एक जिवानं डोंगरात राहत होते. प्रत्येक चोर चोऱ्या करून घर भरत होते नि नाव निळूचं होत होतं. त्या भागात जेवढा गुन्हा होत होता. तो निळूच करीत आहे अशी सरकारात नोंद होत होती. सरकार निळूवर दात खात होतं. धरणं सुटलं होतं. बंदुका त्याचा शोध घेत होत्या.

आणि निळू मृत्यू चुकवीत होता. जिवावर उदार होऊन पळत होता. कधी उभा राहून लढत होता. त्याच्या दराऱ्यानं साजून गाव भयभीत झाला होता.

निळूचा आवाज वाढत होता. त्याचं नाव ऐकताच मी मी म्हणणाऱ्यांना कापरं भरत होतं. कुणीही सरकारात तक्रार करीत नव्हतं. जो सरकारात कळवील त्याचा सत्यानाश होईल ही सर्वांनाच भीती होती.

दूरदूरचे गुन्हेगार निळूला मोठा माणूस मानीत होते. त्याची मदत घेत होते. स्वतः चोरी करून निळूला ऐती वाटणी आणून देत होते. निळूच्या पाठबळानं त्यांना गगन ठेंगणं वाटत होतं.

निळू निर्भय झाला होता. तो वाटेल ते करायला सज्ज होता. तो कुणालाच भीत नव्हता. आता त्यानं जगावरच चढाई आरंभली होती.

सकाळ झाली होती. कृष्णाकाठ शांत भासत होता. एका डोंगरात निळू बसला होता. तोच एक माणूस आला. तो म्हणाला, 'मी वारणाकाठचा हाय. वारणाकाठी भेडस गावात सरकारी खजिना हाय. तेवढा फोडून जन्माचं सार्थक करू या.'

निळू तयार झाला. आपली माणसं घेऊन तो भेडसगावाला निघाला. तो खजिना वाटेगावचा फकिरा मांग फोडणार हे ऐकून त्याला आनंद झाला. त्यानं घाई केली नि फकिराची भेट घेतली.

नि एका रात्री सरकारी खजिना लुटला गेला. एक लाख रुपये गेले नि मग सरकार खवळले. अनेक फौजदार धावू लागले. माग काढण्यात आला नि एका मांगाने सर्वांची नावं सांगितली. त्यात निळूचंही नाव निघालं. निळूनं सरकारी खजिना फोडला म्हणून धरणं सुटलं.

रामा सुतारानं अंथरूण धरलं होतं. तो रोज सकाळी आपण वाईट वागलो म्हणून कोपऱ्यात बसून तोंडात मारून घेत होता.

कित्येक गावकरी आपलं घर कधी पेटणार याची वाट पाहत होते. कित्येकांना आपलं घर पेटलं आहे अशी स्वप्नं पडत होती. ते सर्व रामा सुतार नि चिमा पाटील यांना शिव्या देत होते.

निळू निर्भय होता. भेडसगावचा खजिना लुटून आल्यापासून तर तो जिवावर उदार झाला होता. तो दररोज मशाल घेऊन गावात शिरत होता. भयाण रात्री

मशालीच्या प्रकाशात तो भयंकर उग्र चेहरा पाहून लोक गांगरत होते. दाराच्या फटीतून निळूला पाहत होते आणि ‘देवा ही पीडा पुढं घेऊन जा!’ म्हणून देवावर भार घालीत होते. निळूनं गावावर जबर दहशत बसवली होती. तो मनात म्हणत होता, ‘मी गरीब म्हणून दिवस काढले. रामराम केला. दूर बसून तंबाखू मागून घेतली. दूर बसून ती खाल्ली. पण गावानं त्याचा गैर अर्थ लावला. मला दुबळा समजून तुरूंग दाखवला. आता मी त्यांना मसणवटा दाखवणार.’

दिवस उगवत होते नि मावळत होते. निळू डोंगरात फिरत होता. त्याचा दरारा वाढत होता. सरकारही स्वस्थ नव्हते. मोठमोठे अधिकारी निळूला कैद करायला धावपळ करीत होते. प्रत्येक पोलीस जीव राखून चढाई करीत होता. त्याला निळूचा मारा कळत होता. पिसाळलेला माणूस– निळू– जीव घेईल अशी त्या हरेकाला भीती वाटत होती.

सरकार इरेला पडलं. आपलं सार बळ मैदानात आणलं आणि निळूचा पाठलाग आरंभला. डोंगर वेढला. रानात प्रत्येक बांधावर पोलीस उभा केला. प्रत्येक जाळी वेढली. प्रत्येक झाडाखाली शिपाई दिसू लागला. निळू कोंडला गेला. त्याचं बळ कोतं पडलं. त्यानं हत्यार टाकलं नि तो सरकारच्या हवाली झाला.

मग साजूर गावच्या कित्येक लोकांनी सुटकेचा निःश्वास टाकला. त्यांच्या डोक्यावरची लटकती तलवार दूर झाली नि ते ऐकून निळूची म्हातारी आई रडू लागली. आपला निळू फुकट फासावर जाणार याचं तिला दुःख झालं.

पुन्हा निळूचा खटला उभा राहिला. सरकारनं कायदा नि त्याचे किडे वकील यांचा कोर्टात खच घातला. त्या सर्वांपुढं एकटा निळू उभा राहिला. त्याला वकील नव्हता. त्याच्या वतीने उभं राहणं म्हणजे एक गुन्हाच आहे असं वकिलांना वाटत होतं. निळूच्या वतीनं साक्षीदार नव्हता. हा माणूस चांगला आहे, असं म्हणायचं कुणात सामर्थ्य नव्हतं. तो एकटा होता, पण निर्भय होता. ‘आपण गुन्हा केला नाही. पण इमानदार आहोत. पण राम्या सुतार नि चिम्या पाटील यांनीच आपल्याला चिडवून या भयंकर मार्गाला लावलं. तेच खरे गुन्हेगार आहेत.’ असं त्याचं मत होतं.

सरकारी खजिना लुटून राजद्रोह करणारा निळू मांग हा भयंकर गुन्हेगार मानला जात होता. त्याला क्षमा नव्हती. न्यायाधीश त्याला कोणती कडक शिक्षा करावी याचा विचार करीत होते. काळ्या पाण्यापासून फाशीपर्यंतच्या सर्व शिक्षा त्यांना सौम्य वाटत होत्या. कडक शिक्षा सांगण्यात आली. ती ऐकून निळू हसत म्हणाला.

'सरकार, मायबाप, मी निळ्या मांग. मी साजुरात तंबाखू मागून खाणारा. तुम्ही माझी किंमत तोफेच्या गोळेच्या किंमतीची ठरवल्याबद्दल मी तुमच्या पायावर डोकं ठेवतो.' असं म्हणून निळू मटकन खाली बसला. त्यानं आपलं मस्तक जमिनीवर टेकून न्यायमूर्तींला नमस्कार केला आणि तसाच उठून बेगुमान चालू लागला. मृत्यूकडे निघाला. चालता चालता तो बरोबर असणाऱ्या शिपायाला म्हणाला.

'ए, नोकरी करून फुकट पोटावारी मरू नगं. मरताना तोफेच्या एका गोळ्याची किंमत घेऊन मर. आरं, तोफेच्या तोंडी म्हंजी मामुली काम नव्हं!'

तोफेपुढं उभं राहून काय बोलावं याचा निळू विचार करीत होता. आपल्या गतायुष्यातील अनेक प्रसंग आठवून तो एकाएकी भानावर आला. हसला नि म्हणाला,

'सायब, मी काय बोलू? आता मी मरणार. बोलण्यासारखं माझ्याकडं काईच न्हाय. तुमी मला लवकर वाटेला लावा. संपू द्या एकदाची ही कटकट.'

'तुला काही सांगावंसं वाटतंय का?' एका साहेबानं गंभीर होऊन विचारलं.

निळू शांतपणे म्हणाला, 'सरकारी खजिना लुटला लुटणाऱ्यानं आणि तोफेच्या तोंडी जाणं बेगुन्हा निळ्यानं. चला द्या बत्ती!'

साहेब चकित झाला. त्याचा धीर, त्याची ती धीरवृत्ती नि मृत्यूला कवटाळण्याची हिंमत हे सर्व पाहून साहेबांना नवल वाटलं. त्यांनी आपापसात पुन्हा विचार केला. 'निळूला तोफेच्या तोंडी देऊन आपण फार मोठं काहीच साध्य करू शकत नाही. उलट, निळ्याला सोडला तर लोक चकित होतील,'

असा विचार करून वरिष्ठ अधिकाऱ्यानं 'निळूला सोडा' असा हुकूम केला. निळू सुटला, अगदी आनंदानं नाचत हर्षभरित होऊन आपल्या आईला भेटण्यास साजूरकडं धावू लागला आणि तोफेच्या तोंडी गेलेला निळू परत आलेला पाहून गावकरी दुमचटले.

साजुरात येताच निळूनं प्रथम कोयना नदीत उडी घेतली. भरपूर पोहला नि म्हणाला, 'आई, ह्यो निळ्या जगला. मेला असता तर हे तुझं पाणी मला अंतरलं असतं. आता मी सरळ माणसासारखा वागनं, माणसासारखा जगंन!'

('बरबाद्या कंजारी' मधून)

❑❑❑

# मोरणी

**– विभावरी शिरुरकर**

---

पोलीस मोरणीला घेऊन महिला–सुधारगृहात आले, तेव्हा मोरणी एखाद्या जंगली वाघिणीसारखी दिसली. तिच्या नजरेत खुनशीपणा होता, कडवटपणा होता, तिरस्कार होता. तिला कोणताही प्रश्न विचारणे म्हणजे स्वतःचा अवमान करूण घेणे असेच तिची नजर सांगत होती.

'नांव काय तुझं?' तिचे नीटस नाक–डोळे निरखीत मी विचारले. ती काहीच बोलली नाही. पुनः विचारले तरी ती तितक्याच उद्दामपणाने अबोल राहिली. अखेरीस पोलिसांनी जरा डाफरून म्हटले, 'नांव सांगा ना बाई.'

'त्या कागदात लिहिलं आहे ना? मला कशाला विचारायला हवं? तीच आहे मी.'

काय बाई आहे पण! अशा अर्थाचे काहीसे तिरस्काराचे हसू पोलिसांच्या नि माझ्याहि चेहऱ्यावर उमटले. 'बरं असू द्या हिला. जा तुम्ही.' मोरणीला सांभाळणे एकंदरीत कठीणच आहे, अशा विचाराने पछाडून मी पोलिसांना रजा दिली.

मोरणी ही एक सतरा वर्षांची मुलगी होती. तिच्या वागण्यातील व नजरेतील उद्दामपणाने मला रागच आला होता. हे रत्न केव्हा पळून जाईल याचा नियम

नाही. या विचाराने काहीशा कठोरपणानेच मी जिजाला म्हटले, ''जा हिला घेऊन. ७ नंबरची खोली.''

अब्रू गमावून बसलेल्या त्या चोवीस-पंचवीस जणीत स्वभावाचे वेगवेगळे नमुने होते. त्यात ही नवी भर पडली होती. त्यांची सगळ्यांची ती एकच एक कहाणी. मोहाच्या क्षणाची. नासावलेल्या उभ्या जन्माची, तो मोहाचा क्षण त्याचा होता की तिचा हे सत्य त्यांच्याखेरीज कुणालाच माहीत नसलेली ती एकच एक कहाणी सगळ्यांच्या मुखातून मी ऐकत आले होते. खाली मान घालून दिवस नि दिवस काही न बोलणारांकडून मी ती ऐकली होती. रात्रंदिवस रडून डोळे सुजवून अवाक् झालेल्याकडून मी ती ऐकली होती. कडाकडा बोलून, आक्रंदून, तळमळून सांगितलेली ती मी ऐकली होती. कधी कुणाची वाणी मनाचा खराखुरा वेध घेई, तर कधी लपवालपवीचा खेळ चालल्यासारखा वाटे. पण थोड्याच अवधीत साऱ्या उभारलेल्या भिंती कोसळत. कान, नजर, बोलणे, वागणे साऱ्यांतून मतांचा अंदाज लागे. पण मोरणी ही विलक्षणच. ती एक अक्षर बोलली नाही. ती कुणातही मिसळली नाही. तिला सांगितलेलं काम तिने कधी चुकवले नाही. पण तिच्या चालण्यात, मौनात, कृतीत, राग-राग-राग-तिरस्कार भरलेला असे. हा निराळाच नमुना होता, आणि मी कुतूहलाने तो पाहात होते. ही जळजळ तरी कुणाविरुद्ध?

मैना लागटपणाने तिच्याशी बोलू लागली तेव्हा तिने मैनाला असे काही झिडकारले!

'सगळी माणसं मेली का? दुसऱ्याशी बोल, माझ्याजवळ नको येऊ बोलायला.'

'मोरणी एकटी बसे; नाही तर घुंघट घेऊन डोळे मिटून पडून राही. सगळ्या बायकांना मोरणीचे वागणे हा विषयच होऊन बसला होता. त्या बोलत, टोचून बोलत, फिदीफिदी हसत; पण मोरणी ते काही स्वतःला स्पर्शूच देत नसे. मला भीती वाटे ही पळून जाणार. तिच्यावर सर्वांचीच सक्त नजर होती. खुल्या अब्रूदार समाजातही जशी बोहोचक व्यक्तिव्यक्तींची असते तशी आणि पहारेकऱ्यांची असते तशीही.

मोरणीला पोलिसांनी आणून ठेवली. त्या वेळी दिलेले कागद मी चाळले होते. मोरणीचा पूर्वीचा ठावठिकाणा त्यात असला तरी गेली दीड-दोन वर्षे तिच्याभोवती असे काही गूढ विणलेले होते, की त्याचा तिच्याखेरीज कुणालाच पत्ता नव्हता.

''मोरणी, तू कुणाबरोबर निघून गेलीस?'' ''कोणत्या गावाला गेलीस?'' ''कशी गेलीस?'' मी तिच्याकडून माहिती काढण्याचा निरनिराळ्या वेळी प्रयत्न केला. पण ''मला काही माहीत नाही.'' एवढेच ती उत्तर देई आणि फणकाऱ्याने निघून जाई. एक दिवस मला तिचा असा राग आला!

''मोरणे, जेव्हा तेव्हा तू फणफणत जातेस. इथं फणफणण्याचं काय कारण? तुझा कुणी अपराध केलाय इथे? तुला मदतच करणार आहो ना आम्ही? कुणावर नि कशासाठी रागावतेस सारखी? करूनच्या करून वर आणखी....''

पण माझे हे वाक्य संपायच्या आतच ती कडाडली, ''करूनच्या करून? काय केलं मी? पण बोला, बोला. माझा डोईवरचा पदर खांद्यावर आलाय खरा!''

बोलता बोलता तिच्या डोळ्यांतून धारा वाहू लागल्या, बांध बसल्यासारखे तिचे शब्द अडले नि मोरणी निघून गेली..

कमालीच्या शिस्तीत राहणाऱ्या मोरणीला रागावणार तरी कशावरून ? ती लिहिणे वाचणे तरी किती चटकन् शिकली! ती आपले काम काडीइतके चुकत नसे. ती तोंडात चूळ घेऊन बसली होती एवढेच ना? ती पळून जाईल? पण छे:! ती पळूनही जाणार नव्हती असे माझ्या लक्षात आले. मनी पळून जायचा प्रयत्न करीत होती, तेव्हा राक्षसाच्या बळाने तिचे मनगट पकडून मोरणीने तिला माझ्यापुढे आणून म्हटले, 'पळून जात होती! सांभाळा!'

एवढे बोलून ती निघूनही गेली! मनी पुनः तीच चूक तिसऱ्यांदा करून निरपराधीसा चेहरा करून गृहात आली होती! मोरणीबद्दल तिची काहीबाही स्वतःसारखीच कल्पना झाली आणि 'दोघी पळून जाऊ या' असे जेव्हा मनी म्हणाली तेव्हा मोरणीने तिच्या गालफडात इतकी सणसणीत चापटी दिली होती, की मनीचे तोंड चार दिवस सुजले होते! त्या मारण्याबद्दल मोरणीने शिक्षा भोगली

तरी मनाचा ठाव लागू दिला नाही. मनी काय म्हणाली हेही मला सांगितले नाही. मनीवर तिने नजर मात्र ठेवली होती. मनी पळणार असे दिसताच तिने तिला पकडून आणले. मी चकित झाले. त्या ज्वालामुखीची कल्पना मला येईना! त्यानंतर एक दिवस तर मोरणीने कमाल केली.

मिसेस चंद्रनारायण म्हणजे फार बडे प्रस्थ, संस्थेच्या आश्रयदात्यात त्यांचे नांव झळकत होते! सामाजिक कार्याची हौस म्हणून त्या 'गृहात' मधून मधून येत नि संस्थेची चौकशी करीत. चंद्रनारायणांना तेवढेच जमे आणि तेवढेच त्या करीत. गोऱ्यापान बाई. नखांना रंग, ओठांना रंग, गालांना रूज, तलम-भारी कपडे. संस्थेतील मुली वचकून बघतच राहत. कुणाकुणाला त्या आपल्याशी बोलल्याबद्दल धन्य वाटे. मोरणी आल्यानंतरही त्या संस्थेत आल्या होत्या. मुली कुतूहलाने बघत होत्या; पण मोरणी त्यांच्यात नव्हती. मोरणीचे गूढ वागणे माझ्याच तोंडून चंद्रनारायणांना कळले.

'बघू या तर' असे म्हणून त्या मोरणीच्या खोलीजवळ गेल्या. मोरणीने एकदा त्यांच्याकडे पाहून पाठ फिरवली. चंद्रनारायण बघतच राहिल्या. इंग्रजीत त्या म्हणाल्या, ''उर्मट दिसते मुलगी. भयंकर व्रात्य असली पाहिजे.'' आणखीही एक-दोन वाक्ये त्या बोलत होत्या तोच मोरणीने त्यांच्याकडे चेहरामोहरा फिरवून म्हटलं,....''बघा, बघा. बघण्यासारखी आहे मी. छिनाल आहे. बाजारबसवी आहे. बघा माझ्याकडे!''

तिचे डोळे डबडबून आले आणि तिने भिंतीकडे तोंड करून धाडकन् जमिनीवर अंग टाकले. तिचा हुंदका- दबलेला एकच हुंदका ऐकू आला.

त्या दिवशी मी मोरणीला शिक्षा केली. तिने ती अगदी मुकाट्याने सोसली; पण ती अधिकच अबोल झाली.

मोरणी पंधरा वर्षांची होती. तेव्हाही चलाख चुणचुणीत होती. आई नि ती दोघी एका लहानशा घरात राहत; त्यांचा शेताचा लहानसा तुकडा हाच त्यांचा जीवनाचा आधार. आई शेतावर राबायला जाई. मोरणी आईसाठी नि स्वतःसाठी कोरड्यास नि भाकरी करण्यासाठी घरी राही. मोरणी काळी-सावळी खरी, पण नाक, जिवणी, डोळे किती रेखीव! कुणाचेही लक्ष वेधून राहाण्याइतके रेखीव.

आईच्या नजरेतून ही गोष्ट कशी सुटणार? तिच्या नजरेला मोरणी आणखीच सुंदर दिसत होती. तिला एकटीला घरी ठेवून गेली तरी सुगनीचा जीव धागधुग करीत राही. अखेरीस पहाटे भाकरी करून बांधून दोघीही शेतावर जाऊ लागल्या. मोरणी काबाडकष्टात आईला हार जाणारी नव्हती. तिच्या वयाला न शोभेल इतक्या समजुतीने ती आईला मदत करी. दिवसांमागून दिवस चालले. मुलीच्या गुणांनी आईचे हृदय सुपाएवढे झाले होते. घर नि शेत. शेत आणि घर. मोरणीला कुठे जायची इच्छा होत नसे. चैन करावीसी वाटत नसे. आईच्या मागे जाऊन भरल्या कणसांची डुलणारी शेती पाहत राहणे. ही तिची करमणूक. हेच तिचे सुख. त्या डोलत्या कणसांकडे नजर लावून उन्हाने धापावणाऱ्या शेतात राबणे हाच तिचा छंद. सुगनीला आपल्या मुलीबद्दल केवढा अभिमान वाटे. मग तीच त्या लहानशा मुलीला लटक्या रागाने म्हणे,

'अगं, का अशी धा धा कष्ट करतीस? जा जरा अनसयाबरोबर, खेळावं, हसावं. त्या चिमीकडे जावं. चांगुणाकडं जावं.' 'नको', 'नको' म्हणतच अखेर आईच्या आग्रहाने ती मैत्रिणीकडे जायची. आठवड्यातून एक दिवस. आणि अशीच आईच्या आग्रहामुळे ती एक दिवस मैत्रिणीबरोबर सिनेमाला गेली. मुलगी सिनेमाला गेली तेव्हा ती आपल्या मुलीचे गुण गात शेजारणीच्या घरी बसली.

सिनेमाची वेळ संपली. मुली घरी आल्या नि सांगायला लागल्या, ''मोरणी मधल्या सुटीनंतर सिनेमा चालू असताना अनशीला पाणी प्यायला सोबत म्हणून बाहेर गेली. अनशी पाणी प्यायला गेली अन् पुनः पाहते तो मोरणी दिसेचना! आम्ही खूप वाट पाहिली नि घरी आलो. ''

सुगनीच्या हृदयाने ठाव सोडला. मोरणीचे काय झाले? कुठे गेली? कुणी नेली तर नाही? कोण नेणार तिला? कुठे गेली तर नाही? पण माझी मोरणी कुठे जायची नाही!

धडधडत्या अंतःकरणाने सुगनी पुनः पुनः तेच विचारी. मुली पुनः तेच सांगत. अनशी पाणी प्यायला गेली. तेवढ्या वेळात मोरणी नाहीशी तरी कशी झाली? सगळ्यांनाच अचंबा वाटत होता. एक दिवस गेला. दोन दिवस गेले. सुगनी भिंगरीसारखी हिंडली. तिची जीभ सुकली. डोळ्यातून काळजी भीती

झिरपत राहिली. अखेरीस तिने पोलिसांत वर्दी दिली. अचानक तारा निखळावा तशी मोरणी नाहीशी झाली होती आणि आता उल्केसारखी माझ्यापुढे येऊन पडली होती. मध्यंतरीचे सारे गूढ होते.

एकदा दुपारी दीडचा सुमार असेल. जिन्यावरून धाड् धाड् उतरत नि खिदळत मोरणी माझ्या ऑफिसात आली. ती एका हाताने वर्तमानपत्र फडकवीत होती. एकीकडे भेसूर हसत होती. 'अक्का, मेला! मेला चांडाळ तो. तो चांडाळ मेला! सुरी खुपसली त्याच्या पोटात!'

चढत्या आवाजात मोरणी ओरडत होती. तिचा चेहरा भेसूर दिसत होता. जणू वात झाल्यासारखी ती बेभानपणे हातवारे करीत होती. मला कळेना, सुचेना. सहा महिन्यांत न हसलेली मोरणी हसत होती– हृदय तडकल्यासारखी. अबोल मोरणी बोलत होती– बांध फुटल्यासारखी. ती हातवारे करीत होती–विकल झाल्यासारखी. 'मोरणी, मोरणी! काय झालं?' मी खुर्चीवरून उठून तिला दोन्ही हातांनी सावरीत विचारले आणि मोठा हुंदका देऊन, 'आई' म्हणत हंबरडा फोडल्यासारखी मोरणी रडू लागली. मी चकित होऊन, सुन्न होऊन पाहात होते. दगड बोलत होता. दगड रडत होता. दगडाला पाझर फुटला होता.

मोरणी म्हणाली, 'भली देवानं शिक्षा दिली. मी विचारच करीत होते. रात्रंदिवस त्याचा जीव घ्यावा असं वाटत होतं मला. पापं करणारांची पापं अशीच मारतात त्यांना.' ती खदाखदा हसत म्हणाली, 'अक्का, मी अनशीला मोरीवर सोबत गेले. कुणी तिच्याबरोबर सिनेमा सोडून जाईना. मी म्हटलं, सिनेमापेक्षा अनशीला माझी गरज आहे. तर मी गेलं पाहिजे. म्हणून उठले मी सिनेमा पाहाता पाहाता बाहेर उभी होते, तो या राक्षसानं तोंडात बोळा कोंबून मला उचललं नि मोटारीत कोंबलं. सुरा दाखवला. तोंडात बोळा कोंबला होता म्हणून, नाहीतर 'खुपसं छातीत सुरा' म्हणून बोलले असते. मी त्याला लाथा मारल्या. चौघे जण होते. माझ्या नाकाला रुमाल लावला. मला पुढे कुठे नि कसं नेलं माहीत नाही. जागी झाले तेव्हा एका लहान खोलीत होते एवढं खरं.'

मोरणी धाप लागल्यासारखी किती सांगू नि किती नाही अशी बोलत होती. 'सगळे चांडाळ मरतील. झड लागेल त्यांना. माझ्या देहाचा चुरा केला

त्यांनी. कोल्ही–कुत्री खातील त्यांना.' मग पुनः हुंदका आला नि पुनः आक्रंदून ती म्हणाली, ''आईऽऽ ! आई ऽ गं ऽऽ! त्या चांडाळांनी माझा डोईवरचा पदर खांद्यावर आणला! आता तू मला तुझी मुलगी म्हणून जवळ घेशील का ग?'' पण मोरणीची आई होती कुठे! 'मोरणी', 'मोरणी' करीत ती केव्हाच हाय खाऊन जग सोडून गेली होती! मोरणीकडे पाहून माझ्या अंतःकरणाचे पाणी झाले. मी तिला लहान मुलीसारखी घट्ट जवळ घेतली.

म्हणून मोरणी जळात राहून माशांशी वैर करीत होती! ती त्या जळातली नव्हतीचं. तिच्या हृदयातील डोंब इतके दिवस धुमसत होता. तिचा चुराडा करणाऱ्या राक्षसांपैकी नायकाचाच खून झाला म्हणून तिने वाचले नि तिला समाधान झाले. जे करणे तिला कधीच शक्य नव्हते ते परस्पर देवाने करविले होते. नाही तर ती अशीच अबोलपणाने जन्मभर धुमसली असती? कोण जाणे! त्याचा बळी घेण्यासाठीच ती दूरवर पाहात बसे का? तो कधी तरी दृष्टीस पडला तर नरड्याचा घोट घेता येईल म्हणून?

पण तिच्या असमाधानात केवढी निराशा होती. ज्या जगातून ती उठली होती, ते जग निष्कलंक म्हणून तिला पुनः जवळ करील? असाहाय्य विचाराने तिने हंबरडा फोडला होता. मी तिला म्हटले, 'मोरणी, रडू नको बाळ. सगळं काही ठीक होईल बरं.'

तिने 'नाही' म्हणून जोरजोराने मान हालवली नि ती रडत खोलीत निघून गेली.

नाही? का नाही? पण खरेच होते तिचे म्हणणे. सगळे ठीक कसे होणार? तिचे मानधन केव्हाच हरपले होते. आता अवमानित, बिनअब्रूची म्हणून तिला कुणी पत्करणार होते कदाचित. पण ते तसले जिणे? त्यापेक्षा तिला मरणं बरे वाटले असते. रूप, कष्ट, तेज यांनी कोणत्याही तरुणाची बायको व्हायला लायक असून मोरणी भिक्षेच्या अब्रूने जगणार होती! निष्कलंक मोरणीला मी पुन्हा तिचे मानधन मिळवून दिले नाही तर माझ्या या कामाचा उपयोग तरी काय? नि त्या कामात अर्थ तरी कोणता?

'ह्या धुतल्या तांदळाबद्दल मी सांगेन आणि तिला सन्मानाचे जिणे देईन.'

अशा विचाराने मी प्रयत्न सुरू केले. अखेर तिच्या जमातीच्या पुढाऱ्याला पत्र लिहिले. सामाजिक अन्यायाबद्दल चीड घेऊन उठलेल्या त्या पुढाऱ्याबद्दल मला खात्री होती. तो मदत करीलच करील. 'एखादा समजूतदार चांगल्या घराण्यातील तरुण मोरणीशी लग्नाला तयार करणे, हे आपल्यालाच साधणे शक्य आहे. आपणच निष्कलंक चारित्र्याच्या या मुलीला आयुष्यात पुनः आशा द्याल.' असे पत्र मी लिहिले, त्याला उत्तर आले नाही. पुनः दोन दोन महिन्यांच्या अंतराने तीन पत्रें लिहिली. पण त्या महान् पुढाऱ्याला उत्तर पाठवायला वेळ नव्हता! त्याच्या समाजकार्यात मोरणीला स्थान नव्हते!

पण मोरणी मानी होती. ती लवली नाही, वाकली नाही. 'सच्छील गृहिणीचे मानाचे स्थान मिळत नसले तर ते मला नकोच आहे.' या बाबतीत तिने तडजोड कधीच पत्करली नाही. ती ज्या तन्मयतेने आई बरोबर राबली तितक्याच तन्मयतेनं ती घरात काम करीत असे. चोख, शिस्तीने, अबोलपणे– अंतःकरणाचा नि स्त्रीत्वाच्या भावनांचा तुकडा पुरा कापून! जोगिणीसारखी! आणि गृहातील त्या तडजोड करणाऱ्या सर्वांच्या माना तिच्या शब्दापुढे नमत!

('दोघांचे विश्व आणि इतर काही कथा' मधून)

❑❑❑

# जमीला जावद

**– हमीद दलवाई**

नोव्हेंबरातल्या तोकड्या, गारठ्याच्या दिवसांतल्या एका शुभप्रभाती जमीला जावद आमच्या ऑफिसात काम करू लागली. काही दिवस तिने आमच्या बरोबर आमच्यामध्ये काम केले आणि वसंत ऋतूच्या आगमनाआधीच ती एका अधिकाराच्या जागेवर जाऊन पोहोचली. तिची बसायची जागा बदलली. जणू सहजगत्या मैफलीतून उठून गेल्यासारखी ती एक दिवस आपल्या केबिनमध्ये जाऊन बसली.

ऑफिसात ती कामाला लागण्यापूर्वी मला तिचा आगापिछा माहीत नव्हता. तिची ओळख झाली. कामानिमित्त तिच्याशी संबंध येऊ लागला आणि हळूहळू तिची माहिती कळू लागली. एकदा बोलताना ती परदेशातून जाऊन आल्याचा तिने ओझरता उल्लेख केला. (तिच्या इंग्रजीच्या नोकझोकवरून, बॉबकट केलेल्या केसांच्या वळणावरून आणि जपून चालायच्या पद्धतीवरून मला तसे एकदा वाटलेही होते.)

मलबार हिलजवळ कुठे तरी असलेल्या आपल्या ब्लॉकमध्ये बापाबरोबर ती राहत होती. श्री. जावद हे सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (आणि विलायतची एकदा वारी केलेले) होते. घरात दुसरे कोणी नव्हते. ('माझी ममी फार लवकर

वारली. तिचा चेहरादेखील आता आठवत नाही मला!') या बापलेकीच्या दिमतीला काही नोकर-चाकर होते, एक गाडी होती आणि ती चालवायला शोफर ठेवलेला होता. श्री जावद सहसा कुठे बाहेर जात नसल्यामुळे तिला सकाळी ऑफिसात सोडायचे आणि संध्याकाळी पुन्हा परत घेऊन यायचे. एवढेच काम शोफर अख्ख्या दिवसात करत होता.

जमीला जावद दिसायला फारशी सुंदर नव्हती; परंतु नखे रंगवलेला, बॉबकट केलेला, लिपस्टिक लावलेला, उंच टाचांचे बूट घातलेला आणि उंची वस्त्रे परिधान केलेला तिचा देह किमान आकर्षकता निर्माण केल्याखेरीज राहत नसे. तिला व्यक्तिमत्त्व असे नव्हतेच. तिच्या सफाईदार इंग्रजीने, बोलायच्या विलक्षण मधुर पद्धतीने आणि सुहास्य वदनाने तिला ते प्राप्त झाले होते; त्यातून घडवले गेले होते. तिला याची जाणीव होती आणि ती या तीन गोष्टींना सतत जपत होती; त्या कायम ठेवून वागत होती.

तिने नव्याने ताबा घेतलेली ऑफिसातली केबिन अतिशय जुनी होती. एक सेवानिवृत्तीला आलेला अधिकारी ती वापरीत होता आणि त्यामुळे की काय, तिच्यात सारा अव्यवस्थितपणा पसरला होता. जमीला जावदने तिच्यात प्रवेश केल्यानंतर आपल्या खास मर्जीनुसार ती सजवून घेतली. तिचे सारे स्वरूपच पालटून टाकले. भिंतींना हलक्या पोपटी रंगाचे थर चढवले. एक-दोन चांगली निसर्गचित्रे त्यावर टांगली. केबिनच्या प्रवेशद्वारापाशीच मध्यभागी गांधीजींचे चित्र लावले. (ते पूर्वीदेखील होते; परंतु एका कोपऱ्यात तिरके, कसे तरी लटकत राहिले होते.) खिडक्यांना शटर्स लावून घेतले. आपले टेबल केबिनच्या मध्यभागी तिरके, ठेवले आणि त्यावर जाड काळी काच बसवली.

मी सहधर्मीय होतो म्हणून की काय कुणास ठाऊक, पण जमीला जावद माझ्याशी मोकळेपणाने वागत असे. त्या केबिनमध्ये ती कामाव्यतिरिक्त अनेकदा माझ्याशी गप्पा मारत बसे आणि अनेक विषयावर मला आपले मत व्यक्त करावयास लावी. एकदा तिने केबिनच्या सजावटीबद्दल माझे मत विचारले.

''वा! सुरेख झाली आहे!'' मी उत्तरलो, ''या रुक्ष सरकारी खात्यात तुम्ही या सजावटीने खरं म्हणजे नवे रंग भरले आहेत.''

माझ्या या उद्गारांवर ती नुसतीच हसली.

जमीला जावद केबिनमध्ये गेल्यानंतर कामाच्या अथवा अन्य निमित्ताने मी जेव्हा तिच्याकडे जाऊ लागलो तेव्हा तिच्या टेबलावर तळपत्या उन्हाचे कवडसे दिवसभर पडत राहिलेले आणि ते न्याहाळत ती दंग राहिलेली मला दिसून येऊ लागली. दिवसभर सतत ते आपली जागा व आकार बदलत तळपत राहू लागले आणि संध्याकाळच्या वेळी लुप्त होऊ लागले. जमीला जावद त्यांचा हा खेळ पाहण्यात स्वतःला अनेकदा विसरून जाऊ लागली. काही कामानिमित्त तिच्याकडे गेल्यास तिची नजर मला त्या कवडशांवर खिळलेली दिसू लागली. पण मी समोर उभा राहताच माझी सावली त्या टेबलावर पडत असे आणि ते कवडसे झाकले जात. अशा वेळी तिच्या तंद्रीचा आपोआपच भंग होत असे.

''का हो? हा कवडशांचा खेळ पाहणं तुम्हाला आवडत नाही काय?'' असा चमत्कारिक प्रश्न तिने एकदा अशाच वेळी मला विचारला होता.

काही दिवसांनी वसंताची चाहूल लागली आणि जमीला जावदचा सारा नूर जणू पालटून गेला. झाडाझुडपांना फुटणाऱ्या पालवीसारखे तिच्या स्वभावाचे रंग खुलून जाऊ लागले. वाऱ्याने थरथरणाऱ्या पर्णांच्या हालचालींची गती तिच्या पायांना लाभू लागली. हवेतल्या ओसरणाऱ्या गारव्यासरशी तिची वृत्ती अधिक स्नेहार्द बनली.

जमीला जावद जणू अंतःर्बाह्य बदलू लागली. तिचे स्मित अधिक विलोभनीय भासू लागले. ऑफिसच्या कामात ती अधिक उरक दाखवू लागली. आपल्या टेबलावरील अनेक प्रकरणे उत्साहाने निकालात काढू लागली आणि कधी काम संपताच माझ्याशी गप्पादेखील मारीत बसू लागली.

दुपारची जेवणाची वेळ संपताच एकदा मी तिच्याकडे एक तातडीची फाईल घेऊन गेलो. आपले जेवण संपवून ती खुर्चीच्या पाठीवर मान टेकून विसावली होती. तिचे डोळे मिटलेले होते आणि एक हात खुर्चीच्या कडेवर व दुसरा कपाळावर आडवा धरलेला होता. तसेच परत यावे, असे मला वाटले. परंतु तिला तेवढ्यात माझी चाहूल लागली आणि तिने हळूच डोळे उघडले. मी दिसताच आपले अंग तिने सावरले आणि माझी अवघडल्यासारखी मनःस्थिती

लक्षात घेऊन विचारले, ''काही जरुरीचे काम आहे?''

''होय.''

''बसा.''

तिच्यासमोरच्या खुर्चीवर मी बसलो. ती केस तिला नीट समजावून दिली. तिने त्यावर दिलेल्या सूचनांची नोंद केली आणि जायला उठलो. तिने विचारले,

''का, घाई आहे?''

''हो उत्तर तर पाठवायलाच पाहिजे ना?''

''संध्याकाळीच जाणार ना ते? बसा की. आपण चहा घेऊ.''

अशा रीतीनं त्या दिवशी जमीला जावदबरोबर पहिल्या प्रथम मी चहा घेतला. स्पेशल ट्रेमधून आलेला चहा तिने कपात तयार केला आणि माझ्यापुढे करीत आर्जवाने म्हटले, ''घ्या-घ्या ना.''

''माझ्याशी वागताना तुम्ही संकोचता काय?'' तिने चहाचा कप अलगद तोंडाला लावीत आणि त्यातल्या कढत चहाचे सावकाश घुटके घेत मला विचारले.

मला अधिकच अवघडल्यासारखे झाले. मी कशी तरी वेडीवाकडी मान हलवली. माझ्या मनातली तिच्याविषयीची उच्चतेची भावना तिला माझ्या त्या वेड्यावाकड्या हावभावातून कळून आली.

''मला तुम्ही कोणी अधिकारी समजू नका.'' ती आपल्या आर्जवी स्वरात म्हणाली, ''मी तर तुम्हाला माझे मित्र समजते आणि तुम्हीही मला मित्र समजावं, माझ्याशी बरोबरीच्या नात्यानं वागावं अशी माझी इच्छा आहे.''

तिच्या या मित्रत्वाच्या भावनेने मी त्या क्षणी भारावून गेलो. कसाबसा ''थँक्यू....'' म्हणलो.

''तुम्हाला माझी दैनंदिनी वाचायला आवडेल?'' तिने एक दिवस मला विचारले.

‘‘तुमची दैनंदिनी?’’

‘‘होय, मी दैनंदिनी लिहिते आणि मीच ती वाचते. पण ती दुसऱ्या कुणी वाचावी, असं मला वाटतं. तुम्ही वाचावी...’’

‘‘मी?’’

‘‘का? काय हरकत आहे? मी तर तुम्हाला ती काही आडपडदा न ठेवता वाचायला देत आहे. तुमची वाचायची इच्छा नसेलच तर...’’

‘‘छे, छे! तसं नव्हे...मी आवडीनं वाचेन! तुम्ही देणार आणि मी वाचणार नाही, असं कसं होईल?’’

ती हसली आणि टेबलाच्या खणातून तिनं एक डायरी काढून माझ्या हवाली केली.

जमीला जावदच्या त्या दैनंदिनीची सुरुवात ती ऑफिसमध्ये लागल्या दिवसापासून केलेली होती आणि सुरुवातीची काही पाने ऑफिसमधल्या नवथर अनुभवाने व नंतर मिळालेल्या बढतीच्या उन्मेषाने भरलेली होती. केबिनच्या भिंतीचे हलके रंग तिच्या काही पानांना चिकटलेले होते. एके ठिकाणी माझा उल्लेख होता. (‘‘मी त्याला मित्र समजते आणि मला वाटतं. त्यालाही याची जाणीव आहे.’’) शोफर अब्दुल्लाला तिने काही परिच्छेद वाहिले होते, त्याच्या धीम्या, अगडबंब शरीराची आपल्याला घृणा वाटत असल्याचे तिने म्हटले होते आणि अशा असंस्कृत माणसाला कामाला ठेवल्याबद्दल आपल्या बापाला दोष दिला होता. त्याच पानावर तिने त्यांच्याविषयी लिहिले होते. ‘‘ते काही न बोलता सतत सिगार ओढत बसतात. सतत आपल्या तंद्रीत राहतात. माझ्याशीदेखील फारसं बोलत नाहीत. त्यांना तसे बसलेले पाहून मला ‘मेलँकली’ वाटू लागतं. घरात वावरायचा तिटकारा येतो....’’

आणि यानंतर वसंत ऋतूचे आगमन झाले होते आणि मला जाणवलेल्या जमीला जावदच्या प्रसन्नतेचा खोल ठसा त्या दैनंदिनीच्या पानापानांवर उमटला होता. त्या ऋतूविषयी काही तरी चमत्कारिक ओढ तिच्या मनात निर्माण झाली होती. त्या ऋतूचे ते क्षण तसेच कायम राहावेत, ते पकडून ठेवावेत, असे

तिला वाटत होते. तिच्या मनात भावनांची काही चमत्कारिक आवर्तने निर्माण झाली होती. केव्हा ती अनामिक प्रसन्नतेने न्हाऊन जात होती, तर कधी तिला कसली तरी हुरहुर लागून राहत होती. आपले सारे शरीर पिसासारखे हलके झाले असल्याचा तिला काही क्षणी भास झाला होता. आणि कुठल्या एका क्षणी आपले आयुष्य दिवसभर तळपून संध्याकाळी लंबवर्तुळाकृती धारण करत लुप्त होणाऱ्या कवडशांसारखे वाया चालले असल्याचे दुःख तिला झाले होते!

आपल्याला हे असे का वाटते, हे तिला कळत होते. आपल्याला पुरुषाच्या सहवासाचे, पुरुषाचे आकर्षण निर्माण झाले आहे याची तिला जाणीव झाली होती. आपल्या वैषयिक इच्छा–आकांक्षेचे प्रतिबिंब आपल्या या भावनांत उमटले असण्याची तिने सरळ कबुली दिली होती... ''माझ्यावर उत्कट प्रेम करणारं मला कुणी लाभावं, असं मला वाटतं.'' या वाक्यावर तिची दैनंदिनी संपली होती.

आपली दैनंदिनी मला वाचायला देण्याइतका विश्वास दाखवल्याबद्दल मी तिचे आभार मानले. ती आपल्या सवयीनुसार हसली आणि मान लववून तिने माझ्या आभारांचा स्वीकार केला.

तो ऋतू मागे सरला, एखाद्या पराभूत, विस्कटलेल्या सैन्यासारखा हिवाळा संपूर्णपणे मागे हटला आणि उन्हाळ्याने त्याची जागा व्यापून टाकली. जमीला जावद मात्र दोन ऋतूंना सांधणाऱ्या त्या दिवसांनाच लोंबकळून राहण्याचा प्रयत्न करू लागली. मनात ती त्या दिवसांना कवटाळून बसली आणि सभोवताली त्या दिवसांचे वातावरण टिकवून धरण्यासाठी धडपडू लागली. आपल्या केबिनला तिने 'एअर कंडिशनर' बसवला आणि रेफ्रिजरेटरचे थंड पाणी ती पिऊ लागली. आपल्या परीने उन्हाळ्याचा हल्ला तिने केबिनच्या दरवाजापाशीच थोपवून धरला.

फैझशी तिची ओळख कशी झाली, हे मला कळले नाही आणि मीदेखील तिला कधी ते विचारले नाही. त्या दैनंदिनीच्या वाचनावरून त्या दिवसापर्यंत तो तिच्या आयुष्यात डोकावला नव्हता. त्या उन्हाळ्यात बाहेर कुठे तरी, केव्हा तरी तिची नि त्याची ओळख झाली असली पाहिजे.

फैझ शरीराने अत्यंत दुबळा, हाडकुळा होता. त्याचे हात विलक्षण थिटे

आणि पाय मला अत्यंत बारीक, काड्यांसारखे भासले होते. त्याच्या अंगावरचे कपडेदेखील यथातथाच होते.

राजकारणाच्या प्रवाहात फैझ अनेक काळ वाहत राहिला होता आणि अखेर आता कम्युनिस्ट बनला होता. कुठल्या तरी युनियनचा तो सेक्रेटरी होता. त्याने तुरुंगाच्या वाऱ्या अनेकदा केल्या होत्या. त्याचे आयुष्य असे विलक्षण अस्थिर होते.

ऑफिसात जमीला जावदला तो पहिल्यांदा भेटून गेला आणि मागाहून वारंवार येऊ लागला, तरी प्रथम माझे त्याच्याकडे विशेष लक्ष वेधले नाही. परंतु काही दिवसांनी त्याची यायची वेळ बदलली. संध्याकाळची ती ऑफिसातून सुटायच्या वेळी तो नेमका येऊ लागला. तो असा आला असताना कधी ती दोघे तिच्या केबिनमध्ये बसू लागली किंवा कधी लागलीच बाहेर निघून जाऊ लागली.

एक दिवस तो आला असताना काही कामानिमित्त जमीला जावदकडे मी गेलो, तेव्हा तिनेच ''माझे मित्र मि. फैझ'' या शब्दांत माझी त्याच्याशी ओळख करून दिली. फैझ माझ्याशी औपचारिक चार शब्द बोलला आणि मी नंतर लागलीच बाहेर पडलो. त्यानंतर तो वारंवार मला तिथेच भेटू लागला.

फैझला एक दिवस यायला उशीर झाला होता. जमीला जावदने सारी आवराआवर केली. तिचा शोफरदेखील गाडी घेऊन हजर झाला. तिने काहीशा अस्वस्थ सुरात स्वतःशीच पुटपुटल्यासारखे मला विचारले, ''आज फैझसाहेब कसे आले नाहीत?''

''येणार होते?'' मी विचारले.

''होय.'' ती उत्तरली. ती स्वतःच्याच विचारात गढून गेली आणि मग काही वेळाने तिने एकाएकी मला विचारले, ''काय हो, फैजसाहेब तुम्हाला कसे काय वाटतात?''

मी हसून म्हणालो, ''चांगले वाटतात की!''

त्या उत्तराने तिचे समाधान झालेले मला दिसले नाही. पण माझे अंतरंग

या बाबतीतदेखील समजावून घ्यायची इच्छा तिला का व्हावी, हे मला कळेना. तेवढ्यात ती पुन्हा म्हणाली, ''आय लाईक दॅट मॅन– ते खरंच चांगले आहेत... निर्मळ रसिक मन त्यांना लाभलं आहे.''

जमीला जावद एवढे म्हणाली आणि गंभीर झाली. माझ्याकडे पाहू लागली. तिच्या नजरेत फैझविषयीची प्रीती ओथंबलेली तेव्हाच मी पाहिली. परंतु त्याविषयी कसल्याच प्रतिक्रिया माझ्या मनात निर्माण झाल्या नाहीत.

परंतु तीन–चार दिवसानंतर एका सुट्टीच्या दिवशी फोर्टमधल्या एका हॉटेलात मी गेलो असताना ती दोघे एका टेबलापाशी बसलेली मला दिसली. त्या दोघांनी मला पाहिले आणि जमीला जावदने आपल्यात सामील व्हायची हाताने खूण केली. मी त्यांच्या टेबलापाशी जाऊन बसलो.

जमीला जावद तेव्हा विलक्षण खुशीत आलेली होती. आपले हृद्गत तिने लागलीच माझ्यापुढे खुले केले. ती मला म्हणाली, ''वुई आर समथिंग मोअर दॅन ए फ्रेंड नाऊ! आम्ही लग्न करायचं ठरवलं आहे.''

''अभिनंदन–हार्दिक अभिनंदन!'' मी उद्गारलो, त्या क्षणी मला अधिक काही बोलताच आलं नाही, पण आपली गुपिते तिने माझ्यापाशी का उघड करावीत, माझ्यावर का विश्वास टाकावा– असा विचार माझ्या मनात आला. तिच्या निरागसतेचे हे प्रतीक आहे, असे मला वाटू लागले.

तासाभराच्या त्या अवधीत जमीला जावद एखाद्या चिमणीसारखी चिवचिवत राहिली. अनेक संबद्ध आणि असंबद्ध गोष्टींचा तिने ऊहापोह केला आणि चहाच्या पेल्यांवर पेले रिते केले. अखेर मी आणि फैझने सिगारेटी शिलगावल्या.

''इंग्लंडमध्ये असताना मी कधी कधी सिगारेटी ओढीत असे.'' माझ्या नजरेतला आश्चर्याचा भाव ओळखून ती हसत सांगू लागली. ''तेव्हा वेगळ्या कारणांसाठी ओढल्या. फार भयानक थंडी पडली असताना किंवा एकाकी वाटू लागलं म्हणजे; घरची, मायदेशाची आठवण झाली म्हणजे!'' आणि मग फैझकडे वळून तिने पुन्हा अस्खलित इंग्रजीत विचारले, ''डू यू माइंड डियर?''

''नो–नो. सर्टनली नॉट'' तिच्या भावनांची योग्य ती कदर करत फैझ उद्गारला.

आम्ही उठलो तेव्हा ती मला एकट्याला म्हणाली, ''तुम्हाला माहीतच आहे की, तुमच्यापासून मी काही लपवून ठेवलेले नाही. लग्न करायचा निश्चयदेखील हा नुकताच झाला आहे. आणि सारे समजावून घेण्यासाठी मी उद्या तुम्हाला माझी दैनंदिनीच वाचायला देणार आहे.''

जमिला जावदची दैनंदिनी अशा रीतीने पुन्हा माझ्या हातात आली.

त्यातला मी पूर्वी वाचलेला भाग सोडून पुढचा तेवढा वाचला. सुरुवातीलाच फैझशी झालेल्या तिच्या ओळखीचा आणि नंतर निर्माण झालेल्या प्रेमाचा भाग अतिशय सविस्तरपणे तिनं रेखाटला होता. समाजसंबंध खात्याने भरवलेल्या कुठल्या तरी परिषदेत तिची त्याच्याशी ओळख झाली होती आणि त्यांचे अत्यंत थंड व्यक्तिमत्त्व तिला आवडले होते!

मला माहीत नसलेले त्यांच्या प्रेमाचे अनेक बारकावे तिनं दैनंदिनीत टिपून ठेवले होते. तिनेच आपले प्रेम प्रथम व्यक्त केले होते. फैझची आदबशीर वागणूक मला जाणवली होती, परंतु ती तिच्या दैनंदिनीच्या पानापानांतून डोकावल्यानंतर मला प्रकर्षाने जाणवली होती. तो आपले अद्याप चुंबन घेत नसल्याबद्दलची मनोव्यथा तिने एका पानावर व्यक्त केली होती आणि दुसऱ्या एका पानावर, एका वळणावर गाडी तिरकी झाल्याचे निमित्त साधून ती त्याच्या अंगावर रेलल्याचा उल्लेख होता!

संस्कृती म्हणजे काय?

त्या दोघांनी फार गंभीरपणे या गोष्टीवर विचार केला होता.

''....मला वाटतं, आपले आचार-विचार! आपण कसलं मटण खातो- बकऱ्याचं, गाईचं की म्हशीचं...याचादेखील संस्कृतीत अंतर्भाव होतो!'' तिने त्याच्याशी युक्तिवाद केला होता.

फैझ तिच्या म्हणण्यावर खूप हसला.

''तुला माहीत आहे?'' तो तिला म्हणाला, ''मटणाविषयी म्हणशील, तर मी डुकराचंदेखील मांस खातो!''

''खरंच?'' तिनं धक्का बसून विचारले.

‘‘खरंच!’’

‘‘हाऊ हॉरिबल! मी युरोपात असतानादेखील बीफ खाल्लं नाही.’’

‘‘का बरं?’’

‘‘खायची सवय नाही. आमच्या घरी खात नाहीत.’’

‘‘ओह्! म्हणजे सवय ही तुमची संस्कृती!’’

‘‘अशी थट्टा उडवू नकोस!’’

कधी त्यांना स्वतःच्या भवितव्याचा विचारदेखील अस्वस्थ करीत होता. आपले जमेल की नाही? आपण सुखी होऊ की नाही?

तिच्या शंकांचे निरसन करताना त्याने म्हटले होते, ‘‘तुझ्या व्यक्तिमत्त्वावर माझं प्रेम बसलं आहे. तू कुठंही असलीस आणि कशीही वागलीस, तरी ते नष्ट होणार नाही. कारण कुठल्याही अवस्थेत तुझं व्यक्तित्व माझ्याच संन्निध राहणार आहे.’’

जमीला जावदच्या दैनंदिनीला यापुढे अतिशय गंभीर वळण लागलं होतं. तिने व फैझनं लग्नाचा निश्चय केला होता आणि त्यामुळे सारे प्रकरण आपल्या बापाच्या कानी घालावयाची घाई तिला झाली होती. त्या इराद्याने फैझची आपल्या वडिलांशी ओळख करून दिली.

...ते नेहमीसारखे सिगार ओढीत बसलेले असताना आम्ही खोलीत प्रवेश केला. (या वेळी तर ते सिगार चक्क चावून चघळीत होते! शीः!) आपल्या सवयीनुसार त्यांनी प्रथम माझ्याकडे दुर्लक्षच केले, परंतु माझ्या मागोमाग येणारी फैझची आकृती दृष्टीस पडताच त्यांची अलिप्तता नाहीशी झाली. त्यांची नजर हलली. आश्चर्याने माझ्याकडे वळली. जणू मला धाकाने विचारू लागली, ‘‘हा मनुष्य तुझ्याबरोबर का?’’

फैझला ते बसा देखील म्हणाले नाहीत. (इंग्लंडला जाऊन आल्यानंतर थोडे तरी मॅनर्स यायला हवे होते!) त्यांनी त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली.

‘‘काय करता आपण?’’

‘‘कम्युनिस्ट पक्षाचं काम करतो.’’

‘‘कम्युनिस्ट?’’

‘‘होय....’’

पपा काही क्षण स्तब्ध राहिले. परंतु, त्यांच्या कपाळावर उमटलेल्या आट्या मी पाहिल्या आणि त्यातून फैझविषयीचा त्यांच्या मनातला तिरस्कार व्यक्त झालेला मला जाणवला.

‘‘बोल्शेविक की मेन्शेविक?’’

फैझचे यावर खदखदून हसणे!

‘‘आत्ता त्यातलं काहीही राहिलेलं नाही. जावदसाहेब! रशियन क्रांतिकाळातले ते दोन पंथ! त्यानंतर खूप बदल झाले आहेत आणि पुष्कळ पाणी व्होल्गातून वाहून गेलं आहे!’’

‘‘पाणी? की रक्त?’’

‘‘दोन्ही!’’

‘‘इंडिसेंट कुठले!...क्रुएल!’’

मला पपांचा असा राग आला! एकदम इंडिसेंट म्हणायचे म्हणजे काय? फैझ किती डिसेंट आहे!

काही क्षण दोघे स्तब्ध राहिले. मग पपा आपल्या जागेवरून उठून उभे राहिले. आपली घारीसारखी तीक्ष्ण नजर त्यांनी फैझवर रोखली. ते त्याला म्हणाले, ‘‘माझ्या मुलीशी तुम्हाला लग्न करायचे आहे? हं?’’

‘‘होय.’’

‘‘पण मला ते पसंत नाही! तुम्ही का विचाराल पण तुमच्या ‘का’ ला उत्तर द्यायला मी बांधलेला नाही! माझी इच्छा! माझी मर्जी!’’

‘‘परंतु–’’

''मला माहीत आहे, तुम्ही कुठला युक्तिवाद करणार तो! स्त्रीस्वातंत्र्यावर आणि मुसलमान स्त्रिया पडद्यातून बाहेर पडल्यानंतर त्यांच्यामध्ये झालेल्या प्रचंड बदलावर तुम्ही मला व्याख्यान झोडायची काही आवश्यकता नाही. शिवाय स्त्री स्वातंत्र्याच्या माझ्या कल्पना वेगळ्या आहेत आणि त्याच माझ्या घरात प्रत्यक्षात आणायचं मी ठरवलं आहे.''

''माझा निश्चय समजण्याएवढे तुम्ही खचित समंजस आहात, यापुढे तुम्ही माझ्या मुलीला भेटता कामा नये. तुमच्यामुळे आम्हा दोघांत कसल्याही प्रकारची कटुता येणार नाही अशा रीतीने तुम्ही वागाल, अशी मला आशा आहे.''

''आणि मला ते शक्य झालं नाही तर?''

''तर? तर, होणाऱ्या परिणामांची जबाबदारी तुमची राहील!''

फैझ त्यांच्याशी अधिक वाद घालीत बसला असतादेखील! परंतु मी केलेल्या इशाऱ्यामुळे त्याने आटोपते घेतले. तो लागलीच निघून गेला.

***

''ते आणखीन काय म्हणाले?'' फैझने मला दुसऱ्या दिवशी विचारले.

''त्याची तुला कल्पना आली पाहिजे. त्याचं म्हणणं मी फॉरेन रिटर्न आणि तू कॉन्टिनेन्ट स्वप्नातदेखील पाहिलेलं नाही! आपली लेव्हलच एकूण वेगळी!''

''मला कळत नाही– त्यांनी विरोध का करावा?''

''ते तुला कळणार नाही! आमच्या लोकांनी शिक्षण घेतले, फॉरेन टूर्स काढल्या; परंतु शिक्षणाने येणारे संस्कार त्यांनी बाणवले नाहीत. हा एक विचित्र फेनॉमेना आहे! शिक्षणाची एक लाट आमच्या लोकांत एके काळी उसळली. इतर लोक शिकले आणि विविध क्षेत्रांत पुढे आले याची त्यांना खंत वाटू लागली, म्हणून त्यांनी या शर्यतीत भाग घेतला. परंतु घाईने खाल्लेलं अन्न जसं पचवता येत नाही, तसं त्यांच झालं. परिणामी, शिक्षण हा त्यांचा एक अलंकार बनला, मिरवायची वस्तू बनली! मनाने ते तसेच पूर्वीसारखे अडाणी राहिले...''

''पण यातून मग काय मार्ग काढायचा?''

''आपण लग्न करायचं! त्यांच्या विरोधाला न जुमानता करायचं. मला दुसरा पर्याय दिसत नाही. कारण फ्रेंडली पर्सुएशन आणि मीडिएशन असल्या उपायांनी ते संमती देतील, असं मला वाटत नाही!''

***

आज पहिल्या प्रथमच पपांनी मी घरात शिरताच घड्याळाकडे आपली नजर वळवली आणि संथपणे ती पुन्हा माझ्यावर रोखली.

घड्याळात तेव्हा सात वाजले होते. म्हणजे साडेपाच ते सात असा दीड तासाचा हिशेबच ते नजरेनं जणू माझ्यापाशी मागत होते. मी अर्थातच तो त्यांना दिला नाही. निमूटपणे काही न बोलता माझ्या खोलीत गेले.

असं रोजच होऊ लागलं तर? उद्या मी लवकरच घरी यावं, असा आग्रह धरला तर? आता हा नवा मानसिक छळ सुरू झाला आहे. माझ्याने तो कितपत सहन होईल, मला सांगता येत नाही. कारण अशा छळातून मी कधी गेलेली नाही.....असा अनुभव यापूर्वी घेतलेला नाही....

****

''त्या घरात मला राहणं अशक्य झालं आहे! माझ्या मनाची निष्कारण तगमग चालली आहे फैझ! आधी तू मला यातून मार्ग दाखव!'' फैझला मी आज सांगितलं.

''का? काय झालं?''

''काही झालेलं नाही! काही होत नाही, हेच फार होत आहे. वाटतं, अब्दुल्लाही पपांच्या वतीने माझ्यावर पाळत ठेवतो आहे.''

''त्या घरात राहू नकोस.''

''मग कुठे राहू?''

''तात्पुरती हॉस्टेलमध्ये आणि लग्नानंतर माझ्या घरी.''

''मी तुझ्याआधीच याचा विचार केला आहे. फक्त त्या घरातून बाहेर पडण्याएवढं धाडस सध्या गोळा करत आहे...तुला माहीत आहे, पपांना काय

वाटतं ते! मी कधीच बाहेर पडणार नाही. त्यांना विरोध करू शकणार नाही.... स्वतंत्रपणे वागू शकणार नाही; वावरू शकणार नाही...पण त्यांचा गैरसमज मला दूर करायचा आहे. मी तसा निश्चय केला आहे.''

इथे जमीला जावदची दैनंदिनी संपली होती.

पण मी दैनंदिनी तिला परत दिली, त्या दिवशी ती घराबाहेर पडायच्या निश्चयाने घरातून आली होती.

''आज मी घरी परतायचं नाही, असं ठरवलं आहे.'' किंचित गंभीर सुरात मला म्हणाली, ''सकाळी येतानाच मी त्या निश्चयाने घराबाहेर पडले आहे.''

घर सोडायचा निश्चय बापाला सांगायचे धैर्य काही तिला झाले नाही. त्याकरता तिने वेगळीच युक्ती योजली. त्या दिवशी संध्याकाळी नेहमीसारखा अब्दुल्ला तिला न्यायला आला. तिने बापाला लिहून ठेवलेले पत्र त्याच्यापाशी दिले आणि सांगितले, ''मला यायला वेळ होईल. तू जा आणि हे पत्र पपांना दे!''

अब्दुल्ला काही क्षण घुटमळला. तो जागचा हलला नाही. आपली थंड सापासारखी नजर त्याने जमीला जावदवर रोखली. त्या पत्रातल्या मजकुराचा त्याला अंदाज आला!

त्या नजरेने जमीला जावदचा जणू दाह झालेला मी पाहिला. ती अस्वस्थ झाली आणि मग एकदम उसळून म्हणाली, ''तुम चले जाव!''

अब्दुल्ला तरीही लवकर हलला नाही. एखाद्या अजगरासारखा तो सावकाश मागे हटला आणि केबिनचा स्प्रिंगचा दरवाजा ढकलून बाहेर पडला. उर्मटपणे त्याने तो दरवाजा तसाच सोडून दिला आणि तो धाडकन मागे येऊन आपटला!

त्याची सुस्तावलेली सावली तिच्या टेबलावरून नाहीशी झाली, तेव्हा तिने मान वर केली. तिच्या डोळ्यांत मला विचित्र भीतीचे भाव दिसू लागले. ''मला या माणसाची भीती वाटते. तो फार जंगली आहे– नुसता पशू आहे!''

पण दुसऱ्या दिवशी ती ऑफिसात आली, तेव्हा तिच्या डोळ्यांतले ते भीतीचे भाव साफ नष्ट झाले होते. ती उलट अधिक प्रसन्न भासत होती. मला

ती म्हणाली, ''रात्री फार सुखाची झोप लागली. एका अर्थाने मी कालच वयात आले-वाढले, असं मला वाटलं. जणू माझं व्यक्तिमत्त्वच मला गवसलं. मनावर आता फक्त एकच दडपण राहिलं आहे. पपांच्या प्रतिक्रिया मला कळलेल्या नाहीत. पण त्या कळणारही नाहीत! ते काही माझ्याकडे येणार नाहीत. मग मीच कशाला त्यांच्या रागा-लोभाचा विचार करत बसू? ''

नेहमीसारखा संध्याकाळी फैझ आला. तिला नेहमीची घाई नव्हती. ती दोघे ऑफिसची वेळ होऊन गेली तरी तिच्या केबिनमध्ये बसली. मलाही त्यांनी थांबवले. विवाहाच्या नोंदणी कचेरीत सूचना दुसऱ्या दिवशी द्यायचा त्यांनी तेव्हा बेत केला. जमीला जावद मला म्हणाली, ''मी उद्या ऑफिसला येणार नाही. माझी बरीचशी कामं मला उरकायची आहेत.''

चांगला अंधार पडल्यानंतर आम्ही उठलो आणि चालू लागलो. पहिल्या प्रथम ती पायी रस्त्याने चालत असल्याचे मी पाहिले. थोडा रस्ता चालून जाताच मी त्यांचा निरोप घेतला आणि स्टेशनकडे वळलो. ती दोघे पुढे चालू लागली.

परंतु वळताना मला असे वाटले की, कोणी तरी त्याच्या मागे -मागे चालत आहे. त्यांच्या मागावर आहे, त्यांच्यावर पाळत ठेवते आहे. मी जागीच उभा राहिलो आणि त्यांच्या पाठमोऱ्या, लांब जाणाऱ्या आकृतीकडे काही वेळ पाहत राहिलो. परंतु मला कोणीच दिसले नाही.

मला झालेला भास खरा होता! जमीला जावद जेव्हा एका दिवसाच्या रजेनंतर ऑफिसात आली, तेव्हा प्रथम मला बोलावून तिने सांगितले, ''तुम्हाला माहीत आहे काय- फैझला सतावायला, धमकावण्या द्यायला पपांनी काही मवाल्यांना योजलं आहे. ''

मी तिला मला त्या दिवशी त्यांच्या मागून-मागून जाणाऱ्या ओझरत्या दिसलेल्या माणसाची माहिती सांगितली.

''तुमचा तर्क खरा आहे.'' ती म्हणाली, ''कारण तुम्हाला सोडून आम्ही चालू लागल्यानंतर लागलीच तो माणूस आमच्या मागून येत असल्याची आम्हालाही जाणीव झाली. तो आम्हाला उद्देशून काही तरी अभद्र शब्द उच्चारीत होता. सारखी आमची टिंगल करत होता. होस्टेलनजीक येईपर्यंत तो आमच्यामागे

आला. आम्ही मात्र त्याच्याकडे दुर्लक्ष केले.''

''हा कदाचित योगायोगचादेखील भाग असू शकेल.'' मी म्हणालो.

''पाहू या.''

त्या दिवशी संध्याकाळी आम्ही तिघे ऑफिसच्या बाहेर आलो आणि चालू लागलो. एवढ्यात ती म्हणाली, ''ते पाहा-''

तिने दर्शवलेल्या दिशेने आम्ही पाहू लागलो. रस्त्याच्या विरुद्ध दिशेला एका दिव्याच्या खांबाला टेकून तीन जण उभे होते. त्यातल्या एकाने आम्हाला पाहताच आपल्या हातातली सिगारेट जोरात दूर भिरकावली आणि चालायच्या पवित्र्यात तो उभा राहिला.

''तोच तो- तोच कालचा माणूस! '' ती पुन्हा म्हणाली.

फैझ स्वतःशीच हसला. काही क्षण तिची पावले घुटमळली. पण त्याने तिचा हात पकडला आणि चालायला भाग पाडले. आम्ही सावकाश आणि सावधपणे रस्त्याने चालू लागलो.

चालता चालता फैझ तिला म्हणाला, ''अग, चालायचंच! आपण लग्न करायचं ठरवलं आहे ना; मग असल्या प्रसंगांना डगमगून जाऊन कसं चालेल?''

''मी डगमगून गेले नाही. मला दुःख झालं आहे, वेगळ्याच कारणासाठी. पपांनी असल्या डर्टी ट्रिक्स कराव्यात म्हणून!''

फैझनं मोठ्यानं हसून माझ्याकडे पाहिलं, ''पाहा-'' तो मला उद्देशून म्हणाला, ''वयाची चोवीस वर्षे बापाबरोबर राहून हिनं काही त्यांना ओळखलं नाही. मी मात्र पहिल्याच भेटीत त्या माणसाचा अंदाज घेतला. त्यांनी लग्नाला विरोध केला तेव्हाच समजून चुकलो की, हे लग्न मोडावं म्हणून हा गृहस्थ जंग-जंग पछाडल्याखेरीज राहणार नाही; कुठल्याही वाममार्गाचा अवलंब करायचा शिल्लक ठेवणार नाही.''

माझा अलग रस्ता येऊन ठेपला तेव्हा आम्ही उभे राहिलो आणि मागे वळून पाहिले, दूर अंतरावरून ते तिघे आमच्या मागून येत असलेले आम्हाला

दिसले.

''ते काही करत नाहीत! तुम्ही निःशंकपणे जा पाहू-'' फैझ मला म्हणाला. मी अर्थात त्यांच्याबरोबर राहूनदेखील विशेष काय करणार होतो? मी त्यांचा निरोप घेऊन आपल्या रस्त्याने चालू लागलो.

दुसऱ्या दिवशी ऑफिसात ती आलेली मला दिसली नाही. मला आश्चर्य वाटले. परंतु, काही वेळातच तिचा मला फोन आला.

''त्या लोकांनी फैझला काल मारहाण केली...'' ती फोनवरून कापऱ्या आवाजात म्हणाली,

''काय म्हणता!''

''होय.''

''कसे आहेत फैझ?''

''तसे ठीक आहेत. तुम्ही इकडे येता का?''

''येतो-आलोच.''

तिच्या होस्टेलपाशी मी गेलो, तेव्हा ती रस्त्यावर येऊन उभी राहिली होती.

''आपण फैझकडे जाऊ या.'' ती मला घाईघाईने म्हणाली.

तिचा चेहरा पार उतरला होता. तिच्या मनात उडालेला गोंधळ लपवणे तिला शक्य झाले नाही.

''मी भीत नाही हो- भ्यालेली नाही....'' ती जणू माझी खात्री करून देण्याच्या हेतूने म्हणाली, ''पण असल्या गुंडगिरीच्या प्रकारानं माझ्या मनाला अनंत यातना झाल्या.''

बोलता- बोलता ती गप्प बसली. तिच्या डोळ्यांत अश्रू चमकलेले मला दिसले. आम्ही एक टॅक्सी केली आणि मूकपणे तिच्यातून फैझच्या घरापाशी उतरलो.

फैझला फारशा गंभीर जखमा झाल्या नव्हत्या, परंतु त्याच्या एका हाताला

आणि कपाळाला बराच मार बसला होता. किमान आठ-दहा दिवस तरी त्याला घराबाहेर पडणे मुश्किलीचे होऊन बसले होते.

''आता काय करायचं?'' अस्वस्थपणे जमीला जावदने विचारले. तिचे डोळे आता सुकून गेले होते.

तिच्या मलूल पडलेल्या चेहऱ्याकडे एकवार दृष्टी टाकून फैझ परवासारखा मोठ्याने हसला. पण हसता-हसता त्याला कळा लागल्या आणि त्याचे हसणे एकदम मधेच तुटले.

''काही करायची आवश्यकता नाही.'' तो म्हणाला, ''पण सध्या आपण पोलिसांना या प्रकारची खबर देऊ आणि संरक्षण करायची विनंती करू. झालं?''

जमीला जावद काही म्हणाली नाही. ती आपल्या जागेवरून उठली आणि आम्हाला पाठमोरी उभी राहिली. खिडकीतून ओणवून बाहेर पाहू लागली.

''एवढे पुरे?'' तिने खिडकीतून परत येत विचारले.

''ॲब्सोल्युटली!'' फैझ उद्गारला, ''सध्या तर मी घराबाहेर पडत नाही. बरा झाल्यानंतर बाहेर पडायची वेळ येईल, तेव्हा पाहू''

तिचे त्याच्या या शब्दांनी काही फारसे समाधान झाले नाही. काही तरी अधिक केले पाहिजे, असे तिला वाटत होते; परंतु काय ते तिलासुद्धा कळत नव्हते.

फैझला तिची मनोवृत्ती कळून आली. तिला उत्साहित करण्याच्या हेतूने तो म्हणाला, ''आता थोडे दिवस राहिले आहेत, पंधरा-वीस दिवस...त्यानंतर लग्न करायला आपण मोकळे आहोत.''

तिचा जणू त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही. तिचे धैर्य संपून गेले आहे, असे मला वाटू लागले....ते सारे एक तर अशक्य किंवा अदभुत आहे असा भाव तिच्या चेहऱ्यावर प्रगटला. परंतु फैझच्या शब्दांवर स्वतःचा विश्वास बसवून घेत ती उद्गारली, ''होय.''

फैझ बरा होईपर्यंत आम्ही संध्याकाळी रोज त्याच्याकडे जाऊ लागलो.

आमच्या ऑफिसच्या समोर उभे राहणारे ते मवाली आता कुठे नाहीसे झाले होते आणि फैझची प्रकृती सुधारत होती. त्याच्या हाताचे बँडेज एक दिवस सुटले, कपाळावरील जखम सुकली आणि त्याने सांगितले, ''उद्या संध्याकाळी मी तुमच्या ऑफिसात येणार आहे.''

जमीला जावदचा चेहरा बदलला. ती विलक्षण गंभीर झाली. ''तू एकटाच येणार?'' तिने विचारले.

''मग? दुसऱ्या कुणाला बरोबर आणू?''

''तुझ्या युनियनचे एवढे लोक आहेत–''

''वा! असं कसं होईल?'' तो उत्तरला, ''मला भीती वाटत नाही. माझ्या संरक्षणासाठी दुसऱ्या कुणाला आणायची आवश्यकता वाटत नाही.''

''पण मला वाटते, ते लोक पुन्हा–''

''त्याला काही इलाज नाही. मला एकट्यालाच आलं पाहिजे. मी एकटाच येणार!''

जमीला जावद बोलायची बंद झाली. त्याच्याशी युक्तिवाद करण्यात काही अर्थ नव्हता! तो आपले ऐकणार नाही याची तिला खात्री होती. अस्वस्थ मनाने दुसऱ्या दिवशी त्याची वाट पाहण्यापलीकडे काहीच गत्यंतर नव्हते!

फैझ दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आला आणि आम्ही तिघे जरा लवकर बाहेर पडलो. जमीला जावद काही क्षण फुटपाथवरच थबकली. तिने समोर पाहिले. परंतु तेथे कोणीच उभे नव्हते! आम्ही चालू लागलो. रस्त्यात मी माझ्या दिशेला वळलो आणि ती सावकाश चालत निघून गेली. त्या दिवशी काहीच घडले नाही. त्यानंतर फैझ रोज येऊ लागला आणि ती दोघे रस्त्याने चालत जाऊ लागली.

ते एकेक दिवस असे व्यतीत होऊ लागले आणि जमीला जावदचा ओसरलेला उत्साह पुन्हा परतला, तिचे नैराश्य लुप्त झाले. ती लग्नाचे बेत करू लागली.

नोटिशीची मुदत संपल्याच्या दुसऱ्याच दिवशी लग्न करायचे त्यांनी ठरवले

आणि त्याला सुमारे आठच दिवस उरले, तेव्हा जमीला जावदची तारांबळ उडाली. ती लग्नाच्या तयारीला लागली. स्वतःकरता आणि फैझकरता ती खरेदी करू लागली. फैझसाठी तिने वुलनचे कापड आणि हातातली अंगठी घेतली

''आमच्यात सासरच्या माणसांनी वुलनचा सूट आणि अंगठी नवऱ्याला द्यायचा प्रघात आहे, पण मीच ते करणार आहे.''

ते आठ दिवस असे धांदलीत आणि गडबडीत गेले. जमीला जावदने लग्नाच्या दिवसापासून एक महिन्याची रजा घेतली. आदल्या दिवशी संध्याकाळी फैझ नेहमीप्रमाणे आला आणि आम्ही बराच वेळ ऑफिसातच बोलत बसलो.

''अखेर संपलं सारं!'' ती सुटकेचा निःश्वास टाकून म्हणाली, ''अस्वस्थता संपली! अनिश्चिततेचा काळ संपला! आज मला खूप बरं वाटत आहे....साऱ्या यातनातून सुखरूप पार पडल्याचं समाधान मला लाभलं आहे.''

मी ऑफिसात न जाता परभारे रजिस्ट्रारच्या ऑफिसात जायचे, त्यांच्या लग्नाला साक्ष द्यायची आणि जेवणविधी आटोपताच ऑफिसला जायचे–असे माझे ठरले होते. ठरल्या वेळेनुसार मी त्या कचेरीत गेलो आणि बसून राहिलो.

परंतु वेळ टळून गेली तरी कोणी फिरकले नाही. एक तासभर मी त्यांची वाट पाहिली आणि अस्वस्थ होऊन तिथून उठलो. तडक फैझच्या घरी गेलो.

तिथेच मला कळले की, अनिष्ट राजकीय हालचालींच्या आरोपावरून फैझला प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली रात्रीच अटक करण्यात आली आणि मुंबईबाहेरच्या कुठल्या तरी तुरुंगात नेण्यात आले.

ते ऐकून मी जागीच उभा राहिलो. पहिल्या मवाल्याच्या प्रकारानंतरची शांतता मला तेव्हा जाणवली. पण हा दुसरा प्रकार जमिलाच्या बापाने अगदी आजच का करावा, हे मला कळेना!

ते वृत्त कथन करणारा फैझचा शेजारी काही क्षण माझ्यासमोर उभा राहिला आणि माझ्या आश्चर्याने गोंधळला. मी तिथून हलायची त्याने वाट पाहिली आणि मला उभाच राहिलेला पाहताच त्याने धाड्कन् आपले दार लावून घेतले.

तिथे तसे उभे राहण्यात काहीच अर्थ नव्हता. मी लागलीच तिथून जमीला

जावदच्या होस्टेलकडे धाव मारली आणि व्यवस्थापिकेपाशी तिला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु आपल्याला कुणालाही भेटायला पाठवायचे नाही, अशा सूचना तिने तिला देऊन ठेवल्या होत्या. ती कुणालाच भेटत नव्हती. खोलीबाहेर पडत नव्हती. माझा नाइलाज झाला. तिला न भेटताच मी तिथून परतलो.

जमीद जावदला दुसऱ्या दिवशी भेटायला जायला माझे मन धजावले नाही. तिला बसलेल्या धक्क्यातून आपण जरादेखील सावरू शकणार नाही, तिचे प्रचंड दुःख रतिभरदेखील कमी करु शकणार नाही, असे मला वाटू लागले. तिच्या धक्क्यातून तिला थोडी सावरू द्यावे आणि मगच भेटावे, असे मी ठरवले.

पण त्यानंतर सुमारे आठ-दहा दिवसांनी मी तिला भेटायला गेलो, तेव्हा जमीदा जावद हे होस्टेल सोडून आपल्या बापाकडे राहायला गेली असल्याचे मला कळले. ''तिने आपल्या वडिलांना फोन केला आणि मोटार मागवली.'' व्यवस्थापिकेने खुलासा केला. मी काही बोललो नाही. परंतु तिथून येताना, एखाद्या महाबलाढ्य योद्धापुढे जीत पक्षाचा सेनापती जशी मान खाली घालून जातो तशी, जमीदा जावदची आकृती मान खाली घालून आपल्या घरात शिरताना मला सारखी दिसत होती.

एक महिना सरल्यानंतर मी जमीला जावदला पुन्हा पाहिले. रजा संपून ती कामावर आली, तेव्हा नेहमीसारखी तिची मोटार आमच्या ऑफिसच्या समोर उभी राहिली आणि अब्दुल्लाने मोटारीचे दार उघडल्यानंतर ती खाली उतरली. संथपणे ऑफिसात शिरली आणि सावकाश चालत आपल्या केबिनमध्ये गेली. तिच्या मागोमाग मी आत शिरलो, ती अलगद आपल्या खुर्चीत बसली. खुणेनेच तिने मला बसायला सांगितले आणि काही क्षणातच ती ढसाढसा रडू लागली.

तिच्यासमोर चमत्कारिकपणे मी नुसता बसून राहिलो. त्या क्षणी कसलीही सांत्वनाची भाषा उच्चारणे मला वेडगळपणाचे वाटू लागले. मला वाटले की, माझ्या मूकपणानेच तिचे अधिक आणि खरेखुरे सांत्वन होत होते. अखेर मला तो मूकपणादेखील अपुरा वाटला आणि म्हणून मी हळूच तिचा हात हातात घेतला. त्या स्पर्शानेच माझ्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला,

त्या दिवसापासून तिचे चैतन्यच नष्ट झाल्यासारखे मला वाटू लागले.

चालताना तिची पावले निर्जीवपणे पडू लागली. स्वतःच्या नीटनेटकेपणावरला कटाक्ष संपुष्टात आला. तिचे केस पिंजारलेले फारच विचित्र भासू लागले आणि बोलणे अतिशय तुटक बनले.

दुःखाचे ओझे फारच असह्य झाले की, ती ओक्साबोक्शी रडत राहू लागली. तिच्या सांत्वनाचे शब्द मला अद्याप सुचत नव्हते. परंतु अखेर मीही बोलू लागलो होतो, ''अजून सारं संपलं नाही....फैझची आज ना उद्या सुटका होईल.''

('जमीला जावद आणि इतर कथा' मधून)

❑❑❑

# यंकटअण्णा

– व. वा. बोधे

---

१९६० च्या दरम्यान व्यंकटराव पाटील हे माझ्या गावाचे सरपंच होते. सलग दहा वर्षे. गाव त्यांना यंकटअण्णा म्हणायचं. ते पोलीसपाटीलही होते नि गावचे सरपंचही होते. असा अस्सल रांगडा पण तितकाच प्रेमळ पाटील मी पाहिला नाही.

मराठी चित्रपटांतील दादा साळवींची सुधारलेली आवृत्ती म्हणजे यंकटअण्णा. अण्णा लय रुबाबदार दिसत. बलदंड प्रकृती. सोन्या बेडकागत गालफाडं वर आलेली. अंग धोदरलेलं. नेहरू शर्ट, धोतर, डोक्याला टोपी, असा अण्णांचा साधा वेष असायचा. जगणं ऐसपैस. आवाज बुलंद पहाडी. बोलायला लागले की माईकची गरज भासत नसे. अस्मानकडा ढासळल्यासारखा आवाज कडाडत यायचा.

नाना पाटलांच्या पठडीत ते वाढले असावेत. पण क्रांतिकारकाचा आव त्यांनी कधी आणला नाही. हा देश नाना पाटलांचा आहे. उभी हयात देशासाठी वेचलेल्या सत्त्वशील माणसांचा आहे, अशीच त्यांची धारणा होती. नाना पाटलांसारखीच अण्णांची ग्रामीण भाषेवर हुकूमत होती. ते रात्रंदिवस त्याच भाषेत बोलत.

१९६२ ला भारत-चीन युद्ध झालं. बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपमध्ये असलेले माझ्या गावचे सैनिक शिवाजीराव यादव पुरलेल्या माइन्स काढताना जखमी झाले. दोन्ही पाय तोडावे लागले. मिलिटरी हॉस्पिटलमध्ये पंडित नेहरू, लता मंगेशकर जखमी सैनिकांना पाहून गेल्याचे फोटो 'सैनिक समाचार' मध्ये झळकले. पाटील तो अंक घेऊन गावभर फिरत. सर्वांना दाखवत.

गावाने जेव्हा शिवाजीराव यादवांचा सत्कार केला तेव्हा पाटील आपल्या अस्सल ग्रामीण भाषेत म्हणाले, ''जिवावर बेतलं ते पायाव निभावलं. आय पंढरीचा भेंडा सुखरूप गावात आला, आणखी काय पाहिजे आपल्याला?'' आसलं पाटील, काळीज पिळवटून बोलले, शेवटी म्हणाले, ''गावात बसून मारामारी करण्यापेक्षा, दुसऱ्याच्या वावरातलं पीक नष्ट करण्यापेक्षा देशाचा विचार करा, देशासाठी रगात सांडायची तयारी ठेवा.''

गाव तिथे विरोधक असतात. पाटलांनाही होते. कोणीतरी रात्री-अपरात्री त्यांचा दोन एकर बटाटा उपटून टाकला. यंकटअण्णांनी भर पारावर कुऱ्हाड घासली. करड्या आवाजात म्हणाले, ''लेका, कुणी उपाटलं बटाटं? मला समदं माह्यताय, मी काय हाजामत्या करत न्हाय. पोलीसपाटील हाय. लेका फासंपारधी माझ्याम्होरं नांगी टाकत्याती. यकायकाला चिलटागत चिरडून टाकीन.''

डॉ. पोरे हे यंकटअण्णांचे मित्र. दोघं कायम असत. पाटलांच्या मदतीने शेतीत काही प्रयोग डॉक्टर करत असावेत. त्यांचं काय संभाषण चाले त्यांचं त्यांना माहीत! डॉक्टर वृत्तीने मिश्कील, पण ओरखडा निघेल असं मार्मिक बोलत.

संध्याकाळी दिवस मावळताना यंकटराव पाटील मला ओळी आंब्याच्या टेकडीवर दिसत. सायकल लावलेली. त्याला बाजाराच्या पिशव्या. अण्णा मिसरीची पुडी काढत. चवीनं घासत. नजर ढाण्या वाघासारखी शिवारात भिरभिरत राही. दुसऱ्याच्या शिवारातनं बाटकाचं ओझं घिवून येताना एखादा दिसला की पाटील म्हणत,

''कुठं दरौडा घातलास रं?''

''न्हाय...प...प...पाटील... माझं आयका...मी...''

''ते वझं घरी टाकून चावडीव ये. चार बूट टाळक्यात हाणल्याशिवाय न्हाय आक्कल याची.

तो माणूस माफी मागायचा. जिथून ओझं आणलं त्या वावरात न्हीवून टाकायचा. नंदीवाली सीताफळं चोरायची. कुणाच्याबी झाडीत घुसून ओझीच्या ओझी न्यायची. यंकटअण्णांनी दहा-बारा नंदीवाली धरली. बूट तुटोस्तवर हाणली. चारपाचशे सीताफळांचा ढीग शाळेतल्या पोरांना वाटला. नंदीवाल्यांवर पोलीस केस केली. तेव्हापासून एक नंदीवाला शिवारात फिरकला न्हाय.

गावात फांसपारधी भीक मागाय आलं. यंकटअण्णा म्हणलं, ''भडव्यानू, गावात चोरीबिरी कराल. गजाआड टाकीन उचलून यकायकाला. ये इठ्या कोतवाल, काठी घिवून मागं फिर ह्येंच्या. कुणाची कोंबडीफिंबडी उचालली तर फिरवून काठी टाकायची.''

पारध्यांच्या बाया लागल्या कलाकला कराय. दहा-पाच घरं भीक मागत फिरल्या. पुन्हा शिवारात निघून गेल्या. दुपारच्या वक्ताला गोमगाला झाला. बाजरीची कणसं वरच्यावर खुडून पारधी पळत हुतं. बाया, गडी धरलं लोकांनी. आणली फलर चावडीव. यंकटराव पाटलांनी पारधी लय सडाकली. यका बाईनं बाजरीचं कणीस घेतलं आन् काटकाकडनं बारक्या पोराच्या नाकात खुपासलं. पाटलाम्होरं हात ववळत पारधीन लागली शिव्या द्याला.

''पोराचं नाक फोडलं भाड्यानं. रगूत बघ आंगराकाव. तुला खाल्ला गिधाडानं. यीवू दे पोलीस. हातकडी घालती.''

बाजी आपल्यावर उलटली म्हणल्याव पाटलांनी दिलं पारधी हाकलून.

यंकटअण्णा सुधारणावादी, काळाच्या पन्नास वर्षे पुढे बघत. गाव सुधारावं, गावाला शाळा असावी, ग्रामपंचायतीसाठी ऑफिस असावं, पोरांना खेळण्यासाठी ग्राउंड असावं, लोकांच्या करमणुकीसाठी ग्रामपंचायतीचा रेडिओ असावा, एखादं वाचनालय असावं असं त्यांना मनापासून वाटायचं.

अण्णांना गावात मान होता. प्रत्येक लग्नात त्यांच्या हस्तेच हुंडा दिला जायचा. वेशीत नवरदेवाचे स्वागत तेच करत. पाहुणेमंडळींचे मानपान करण्यात

पाटील आघाडीला असत. लग्न कुणाचेही असो; गावाला मान खाली घालायला लागू नये म्हणून दक्ष असत.

माळकऱ्यांवर त्यांचा राग होता. कीर्तनकारांच्या विसंगत वागणुकीबद्दल चीड व्यक्त करत. तरणी पोरं भानगड करताना सापडली तर बुटानं मारत. ज्याला बूट फेकून मारत त्यालाच बूट परत द्यायला लावत. तसं सगळं गावच त्यांना घाबरून असायचं. फौजदार गावात आला तर पाटलांना जवळ बसवायचा. पाटलांचं कौतुक करायचा. गावातला दारूधंदा पाटलांनीच बंद केला. मांग-रामोशांना कह्यात ठेवलं.

सगळंच गाव त्यांना चांगलं म्हणत होतं असं नाही. पण पाटील कोणालाच भीक घालत नसत. गावाचे पाटील असूनही स्वतःच्या म्हशी स्वतः पाण्यावर घालत. बैलगाडी जुंपत. खांद्यावर आसूड टाकून बाजाराला जात. गावाचे प्रश्न गावातच मिटले पाहिजेत असं त्यांना वाटायचं. आमची शाळा बांधण्याआधी मुलं उघड्यावर अभ्यास करत. एक-दोन वर्ग तर चक्क लिंबाखाली भरायचे. अण्णांनी गाव गोळा केलं. मारुतीच्या मंदिराच्या पोवळीवर मेडकी रोवली. आटवाटे टाकली. मृगाचा पाऊस कोसळण्याआधी पत्रा टाकून मोकळे झाले. मास्तरांना म्हणाले,

''याला सांदीपनीचा आश्रम समजा. मन लावून पोरं शिकवा. शाळा बांधल्याशिवाय ह्यो पाटील मरत न्हाय येवढं ध्येनात ठेवा. दोन वर्ग मशिदीत, एक वर्ग देवळात आणि उरल्याला वर्ग या पवळीव बसू द्या.''

१९६२ साली गावात प्राथमिक शाळा बांधायची ठरली. जागा कोणी देईना. शाळा मुस्लीम समाजाच्या मशिदीत भरायची. पाटलांच्या डोक्यात विचार खुळखुळला. 'ही मशीद पाडून इथे शाळा बांधली तर?' त्यांनी त्या दिवशीच गावमिटिंग घेतली. नाना पाटलांचा जयजयकार करत शड्डू ठोकला.

''लेकानू, गावाला शाळा न्हाय. पोरं मशिदीत बसत्याती. उरल्याली मारुतीच्या देवळात शिकत्याती. जिल्हा परिषदेचं टपाल आलंय. गावानं पन्नास टक्के रक्कम घालावी. जिल्हा परिषद पन्नास टक्के देणाराय.''

''पर शाळा बांधाय जागा कुठाय?''

“गावात कुणी जागा देत न्हाय.”

“मग?”

“एक जागा हाय. पण तुमची संमती हवी. गाव माझ्यामागं हायच... पर शंभर टक्के पाठीशी राहणार असाल तर एक जागा हाय.”

“कंची?”

“मशीद. मशीद पाडायची न् शाळा बांधायची. न्हायतरी त्या मशिदीत काय हाय? येक चार किलोचा धोंडा हाय. आमचा कुणाच्या धर्माव राग न्हाय. गावात एकसुदीक मुसुलमानाचं घरं न्हाय. कवा मोहरम आसल्यावर शिरंब्याची चार माणसं येत्याती डोला घिवून. गावच जातंय डोला मिरवीत. शिरंब्यात याक घर मुसुलमानाचं. त्येनला समजून सांगायचं काम माझं.”

“मग गाव मागं हाय तुमच्या. बांधा शाळा.” गावानं होकार दिला.

पाटलांनी जिगर बांधली. मुसलमानांना घेतलं बोलावून.

“लेकांनो, मशीद पडाय झालीया. कोण रं दुरूस्त करायचं? उद्या भिताड पोराठोरांच्या अंगाव पडलं तर सगळ्या मुसुलमानास्नी कोर्टात खेचीन. लेका, बारा बलुत्यातलं एक बलुतं मुलाण्याचं, गावासाठी करा की कायतरी.”

“आमी गरीब माणसं. काय करणार?”

“दहा वर्ष झाली शाळेची नोंद हाय तिथं. गावाला घिवून मी शाळा बांधणाराय तिथं.”

“बांधा. बांधा. आवं, दिवाबत्ती लावाय आमाला टायम न्हाय. पोटाला हिसकं दिवून जगतूय आमी. मशीद रिपेर कराय किसके पास गिन्नाट है... तुम राजरोस रिपेर करो.”

पाटलांनी पंधरा दिवसांत मशीद होत्याची नव्हती केली. कौले, लाकडे विकून टाकली. पाच खोल्या उभ्या करायचा त्यांचा विचार होता. पण गावटगे आडवे पडले. तीनच खोल्या उभ्या राहिल्या. एक वर्ग शेवटपर्यंत लिंबाच्या झाडाखालीच भरत राहिला.

मारुतीच्या देवळापुढं अण्णांनी छोटी खोली काढली. त्यात ग्रामपंचायतीचा रेडिओ ठेवला. सुरुवातीला काही दिवस त्यांनी तो आपल्या घरातच ठेवला होता. कर्णा मात्र वरच्या चौकात जोडला होता. बातम्या, गाणी, लोकनाट्य ऐकायला माणसं पारावर जमत. या दरम्यान सरपंचकी नारायण बापूंकडे गेली. यंकटअण्णा पोलीस पाटीलकी आणि रेशनिंग दुकान सांभाळू लागले.

अण्णा तसे प्रेमळ. आम्हा भावंडांबद्दल त्यांना प्रेम वाटायचं. स्वस्त धान्य दुकानात तेव्हा अमेरिकन तांबडा मिलो मिळायचा. ही तांबडी ज्वारी रुपायाला एक किलो होती. आमची गरिबी. बाप बेफिकीर. आई मला एखादी पावली द्यायची आणि पावशेर तांबडी आणायला पाठवायची. अण्णा तक्रार न करता पावशेर ज्वारी जोखत. आसपासच्या लोकांना म्हणत, ''या पावशेर ज्वारीत चार मुलं नि माउली कसा दिवस काढतील. बाबासाहेबांना हे कधी कळणार?''

मला अण्णांबद्दल आदर वाटायचा. त्यांनी कधीच आमची हेटाळणी केली नाही. चार आण्याची ज्वारी द्यायला नकार दिला नाही. पण सत्याची पाठही त्यांनी कधी सोडली नाही. त्यांना खोटेपणा, बेफिकीरपणा आवडत नसे. आमच्या शेळ्या त्यांच्या मळ्यात शिरल्या की ते शिव्या देत. कधीकधी कोंडवाड्यात डांबून सक्तीनं दंडही वसूल करत. मग माझी आई नागिणीसारखी चवताळायची. पाटलांना शिव्या घालायची. पाटील न ऐकल्यासारखं करून वाटेला लागत.

पाटील अधूनमधून आमच्या शाळेत येत. गुरुजींशी बोलत. समोरच्या चावडीवर मोठ्या आवाजात गावचे खटले निकालात काढत. अण्णांनी एक काम मात्र चांगलं केलं. गावासाठी वाचनालय सुरू केलं. वरच्या आळीला त्यांच्याच माडीवर एका लाकडी कपाटात नवीकोरी पुस्तकं होती. गावात मी आणि माझे थोरले बंधू प्रकाशराव सोडले तर कोणालाच वाचनाची आवड नव्हती. अण्णांनी ग्रंथालयाची किल्ली दिवेलागण करणाऱ्या कर्मचाऱ्याकडे दिली होती. साऱ्या गावाचे दिवे लावून झाल्यावर मग ग्रंथालय उघडलं जायचं. मला कुत्र्यांची भीती वाटायची. कोतवालवजा त्या कर्मचाऱ्याची पाठ धरून जायचो. त्याच्याच कंदिलाच्या प्रकाशात घरी यायचो.

पुढे मी कॉलेजला गेलो. गावात तसा महाविद्यालयात शिकणारा मी एकमेव

मुलगा. परिणामी यंकटअण्णांना माझ्याबद्दल प्रेम वाटायचं. मला ते अहो-जाहो बोलवत. त्यांचा मळा दाखवायला नेत.

अण्णांचा मळा हा माझ्या लेखी कौतुकाचा विषय होता. १९५० पासून १९७५ पर्यंत पाटलांचा मळा जसा फुलत राहिला तसे पाटीलही फुलत राहिले. गाव पाटलांना मानायचं. त्यांनी फेकलेला शब्द गाव सोनं झेलल्यागत झेलायचं. काही पाटील मंडळी आतून जळायची. पण यंकटअण्णा कोणाचीच फिकीर बाळगत नसत.

धरणाचा पाट आणि भिजणारी शेती हा प्रकार फार उशिरा आला. पण पाटलांनी पन्नास वर्षापूर्वीच गावाजवळ बेंदेच्या ओढ्यावर धरण उभं केलं. दगडमातीचा बंधारा घातला. पाट खणायचं कॉन्ट्रॅक्ट नामदेवकाका नि जगू मोरे यांना दिलं. खळाळतं पाणी पाटलांनी आपल्या गावाजवळच्या मळ्यात न्हेलं. फ्लॉवर, कोबी या श्रीमंती भाज्या त्या काळात या माणसाने मळ्यात फुलविल्या. पपईची बाग लावली. केळी लावल्या. मी भेटलो की खांद्यावर हात टाकून मला मळ्यात नेत. पेरू देत. केळीचा मरून कलरचा कोका देत. मला केळफुलांची भाजी आवडायची. पाटलांनी ते नेमकं लक्षात ठेवलेलं. तंबाखू मळत म्हणत-
''कसा वाटला आमचा मळा?''

''अण्णा, सिनेमावाल्यांनी हा मळा पाहिला ना तर चित्रीकरण करतील.''

''कशाचं चित्रीकरण? तुडवा करतील सारा. मला सांगा वसंतराव, तुमी शिकताय कराडला जाऊन. म्होरं काय करणार?''

''शिक्षक होणार. समाज सुधारणार.''

''वा..वा...वा... आमच्या नाना पाटलास्नी बघितलंवतं का तुमी? नसंल बघितलं. ढाण्या वाघ व्हलपटंल असा दरारा हुता पाटलांचा.''

''अण्णा, तुमी का गेला न्हाय स्वातंत्र्यचळवळीत?''

''कसा जाणार? सरपंचकी करू, पाटीलकी सांभाळू का जमीनजुमल्याव ध्यान दीवू? वसंतराव, मी गावासाठी शाळा उभी किली. पण माझी पोरं शिक्षणापासून दूरच राह्यली. गावाचं नाव आता तुमीच मोठं करायचं. काय काय

टायंबाला वाटायचं, सारं सोडावं. जावं नाना पाटलांच्या चळवळीत. एक सांगतो तुमाला, मी भूमिगत न्हाय झालो. पण नाना पाटलाचं प्रति–सरकार गावात चालू ठेवलं. गावातला न्यायनिवाडा गावातच केला. कवा कोर्टात केस जाऊन दिली न्हाय. गोरगरिबाला आडीवलं न्हाय.''

अण्णा हे बांधावरचे शेतकरी नव्हते. स्वतः शेतीत राबत. हिरवं सोनं पिकवत, मेथी, वांगी, गाजरं, पपया भरून बैलगाडी कोरेगावला नेत. खिसा कायम गरम असायचा. पण कधी मस्ती नाही. दारू पिऊन झिंगणे नाही. स्वतः डोबंर पाण्यावर नेत. रात्री–अपरात्री हा गावचा पाटील हातात चार सेलची बॅटरी घेऊन गावभर गस्त घालायचा. कोतवालाला सावध राहायला सांगायचा. भेटला भुरटा तर बुटानं सडकायचा. भानगडखोर कार्टी पाटलाला टरकून राहत. पोरीबाळींना पाटील मानानं वागवत.

पाटलांचा आहार तसा बरा होता. मनापासून जेवत. जेवल्यावर आडशिरीभर शेंगा खात. शेंगा त्यांना खूप आवडत.

गावाची जत्रा असली की पाटलांना झोप नसायची. आधीच आठवडाभर मीटिंग घेत, यात्रा कमिटी करत. कामे वाटून देत. उभं राहून भाषण करत.

''यात्रा कमिटीनं जत्रंवर नजर ठेवावी, ही जत्रा भवानीदेवीची हाय. लेकांनू, साधी देवी न्हवं. शिवाजी महाराजांची देवी हाय, राजाराम पवार, तुमी छबिना संभळायचा. देवीच्या ओटींच सामान, नारळ, गुलाल....काय लागंल ती आणा. ये किस्ना पैलवान, त्या पांडबाला हाताशी धरून तेवढा कुस्त्याचा फड बघा. काशा रामोशाला म्हणावं, बैलगाडी घिवून जा त्या तमासगिराच्या भिकार तासगावला. म्होरं घालून आण तमासगीर. न्हायतर जिहेकर अण्णाला माझं नाव सांग. कुणी जत्रंत खौंडळ कीली तर तुडीवतोच धरून. राती नऊला छबिना सुरू झाल्यावं पहाटं तीनला संपंल. पुन्हा पहाटं पाच वाजाय तमाशा उभा राह्यला पायजे चावडीव. दहाला सुट्टी करा. आंगुळापांगुळा उरकून जेवणं करून तमासगीर पुन्हा बाराला उभं ऱ्हात्यालं. वग दुपारी चारला सुटला की लोंढा फडाकडं गेला पाहिजे. दोघातिघांनी जाऊन तेवढा फडात झेंडा रोवून या. पताका लावा. आपल्या गावात आठ वाडं. वाडावार वर्गणी जमा करा. शनिवारी वैशाख

शुद्ध पंचमीला मारुतीच्या देवळात सकाळी दहा वाजता वर्गणी आली पायजे.''

तो काळ स्वस्ताईचा. तरीही पाटील दिमाखात जत्रा साजरी करत. छबिन्यात लेझीम खेळत. गुलालानं रंगत. पैलवानांचे लाड करत. घरटी पैलवान जेवायला पाठवत. तमासगिरांना जेवणं मिळावं म्हणून इठ्या कोतवालाला गावात पाठवत. पाटीभर भाकरी नि पात्यालंभर मटण गोळा करून आणत. तसल्या उन्हाची नळी हाणून सुरते सूर धरत.

गेला तो जमाना. आता पाटीलही राहिले नाहीत. चार-पाच वर्षापूर्वी वारले. माणसं इतकी निर्दयी की मला कोणीच कळवले नाही. त्यांची मुले अडाणी हे मी समजू शकतो, पण सभोवतालच्या सुशिक्षितांनीही का मौन बाळगावे? निदान त्यांच्या अस्थिविसर्जनाला तरी बोलवायचं. आता गावात घराघरात फोन आलेत. पोरांच्या खिशात मोबाईल वाजायला लागलेत. पण या संपर्कयंत्रणेचा वापर योग्य वेळी करावा याचे भान कोणालाच नाही. असो! समाधान एवढंच आहे की पाटालांचा मळा त्यांच्या मुलांनी तसाच हिरवागार ठेवलाय. फुलता ठेवलाय. कधीकधी वाटतं. त्या अरुंद हिरव्या गर्द वाटेनं बेंदेच्या ओढ्यात उतरायला हवं.

कोणी सांगावं....पाटलांचा आत्मा त्या ओढ्याकाठच्या मळ्यात अजूनही वावरत असेल. मला पाहिल्यावर पाटील तोंडभरून हसतील. हात झाडत म्हणतील, ''या...या...वसंतराव...कशी काय वाट चुकला! बसा. हे गार पाणी प्या. आता बघा मी मळा सोडून कुठं जात न्हाय. गावातल्या माणसास्नीबी आता आपली किंमत न्हाय. कालपरवाची कार्टी आवाज चढवून बोलत्याती आवं फौजदारसुदीक आमाला बघितल्याव सलाम घालायचा. माझ्या पाठीव नाना पाटलांचा हात फिरलाय बघा...भाकरी आणलीया पोरानं. खाऊया थोडी थोडी. बेस चाललंय ना? मग काय....जाताना कालवणासाठी केळीचा कोका घीवून जावा. वांगी न्या. तंबाटी न्या...मला वाटतंय वसंतराव, तुमच्यामागं असं गावाचं नाव काढणाऱ्या पोरांची रांग लागायला हवी. मला लय वाटतंय गाव बदलायला हवं. तुमच्या आईनी, बापूंनी लय कष्ट काढलं....जीव मारून तुमाला शिकीवलं. आसी पोरं शिकीवणारी माणसं उभी राह्यली पायजेती...आता काय राह्यलंय

गावात...उंडगी सवाशीण झालीया....टग्या गावाला सबा सांगतूया....बसा... वाईच भुईमुगाच्या शेंगा खाया आणतू....''

अजून शंभर वर्षे तरी गाव यंकटअण्णांना विसरू शकणार नाही.

('गावाकडची माणसं' मधून)

❑❑❑

# दगडू मामा

**– उत्तम कांबळे**

कॉलेजचा शेवटचा तास संपवून मी आणि माझा मित्र दीपक होस्टेलच्या दिशेनं निघालो. शेवटचा तास साडेअकराला संपायचा. तो संपवून होस्टेल गाठेपर्यंत पाऊण तास लागायचा. पोटात कावळे ओरडायचे. ते पायांना धक्के द्यायचे. पायांची गती वाढायची. हातातली वही खालवर करत किंवा डाव्या हातातील बोटावर ती फिरवत आम्ही चालत राहायचो. कधी कधी वही नसायचीही. कॉलेजमधील गमतीजमतीवर गप्पा मारत वाट कधी सरली कळायचं नाही.

पंचगंगा नदीवरील लक्ष्मी पुलावर आलो. पाय आपोआप थांबले. पुलाच्या, डाव्या बाजूला माणसांची गर्दी जमली होती. पुलावर अशी गर्दी नेहमीच व्हायची. कोणी तरी दोन-तीन टगी मुलं पुलावर थांबायची. एकटक खाली पाहायची हातवारे करायची. ते काय पाहतात हे पाहण्यासाठी पुलावरून ये-जा करणारे अन्य लोकही थांबायचे. बघता बघता गर्दी वाढायची. गर्दी वाढली की टगी मुलं तेथून सटकायची. गर्दीतला प्रत्येक जण परस्पराला 'काय -काय?' असं कधी चेहऱ्यानंच तर कधी एखादा शब्द खर्चून विचारायचा; पण उत्तर काहीच मिळायचं नाही. आपण उगीचच थांबलो असं प्रत्येकाला वाटायचं. स्वतःवरच नाराज होऊन तो मार्गस्थ व्हायचा. अशा फसलेल्या गर्दीत मी स्वतःही अनेक वेळा शिरलो होतो. बहुतेक वेळा माझीही फसगत झाली होती. याही वेळी गर्दी

पाहून पाय थबकले; पण मन मात्र थांबायला तयार नव्हतं. गर्दी जवळ आली तसा दीपक म्हणाला, ''अरे राजा, चल काय आहे पाहू.''

मी म्हणालो, ''मला नाही पाहायचं. भूक लागलीय, होस्टेलला जाऊ ''

दीपक म्हणाला, ''अरे, एक मिनिट थांबू.''

''नको बाबा, मी अनेक वेळा फसलोय.''

दीपक म्हणाला, ''अरे पण काही तोटा तर झाला नाही ना?''

''अरे पण कशालाऽऽऽ?''

माझं  वाक्य पूर्ण होण्याअगोदरच दीपकनं मला बळंबळं ओढतच गर्दीकडं नेलं. गर्दीचं एक प्रचंड कडं झालं होतं. माणसांचे अनेक थर एकावर एक चढवले आहेत असं वाटतं होतं. पहिल्या थरातला माणूस एक एक थर भेदून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. तर शेवटच्या थराबाहेर माणूस एक एक थर तोडून आत जाण्याचा प्रयत्न करत होता. गर्दीतून बाहेर पडणारा काहीच बोलत नव्हता. मी एक दोघांना विचारलं, पण त्यांनी अबोल राहणचं पसंत केलं.

शेवटी आम्ही दोघांनीही गर्दीत घुसण्याच निर्णय घेतला. हातातील वही शर्टात टाकली. मुंगीच्या पावलानं गर्दीत घुसू लागलो. मध्येच कोणीतरी ओरडायचं, ''अरे, काय झालंय, कोणी सांगत का नाही?'' पण कोणीच तो प्रश्न ऐकायचं नाही. हळूहळू वाहनधारकही बाजूला वाहन लावून गर्दीत घुसू लागले. कोणीतरी ओरडलं, ''अरे प्रेत आहे प्रेत! प्रेताचा एक हात तुटून बाजूलाच पडला आहे.''

गर्दीचं कारण लक्षात आलं. प्रेत पाहायला आम्हीही उत्सुक झालो. गर्दीचा रेटा वाढू लागला होता. रेट्यामुळं कधी कधी पाय अधांतरीच राहतात की काय असं वाटायचं. शेवटी एकदाचं प्रेताजवळ गेलो. प्रेताच्या तोंडावर कापड पडलं होतं. एक हात तुटलेल्या अवस्थेत शेजारीच पडला होता. रक्ताचं थारोळं निर्माण झालं होत. तुटलेला हात डोकं तुटलेल्या सापासारखा वाटत होता. ''कुणाचं असेल बरं प्रेत?'' माझ्या मनात प्रश्न.

मी दीपकला म्हणालो, ''काय रे दीप्या, कुणाचं असेल प्रेत, कुणी तोडला

असेल त्याचा हात? कुणी केला असेल खून?''

दीपकनं माझा हात पकडला. म्हणाला, ''चला, आता जाऊ या. मला पाहवत नाहीय.''

आम्ही माघारी वळणार तोच गर्दीच्या रेट्यानं एका माणसाचा तोल गेला. त्याचा पाय प्रेताच्या तोंडावर पडलेल्या कापडावरून घसरला तसं कापड दूर झालं. माझी नजर प्रेताच्या तोंडावर गेली. तोंडावर भला मोठा आवळा असलेला चेहरा ओळखीचा वाटला. एका क्षणातच मी ओरडलो, ''दीप्या, अरे हा तर.....''

दुसऱ्याच क्षणाला मी तोंड बंद केलं. पण दीप्या म्हणाला, ''काय रे राजा, तू या प्रेताला ओळखतोस?''

माझे शब्द घशात रुतून बसले होते. क्षणभर कोंडल्यासारखं झालं. दुसऱ्याच क्षणाला स्वतःला सावरत म्हणलो, ''दीप्या, चल ना रे..''

गर्दीतून बाहेर पडलो. तसा दीपक म्हणाला, ''काय रे राजा, तू त्या प्रेताला ओळखतोस?''

''छे – छे मी कसा ओळखेन?''

''पण तू काहीतरी म्हणण्यासाठी तोंड उघडलंस....हा आपला असं काही तरी म्हणालास आणि लगेच थांबलास...''

''हो म्हणालो तसा पण तसं काहीच नाही. चेहरा कुठं तरी पाहिल्यासारखा वाटला, पण ते खरं नव्हतं.''

''पण काय रे, मर्डर झाला असेल?''

''तर मर्डरच ना पोटावर, गळ्यावर जखमा नाही का दिसल्या?''

''कुणी केला असेल मर्डर?''

''मी पोलीस खात्यात भरती झालो ना तर पाहू.''

''हट् साल्या, तू काय पोलीस होतोस, तू कुठं तरी कारकूनच होणार.''

''ठीक आहे बाबा. मी होईन कारकून. तू साहेब हो, मग तर झालं.''

''हे बघ राजा, तू खूप लवकर चिडतोस.''

''नाही रे दीप्या, आज मला मूड नाहीय.''

''काय झालं मूड खराब व्हायला?''

''काही नाही असंच.''

बोलता बोलता होस्टेल आलं. खोलीवर जाण्याऐवजी थेट मेसमध्येच गेलो. शर्टात फेकलेली वही बाकावर ठेवली. नळावर जाऊन हात धुतले. जेवायला बसलो. पोटातली भूक घास ओढून घेत नव्हती. भोजनाची इच्छाच मरून गेल्यासारखं वाटायला लागलं. कसं तरी दोन-चार घास गिळून उठलो. वही उचलली. खोलीत जाऊन खाटेवर पडलो. कितीतरी वेळानं दीपक ढेकर देत आला. नेहमीप्रमाणं तोही खाटेवर पडला.

''राजा, तुझं काहीतरी बिघडलंय आज. चल, आपण पान खाऊन येऊ.''

माझ्या चेहऱ्यावरची अस्वस्थता लपण्यापलीकडे पोहोचली होती. दीपकच्या नजरेत ती भरली होती. विषय बदलायचा म्हणून मी म्हणलो, ''दीप्या, आता आपण मस्तपैकी दोन तास झोप काढू आणि मग पान खायला जाऊ.''

दीपक काही तरी उत्तर देणार तेवढ्यात मी तोंडावर चादर ओढलीही. तोंडावर चादर ओढल्यामुळं अस्वस्थता आणखी वाढली. चादरीमुळं आपला चेहरा कोणी पाहणार नाही हेही त्यामागचं कारण असावं. एका क्षणाला तर वाटलं की, आपण उठावं आणि होस्टेलच्या गच्चीवर जाऊन जोरात ओरडावं....मोठमोठ्यानं हुंदके देत रडावं....काळजात साचलेलं पाणी डोळ्यांतून फेकून द्यावं...घशात गारठलेला आवाज मोकळा करून टाकावा. पण प्रत्यक्षात मी ते केलं नाही. चेहऱ्यावरची चादर बाजूला केली. दीपकच्या खाटेवर नजर टाकली. त्याला झोप लागली होती. अंगाचा मुटका करून त्यानं स्वतःला जणू चादरीत गुंडाळून घेतलं होतं. मी उठलो. कपडे घातले. होस्टेलबाहेर पडलो. भाड्यानं सायकल घेतली. ती जोरजोरात चालवत निघालो. इतक्या जोरानं सायकल चालवण्याचा माझा पहिलाच अनुभव असावा. सायकल पंचगंगेवरील लक्ष्मी पुलाच्या दिशेनं वळली.

पूल नरजेसमोर आला. आणि पाय गळल्यासारखे झाले. पुलावर चिटपाखरही नव्हतं. सायकलीवरून उतरलो. हातानंच सायकल ढकलत पुलावर गेलो. दोन–चार तासांपूर्वी जिथं प्रेत होतं ती जागा मोकळी होती. रक्ताने डाग मात्र दिसत होते. पूल बुधवार पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत होता. याची मला कल्पना होती. मी सायकल तिकडं वळवली.

पोलीस ठाण्यात वर्दळ नव्हती. सायकल बाहेर लावून मी ठाण्याच्या दारात पोहोचलो. एक पाय आत ठेवला अणि तो दुसऱ्याच क्षणाला मागं घेतला. मागं वळलो, सायकल घेतली. होस्टेलमध्ये आलो. दीपक अजूनही झोपलेलाच होता. मी खोलीत न थांबताच गच्चीवर गेलो. बदामाच्या झाडाची सावली गच्चीवर पसरली होती. पण सावलीऐवजी मी उन्हातच बसलो. उन्हामुळं कोंडमारा फुटेल. असं वाटतं होतं, पण ते शक्य झालं नाही. माझ्यासमोर ते प्रेत आलं. ते मला शिव्या घालतं आहे. भ्याड म्हणतं आहे की काय असं वाटू लागलं. प्रेताचा तुटलेला हात माझ्या गालावर पडत असल्याचा भास मला होऊ लागला. क्षणभर मी डोळे बंद केले. पुन्हा उघडले. मी मला शिव्या देऊ लागलो. स्वतःच्या भ्याडपणावर मनातल्या मनात हसू लागलो. चिडू लागलो. मध्येच डोळ्यांच्या कडा ओल्या व्हायच्या. पण उन्हाच्या चटक्यामुळं त्या कोरड्या पडायच्या. गच्चीवरची सावली माझ्याकडं सरकत होती. माझी सावलीही झाडाच्या सावलीत मिसळून नाहीशी होत होती. क्षणभर मला वाटलं, आपण प्रतिष्ठितांच्या जगात, त्यांच्या सावलीत स्वतःला असंच विसरलं असावं. मनात येणाऱ्या नाना कल्पनांनी मला एकदम बालपणात नेलं. ती सुतारवाडी, गावाबाहेरील दलित वसाहत, त्या वसाहतीमधील टुमदार समाजमंदिर, पत्त्यांचा रंगलेला डाव, या डावात दगडूमामा मोठ्यानं ओरडतोय– हे माझे दहा रुपये आणखी ब्लाईंड....डावातले लोक चक्रावतात...आपापले पत्ते पाहू लागतात. एक एक जण पत्ते खाली ठेवतो. दगडूमामा पत्ते न खोलताच डाव जिंकतो. डावातले पैसे आपल्याकडं ओढतो. त्यातील पंचवीस पैशाचं नाणं माझ्या हातात देत म्हणतो, ‘‘चल राजा, हे घे पैसे. एक सिन्नर विडीचा कट आणि काडीपेटी घेऊन ये. उरलेले पाच पैसे तुझे, गोळ्या घे नाही तर वटाणे घे. चल पळ.’’

दगडूमामाची थाप पाठीवर बसताच मी दुकान गाठतो. होय, दगडूमामा.

लोक त्याला ''दगड्या दरोडेखोर'' म्हणायचे. दगड्या अंगापिंडानं दगडासारखाच. पहिलवान शोभावा असा. त्याची उंची फार नव्हती. डोळे बारीक होते. बहुतेक वेळेला ते लालेलाल असायचे. त्याच्या चेहऱ्यावर उजव्या बाजूच्या गालावर मोठा आवळा होता. पत्ते खेळताना तो या आवळ्यावर पत्ते घासून विचार करायचा. दोन्हीही गाल फुगलेले. नाक किंचित नकटं. ओठावर पिळदार मिशा. डाव्या गालावर कसला तरी व्रण. दोन्हीही हातांच्या बोटांची नखं वाढलेली. गळ्यात भला मोठा ताईत. पाहता क्षणीच धाक वाटावा असा त्याचा चेहरा होता. दगडूमामाला ना घर ना दार. आई-वडील लहानपणीच देवाघरी गेलेले. घरात दगडूमामा एकटाच राहायचा. भरपूर दारू प्यायचा. मटण खायचा. दुपारी आणि संध्याकाळी पत्ते खेळायला समाजमंदिरात यायचा. जुगार खेळण्यासाठी लोकांकडं पैसे नसले, की तो स्वतः उधारीवर पैसे द्यायचा. तीन पत्त्यांच्या, पाच पत्त्यांच्या आणि रमीच्या डावात तो तासन्‌तास रंगायचा.

दरोडे घालायचा. सगळ्या भागात त्याचा दरारा. दगड्याचं नावं घेतलं की मी मी म्हणणारा पाटीलही चळाचळा कापायचा. दगड्या गरिबांना कधी त्रास द्यायचा नाही. हिंदी सिनेमातल्या नायकाप्रमाणे तो फक्त श्रीमंतांनाच लुटायचा आणि तेही खुलेआम. ज्यांच्या घरी दरोडा टाकायचा तेथील दारावर तो मोडक्या तोडक्या मराठीत लिहायचा. ''आज रात्री दगड्या येणार हाय...संबाळून ऱ्हा.'' घराचा मालक कसाही असला आणि तो कितीही जागत राहिला तरी दगड्याचा दरोडा यशस्वी. त्याच्या गळ्यात गोफण असायची. उजव्या खिशात चाकू. डाव्या खिशात टोकदार दगड असायचे. चटणीनं भरलेली एक पिशवीही तो गळ्यात अडकवायचा. दरोडा पडला की दगड्या आठ दिवस गायब व्हायचा. पुन्हा गावात यायचा. त्याच्याकडं बघण्याचं धाडस कुणातच असायचं नाही. गल्लीतील पोर भिऊन पळायची. ती पळायला लागली की, दगड्या हसायचा. 'कधी कधी गोळ्या चॉकलेट देतो, थांबा' असं म्हणायचा. दगड्या गावात फिरायला लागला की, लोक त्याला रस्ता सोडून मोकळं व्हायचे. दगड्या उगीचच कुणाला मारायचा नाही. कुणाच्या नादालाही लागायचा नाही. कधी कधी तो अण्णाभाऊ साठेंच्या कादंबरीतील नायकाप्रमाणं वाटायचा. मरगुबाईची जत्रा असली की दगड्याच सर्व खर्च करायचा. देवीसमोर बळी देण्यासाठी रेडाही

तोच आणायचा. रेड्याची मिरवणूक निघाली ही हलगीच्या तालावर नाचायचा. गुलालात रंगायचा. बऱ्याच वेळा तो एका दणक्यातच रेड्याचं मुंडकं धडावेगळं करायचा. रक्तात हात बुडवून रक्त कपाळावर लावून घ्यायचा. रात्री सगळी गल्ली जेवायला बसली की तो दारू पिऊन तर्र व्हायचा. पंक्तीत फिरायचा. ''फोडा रे हाडं पोरांनो'' असं आग्रहानं सांगायचा. पोरं मात्र कधी त्याच्याकडं पाहत नसतं.

माझी आणि दगड्याची ओळख झाली ती माझ्या आई–बापाच्या भांडणात, दारू पिऊन आलेला बाप आईला गुरासारखं बडवत होता. मी मध्ये पडलो. मार खाल्ला, बापानं माझ्या गचांडीला धरून बाहेर फेकलं. तेव्हा मी बोंबलतच समाजमंदिरासमोर आलो. माझं रडणं ऐकून दगड्या धावला. मी त्याचा हात धरून त्याला घरात आणलं. बापानं तोपर्यंत आईला रक्तबंबाळ केलं होतं. हातातील काठी तिच्या डोक्यात घालण्याच्या बेतात तो होता. दगड्यानं वरच्यावर काठी पकडली आणि बापाच्या पाठीत जोरानं लाथ मारली. बाप कोलमडला. समोरच्या भिंतीवर जाऊन आदळला. तो उठण्याचा प्रयत्न करत होता. पण दगड्यानं काठी उगारली. शेवटी आईच मध्ये पडली. दगड्यानं बापाला ठणकावलं. ''हे बघ सीत्या, आजपासून बायकोवर हात टाकायचा नाही. साल्या दिवसभर पिऊन पडतोस, ती बिचारी राबायला जाते आणि तुला जगवते. तिलाच मारतोस काय? सीत्या तुला सांगून ठेवतो, आजपासून तुझी बायको माझी बहीण आणि मुलगा भाचा. चुकून जर त्यांना मारलंस तर तुझी हाडं मोडून पिशवीत भरेन आणि कृष्णा नदीत सोडून येईन. समजलं का? अरे, मर्दुमकी असेल तर दरोडा टाक माझ्याप्रमाणं, बायकोला काय मारतोस...''

बस्स तेव्हापासून माझ्या आईचा मार बंद झाला. तिला भाऊ आणि मला मामा मिळाला. समाजमंदिरात पत्त्याचा डाव सुरू झाला की, मी हमखास दगडूमामाजवळ, पण दगडूमामा वस्ताद. तो मला पाढे म्हणायला लावायचा. बाराखडी म्हणायला लावायचा. शाळा शिकून मामलेदार हो म्हणायचा. रात्री उशिरापर्यंत डाव रंगण्याची चिन्हं दिसली की, तो माझ्या हातावर दहा पैसे टेकवायचा आणि ''पळ भोसडीच्या, जा घराकडं'' असं सांगायचा. एकदा पाढे येत नाहीत म्हणून मास्तरनं मला अगं सुजेपर्यंत मारलं होतं. दगडूमामाला समजलं.

तो रागारागानं शाळेला आला. मास्तराला म्हणाला, ‘‘हे बघ मास्तरा, दगड्या दरोडेखोर म्हनत्यात मला. माझ्या भाच्याला पुन्हा मारलंस ना तर पहाटेच्या टायमाला शाळा पेटवीन आणि खुशाल शेकत बसीन. शाळेची राख अंगारा म्हणून तुझ्या कपाळाला लावीन.’’ दगडूमामाच्या या बोलण्यावर मास्तरची विजारच ढिली झाली असावी. त्या दिवसापासून मास्तरनं माझ्या अंगावर हात टाकला नाही. दगडूमामा कधी कधी मला पाटी आणायचा. सहल निघाली की, मला पैसे द्यायचा. तो माझा आवडता मामा आणि मी त्याचा आवडता भाचा झालो होतो. गल्लीतलं लोक मात्र आईला काहीही बोलायचे. पोराला दरोडेखोर करायचं आहे काय! असं विचारायचे, आई म्हणायची ‘‘चंदनाच्या झाडावर निंबाची सावली पडली म्हणून चंदन काही कडू होत नाही. दगड्या तुम्हाला वाटत असेल दरोडेखोर, पण माझ्यासाठी तो सख्ख्या भावापेक्षा अधिक जिव्हाळ्याचा भाऊ. माझा नवरा माझा जीव घेत होता, तेव्हा देवावानी धावून आला तो दगड्याच. बाकी सगळी तुम्ही डोळे उघडून बघत होता.’’

दगडूमामा मला बऱ्याच वेळेला फिरायला न्यायचा. भजी द्यायचा. पाव द्यायचा. भोवरा घेऊन द्यायचा. मध्ये माझ्या पाठीवर हात फिरवत म्हणायचा, ‘‘राजा, तू खूप मोठा होणार आहेस.’’

मी म्हणायचो, ‘‘खूप मोठा म्हणजे तुझ्याएवढा?’’

तो म्हणाला, ‘‘साल्या माझ्यापेक्षा मोठा.’’

‘‘तुझ्यापेक्षा मोठा म्हणजे समाजमंदिराच्या भिंतीएवढा?’’

‘‘गाढवा, अरे उंचीनं, नव्हं मोठेपणानं.’’

‘‘मोठेपणा म्हणजे काय असतो रे मामा.’’

‘‘मोठेपणा म्हणजे इज्जत असते.’’

‘‘अरे मामा, इज्जत कशासाठी?’’

‘‘अरे बाबा, इज्जत असली ना, इज्जत असली ना, आयला कसं सांगायचं याला? हे बघ खूप इज्जत मिळव.’’

‘‘कुठून आणायची ती? तू आण ना दरोडा घालून.’’

‘‘राजा, दरोड्यात भाकरी मिळते. इज्जत नाही मिळत.’’

‘‘मग मलाही भाकरी पाहिजे ना. मीही येईन तुझ्याबरोबर दरोडा टाकायला.’’

यावर दगडूमामा चिडला आणि त्यानं गालावर दणका दिला. मला भोवळ आली. दोन दोन दगडूमामा दिसू लागले. त्यानं मला उचलून धरलं. छातीला लावलं. आम्ही गप्पा मारत मारत घरी आलो.

माझं प्राथमिक शिक्षण चौथीपर्यंत पोहोचलं होतं. चौथीला केंद्राची परीक्षा होती. परीक्षा संपली. शाळेत जाऊन निकाल घेतला. मी पास झालो. दगडूमामाला सांगण्यासाठी धावत आलो. दगडूमामा भेटला नाही. खूप वाईट वाटलं. त्याची चौकशी केली. त्याच्या घरात गेलो. रात्री उशिरापर्यंत समाजमंदिरात थांबलो. पत्त्याचा डाव झाला पण दगडूमामा काही आला नाही. आईकडे चौकशी केली. तिलाही काही सांगता आलं नाही. पुढ तो दुसऱ्या दिवशी, तिसऱ्या दिवशी, कधीच गावात आला नाही. वर्षामागून वर्षे गेली. माझं माध्यमिक शिक्षण संपलं. दरम्यानच्या काळात आईला बापाचा त्रास वाढला होता. तो मध्येच दारू प्यायचा. आईवर तुटून पडायचा. आई दगडूमामाचं नाव घेऊन ओरडायची. ‘कुठं जाऊन बसलास रं दगडू भावा.’ असं विचारायची.

दगडूमामा आला नाही. कुणी म्हणायचं, पोलिसांनी त्याला काळ्या पाण्याची, खडी फोडण्याची, जन्मठेपेची सजा दिलीय. कुणी म्हणायचं, पाटलानं त्याला ठार केला. कुणी सांगायचं, दगड्याच्या डोक्यावर परिणाम झाला. तो खुळा होऊन कोल्हापुरात भीक मागतोय. कुणी सांगायचं मुंबईत त्यानं टोळी केलीय. रेल्वे लुटतोय. कुणी सांगायचं की, शहरात तो वेश्येच्या प्रेमात पडलाय....नाना तऱ्हेच्या कल्पना लोक लढवायचे. दगडूमामा मात्र कुणालाच भेटला नव्हता.

जवळजवळ दहा अकरा वर्षांनी दगडूमामा मला दिसला तो लक्ष्मी पुलावर मेलेल्या अवस्थेत. त्याच्या गालावर आवळा, त्याचे बारीक डोळे चटकन मी ओळखले होते. त्याचं नावही माझ्या ओठावरं आलं. पण मी ते गिळून टाकलं. दगडू माझा मामा होता हे सगळ्यांना समजलं असतं तर लोकांनी मला दूर केलं असतं. दरोडेखोराचा भाचा म्हणून चिडवलं असतं.

बहिष्कृतही केलं असतं. मी दगडूमामाच्या प्रेतालाही ओळख दाखवू शकलो नाही. दगडूमामा लहानपणी इज्जत इज्जत असं काही तरी म्हणायचा. ती किती कठोर असते, तिच्या पडद्याला तलवारीसारखी धार असते. ती माणसाच्या भावना चिरून टाकते. काळीज चिरून टाकते. अश्रू पिऊन टाकते. इज्जत खरंच इतकी वाईट असते....माणसाला कठोर आणि संवेदनाहीन बनवते? दगडूमामा माझ्याविषयी खूप मोठंमोठं बोलायचा....मोठा माणूस होशील असं म्हणायचा... पण या मोठेपणाला, या इज्जतीला कधी स्वतःचे पाय असतील की ती असेल अशीच अधांतरी....गच्चीवर बसून मला रडवणारी, हुंदके फोडणारी आणि हुंदके गिळायला लावणारी...दगडूमामाला कोणी मारलं असेल, का मारलं असेल? मनात अनेक प्रश्न निर्माण होत होते आणि प्रतिष्ठेच्या पोलादी पडद्याखाली चिरडूनही जात होते.

''राजा, ए राजा'' दीपकचा पहाडी आवाज गच्चीवर पोहोचला. तो वर येण्यापूर्वी मीच पायऱ्या उतरू लागलो.

('कावळे आणि माणसं' मधून)

❑❑❑

# मुंबईचा चित्रकार

**– अरुण खोपकर**

---

**रावणाची दुसरी लंका**

मुंबईची अनेक चित्रणे मराठी संस्कृतीत मिळतात. माडगावकरांचे मुंबईचे वर्णन. पठ्ठे बापूरावांची मुंबईची लावणी. मर्ढेकरांची ठाकूरद्वारला टांग मारणारी कांदेवाडी. अरुण कोलटकरांनी इराणी रेस्टॉरंट ही कविता लिहून इराणच्या तडकलेल्या काचेमागच्या काण्या शहाला कविसिंहासनावर बसविले. भाऊ पाध्यांच्या वासूनाक्याने नाकासमोर चालतो असे दाखवू पाहणाऱ्यांच्या नाकाला झिणझिण्या आणल्या. वसंत गुर्जरांनी गोदीचे भव्य चित्र रेखाटले. नारायणराव सुर्व्यांनी प्राथमिक शाळेत काम करता करता, विद्यापीठात आडरस्ते न शोधता, अख्खे विद्यापीठच फूटपाथवर आणले आणि त्यामुळेच विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढली. नामदेव तर सरळ गोलपिठ्यात घुसला. दिलीप चित्र्यांच्या तिरकस, चौकस कवितांत मुंबईचे अनेक पैलू दिसू लागले.

ही सारी शब्दचित्रे. मुंबईची इतरही अनेक चित्रे आहेत. परत प्रत्येक कलावंताची मुंबई वेगळी. क्वचित काही साम्यस्थळे. एरवी लेखकांच्या प्रकृती आणि कृती वेगवेगळ्या. ह्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही.

तल्स्तॉयचे सेट पीटर्सबर्ग हे आंद्रे ब्येलीचे सेंट पीटर्सबर्ग थोडेच आहे?

ऋत्विक घटक आणि सत्यजित राय, एका कलकत्त्यात थोडेच राहत होते? बाल्झाकचे पॅरिस झोलाला चांगले माहीत होते, पण त्याने स्वत:चे एक भले मोठे पॅरिस बांधलेच. गोडसेभटजीची झांशी, तुमच्या आमच्या झांशीपेक्षा रंगेल आणि रंगीत हे चालायचेच.

जरा साहित्य सोडून इतर कलांतील मुंबई पाहू. मुंबईचे विराट स्वरूप, तिच्यातली वैविध्ये, वैशिष्ट्ये, व्यंगे आणि सर्वसंकर ह्यातून तिचा मोह चित्रकारांना आणि चित्रपट दिग्दर्शकांना वाटेल अशी आपल्याला खात्रीच वाटावी, असे हे पिसाटलेले शहर आहे.

काही प्रमाणात नवकेतन, आर.के. फिल्म्स आणि गुरुदत्त ह्यांच्या चित्रपटांतून मुंबई पाहायला मिळते. वरळी, जुहू चौपाटी अशा काही मोजक्या जागा पाहायला मिळतात. मात्र मुंबईचे फूटपाथ आणि बुटपॉलिशवाले हे स्टुडिओतच बनवले जातात. अलीकडच्या सत्या इत्यादी चित्रपटात मुंबईच्या गुन्हेगारी जगाचेच चमचमीत चित्र आहे. त्यातले मसाल्याचे पदार्थ ठरलेले आहेत. फास्ट फूडसारखी त्याची चवही ठरलेली आहे.

मराठी कलावंतांच्या चित्रकलेत आणि मराठी सिनेमात, मुंबईला फारसे महत्त्व नाही. मराठी चित्रपट दशके न् दशके गावात गुंतलेला आता आता उमेश कुळकर्णी, सचिन कुंडलकर, परेश मोकाशी इत्यादींच्या कामांमुळे त्यात काही जीव आला आहे. त्यांच्याकडून अपेक्षा आहेत, पण भरभक्कम कामगिरी अजून व्हायची आहे.

तर तात्पर्य काय? रोसेलिनीचा रोम, ओपन सिटी, द सिकाचा उंबेर्तो डी., फेलिनीचा रोमा, पासोलिनीचे रोमच्या पोटाखालचा भाग दाखवणारे अनेक चित्रपट, वुडी ॲलनचे मॅनहॅटन यांच्यासारखे मुंबईचे जगड्व्याळ चित्र काढणारा चित्रपट दिग्दर्शक झाला नाही हे खरे.

जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून येणाऱ्या चित्रकारांची कला हा भारतीय आधुनिक चित्रकलेचा महत्त्वाचा स्त्रोत. इतके उत्तम चित्रकार तिथे शिक्षणासाठी येत असत. त्यांची नावे ही भारतीय कलेतली तेजस्वी नामावली आहे. त्यांच्या मॉडर्निस्ट चित्रपरंपरेत ॲब्स्ट्रॅक्ट चित्रकला हीच आधुनिक चित्रकला, असे

समीकरण झाल्याने वासुदेव गायतोंडे, प्रभाकर बर्वे, प्रभाकर कोलते इत्यादींच्या उत्तम चित्रकलेतही तिला जागा नव्हती. हुसेन अकबर, सबावाला ह्यांनी मानवी परिसर वापरला पण त्यात मुंबईच्या खास व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यात त्यांना रस दिसला नाही. तो त्यांच्या कार्यक्रमाचा भाग नव्हता. आपला चेहरा आरशात पाहण्यासाठी मुंबईला वाट बघावी लागली. सुधीर पटवर्धन शांतपणे आपल्या कारागिरीने तो आरसा घासून पुसून चकचकीत करत होते. त्याची चकाकी जसजशी वाढायला लागली तसा मुंबईचा चेहरा, तिला आणि इतरांना चित्रकलेत प्रतिबिंबित झालेला दिसू लागला.

**– अहा, कोळसेवाला काळा! नव्या मनूतिल गिरीधर–पुतळा।।**

ह्या आरशात सत्तरीच्या मुंबईची प्रतिमा दिसू लागली. सुधीर पटवर्धनांच्या सुरुवातीच्या चित्रांतून, इथल्या माणसांची शरीरे, कपडे, शरीरावरचे अनेक ताण, त्यातून आलेले बाक, कष्टकरी स्नायू, विशिष्ट कामातून, घामातून बनलेले चेहरे. दोन शर्ट घातलेला माणूस, ट्रक आणि तिची साखळी, धातूच्या सिलेंडरच्या गोलाईच्या शरीराचा ड्रायव्हर, आरशातली प्रतिमांची तारांबळ दाखवणारे, पण कोलटकरांच्या रेस्तोरंपेक्षा वेगळे इराणी रेस्तोरां. अशा मुंबईच्या एक ना अनेक प्रतिमा पटवर्धनाच्या चित्रांतून दिसू लागल्या.

पटवर्धन हे पेशाने डॉक्टर आणि त्यात क्ष–किरणवाले डॉक्टर अशोक शहाण्यांपेक्षा वेगळे क्ष–किरण टाकणारे आणि त्यांतून मिळणाऱ्या प्रतिमांनी वेगळे निदान करणारे. डोळ्यांनी जे पाहता येते, ते पाहण्याची त्यांची शक्ती ही देखील विशेष आहे. चित्रणाच्या तपशिलावर त्यांचा काबू आहे. रचनेवर पकड आहे. त्यांना ते योग्य न्याय देतात, पण तपशिलात अडकून राहत नाहीत. दृश्य अनुभवाच्या मागच्या, त्याला आधारभूत अशा शरीराच्या अस्थिसंस्थेसारख्या, इतर मानवनिर्मित सामाजिक संस्थाही त्यांना जाणवतात आणि त्यांच्या चित्रणात व्यक्त होतात.

एकूण आधुनिक भारतीय चित्रकारांचे मानवी चेहऱ्याचे आणि शरीराचे चित्रण विचारात घेतले, की पटवर्धनांच्या कामाचे राष्ट्रीय चित्रकलेतले स्थान किती महत्त्वाचे आहे हे जाणवते. मार्क्सवाद हा मानवतावादाचे एक विशिष्ट

ऐतिहासिक रूप आहे. त्याच्या युरोपीय पूर्वसूरींबद्दल मार्क्सने स्वत:च लिहिले आहे. पण त्याहीपूर्वी हा मानवतावाद कितीतरी वेगवेगळ्या स्वरूपात पाहायला मिळतो. जीवांबद्दल असणारी अनुकंपा आणि सह–अनुभूती, म्हणजे त्या जीवांच्या बरोबरीने त्यांच्या आयुष्यातील अनुभव घेण्याची क्षमता, हा त्याचा स्वायीभाव आहे. बुद्ध धर्मांच्या प्रभावाखाली निर्माण झालेल्या अजिंठ्याच्या भित्तिचित्रात, सिएम रीपच्या आंकोर व्हाटमधल्या पृष्ठशिल्पांत, महाबलीपुरमच्या गंगावतरणात आणि विसाव्या शतकातल्या बेनोदबेहारीच्या हिंदी भवनमधल्या शांतिनिकेतनच्या भित्तिचित्रातही ही अनुकंपा दिसते.

पटवर्धनांच्या चित्रणात येणारे चेहरे मुंबईच्या अठरापगड संस्कृतीचा एक शारीरिक अनुभव देतात. हे शहर निर्माण करताना त्याकरता झिजलेल्या हाडाचे हे क्ष–किरणातले आलेख आहेत. हा मुंबईचा खरा इतिहास आहे. ह्या शहरात राबण्याच्या किंमतीची, त्यातल्या दूषित वातावरणात काम करण्याची, त्यातल्या पावसातल्या तुंबलेल्या रस्त्यांनी घरेदारे बुडवणाऱ्या मानवनिर्मित नफेबाज निष्काळजीपणाची आणि त्याला धैर्याने तोंड देणाऱ्यांची ही श्रमगाथा आहे. ह्या चेहऱ्यांना आणि शरीरांना, कोणतेही अतिशयोक्त स्वरूप पटवर्धन देत नाहीत. जसे रोगाचे निदान करताना. डॉक्टरला रोगाच्या लक्षणांबद्दल दक्ष रहावे लागते. तसेच पटवर्धनांच्या कलेचे स्वरूप आहे.

पटवर्धनांच्या अनुभवक्षेत्राची, विचारक्षेत्राची आणि कलाक्षेत्राची चौकट जसजशी विस्तारित होऊ लागली. तसतसा त्यांच्या दृष्टिक्षेत्राचा आकार आणि त्याची खोली वाढू लागली. शरीरचित्रणाबरोबरच पार्श्वभूमी आणि सामाजिक संदर्भ येऊ लागले. ट्रेन, सिटी इत्यादी चित्रांतून शहरी वास्तू, स्ट्रीटप्लेसारखे प्रसंग, ॲक्सिडंटसारख्या घटना आणि त्याबरोबरच ह्या घटनांच्या पार्श्वभूमीच्या इमारती, वस्तू, रस्ते ह्यांचे चित्रण होऊ लागले. त्यांच्या कामाचा ओव्हरब्रिज माणसे, निसर्ग आणि उद्योग ह्यांतील सांधे जोडू लागला. विशिष्टाची सामायिकाची सांगड घालू लागला.

पटवर्धनाची वैचारिक पार्श्वभूमी मार्क्सवादाची असली तरी ती पार्टीच्या राजकारणापुरती मर्यादित असलेली मार्क्सवादाची चौकट नव्हती. मानवी मनाचे

नवे दर्शन देणाऱ्या सायकोअनालिसिस इत्यादी शास्त्रांची त्यांना जाण आणि जाणीव आहे. त्यामुळे त्यांच्या कलेत निर्जीव फोटोरिअलिझमही नव्हता, तसाच आदर्शवादी सोशलिस्ट रिअलिझमदेखील नव्हता. (कधीतरी त्याच्या सावल्या पटवर्धनांच्या कामावर पडून पटकन नाहीशा होतात.) विविध दृष्टिकोनांतून, डोळसपणाने पाहिलेल्या अनुभवाचं एकत्रीकरण होते. त्यांच्या चित्रणशैलीत व्यक्तिगत आणि ऐतिहासिक स्मृतींचे थर आहेत.

सत्तरीच्या काळात, भारतात आणि जगातल्या इतर भागांत निर्माण झालेल्या वर्धिष्णू कलाजाणिवेच्या वातावरणात पटवर्धनांची कला वाढीला लागली. भूपेन खक्कर, नलिनी मालानी, जोगेन चौधरी, गुलाममहंमद शेख, व्हिवान सुंदरम् असे अनेक कलाकार आपापला विशेष आणि सामायिक कलाविष्कार करण्याचा वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करीत होते. जहांगीर आर्ट गॅलरीत भरलेल्या 'प्लेस फॉर पीपल' (१९८०) ह्या प्रदर्शनात ह्या विविध रेषा एका बिंदूत मिळाल्या आणि तो बिंदू भारतीय आधुनिक कलेचा एक शिखरबिंदू ठरला.

ह्या एकत्र येणाऱ्या चित्रकारांत, अनेकांना रेनेसान्सपूर्व कलेतील कथनचित्रांविषयी आकर्षण होते. त्यातून त्यांना एक वेगळा, भारतीय कथनपरंपरेच्या जवळ येणारा रस्ता दिसत होता. ह्या साऱ्यांच्या कामात अनेक कालबिंदूंना स्पर्श करण्याची ईर्षा होती. स्ट्रीट कॉर्नरसारख्या चित्रातून भिंतीच्या आतले आणि बाहेरचे जग. एकाच चित्रात सामावण्याची इच्छा आणि क्षमता पटवर्धनांच्या चित्रात दिसत होती. ह्यातूनच त्यांच्या कलेचा पुढचा समृद्ध मार्ग निघाला.

### नगरविस्तार आणि दृष्टिविस्तार

ऐंशीच्या नंतरच्या काळात, मुंबईचा चेहरामोहराच नव्हे तर अंतरंगही बदलू लागले. मुंबईचे महामुंबईत रूपांतर होताना तिच्या उपनगरांनी झाडे पाडली. टेकड्या गिळल्या आणि निसर्गाला मागे रेटले. पटवर्धन ह्या काळात ठाण्यात राहत होते. वैयक्तिक जीवनातल्या घटना कलेत येताना त्यांना वेगळे वळण मिळते. तसे पटवर्धनांचे झाले. कारण ठाण्याच्या परिसरात अनेक नवीन उद्योग चालले होते. कारखाने निघत होते. वस्त्या बनत होत्या. अनेक जातिजमातीची

कडबोळी वाढत होती. त्यांच्या चित्रांतून हा मानवी प्रयत्नाने बदलणारा निसर्ग येऊ लागला.

हा निसर्ग रुसोच्या नोबल सॅव्हेजचा निसर्ग नव्हता. आदिकालाच्या सुवर्णयुगाच्या. आधुनिक मिथकथांच्या कालातील निसर्गही नव्हता. हा १९८० च्या सुमाराचा मुंबईचा यांत्रिक संस्कृतीतून निर्माण होत असलेला विशिष्ट निसर्ग होता. बेंद्रे, रामकुमार, लक्ष्मण श्रेष्ठा, सबावाला आणि पद्मसीच्या निसर्गापेक्षा वेगळा ऐतिहासिक, हिंस्त्र, भांडवलाने लचके तोडले जाणारा निसर्ग होता. हा दूषित होता. विषारी होता, त्यातली झाडे एकतर पाडली होती किंवा कुऱ्हाडीची आणि बुलडोझर्सची वाट बघत होती. तो सिमेंट-क्राँक्रीटचे असे एक जंगल होत होता, की जिथे फक्त कावळेच राहू शकतील.

ह्या निसर्गाच्या चित्रांबरोबर सहजपणे नगरचित्रे पटवर्धनांच्या कलेत येऊ लागली. त्यांचा केवळ आकार मोठा नव्हता तर आवाकाही मोठा होता. १९९५ च्या ट्रीला फळांऐवजी माणसे लगडली होती. लोंबत होती. झोंबत होती. लोअर परळचा भोंगा. अनेक दशकानंतर सकाळी सात वाजता पहिल्या पाळीची भूपाळी म्हणेनासा झाला. उल्हासनगरच्या विषमय रसायनांनी दूषित झालेला ओढा. केवळ निर्झराचे मोहक वळण न घेता, इतिहासाचे आडवळणही दाखवत होता.

सिनेमात एक्स्ट्रिम लाँगशॉट घेताना बहुधा पुष्कळ पायपीट करायला लागते. त्यानंतरच योग्य दृश्यबिंदू मिळतो. पटवर्धनांच्या नगरचित्रांत आणि निसर्गचित्रांत बरीच पायपीट आहे. शिवाय मासा गळाला लागण्याकरता जसा धीर धरावा लागतो तसा धीरही दिसून येतो. माशाऐवजी ते वेगवेगळ्या वेळेच्या, गुणांच्या क्षणिक प्रकाशाकरता गळ लावून बसतात आणि हे सारे क्षण मग त्यांच्या चित्रांत उतरतात. त्यात कधी पहाटेचा प्रकाश, कधी माध्यान्हींचा, तर कधी मावळत्या सूर्याचे शेवटचे किरण. हे सारे क्षण, चित्राच्या विविध भागांत चित्रिलेले, गुंफलेले असतात. त्यातून कालचक्राला एक छेद दिला जातो. चित्रकला ही एकापरीने कथनकला आहे. अगदी लेसोच्या आणि अल्ला मिराच्या गुहाचित्रांपासून क्युबिझमपर्यंत. अवकाशाबरोबर कालाचेही चित्रण करण्याची उत्कट इच्छा आणि सतत प्रयत्न चित्रकलेत दिसून येतो त्याबरोबरच त्रिमितीचे चित्रण करण्याच्या

विविध चित्रपद्धती दिसून येतात. पर्स्पेक्टिव्हचा शोध हा त्यातल्या पाश्चात्त्य चित्रकलेतील महत्त्वाचा टप्पा.

रेनेसान्सच्या कलेतला पर्स्पेक्टिवचा शोध आणि त्याचे अनंत मार्गांने होणारे उपयोग. हा त्या कलेचा एक मानबिंदू होता. पण रंगाचा अनुभव हा आपण चित्र कसे बघतो ह्यावरही अवलंबून आहे. हा इंप्रेशनिझमने लावलेला एक मोठा शोध होता. प्राथमिक रंगाचे संपृक्त रंगातले ठिपके जर अगदी जवळ जवळ काढले तर ते जरा दुरून पाहताना त्यातले रंग एकमेकांत मिसळण्याचे काम आपला डोळा करतो आणि आपल्याला दुय्यम रंगाचा आभास होतो.

चित्रकारांनी हे लक्षता घेऊन कॅन्व्हास स्टुडिओबाहेर नेले. तेव्हा औद्योगिक प्रगतीने तैलरंग ट्यूब्समध्ये मिळू लागले होते. ह्या तांत्रिक प्रगतीने चित्रकलेचा घाट आणि महत्त्वाकांक्षा बदलल्या. ठिपक्यांच्या रंगातल्या अनेक शैली तयार होऊ लागल्या. परिणामी चित्राची घनता गेली. चित्रांना एक द्विमिती घाट येऊ लागला. घनतेचे छायाप्रकाशाने केलेले चित्रण हा जुना मार्ग होता. पण सेझानने जुन्या पर्स्पेक्टिव्हकडे परत न वळता, रंगाची मांडणी स्तरात करून चित्राला नव्या प्रकारची घनता दिली.

त्यानंतर आधुनिक चित्रकला घनतेचा अनुभव देण्याकरता सेझानच्या शोधांचा विविध प्रकारे वापर करू लागली. पटवर्धनानी ह्या शोधांना आपलेसे करून घेतले. इतरही अनेक शैलीतून त्यांनी बऱ्याच गोष्टी शोधल्या आणि साध्या विषयाला भव्यता देण्याचा, साध्यासुध्या कष्टकऱ्यांना त्यांची मानाची जागा देण्याचा मार्ग फक्त विषयातून न शोधता, घाटातून आणि चित्रकलेच्या अभ्यासातून शोधला.

त्रैमितिक जग आणि कालाची चौथी मिती ह्यांचे एकसमयावच्छेदे चित्रण करताना क्वांटम मेकॅनिक्समध्ये येणाऱ्या वेव्ह आणि पार्टिकलच्या द्वैतासारखे, एकोणिसाव्या शतकाअखेरच्या आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभाच्या पाश्चात्त्य चित्रकलेतही द्वैत येऊ लागले होते. मोनेने एकाच वस्तूचे आणि इमारतीचे, दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या ऋतूंत चित्रण केले. उदाहरणार्थ रुआंचे कॅथिड्रल, हे-स्टॅक्स इत्यादी, त्याच्या कुंचल्यात निसटत्या क्षणांचे अप्रतिम

चित्रण करण्याची क्षमता होती. मात्र ह्या क्षणचित्रांत इतका फरक जाणवत होता की त्यामागची वस्तू एकच आहे ही भावनाच नष्ट होऊ लागली. बदलत्या प्रकाशाच्या नित्यनवेपणात पदार्थांचे सातत्य आणि घनता दोन्हींचा ऱ्हास होता. सेझानने केलेल्या महान यत्नात. कालाच्या लाटेतून पदार्थ त्याच्या त्रिमितीसकट परत मिळाला. अर्थात ह्या त्रिमितीत पर्स्पेक्टिव्हची एकाच अचल डोळ्यांची स्थितिमानता नव्हती. इंप्रेशनिझमच्या अनेक पावले पुढे जाऊन क्युबिझमकडे नेणारी धीरगंभीर गतिमानता होती.

पटवर्धनांच्या ऐंशीच्या दशकातल्या चित्रांमागे असणाऱ्या अनेक प्रेरणांपैकी सर्वात महत्त्वाची प्रेरणा ही सेझानची. सेझानशी पटवर्धनांचा सुरू झालेला तेव्हाचा संवाद, हा विविध पातळ्यांवर आजही सुरू आहे. कधी तो टेकडीत दिसतो, कधी बॉय, काफ इत्यादी चित्रांतून शरीरचित्रणात दिसतो तर कधी त्यांच्या स्मृतीचा अविभाज्य भाग होऊन, मेमरीसारख्या महान चित्रात येतो.

**चित्रवृत्ती आणि शिल्पवृत्ती**

हाइनरिश व्योल्फलिनने प्रिन्सिपल्स ऑफ आर्ट हिस्टरी ह्या ग्रंथात चित्रकारांच्या मुख्य प्रवृत्तींचे आणि शैलीविशेषांचे वर्णन करताना 'पेंटरली' आणि 'लिनीअर' ह्या दोन मूल प्रवृत्ती मांडल्या आहेत. वस्तूकडे बघताना, तिचे चित्रण करताना, ज्याला तिची रूपरेषा उत्कटपणे जाणवते आणि त्यामुळे त्यांच्या चित्रणाला रेखीवपणा येतो, अशा चित्रकारांची मूळ प्रेरणा 'लिनीअर' आहे असे तो म्हणतो. त्याउलट रंगाच्या आणि प्रकाशाच्या जाणिवेतून जो प्रतिमेकडे वळतो, त्या चित्रकाराची मूळ प्रेरणा 'पेंटरली' ह्या शब्दाचे वर्णन करतो.

पहिल्या प्रकारचा चित्रकार भूमितीत रचना करतो आणि त्यात रंगांचा वापर करतो. दुसऱ्या प्रकारचा चित्रकार, रंगात रचना करतो आणि भूमितीत तिची अभिव्यक्ती करतो. पहिल्याला दुधाची बाटली रंगवायची असते. तो तिचा आकार रेखाटतो आणि त्यात रंग भरतो. दुसऱ्याला एक पांढरा आकार हवा असतो. त्याकरता त्याला बाटली सोयीची वाटते. म्हणून तो ती रंगवतो.

पटवर्धनांची चित्रे अनेक वर्षे बघून मला चित्रकारांच्या मूळ प्रेरणांचा आणखी एक प्रकार असल्याची जाणीव झाली. या प्रकाराचे वर्णन करण्याकरता

मला दोन शब्द सुचले आहेत. ते म्हणजे ‘चित्रवृत्ती’ आणि ‘स्पर्शवृत्ती’. चित्रवृत्ती जास्त प्रबल असताना चित्रकार रंगफलकाचा वापर त्यातून आपण दृश्य पाहत आहोत असा खिडकीसारखा करतो. त्यात चित्रविषयापासून पाहणाऱ्यांचे थोडेसे दूरत्व गृहीत धरले आहे. या दूरत्वामुळे पाहणाऱ्यांला पटकन चित्रविषयाला स्पर्श करावा असे वाटत नाही. जरासा लांबूनच त्याचा आस्वाद घ्यावा अशा तऱ्हेने तो त्या चित्रांकडे बघतो.

ज्या चित्रकाराचे समाधान चित्रविषयाचा केवळ डोळ्याने अनुभव घेऊन होत नाही, त्याला चित्रवस्तूला स्पर्श करावासा वाटतो आणि त्या स्पर्शानुभवाला चित्रनिर्मितीत महत्त्वाचे स्थान द्यावेसे वाटते. त्याची मूळ प्रेरणा म्हणजे स्पर्शवृत्ती. ह्या वृत्तीचा परिणाम म्हणजे, चित्रात विषयवस्तूच्या घनतेला जास्त महत्त्व येते. चित्राला एक प्रकारचे जडत्व येते. हे जडत्व हा दुर्गुणपर शब्दप्रयोग नाही. तो गुणविशेष आहे. जडत्वाला दृश्य स्वरूप देणे हे सोपे काम नाही. सेझानला ते जमले. लेजेला ते वेगळ्या प्रकारे साधले, पटवर्धनांनी ह्या जडत्वाचा अनेक वर्षे मागोवा घेतला आहे. शिल्पांचेही असेच आहे. काही दुरून पाहण्याची आणि काही स्पर्शाला आवाहन करणारी. त्यांचे टेराकोटातील काम हा या शोधातला आणि विकासप्रक्रियेतला एक महत्त्वाचा आणि आवश्यक टप्पा आहे.

पटवर्धनांच्या टेराकोटातील कामाकडे नीट पाहणाऱ्याला कदाचित माझे म्हणणे चुकीचे वाटेल. कारण जडत्वाऐवजी ह्या शिल्पांत एक अलगदपणा जाणवतो. कारण ही शिल्पे बा रिलिफ (Bas relief) ह्या प्रकारची आहेत. स्वतंत्रपणे उभ्या राहणाऱ्या त्रिमिती शिल्पांपेक्षा ही वेगळी असतात. द्विमिती आणि त्रिमिती ह्यांच्या संधिकालात सीमारेषेवर ही शिल्पे असतात. मग त्यातून शिल्पवृत्ती जाणवते. हा विरोधाभास असला तरी तो केवळ वरवरचा आहे. बास रिलिफ किंवा उत्थित शिल्पांत, निराकारातून साकारात येतानाच्या प्रक्रियेचे क्षणचित्र आहे. कॅमेऱ्याने काढलेल्या गतिमान प्रसंगाचे क्षणचित्र त्याचा दिसेल न दिसेल असा पुसट ठसा ठेवून देते. त्याचप्रमाणे उत्थित शिल्प आहे. करंदीकरांच्या शब्दात सांगायचे तर–आणि अशा ताजेपणाला कवीशिवाय कोण शब्दरूप देऊ शकेल?– हा उत्थित शिल्पे स्पर्शांची कोवळी पालवी आहेत.

**मांदियाळी उर्फ मंडळी**

एका मार्क्सवादी चित्रकाराच्या आणि विचारवंताच्या कामाचे वर्णन आणि विश्लेषण करताना या ज्ञानेश्वरांचा पसायदानातला शब्दप्रयोग कुणाला अप्रस्तुत वाटला तर मला नवल वाटणार नाही. हा झाला एक मुद्दा. दुसरा म्हणजे आजकाल पत्रकार हा शब्द सर्रास वापरतात. राजकारणातल्या व्यक्तींचीही मांदियाळी असते. तर पत्रकारांनी वापरून अवमूल्यन केलेला शब्द का वापरावा? त्याला कारण इतकेच, की जशी आळंदी चोरांची असते, तशी देवांचीही असते. मग मांदियाळी फक्त चोरांच्या हातात का जाऊ द्यावी?

ज्ञानदेवांना आपल्या पसायदानात सर्वांना संतसमागम व्हावा असे मागावेसे वाटते. त्यांच्या लेखी, माणुसकीचा अंतिम अवतार, म्हणजे संत. पटवर्धनांच्या कलेत आणि विचारसरणीत, इतिहासाचे जे भान आहे, त्या भानाला उद्देशूनच मला हा शब्दप्रयोग वापरावासा वाटतो. ह्या भानात मानवाविषयी, प्राणिमात्राविषयी आणि त्याला सामावून घेणाऱ्या निसर्गाविषयी जे प्रेम आहे, समानतेचा जो आग्रह आहे, प्रयोग आहे त्याला चित्रकलेतली एक मोठी परंपरा आहे. त्यातूनच सम्राटाकडे आणि सफरचंदाकडे सारख्याच प्रेमाने आणि तटस्थपणे पाहणाऱ्या चित्रकलाप्रेमिकांची एक मांदियाळीच आहे. त्यात निसर्गचित्रांतून आदितत्त्वांपर्यंत पोहचणारे चिनी चित्रकार आहेत, बैलांच्या बलवान, वेगवान शरीराचे जणू काही चलच्चित्रण करणारे आणि सिनेमाचे हजारो वर्षांपूर्वीच स्वप्न पाहणारे, अनामिक भित्तिचित्रकार आहेत. भारतीय लघुचित्रपरंपरेतले चित्रकार आहेत. कष्टकऱ्यांच्या जेवणावळींची, समारंभांची आणि मुलांच्या विविध खेळांची, एवढेच काय त्यांच्या म्हणींची आणि वाक्प्रचारांचीदेखील चित्रे काढणारे ब्रॉयगल महाराज आहेत. संत सेझान तर आघाडीलाच आहेत. व्हॅन गॉफ आपली गोफण घेऊन चालला आहे. कालचे भूपेन खक्कर आहेत, त्यांच्यामागे पिएरो दे ला फ्रांचेस्का आहेत, भिंती झकास रंगवणारे विनोदबाबू आहेत, किती म्हणून सांगू?

न्यूटन एकदा म्हणाला, की महामानवांच्या खांद्यावर मी उभा आहे. त्यामुळे मी जरा अधिक दूरवरचे पाहू शकलो. तसेच पटवर्धनांचे जे काही खास बघणे आहे, त्यात अनेक नजरा मिसळलेल्या आहेत. त्यांच्या ध्वनीत अनेक शतकांचे

प्रतिध्वनी स्पष्ट आणि अस्पष्ट ऐकू येतात. आणि त्यांत पटवर्धनांना कोणत्याही प्रकारचा कमीपणा नसून, एक खास श्रेय आहे. कारण खरी नवता, ही परंपरेशी असणाऱ्या प्रेमाच्या आणि संतापाच्या, रागाच्या आणि अनुरागाच्या नात्यातूनच येते. इतकेच काय तर प्रत्येक नवता, आपली अशी खास परंपरा सांगत येते.

मराठीत पटवर्धनांच्या कामावर पद्माकर कुलकर्णी ह्यांनी लिहिलेले आणि लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केलेले चित्रकार सुधीर पटवर्धन हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. कुळकर्णींच्या पटवर्धनांवरील लेखनाचे एक खास वैशिष्ट्य आहे. त्यांनी ह्या संतसमागमाचा, मांदियाळीचा यथेच्छ मागोवा घेतला आहे. कधी पटवर्धनांना, कधी इतर भाष्यकारांना वाट पुसली. त्यांनी सांगितले ते सच्चिदानंदबाबांप्रमाणे आदराने लिहून घेतले. पचनी पाडले. त्यातूनच मराठीला अभिमान वाटावा असे बाळसेदार आणि देखणे पुस्तक बाहेर पडले.

**समाजाभिमुख कलाकार**

पटवर्धनांच्या आणि माझ्या स्नेहाला आता अनेक दशके झाली. एकमेकांच्या कामातले आणि आयुष्यातले अनेक चढउतार आम्ही पाहिले आहेत. सुधीर बेडेकरच्या मागोवा ह्या लघुनियतकालिकाच्या निमित्ताने झालेल्या आमच्या पहिल्या भेटीपासून त्यातली काही सूत्रे कायम आहेत. कलेच्या सामाजिक अभिमुखाची जाणीव हे पटवर्धनांच्या आयुष्यात विविध रूपात आलेले पण अखंड असणारे एक सूत्र आहे.

पटवर्धनांनी २००८ ते २००९ च्या दरम्यान वर्षभर एक फिरते प्रदर्शन आयोजित केले. संकल्पना त्यांचीच होती. त्याला अनेक नामवंत कलावंतांनी हातभार लावला होता. आजकाल कलाकृतींच्या किंमती बेसुमार वाढल्याने मुंबईसारख्या शहराव्यतिरिक्त बाहेरच्या कलाकारांना, कलेच्या अभ्यासकांना आणि आस्वादकांना कलेचे उत्तमोत्तम नमुने पाहायलाच मिळत नाहीत, ही जाणीव ठेवून या प्रदर्शनाची योजना केली होती.

हे प्रदर्शन, महाराष्ट्रातल्या मुंबई, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, सोलापूर, कोल्हापूर, पुणे आणि नाशिक ह्या शहरांत फिरले. त्यात आधुनिक चित्रकलेतील महत्त्वाचे कलावंत सुझा, तयब मेहता, गायतोंडे, अकबर पदमसी,

मीरा मुखर्जी इत्यादींच्या कलाकृती होत्या. १९७० च्या काळात काम केलेल्या लक्ष्मा गौड, गुलाम शेख, मनजीत बावा, अर्पिता सिंग, पटवर्धन, कोलते, बर्वे ह्यांच्या कलाकृती होत्या. आणि १९९० पासून नव्या प्रकारचे समकालीन काम करणाऱ्या एन. एस. हर्षा, जितीश कल्लट, सुबोध गुप्ता, झरीना हश्मी इत्यादींच्या कलाकृतींचे ड्रॉईंग, पेटिंग, शिल्प, फोटोग्राफ्स, व्हिडिओ, इस्टॉलेशन ह्या सर्व प्रकारचे नमुने होते.

ह्यात भाग घेतलेल्या अनेक कलावंतांची त्यात सोदाहरण व्याख्याने झाली. त्यावर चर्चा झाल्या. त्याबरोबरच ज्या ज्या शहरात हे प्रदर्शन फिरले तिथल्या स्थानिक कलाकारांनी आणि इतर माध्यमांतल्या कलावंतांनी आणि साहित्यिकांनी आधुनिक आणि समकालीन कलांवरच्या चर्चांत भाग घेतला. त्याबरोबरच, या प्रदर्शनाचा उत्तम छापलेला कॅटलॉग अगदी परवडेलशा दरात उपलब्ध केला होता.

महाराष्ट्रात दृश्य कलांची, त्यावरील तत्त्वचर्चेची, विचारांची परंपरा नाही. नवीन प्रयोग नाहीत. चांगली पुस्तके तर नाहीतच नाहीत. चर्चेला व्यासपीठ नाही. साधे कुतूहलही नाही. मराठी वृत्तपत्रात जिला कला म्हटले जाते आणि ज्या शब्दांत तिचे वर्णन आणि मूल्यमापन केले जाते, ते वाचून आपल्या एकूण वैचारिक पातळीबद्दल लाजेखेरीज कोणतीही भावना मनात येणे कठीण आहे. मुख्य म्हणजे, उत्तम कलेला सामोरे जाणे, हेच होत नाही. पैशाखेरीज आणि चंगळबाजीखेरीज, आयुष्यात काही मिळवायचे असते, काही आनंद असू शकतो अशी जाणीवच नाही. 'साहित्यसंगीत कलाविहीन' अशा प्रदेशात आणि काळात, आणि 'पुच्छविषाणहीन' अशा 'रसिकांत' आपल्या कलेबद्दल ज्याचे आतडे पिळवटून निघते असाच कलावंत आपल्या उमेदीच्या, सर्जनशील आयुष्यातला एक वर्षाहून अधिक काळ कोणताही भरभक्कम आर्थिक मोबदला न घेता, काम करू शकतो, हे पटवर्धनांनी आपल्या स्वभावाला साजेशा नम्रपणाने, गाजावाजा न करता आणि चोखपणे सिद्ध केले. त्याबद्दल मी व्यक्तिशः आणि कलाकारांच्या स्नेहमंडळातील एक व्यक्ती ह्या नात्याने ऋणी आणि कृतज्ञ आहे.

('चित्रव्यूह' मधून)

❑❑❑

# हिरा

**– इंद्रजित भालेराव**

आमचं घर गावाच्या शेवटी होतं. पुढं गाव संपून गावखर सुरू व्हायचा. आमच्या या घराचं अंगण गावखरातच जमा होते. अंगणात मोठा लिंब होता. गावात येणारे घिसाडी, डाकेकरी, कैकाडी त्याच्या सावलीला उतरायचे. याच सावलीला निम्म्या गावातील मुलं खेळण्यासाठी जमायची. मणेरी, कासार आणि चाट्यांची दुकानही तिथचं लागायची. कधी कधी योगायोगानं हे सगळे एकदाच जमा झाले, तर आमच्या दारातल्या या भल्यामोठ्या लिंबाच्या सावलीत बाजारच भरायचा. नाहीतरी नेहमीसाठी आम्हा मुलांचा बाजार भरलेला असायचाच. गावात कुणाचं बांधकाम सुरू असेल तर त्यासाठी लागणारा चुना ज्या घाणीत मळला जाई ती घणीही याच लिंबाखाली होती. घणी सुरू असली म्हणजे आळीपाळीने तिच्यावर बसून मुलं बैलं हाकारीत. त्यात मुलांचा खेळही होत असे आणि घणी हाकणाराला आरामही मिळत असे. हा खेळ सर्व मुलांना खेळता येत नसे. थोडी मोठी आणि जाणकार मुलंच हा खेळ धीटपणे खेळू शकत कारण जरासाही तोल गेला तर चुन्याच्या नालीत किंवा बैलाच्या पायात पडण्याची शक्यता असे.

या लिंबाशेजारीच एक मोठा लिंब होता. तो दोनच वर्षापूर्वी काहीतरी गावसमाईक कामासाठी तोडला गेला. तोडलेल्या लिंबाचा शिल्लक राहिलेला मोठा बुंधाही याच लिंबाच्या सावलीत टाकला होता. या बुंध्याच्या मुळाकडच्या

भागाला एक विशिष्ट आकाराचं उभं छिद्र होतं. त्यात टाकलेली माती, वाळू गिरणीतून पडणाऱ्या पिठासारखी खाली येत असे. आम्हा मुलांचा लुटूपुटूचा गाव आणि खेळाचा डाव उभा राहिला की हीच आमची पिठाची गिरणी असे आणि मी तिचा मालक असे. प्रत्येकानं आणलेलं दळण मी दळून देत असे. खरोखरच्या गिरणीतल्यासारखं हुबेहूब सगळं आम्हीही करायचो. प्रत्येकाला आपलं दळण घेऊन रांगेत उभं राहावं लागत असे. मी कुणालाही मागे-पुढे होऊ देत नसे. मग कुणी म्हणायचं मालक आम्ही शेजेगावचे आहोत. आम्हाला अंधार पडायच्या आधी काढून द्या की, तर कुणी म्हणायचं घरी भाकरीला पीठ नाही. कुणी रडणाऱ्या लेकराचं तर कुणी आणखी कशाचं निमित्त सांगून लवकर दळून मागे.

एके दिवशी हा खेळ सुरू असताना सावळ्या रंगाची, विस्कटलेल्या केसांची, मळका फाटका झगा घातलेली हरिणीसारख्या डोळ्यांची आणि सावळ्या रंगामुळं अधिकच उठून दिसणाऱ्या पांढऱ्या दाताची एक सात-आठ वर्षांची, म्हणजे माझ्याच वयाची एक मुलगी हा सगळा खेळ दूर उभा राहून पाहत होती. तिला रांगेत उभा राहावसं वाटत होतं, खेळात सामील व्हावसं वाटत होतं. का कुणास ठाऊक मलाही तिनं खेळात सामील व्हावं असं तीव्रतेनं वाटलं. इतक्यात पलीकडून 'हिरे' अशी हाक आली आणि झिंज्या उडवीत ती मुलगी हाकेच्या दिशेनं पळाली. ती कैकाड्याची मुलगी आहे आणि तिचे नाव हिरा आहे हे प्रसंगावरून माझ्या आपोआपच लक्षात आले. कैकाड्याच्या पालातून तिला हाक आली होती. सुगीचे दिवस तोंडावर आलेले पाहून ते कुटुंब इथं आलं होतं. वर्षभराची कमाई याच मोसमात त्यांना करून घ्यायची होती. त्यासाठी नक्कीच दोन महिने त्यांचा मुक्काम आता इथं असणार. त्यासाठी तात्पुरतं पालही त्यांनी उभारलं होतं.

दिवसभर ती मुलगी माझ्या डोळ्यासमोर हालली नाही. झोपेतल्या स्वप्नातही मी तिच्याशीच खेळलो. पहिलाच दिवस असल्यामुळं हिरीच्या आईबापाला अजून काम मिळाल नव्हतं म्हणून त्यांनी गावात भीक मागून रात्रीची जेवण केली.

दुसऱ्या दिवशी हिरीच्या बापानं ज्वारी आणून ती दळून आणली. आईनं

स्वयंपाक केला आणि जेवणं झाल्यावर धाकटी बहीण व पाल सांभाळायला हिराला ठेवून दोघे नवरा बायकू शिंदीच्या फोकाच्या शोधात रानात निघून गेले.

रोजच्या प्रमाणे आमचा खेळ चालला होता. दळणाची रांग लागली होती. हिरा हे सगळं कालच्यासारखं दुरूनच पाहत होती. माझं तिच्याकडं लक्ष गेलं आणि मी लगेच म्हणालो, 'दळण आण की,' मी हे तिला म्हणतोय हे तिच्या लक्षात आलंच नाही. मी तिला पुन्हा तेच म्हणालो. तेव्हा ती एकदम भानावर आली आणि खांद्यावरल्या कोवडाला सांभाळीत धावतच पालाकडं गेली आणि एक कुरकुलं घेऊन आली. माती भरून दळणाच्या रांगेत उभी राहिली. माती भरलेलं तिचं कुरकुलं खूपच चांगलं होतं. तिच्या आईनं स्वतःच्या हातानं ते विणलं असणार. संपूर्ण रांगेतल्या कुणा मुली जवळ तसं देखणं कुरकुलं नव्हतं. अर्थातच मुलींना ते पाहवलं नाही. तिला लोटण्याचा, रांगेत उभं न राहू देण्याचा हेका त्या धरू लागल्या. शेवटी तिचं कुरकुलं त्यांनी भिरकावून दिलं आणि तिलाही हाकलून दिलं. ती बिचारी केविलवाणी होऊन पहिल्यासारखी दूर जाऊन उभी राहिली. खरं तर मारामारीत ती एकाही मुलीला ऐकली नसती पण ती एकटी होती ना आणि वर वनवासी. मला राहवलं नाही. मी तिला कुरकुल्यात पुन्हा माती भरायला लावली व सर्वांत आधी दळून दिलं. अर्थातच बाकीची दळणं परत गेली. व माझी पिठाची गिरणी बंद पडली. गावातल्या मुलांच्या इतरही खेळातून मी आपोआपच वगळलो गेलो आणि तसातसा हिरीच्या अधिकच जवळ गेलो.

सुगी सुरू झाली आणि हळूहळू गावातली माणसं कमी होत गेली, रानात माणसांची गर्दी झाली. कोवळ्या दुपारनंतर गावात कुणी थांबेनासं झालं. नसींचे बोकने नाकात कोंबणाऱ्या म्हाताऱ्या तेवढ्या खोकत बसलेल्या दिसत. लहान मुलंही रानात आईवडिलांच्या पाठीमागं जाऊन झाडाखाली खेळ मांडू लागले. आमच्या शाळेला दुपारी दोन तीन तास सुट्टी असायची. शाळा सुटली म्हणजे दुपारच्या जेवणासाठी मुलं परस्पर रानातच आईवडिलांकडं निघून जात. गावात फक्त मी आणि हिरी त्या मोठ्या लिंबाच्या गर्द छायेत खेळायचो. खेळ रंगला म्हणजे दिवस कसा भुर्रकन निघून जायचा भर उन्हाच्या पाहारी एखादा पक्षी कर्कश ओरडला किंवा दगडाच्या पवळीतून एखाद्या मुंगसानं आपलं लाल तोंड

बाहेर काढलं की आम्ही दोघंही घाबरायचो आणि लगे खेळातही रमायचो. खेळाचे अनेक प्रकार गावोगाव फिरल्यामुळं हिरीला माहीत होते. कधी खेळाच्या तपशिलात तर कधी फक्त नावातच बदल असे संध्याकाळी पुन्हा गावातली मुलं खेळायला जमत पण माझा आणि हिरीचा काहीतरी वेगळाच खेळ चाललेला असे. आम्ही इतके सोबत असू की आम्हाला सोबतच जेवण करावं वाटायचं. पण ते जमत नसे. मला भाकरी घेऊन घराच्या बाहेर निघता येत नसे आणि हिरीचं काही खायला मला बंदी असे तरीही खिशात घालून जे पदार्थ चोरून बाहेर आणता येत असे ते मी हिरीला आणून देत असेच.

एके दिवशी मी शाळेतून घरी येत होतो तर हिरा आमच्या उकंड्यावर कचरा विचकत असलेली दिसली. मी तिला 'काय शोधायली' म्हणून विचारलं तर तिनं शेंगदाणे शोधत असल्याचं सांगितलं.

आमच्या घरी बियाण्यासाठी शेंगांची फोडणी चाललेली होती. त्याची टरफलं उकंड्यावर पडत. फोडणारांच्या, निसणाऱ्यांच्या, पाखडणाऱ्यांच्या नजरेतून चुकलेला एखादा शेंगदाणा चुकून त्यात सापडे. त्याचसाठी हिरी सगळा उकंडा उकरीत बसली होती.

मी धावतच घरी आलो. चड्डीचे दोनही खिशे भरले. तिरप्या नजरेनं माझं वहिनीकडं लक्ष होतंच. तिचं आपल्याकडं लक्ष नाही असं मला वाटलं. मी धावतच बाहेर आलो. उकंड्याशेजारी गजग्याची जाळी होती तिच्या आड गेलो आणि हिरीला तिथं बोलावून तिला शेंगा दिल्या. माझे दोन्ही खिसे तिच्या झग्याच्या वटीत रिकामे केले. आता उकंडा इचकू नकोस, पळ पालात जाऊन शेंगा खाय असंही मी तिला म्हणालो. ती पालाकडं निघून गेली. मला भूक लागली होती. मी घरी आलो. भाकरी अजून व्हायच्या होत्या. मी आईजवळ जेवणाची घाई करत होतो. तर ती म्हणाली आताच दोन खिसे भरून शेंगा नेल्यास, मढे पडोसतोवर खाल्ल्या असतील की, तिचं खरं होतं. इतक्या शेंगा खाल्यावर कशी भूक लागेल? पण मी शेंगा खाल्ल्याच नव्हत्या तर माझी भूक कशी थांबेल? पण तसं सांगायचीही चोरी. मी पुन्हा शेंगा खात बसलो. माय माझ्यावर खेकसली म्हणाली आता पुन्हा शेंगा खाऊ नकोस. रात्री पोट दुखायलंय म्हणून उठलास तर मी मारीन. पण मी कसं सांगू की माझ्या पोटात काहीच नाही

तर माझं पोट दुखेल कसं. तसाचं शेंगा खात बसलो.

नंतर शेंगा फोडणी सुरू असेपर्यंत मी रोज शेंगा चोरून हिराला नेऊन देत असे. एके दिवशी ते वहिनीच्या लक्षात आलं. त्यांनी माझ्यावर पाळतच ठेवली. आईनं आणि वहिनीनं दोघींनी मिळून माझी चोरी पकडायचं ठरवलं. एके दिवशी मी राजग्याच्या जाळीआडून हिराला शेंगा देऊन परत आलो. शेंगा फोडणाऱ्या सगळ्या माझ्याकडंच पाहत होत्या व हसत होत्या. संपल्या का शेंगा म्हणून वहिनींनी मला विचारलं परिस्थिती पाहून आपली चोरी पकडल्याचं माझ्या लक्षात आलं. पुढं वहिनी म्हणाली, बायकोची लई माया येती नाही का? रोज शेंगा नेऊन देता, बरं हाय मातर.

अगोदरच हिरीचं व माझं दिवसभर सोबत राहणं, ती शाळेत नसून, जातीची नसून इतकं जवळ येणे हा चेष्टेचा विषय झाला होता. आता तर सरळ-सरळ वहिनी मला हिरीचा नवरा म्हणून चिडवू लागली. यात आई बहिणींही सामील झाल्या. रात्रीच्या गप्पांत विनोदासाठी माझा वापर होऊ लागला.

एके रात्री असेच सगळेजण बसलो होतो. वहिनी म्हणाली, रावसाब तुम्हाला एक नाव शिकविते, ऐन्यातलं, मी लाजलो. आम्हाला न्हाई शिकायचं म्हणालो, तरीपण गोड बोलून वहिनीनं मला शेवटी तयार केलंच. वहिनी पुढं म्हणत होती मी तिच्या मागं म्हणतं होतो,

उशाचा शेला

पायथ्याला गेला

उठ उठ हिरे

दिवस निघाला.

नंतर एकदम माझ्या लक्षात आलं की वहिनीनं आपल्याला फसवलं आणि हिरीचा नवरा म्हणून ऐन्यातलं नाव घ्यायला लावलं. मी अधिकच लाजलो. सगळे जण खूप हसले. मग रोज रात्री मला हे ऐन्यातलं नाव घेण्याचा आग्रह व्हायचा आणि आढेवेढे घेत मी ते घ्यायचो. नंतर धीट होऊन, आढेवेढे न घेता, न लाजता मी हे नाव घ्यायचो. कोणी पाव्हणा आला की मला त्याच्यासमोर उभे

राहून हे नाव घ्यायला लावीत. आणि सगळे जण हसत. मला नवरा शब्दाचा अर्थ कळायच्या आधीच मी कुणाचा तरी नवरा झालो होतो. हिरीचं व माझं प्रेम नवरा-बायकोचं, बहीण-भावाचं, की त्या पलीकडचं होतं हे मला माहीत नाही. व्यवहारात मुरलेल्या माणसांनी मात्र आमच्या प्रेमाला नवराबायकोचं परिमाण देऊन टाकलं.

शेंगाबरोबर इतरही अनेक पदार्थ मी हिरीला द्यायचो. खारवड्या, कुरवड्या, पापड, ऊस, वाळकं, टहाळ इत्यादी. पालातून वावरणाऱ्या आदिवासींना या वस्तू मिळणं अवघड. साधी भाजी-भाकरी करणं एवढंच त्यांना माहीत. कधी सणावारी किंवा गावजेवणात उष्टावळ मिळाली तर चुकून असे पदार्थ त्यांना खायला मिळत.

हिराही मला काही-बाही खायला द्यायची. तिच्याकडून मव्हळाचा मध नेहमी खायला मिळे. तिचा बाप फोकासाठी शिंदी तोडायला जाई तेव्हा परत येताना नेहमी मधाचे पोळे आणत असे. कमरेच्या जल्लद करवतीने मव्हळाचं पोळे तो अलगद काढीत असे. आणि हिरीसाठी घरी आणत असे तेव्हा आईवडिलांसमोर मला बोलावून हिरी मला मध देत असे. तिचे मायबाप तिला नको म्हणत नसत. मला नवल वाटे. आमच्या घरी इतकं सगळं असून, हिराला मला द्यायचं असेल तर चोरून द्यावं लागायचं. मला घरच्यांचा राग येई आणि हिराच्या आईवडिलांविषयी प्रेम वाटे.

कधी कधी हिराचा बाप मासे, खेकडे, खंडोळ्या पकडून आणीत असे व सगळे जण मिळून ते भाजून खात असत. अशा वेळेला आम्हाला घराच्या बाहेरही निघू दिलं जात नसे.

सुगी संपली. हिराच्या बापाचा फोकाचा धंदाही संपला. आता त्यांना गाव सोडनं भाग होतं. हिरा आपणाला सोडून जाणार म्हणून हुरहुर वाटत होती. परंतु हिराच्या बापाला पऱ्हाट्यांचे ताटवे विणायचं काम मिळालं व त्यांचा मुक्काम वाढला. मला खूप आनंद झाला. या कामावर हिराच्या बापाला चौघांच्या पोटाला पुरेल एवढा पैसा मिळत नसे. मग हिराच्या आईनंही धंदा शोधला. सुगीत कमावलेलं झडी पाण्यासाठी साचून ठेवणं आवश्यक होतं. हिराची आई आमच्या

गावात आणि गावोगाव जाऊन केसावर फुगे आणि पिना विकत असे. मिळालचं तर कणग्या सारवून देण्याचं काम करीत असे. त्यावरही भागत नसे म्हणून हिरी व तिची बहिणी पिरी गावात भीक मागत. हिराला भीक मागताना पाहून मला कसंतरीच वाटे. कधी कधी मी जेवत असतानाच त्या दोघा बहिणींचा आवाज कानी पडे. माझा घास तोंडातच गुरमळे, नुसतं एकदा भीक मागितली तर लोक दुर्लक्ष करतात, म्हणून त्या दोघींनीही त्यांच्या आईनं एक गाणं शिकवलं होतं. तोंड केविलवाणं करून, मोठ्या आवाजात, त्या ते गाणं म्हणीत, आर्त आवाज काढून भाकरी मागत. मग ही किरकिर दारातून घालवण्यासाठी लोक कोरकुटका वाढीत. मग त्या बहिणी पुढच्या दारावर सरकत.

एकदोन पोतं केस जमा झाले म्हणजे हिराची आई ते शहरात नेऊन विकत असे. परत येताना रबरी विंचू, घोडे, साप, बदक, हत्ती, फुगे, पिना आणि सुया इत्यादी वस्तू आणत असे. केसाच्या बदल्यात वस्तू मुलांना देऊन पुन्हा केस जमवीत असे.

एकदा हिराच्या आईनं नुकताच माल भरला होता. त्यातला काही घेऊन ती शेजारच्या खेड्यावर गेली होती. तिचा बाप पऱ्हाटया उपटायला शेतावर गेला होता. मी आणि हिरा लिंबाच्या झाडाखाली खेळत होतो. भर दुपारची वेळ होती. इतक्यात गावातल्या आवचिंद मुलांचं एक टोळकं हिराच्या पालात घुसलं. आमचं तिकडं लक्ष गेलं. हिरा पळतच गेली तर तिलाही या मुलांनी फेकून दिलं. हिरा रडत बोंबलत होती. मलाही त्या सर्वांची भीती वाटत होती. रागही येत व्हता आणि रडूही येत व्हतं. त्या आवचिंद मुलांनी पालातलं सगळं सामान रस्त्यावर फेकलं. हिराच्या आईनं कालच बाजारातून आणलेली खेळणी रस्ताभर पसरली. गावातल्या मुलांची त्यावर झुंबड उडाली. हाती लागेल ते खेळणं घेऊन ते लपवण्यासाठी मुलं घराकडं पळत होती. सगळ्या पालाचा इस्कोट करून ती मुलं निघून गेली.

संध्याकाळी हिराचे आई-बाप घरी आले तेव्हा हे सगळं पाहून ऊर बडवून घेऊ लागले. हिरानं जेव्हा आवचिंद मुलांची नाव आईला सांगितली तेव्हा सगळा प्रकार तिच्या लक्षता आला. ह्याच टोळक्यानं आडरानात आडवून तिला फुकटात

खेळणी मागितली होती. नाही देत म्हटल्यावर अंगाशी झोंबाझोंबीही केली होती. रागाच्या भरात हिराच्या आईनं एकादोघांच्या थोबाडीतही मारली होती. त्याचाच हा परिणाम होता.

रात्रभर हिराच्या पालावर रडारड चालली होती. हिराची आई गाववाल्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु तिचं ऐकून घ्यायला कोणी तयार नव्हतं. हिरा आणि तिची बहीण उपाशी पोटीच फुंदू-फुंदू रडत होत्या. हे सगळं पाहत, ऐकत मी रात्री केव्हातरी झोपी गेलो.

सकाळी उठून डोळे चोळीत लघवीसाठी बाहेर आलो. तर हिराच्या पालाच्या जागी राखेचा ढीग दिसला. मी पळतच घरात आलो आणि आईला विचारलं तर रात्री घडलेल्या झोपडं जाळण्याच्या प्रसंगाचा वृत्तांत आईनं मला सांगितला. रातोरात हिरा आणि तिच्या मायबापाला गाव सोडावं लागलं होतं.

हिराच्या आठवणीनं माझे हातपायच गळाले. वाटलं आता पुन्हा हिरा केव्हा तरी भेटेल का? थेट अंधाऱ्या खोलीत, उतरंडीच्या सांदीत जाऊन, मी मुसमुसून रडू लागलो. खूप रडलो तरी रडू थांबत नव्हतं. काही तरी शोधण्यासाठी वहिनी उतरंडीजवळ आली व माझ्या रडण्यानं घाबरून पळतच बाहेर गेली. आई व वहिनी बॅटरी घेऊन पुन्हा घरात आल्या. बॅटरीच्या उजेडात पाहतात तर मी रडत बसलेला. आईला समजेचना की मी का रडतोय. तिला वाटलं माझं काही तरी दुखत असावं. तिनं मला तसं विचारलं आता काहीतरी सांगणं भाग होतं. खरं कारण सांगितलं असतं तर कुणाचा विश्वास बसला नसता. म्हणून मी पोट दुखत असल्याचं सांगितलं.

आईनं मला उचलून बाहेर आणलं. माझं पोट दाबून पाहिलं तर ते नरम लागत होतं. अंथरूण टाकून त्यावर मला झोपवलं आणि आई आपली कामं करू लागली. हिराची आठवण झाली म्हणजे मला हुंदका यायचा आणि मी रडायचो. आई घाबरली तिला कसलीची शंका आली. तिनं तान्हाई मांगनीला बोलावून आणलं. माझ्या पोटावर तूप लावून, त्यावर बिबा व चुना घातला. पण तो हिरवा पडला नाही. मग आईनं दुसरे उपाय करून पाहिले. मी ते सर्व सहन केले. कारण खरी गोष्ट जर मी सांगितली असती तर मला सगळ्यांनी वेड्यात काढलं असतं.

हळूहळू दिवस जात राहिले. काळाच्या ओघात हिराची आठवण पुसट होत गेली. अजूनही कधी कधी दिवाळी निमित्त आम्ही सगळी बहीण-भाऊ एकत्र येतो तेव्हां मला खास करून

‘उशाचा शेला

पायथ्याला गेला

उठ उठ हिरे

दिवस निघाला.’

हा उखाणा घ्यायला लावला जातो. उखाण्याला सर्वजण पोटभर हसतात वरवर मी हसण्यात सामील होतो पण अंतर्यामी कुठंतरी दुःखाची एक कळ उमटते. हिराच्या आठवणी दाटून येतात. वाटतं आता हिरा कुठं असेल केसावर फुगे, पिना विकत गावोगाव फिरत असेल की मोठी कैकाडीन बाई होऊन कुठल्यातरी गावखरातल्या लिंबाच्या सावलीत कणग्या विणत बसली असेल.

(‘गाई घरा आल्या’ मधून)

❑❑❑

# बाबा मास्तर

**– दि. बा. पाटील**

---

बाबा मास्तर रस्त्यावर समोरून आले की, त्यांना आदरानं नमस्कार घालण्यासाठी कोणाचाही हात सहजपणे आपल्या कपाळाकडे जात असे. स्वभावानं अत्यंत नम्र व मितभाषी असलेले बाबा मास्तर एकदम किरकोळ शरीरयष्टीचे होते. सर्वसाधारणपणे पावणेसहा फूट उंचीचे. डोक्यावर सदैव पांढरी टोपी घालायचे. दाढीमिशा गुळगुळीत केलेल्या. म्हातारपणाचं वय झाल्याने गालफाडे आत ओढलेली. त्यामुळे डोळ्यांखालची ढोपरे वर दिसायची. डोळ्यावर डबल भिंगाचा काळसर दांडीचा चष्मा असायचा. अंगावर पूर्ण बाह्यांचा तीन बटणांचा लांब खाली गुडघ्यापर्यंत आलेला शर्ट. त्या शर्टाची गळ्याजवळची बटणे लावलेली असायची. खाली थोडीशी घळघळीत विजार, पण ती घोट्यापर्यंत वर उचललेली. पायात एकाच आडव्या पट्ट्याचं काळं चप्पल. स्वारी मध्यमवर्गीयांच्यात शोभूनं दिसणारी वाटायची. कारण त्यांच्या डाव्या हातात सदैव उघडलेली काळी छत्री असायची; ती उन्हाळ्या-पावसाळ्यात त्यांच्या डोक्यावर धरलेली दिसायची. उजव्या हातात दोन बंदांची पांढरी पिशवी असायची. त्या पिशवीत नेहमी एखादं वर्तमानपत्र आणि एक दोन पुस्तकं असायची. रस्त्याने जाताना वाटेत एखाद्या झाडाखालच्या पारावर बसलेला रिकामटेकडा माणूस त्यांना म्हणायचा,

'गुरुजी पेपर आजचा हाय काय?'

त्याचबरोबर लगेच थांबत गुरुजी म्हणायचे,

'काय वाचणार आहे का?'

समोरचा 'बघूया, आणा इकडं' म्हणाला की मास्तर थांबायचे. त्याला पेपर द्यायचे आणि पेपर वाचून होईपर्यंत थांबायचे. पण त्यांच्या स्वभावात कधी घाई नसायची. लोकांनी आपल्याजवळचं वर्तमानपत्र मागून घेऊन वाचलं की, त्यांना बरं वाटायचं. घरी जायला वेळ होतोय म्हणून ते असल्या रिकामटेकड्या फुकट्या वाचकावर कधीच रागवायचे नाहीत. म्हातारपणामुळं त्यांच्या पाठीला थोडसं कुबड आलं होतं. तरी ते ताठ चालायचे. कधीतरी सणासुदीला अथवा एखाद्या गावी जाताना अंगावर काळा कोट घालायचे. त्यामुळे ते रिटायर्ड अधिकाऱ्यासारखे वाटायचे. आयुष्य मराठी शाळेवर शिक्षकी पेशात घालवल्यामुळे ते एकदम नेमस्त व निष्पापवृत्तीचे होते. चाकोरीबद्ध जीवन जगलेल्या मास्तरांचं नाव बहिर्जी पाटील असं होतं. पण आपुलकीचं नाव लोकांनीच बाबा मास्तर असं ठेवलं होतं, ते बाबा मास्तर नावानंच ओळखायचे. इस्लामपुरात भागिदारीत त्यांनी एक छपाई प्रेस सुरू केला होता. कारण त्यांचं पुस्तकांबद्दलचं प्रेम प्रचंड होतं. त्यांनी आयुष्यभर पुस्तकांशी घनिष्ठ मैत्री केली होती. पुस्तके वाचण्याचा त्यांना छंद होता. ते रानातल्या घरात राहायचे. त्यांचं रानातलं घर कोकणातल्या घरासारखं आत बाहेर अंगण शेणाने सारवलेलं, असं अगदी स्वच्छ व निर्मळ होतं. घरासमोरच्या शेतात नारळीची मोठी बाग होती. त्यात विविध फुलझाडंही होती. त्यांची ती बाग म्हणजे शाळेतल्या सहलींचा पिकनिक पॉईंट होता. बागेत येणाऱ्या मुलांच्या सहलीसाठी ते पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करायचे. मुले शेजारच्या विहिरीकडे जाऊ नयेत म्हणून ते दक्ष असायचे.

अशा या संतवृत्तीच्या बाबा मास्तरांनी गावातल्या शिकल्यासावरल्या लोकांना काहीतरी चांगलं वाचायला मिळावं म्हणून गावात एक सार्वजनिक ग्रंथालय सुरू केलं. त्याला नाव 'श्री शिवाजी वाचनालय' असं दिलं. त्यांच्या प्रेसचंही नाव श्री शिवाजी प्रेस असंच होतं. ग्रंथ वाचनानं गाव सुसंस्कृत होईल अशी त्यांची धारणा होती. त्याकाळी ग्रंथालये काढून ती चालवणे हे काम फार जिकिरीचं असायचं. कारण ग्रंथालयांना शासकीय अनुदान फारस मिळायचं नाही.

ते मिळवण्यासाठी क्लिष्ट अटींची पूर्तता करावी लागे. त्यामुळं रजिस्टर ग्रंथालय असलं तरीही ते गावकऱ्यांच्या व वाचकांच्या उदार देणगीवरच चालायचं. वाचकांची संख्याही तुरळक असायची. ठरावीक मंडळीच ग्रंथालयात येत असत. त्यामुळे वर्गणीही जेमतेमच जमायची. म्हणून बाबा मास्तर वर्गणीपेक्षा ग्रंथालयाला देणगी मिळवण्यावर भर द्यायचे. ते म्हणायचे,

'फुकटात का होईना, पण लोकांनी वाचलं पाहिजे.'

अशी त्यांची विचारधारा होती. म्हणून ते गावातल्या अनेक मान्यवरांना व सुखवस्तू माणसांना भेटायचे. त्यांना ग्रंथालयाचं महत्त्व पटवून देऊन देणगी मागायचे. मिळेल त्या देणगीवर समाधान मानायचे. कधी कधी ते एखाद्या लग्नसमारंभातही देणगीसाठी जायचे. लग्न कार्याची ठिकाणं ही हक्काच्या देणगीची स्थळं त्यांना वाटत. कारण पूर्वी बहुतेक लग्न कार्ये ही दारातच व्हायची. त्यासाठी करंजीच्या झाडांच्या फाद्यांचा व आंब्याच्या डहाळ्यांचा मांडव दारात उभा राहायचा. काही तालेवारांच्या दारात कापडी मंडप उभे राहायचे. मांडवावर लावलेला लाऊड स्पिकर हा गावकऱ्यांचं आकर्षण असायचा. लग्न समारंभ संपल्यानंतर माईकवरून बराच वेळ आहेर देणाऱ्यांची नावे व त्यांच्या लग्न मालकास दिलेल्या आहेराच्या रकमा अथवा वस्तू मोठ्यानं पुकारण्याची पद्धत होती. आहेर देणाऱ्यांनाही स्पिकरवरून आपलं नाव ऐकून आहेर दिल्याचं चीज झाल्यासारखं वाटायचं म्हणून पुकारणाऱ्या पोराजवळ जाऊन ताटकळत उभे राहयचे. बाबामास्तरही त्या गर्दीतच उभे असायचे आणि नावे वाचून लग्नमालकाच्या हाती आहेराची रक्कम गेली की मास्तर त्या लग्नमालकास वाचनालयाच्या देणगीसाठी भीड घालायचे व म्हणायचे.

'आपल्या मुलाच्या लग्नात खूप आहेर मिळालाय. त्यातील थोडीशी रक्कम ग्रंथालयासाठी नवरदेवाच्या नावाने दिलीत तर खूप मोठं काम होईल...या लग्नाची आठवणही राहील.'

असं म्हणत मास्तर पिशवीतून हळूच पावतीपुस्तक बाहेर काढत त्या मालकाला म्हणायचे,

'देणगीची पावती नवरदेवाच्या नावाने फाडू का?'

मास्तरांच्या आग्रहाने लग्नमालक आपल्या कुवतीप्रमाणे देणगी द्यायचा आणि मास्तर देणगीची पावती त्याच्या हातावर ठेवून निघायचे. अशा जिकिरीनं मास्तरांनी वाचनालय चालवलं होतं. पुढे सरकार दरबारी खेटे घालून मास्तरांनी ग्रंथालयासाठी गावठाणातली सरकारी जागा मिळवली. पण तिथे इमारत बांधण्याचा प्रकार म्हणजे नालंसाठी घोडा घेतल्यासारखा होता. ते काम मास्तरांच्या कुवतीबाहेरचं होतं. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात त्यांनी भाड्याच्या खोलीत ग्रंथालय चालवणे पसंत केलं. त्यांच स्वतंत्र इमारतीचं स्वप्न तसंच राहून गेलं. प्राथमिक अवस्थेत भैरोबाच्या देवळापाठीमागच्या एका खोलीत त्यांनी ग्रंथालय थाटलं. तोपर्यंत माझी त्यांच्या ग्रंथालयाशी ओळख नव्हती.

पण एके दिवशी बाबाजीच्या दर्ग्यासमोरच्या, डेरेदार लिंबाच्या झाडाखाली असलेल्या व बरेच दिवस बंद असलेल्या खोलीवर श्री शिवाजी वाचनालयाचा पत्र्याचा बोर्ड लागला आणि माझी उत्सुकता ताणली गेली. मी मराठी शाळेत पाचवीच्या वर्गात शिकत होतो. त्यामुळे दररोज जाता येता दर्ग्यासमोरून जावे लागे. कधी कधी दर्ग्यासमोरच्या पटांगणात अथवा लिंबाच्या झाडाखाली खेळाचा डाव रंगे. दर्ग्यासमोर एकूण चार खोल्या होत्या. एका खोलीत सोडावॉटरचं दुकान होतं. दुसऱ्या दोन खोल्यात हजामतीची दुकानं होती. हजामतीच्या निमित्तानं तिथं जावं लागे. आता बंद असलेल्या खोलीत ग्रंथालय आलं होतं. ग्रंथालय म्हणजे काय हे सुद्धा मला माहीत नव्हतं. एक दोन दिवस गेले आणि ग्रंथालय उघडलं गेलं. शाळेच्या मधल्या सुट्टीत आम्ही मुलं शाळेपुढच्या पटांगणात खेळत असू. त्यावेळी सकाळची ग्रंथालयासमोरच्या दगडी कट्ट्यावर दहा पंधरा माणसांची गर्दी दिसायची. बहुतेकांच्या हाती तोंडासमोर धरलेली वर्तमानपत्रे असायची. त्यामुळे मलाही ह्या ग्रंथालयात जाण्याची ओढ लागली. एका मधल्या सुट्टीत हायवे ओलांडून मी ग्रंथालयाकडे गेलो. ग्रंथालयाच्या चौकटीत जाऊन एका बाजूला उभा राहून आत वाकून पाहिलं. समोरच एक लाकडी रॅक होतं. त्यावर रंगीबेरंगी चांदोबा मासिके लावलेली. ती पहिल्याच नजरेत भरली. चांदोबा मासिकावरचे राक्षस, प्राणी, साप, अजगर, पक्षी, उडत्या पंखांची माणसे या चित्रांनी भुरळ घातली. आपणही चांदोबा वाचलाच पाहिजे असे वाटू लागलं. चौकट ओलांडून आत गेलो. जमिनीवर पोते अंथरून त्यावर बाबा मास्तर

मांडी घालून बसले होते. त्यांच्यासमोर एक मोठं रजिस्टर होतं. त्यात ते खाली मान घालून काहीतरी लिहीत होते. माझी चाहूल लागताच त्यांनी नाकावरच्या चष्म्यावरून माझ्याकडे एकटक पाहिलं व म्हणाले,

'काय पाहिजे?'

मी समोरच्या चांदोबाकडे पाहत म्हणालो,

'चांदोबा पाहिजे!'

ते काहीच बोलले नाहीत. पुन्हा खाली मान घालून लिहू लागले. थोडावेळ गेला. मीही मख्खपणे उभा होतो. डोळ्यांवरचा चष्मा काढून मास्तर म्हणाले,

'त्या कोपऱ्यात केरसुणी आहे, चांदोबा पाहिजे असेल तर ती केरसुणी घे आणि बाहेरचा कट्टा झाडून काढ.'

त्यांनी बोटाने केरसुणी दाखवली. मी ती घेऊन लगेच बाहेरचा कट्टा झाडण्याच्या कामास लागलो. कट्टा झाडून होताच मास्तरांच्या पुढ्यात उभा राहिलो. बसलेले मास्तर उठले व मला म्हणाले,

'शाब्बास पोरा...आता तुला चांदोबा द्यायला हरकत नाही, परीक्षेत पास झालास!'

त्यांच्या शाब्बासकीपेक्षा मला चांदोबा महत्त्वाचा वाटत होता. गुरुजींनी एक जुनं चांदोबाचं मासिक माझ्या हाती दिलं. मला म्हणाले,

'नीट वापर, फाडू नकोस....नाहीतर भरून घेईन.'

मी मान डोलावून चांदोबा हाती घेतला. शाळा सुटल्यानंतर घरी आलो. पाठीवरच दप्तर ठेवून चांदोबा बाहेर काढला. पहिल्यांदा त्यातील सर्व रंगीत चित्रे डोळ्यांखालून घातली. सगळी चित्रं कशी गूढरम्य वाटणारी. बालमनाला खेचून घेणारी. चित्रं पाहून होताच चांदोबातल्या छोट्या छोट्या कथा वाचू लागलो. देवादिकांच्या, परींच्या आणि क्रूर राक्षसांच्या साम्राज्यातून मन प्रवास करून आलं. समुद्रतळाच्या नागलोकांतून जाऊन आलो. पशुपक्ष्यांबरोबर जंगले धुंडाळल्याचा आनंद मिळाला आणि मी चांदोबाच्या प्रेमात पडलो. चांदोबासाठी दररोज ग्रंथालयात जायचा आणि मास्तर सांगायच्या अगोदर हातात झाडू घेऊन

बाहेरचा कट्टा झाडायचा. कधीतरी मास्तर खोलीही झाडून घ्यायचे. एक दिवस मास्तरांनी सभासद म्हणून त्यांच्या त्या मोठ्या वहीत माझं नाव लिहिलं. माझ्या नावाखाली दररोज दिल्या जाणाऱ्या चांदोबाची नोंद केली. माझी मोडकीतोडकी सही घेतली. सही करताना गुरुजींच्या वळणदार मोत्यासारख्या अक्षरांवर माझी नजर रुतून बसायची. मला त्याचं अक्षर फार आवडायचं. आपणही तसंच अक्षर काढलं पाहिजे ही ईर्षा मला त्यांच्या अक्षरापासून मिळाली. त्या दिवशी मी माझा बोरू टोकदार केला. अक्षराला रेखीवपणा द्यायचा प्रयत्न केला. एक दिवस थोरावडे मास्तरांनी माझी वही पाहताना म्हटले,

'कोणी शिकवलं असं अक्षर काढायला?....सुंदर आहे!'

मी गुरुजींना काहीच बोललो नाही. पण बाबा मास्तर मात्र माझ्या नजरेसमोर तरळून गेले.

पुढे मी सातवीत गेलो. आता मी विविध पुस्तके वाचू लागलो होतो. त्यामुळे मी वाचनालयात गेलो की, काचेच्या कपाटातील पुस्तके निरखून बघायचा. अनेक लेखकांची अनेक पुस्तकं मला खुणवायची. ती पुस्तकं वाचावीत असं वाटायचं. या पुस्तकांच्या वाचनाच्या ओढीतून मी गुरुजींना काचेच्या कपाटातलं पुस्तकं मागितलं, गुरुजींनी पाच रुपये वर्गणी मागितली. मी घरी जाऊन पैसे आणून दिले. तेव्हापासून वाचनालयाचा वाचक सभासद झालो. बालपणापासून शिवाजीचं आकर्षण होतं. म्हणून मी गुरुजींना शिवाजी महाराजांच्यावरच पहिलं पुस्तक मागितलं तेव्हा गुरुजींनी, 'श्रीमान योगी' पुस्तकाच्या छोट्या छोट्या खंडांपैकी एक नंबरचं पुस्तक काचेच्या कपाटातून काढून मला दिलं. त्या पुस्तकाने माझी वाचनाची अभिरुची वाढवली आणि मराठ्यांच्या इतिहासाचं दर्शन घडलं. कादंबरीरूपात असणाऱ्या श्रीमान योगीमुळं मी शिवभक्त झालो. ते सगळे खंड वाचायला मला दोन वर्षे लागली. कारण अधलामधला खंड कोणीतरी नेलेला असायचा व त्यांची वाट पाहण्यात दिवस जायचे. अकरावीपर्यंत अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरातांसारख्या लेखकांची पुस्तके वाचली. अकरावी बोर्डाची परीक्षा असल्यानं वाचन बंद झालं. पण या गडबडीत अण्णाभाऊंची फकिरा कादंबरी माझ्याकडे राहून गेली. ती ग्रंथालयात जमा केली नाही. अभ्यासासाठी

इस्लामपुरात लिपारेंच्या घरापाठीमागे आडबाजूला आम्ही दोन-तीन मित्रांनी एक खोली भाड्याने घेतली. घराकडून जेवणाचा डबा यायचा. त्यामुळे गावी फारसा जात नसे. तीन-चार महिने गेले आणि एका बोळातून मला शोधत आलेले बाबा-मास्तर खोलीपुढे उभे राहिले. मी चौकटीतच होतो. ते मला शांतपणे म्हणाले,

'अरे लेका, तू ती फकिरा कादंबरी घेऊन गेलास, तेव्हापासून फिरकलाच नाहीस...कुठे आहे ते पुस्तक?....इथे असेल तर दे माझ्याकडे, घेऊन जातो.'

माझी मोठी पंचाईत झाली. फकिरा आणली होती. पण कुठे ठेवली ते आठवत नव्हतं. म्हणून मी त्यांना दोन दिवसांत पुस्तक जमा करतो असं सांगितलं. पण पुढे पंधरवडा गेला तरी मी पुस्तक जमा केलं नाही. पंधरवड्याने गुरुजी खोलीवर आले. त्याच शांतपणे त्यांनी पुस्तक मागितले. मी पुन्हा खोटे बोललो. गुरुजी परत गेले. आठ दिवस उलटल्यानंतर मला फकिरा पुस्तकाची रुखरुख लागून राहिली पुस्तकं दिलं नाही तर गुरुजी पुन्हा रूमवर येणार असं वाटलं. आणि तसंच झालं. त्या दिवशी संध्याकाळीच गुरुजी खोलीवर आले. अगदी शांतपणे म्हणाले,

'तुला पुस्तक सापडत नसेल तर त्याची दीडपट किंमत जमा कर...तुला त्याची पावती मिळेल... सार्वजनिक ग्रंथालय आहे, त्यामुळे पुस्तक हरवून चालणार नाही.'

गुरुजीनी पुस्तक माझ्याकडून हरवलं आहे असं गृहीत धरून मला त्या पुस्तकाचे पैसे भरायला सांगितले. मी स्वतःशीच खजील होऊन गप्प उभा राहिलो. गुरुजी म्हणाले,

'बोल, केव्हा पैसे भरतोस?'

मी दोन दिवसाचा वायदा केला. गुरुजी पाठमोरे झाले. मलाही खंत वाटली.

एवढा वयस्कर माणूस एका पुस्तकासाठी किती तन्मयतेनं आपल्यापर्यंत आला?...त्यात त्यांचा काय फायदा?...त्यांचं कामसुद्धा विनामानधनाचं सेवाभावी वृत्तीचं होतं. या जाणिवेतून मी गुरुजींचं पुस्तक अथवा किंमत देण्याचा

निर्णय घेतला व दुसऱ्या दिवशी घरी गेलो. घरातले सर्व कोनाडे धुंडाळले. पुस्तक सापडलं नाही. त्याचक्षणी माझ्या लक्षात आलं की आपल्या एका पैलवान मित्रानं ते पुस्तक नेले आहे. वाचायला म्हणून खूप दिवसापूर्वी आपण त्याला दिलं आहे. मी लगेच पैलवानचं घर गाठलं. तो घरीच भेटला. मी त्याला फकिरा कादंबरी मागितली. तसा तो म्हणाला.

'वाचायचं म्हणून तुज्याकडनं आणलं खर? चार -पाच पानं वाचली आणि त्ये तसंच ऱ्हावून गेलं!.... वाचून देतो की तुला, एवढी घाई हाय का जमा करायची?'

त्यावर मी त्याला बाबा मास्तरांचा सर्व किस्सा ऐकवला आणि 'गुरुजी आले की आता मलाच लाज वाटते.' असं त्याला म्हणालो.

पैलवान खो खो करून हसला आणि म्हणाला,

'म्हातारं काय म्हणून येवढं व्याप करतंय?'

पैलवानला गुरुजींचे हे नस्ते उपद्व्याप वाटत होते. त्याला मी समजून सांगितलं आणि पुस्तक घेऊन सरळ गुरुजींच्या घरी गेलो. त्यांना पुस्तक दिलं.

'बरं झालं पुस्तक सापडलं ते!' असे ते समाधानाने उद्गारले.

ही गोष्ट माझ्यापुरतीच नव्हती. तर गुरुजी पुस्तके परत न देणाऱ्या प्रत्येक वाचकाकडे हेलपाटे घालायचे.

एकदा गावातल्या हणमा पाटील नावाच्या माणसानं ग्रंथालयातलं एक पुस्तक नेलं होतं. त्याचा कंत्राटचा व्यवसाय होता. त्यामुळे तो सांगलीस जाऊन राहिला. गुरुजींनी त्याचा पत्ता मिळवला. ते सांगलीस गेले. हणमाला गाठला. त्याच्याकडून पुस्तक वसूल केलं.

हणमा त्यांना म्हणाला,

'गुरुजी काय म्हणून सांगलीला आलासा?.... पुस्तकाच्या किंमतीपेक्षा जास्ती तुमचं एस. टी. व रिक्षा भाडे गेलं असेल.'

'माझे पैसे गेले तर जाऊ देत....हे पुस्तक सार्वजनिक ग्रंथालयाचं आहे..... ते जाऊन चालणार नाही.'

असं गुरुजींनी हणमाला सुनावलं. गुरुजींचे विचार हणम्याचाच नव्हे तर सर्वसामान्य माणसांच्या बुद्धिपलीकडचे होते. ग्रंथालय हे सार्वजनिक आहे. ते अनेकांच्या मदतीवर उभं राहिलंय. त्याचं काम आपण एक विश्वस्त म्हणून सेवाभावी वृत्तीनं केलं पाहिजे. ही गुरुजींच्या मनाची धारणा होती. त्याच विश्वासानं दिवसेंदिवस गुरुजींनी ग्रंथालय जपलं आणि समृद्धही केलं.

काळाच्या ओघात गुरुजींचं पिकलं पान गळलं. पण गुरुजींनी शिवाजी वाचनालयाचं लावलेलं रोपटं जगवण्याचं काम काही निवडक ग्रंथप्रेमींनी केलं. बाबासाहेब पाटील नावाच्या माणसानं त्यांचा वसा त्यांच्याचसारखा जपून ते ग्रंथालय 'अ' वर्गात आणलं. शासकीय अनुदानाच्या जोरावर ग्रंथाची संख्याही प्रचंड वाढली. पण वाचकवर्ग मात्र रोडावला आहे. मी स्वतःच एका महाविद्यालयाचा ग्रंथपाल झाल्याने, माझ्या नोकरीच्या काळात माझा शिवाजी वाचनालयाशी असणारा संबंधही कमी झाला. पण एक दिवस मला बाबासाहेब बापूंचं निमंत्रण आलं की, ग्रंथालयात बाबा मास्तरांचा फोटो बसवायचा आहे. तेव्हा आपण उपस्थित राहावे. रविवारचा दिवस असल्याने मी रिकामाच होतो. वेळ काढून ठरल्यावेळी सकाळी नऊ वाजता ग्रंथालयात गेलो. पंधरावीस जणांची उपस्थिती होती. लेखक म्हणून मला गुरुजींच्या फोटोला हार घालायला लावला. पाच मिनिटांचं भाषणही करण्याचा आग्रह झाला. मी भाषणास उठलो तेव्हा मला माझं बालपण आठवलं. एका 'चांदोबा' मासिकासाठी वाचनालयाचा कट्टा झाडल्याची आठवण झाली. या सर्व आठवणी सांगत मी म्हणालो,

'बाबा मास्तरांनी गावाला सुसंस्कृत चेहरा दिला...त्यांच्या चांदोबानेच भविष्यात माझ्यासारखा साहित्यिक घडला..त्यांचे या गावावर फार मोठे उपकार आहेत...'

माझे शब्द भावपूर्ण झाले. ते घशातच अडखळले आणि डोळ्यांनी बाबा मास्तरांच्यासाठी दोन अश्रूंचे थेंब दिले!.

('भली माणसं' मधून)

❑❑❑

# दादासाहेब वस्ताद

**– सयाजीराजे मोकाशी**

---

आज दसरा, सोनं लुटायचा दिवस. सकाळी पूजा, देवदर्शन, शस्त्रपूजा झाली. दुपारी जेवणं झाल्यावर, दिवस कलल्यावर नाथबाबाच्या देवळाजवळ माणसं जमायला लागली. वरली आळी, खालची आळी, वाडी, मळा, शिवंच शेत सगळ्या बाजूंनी माणसं गोळा होऊ लागली. घटका दोन घटकांनी सोनं लुटायचं म्हणून सगळी माणसं गोळा होऊ लागली. तवर एकच दंगा झाला. 'रामू पैलवानला मारलं, पळा पळा' सगळी माणसं बावरून हुड्यावर पळत सुटली.

भगवा पटका गुंडलेला, ठेवणीतला सदरा अंगात घातलेला पैलवान रामू रक्तानं उभा न्हाला होता. डोक्यात त्याच्या मधोमध कुऱ्हाडीचा घाव बसला होता. तो थोडा भेलकांडला. डाव्या काखेत डोईचा पटका घेऊन डोक्याची दोन्ही भकलं रामूनं हातानं जाम धरली अन् हळूहळू वाड्याकडं आला. पायऱ्या चढून भव्य वाड्याच्या ढेलजेत खांबाला टेकला. लोक गोळा झाले. घरात रडारड सुरू झाली. रामूचे थोरले भाऊ दादा वस्ताद यांना समजल्याबरोबर ते धावत तेथे आले.

रामूचं बोलणं बंद झाले अन् मान डाव्या खांद्यावर कलली. वाड्यात एकच गोंधळ उडाला. दादा वस्ताद रामूच्या गळ्यात पडून रड रड रडले. अन् एका झिटीत उठले. घरातली फरशी कुऱ्हाड हातात घेऊन डोईला टापरी बांधून म्हणाले,

''कुणी मारले माझ्या भावाला? त्याचं नाव सांगा मला; बघतो त्याचं.''

पण सगळेजण गप्प, कुणीच बोलेना. मग धाकटा नाना म्हणाला, ''वरल्या आळीचा धोंडी''

वस्ताद पाच-पंचवीस तालमीतली पोरं घेऊन त्याचा पाठलाग करू लागले. पण तो तामजाईच्या डोंगरात दडून बसला. जंगजंग पछाडला पण तो सापडला नाही. वस्ताद परत आले. रामूवर अंत्यसंस्कार केले. जमलेली माणसं पांगली. रामू वाड्यात अन् गावात मोठं दुःख ठेवून गेला. हळूहळू लोक कुचकुचू लागले. बायका पदराआड तोंड लपवून बोलू लागल्या.

''आवं व्हंजी, रामूला कुणी मारू शकला नसता, पण फसवून त्याचा काटा काढला.''

''ते कसा?''

''रामू शंकर अण्णाच्यात दत्तक घातला म्हणून बाकीच्याला राग आला. अन् कारस्थानी त्यो बाबा हाय की तरण्या पोरास्नी फितवायला.''

''कोण त्यो?''

''त्यो शिरू काका. त्येनंच हे कारस्थान रचलं अन् त्यात रामू बळी गेला.''

गावात, घरात, रानात हीच चर्चा सुरू झाली. धोंडी अस्तखाल पळून गेला. नेमानेमी गांधीजींची हत्या झाली. वस्तादला नेमकी संधी धावून आली. तालमीतली पाच-पन्नास पोरं घेऊन शिरूकाकाला आत कोंडून, दिला वाडा पेटवून.

पुढे अनेक दिवस तारखा पडल्या. सगळे निर्दोष सुटले. पंत सरकार म्हणाले, ''वस्ताद आता मागचं सगळं विसरा. या नव्या पोरांना नवी दिशा द्या. रागापेक्षा संयमाने जगायला शिकवा. साऱ्या समाजाचा फायदा होईल.''

वस्तादने हे मनावर घेतलं अन् या पुढचं आयुष्य समाजासाठी वाहून द्यायचं ठरविलं.

दादा वस्ताद दिसायला गोरेपान, भरलेली शरीरयष्टी, भरदार मिशा, डोईवर डाळिंबी रंगाचा रेशमी फेटा. अंगात काव लावलेला तांबडा सदरा, पायघोळ धोतर, नजर भेदक, रागावले तर लालबुंद होत. अंगात अचाट ताकद, शरीर व्यायामाने कमावलेले. गावोगांवच्या फडात हमखास कुस्ती करणारा पैलवान म्हणून ख्याती. अन् कुस्त्याचा फड मोडताना वस्ताद पुंड्या ऊस पिळून रस काढत. हे बघून बघे लोक गप्प होत व वस्तादाच्या ताकदीचे कौतुक करीत घरी परतत. मग डफडं पिपाणी वाजत-गाजत पंच मंडळी देवळाकडं येत. ग्रामदैवताचं चांगभलं गाजवून खिरीचा प्रसाद खाऊन, रातचा तमाशा उभा राहत असे.

वस्ताद नावाने ओळखले जाणारे 'दादा' इनामदार घराण्यातले होते. दक्षिणमुखी वळणाऱ्या बेलवण नदीच्या उंच अकटावर दादांचा एकराएवढा मोठा वाडा. चारी बाजूला बुरूज. मोठाले दगड. तटावरून बैलगाडी जाईल एवढ्या रुंदीचा बाजूचा तट. वाड्याचा मोठा दरवाजा. गायी-वासरांनी भरलेला गोठा. राबणारे गडी. जवळच तालीम. शंभर एक पोरं रोज पहाटेपासून त्या तालमीत घुमत. वस्ताद पहाटे उठून पोरांना खेळवीत. डाव शिकवीत, व्यायामाचे नवनवे प्रकार करून दाखवत. स्वतः व्यायाम करून, तालमीत चार पकडी धरून, मग नदीवर आंघोळीला जात. रोज पहाटे नदीवर जाताना गावातील लोक पाण्याशिवायच प्रातर्विधीला जात हे वस्तादना नेहमी खटके. एक दिवस त्यांनी एक योजना आखली, कुंभाराच्या घरातून दहा-वीस मडकी आणली. नदीतून ती भरून, जो पाणी न घेता कासोटा सोडून जीव मोकळा करायला चवड्यावर बसला आहे. त्याच्याजवळ ते मडके ते ठेवत. त्याचा परिणाम असा झाला की लोक रोज पाणी घेऊन जाऊ लागले. खजील झालेले लोक ही गोष्ट कोणाजवळ कधीच बोलले नाहीत. एरव्ही वस्तादांना पाहिले तर लाजत, गप्प होत.

त्यांच्या वाड्यावर रोज गोर-गरिबांचा मोठा राबता असे. कुणाचे धान्य संपले, कुणाला नांगर तर कुणाला सांभाळायला कालवड पाहिजे असे. ते कुणालाच नाही म्हणत नसत. कुणाचं पोर शिकायला शहरात निघालं. कुणाची मुलगी नांदायला निघाली की ते हटकून वाड्याच्या पायऱ्या चढत. वस्तादाच्या माईच्या पाया पडत. त्यांना पैशाची अडचण आहे का तेही विचारत.

वस्ताद म्हणत, ''हे सारं वैभव माझ्या वाडवडिलांचं आहे. त्यांनी मला गोर-गरिबांना वाटायला सांगितलं आहे. हे सारं तुमचंच आहे, मी आपला हे सांभाळणारा कारभारी आहे.''

वाड्यात खूप मोठं उंबराचं झाड. शेवगा, आंबा, बेल, कडुलिंब, पारिजातक आणि जांभळ ही झाडं. एका पावसाळ्यात उंबराची फळं खायला एक लेकुरवाळी वानरीन एकटीच आली. तिचा कळप भिऊन परागंदा झाला. तिचं पिलू तिच्या छातीला कायम चिकटलेलं. ते नर होतं. म्हणून वस्तादांनी त्यांची नावं भागी-नाऱ्या असं ठेवलं. सकाळी सकाळी शिळं अन्न खायला माय-लेकरं येत. माई त्यांना पोटभर टाकत. घरच्या माणसावानी त्यांची ऊठबस होई. पुढं पुढं ती माणसाळली. वाड्यात खुशाल हिंडू-फिरू लागली.

वस्तादांची वडिलार्जित मोठी जमीन. त्या इनामातून मधूनच पंढरपूरला रेल्वे जाई. तिला 'देवाची गाडी' म्हणत. एक साल तिथं ऊस लावला. भरमसाठ वाढला. माघवारी सुरू झाली. वस्तादनी दहा-वीस पैलवानांना एकत्र करून, काव लावलेलं तांबडं खांद्यावरील धोतर रेल्वे रुळावरून उभा राहून दाखवलं, अन् रेल्वेने गती कमी केली, गाडी थांबली. हिंदी बोलणाऱ्या ड्रायव्हरला वस्ताद मराठीत बोलले. ''तुम्ही सगळीजण पंढरीला वारीला निघालाय. माझ्या शेतातला रस अन् ऊस घ्या. सगळ्या वारकऱ्यांना रस पिऊ द्या, ही माझी विनंती आहे.''

गाडी दहा मिनिटं थांबली. सगळ्यांना जमेल तसं रसपाणी दिलं. अन् गाडीनं शीळ दिली. धूर सोडत गाडी डोंगराआड झाली. वस्तादना आनंद झाला. मग पोरं माघारी फिरली.

वर्षातून चार-पाच महिने वस्ताद गावोगांवचे कुस्त्यांचे फड करीत पोरांना घेऊन पूर्वेला पुसद, यवतमाळपर्यंत जात. कधी मुधोळ, तंजावर, बेल्लारीला तर कधी देवास, कोटा, ग्वाल्हेरला. एकदा वस्ताद पुसदच्या तालमीत पोरांना शिकवायला राहिले. मागे गावाकडे माई आजारी पडल्या. खानापूरचा डागदार आला. तपासणी करताना माईंना म्हणाला, ''बाई नाडी तपासायची आहे तुमची, हात द्या जरा.''

अंथरुणावर पडलेल्या माई कण्हत म्हणाल्या, ''डॉक्टर हात एकालाच दिलाय, दुसऱ्याला नाही.'' त्यांनी शेवटी औषधाच्या चार पुड्या दिल्या. त्या खाऊनही त्यांना गुण आला नाही. एका पहाटे त्या वारल्या. वस्ताद वाट चालत होते. सूर्योदयाला आले. सगळा वाडा, गाव हळहळले. भागी-नाऱ्या आपल्या मालकीनीची शेवटची पाठवणी करताना वाड्याच्या बुरुजावर गप्प बसून होते. सारा वाडा भरून गेला. दुःखाला पारावार उरला नाही.

आता वाडा उघडा पडला. वाड्याची शिस्त त्याच्या बुरुजासारखी ढासळली. गोर-गरीब माईसाठी रड रड रडले. गोठ्यातल्या गाईच्या डोळ्यांत पाणी तरारले. पशु-पक्षी, झाडे-झुडपे गप्प झाली. वाड्याचा दगड न् दगड स्तब्ध झाला.

वस्ताद हे सारे विराट दुःख हळूहळू पाठीवर टाकत राहिले.

त्यांनी गावची ग्रामपंचायत बिनविरोध केली. गावातले सावकार गरिबांना छळत. त्यांना धडा शिकविला. गावात पैलवानांसाठी नदीकाठी मोठी तालीम बांधणे सुरू झाले. गावच्या राजकारणातून विरोध होऊ लागला. तरी तो मोडून त्यांनी तालीम बांधून काढली. तामखडीतून तांबडी माती आणली. ती चांगली मळली. त्यात गोडेतेल ओतून खोलवर खणून घेतली. बलभीमाचा फोटो लावला अन् जुना पैलवान महंमद नुराणी यांच्या हस्ते उद्घाटन झाले आणि वस्तादांना गावात शत्रू वाढले.

एका रात्री वस्ताद पंढरपूरच्या कुस्त्या करून आले. वाड्याच्या मोकळ्या अंगणातील एका बाजेवर ते झोपले. रात्री मध्यानीनंतर कसला तरी आवाज झाला. भागी-नाऱ्या या वानरांनी आवाज केला. वस्ताद उठले. त्यांनी टाफरी बांधली होती. ''कोण आहे?'' असं म्हणाले, तर चारजण एकदम वाड्याच्या भिंतीवरून उड्या टाकून आत उतरले, हातात त्यांच्या फरशी कुऱ्हाडी होत्या. त्यातला एकजण म्हणाला, ''त्यो दादासाब कुठाय?'' यावर वस्ताद म्हणाले, ''ते आत झोपलेत. रात्री उशीरा कुस्त्यास्नं आलेत. तवर हे पाणी घ्या. दूध देतो. त्यांना हाक मारतोच.''

मारेकरी जरा सैल पडले.

''का, काय काम होतं वस्तादकडं?''

''व्हय, त्येला बघून घ्याचं हाय.'' एकजण गुरगुरला.

''थांबा आलेच ते.''

असे म्हणून वस्ताद वाड्याच्या ढेलजेत वळले, चहापान झाले आणि फेटा बांधून चार तगड्या पोरांना घेऊन आले. तसे मारेकरी वस्तादचे पाय धरायला लागले. ''आमची चूक झाली. माफ करा.''

घरचं दुःख विसरत वस्ताद सामाजिक कामात एकरूप होत गेले. नाथाची यात्रा, कुस्त्या, त्याचा महाप्रसाद, देवाची पालखी, उत्सव, सण, समारंभ यात एकजीव होत गेले. मदतीला अनेक तरुण पैलवान, मित्र, नातलग, घरातील लोक, भावकी यांची मदत होऊ लागली. त्यांनी अनेक पैलवान तयार केले प्रत्येक फडावरील एकूण रकमेच्या ६० ते ७० टक्के रक्कम ते जिंकून आणत. शे-दोनशे पोरं तालमीत घुमू लागली की त्यांना आनंद वाटे. चढाओढीने कुस्त्या करीत. एकदा बापू पैलवानाने पैज लावली. ''येत्या नाथाच्या फडावर जर मी हरलो तर जलमभर लुगडं नेसीन!'' दुर्दैवाने तो हरला. लुगडं नेसण्यापेक्षा त्यानं विहिरीच्या माचाडाला आपल्या पटक्याने फास घेतला. तेव्हा वस्ताद कळवळले. ''असं कुत्र्या मांजरासारखं मरण्यापेक्षा लढून कुस्ती करून, नाव कमवा. गावाला मोठेपणा द्या. तुम्ही पण जगा.''

गावात एकदा पारध्याची दोन पालं उतरली. त्यात एक म्हातारी खूपच थकलेली. पौषाच्या थंडीत ती गारठली. अन् डोळे मिटले. संक्रांतीचा सण, घरोघर डाळ शिजली. वस्तादांनी त्या डाळीची वाड्यात पुरणपोळी करण्याऐवजी उसळ करायला सांगितली. चार-सहा भाकरी करून त्या पारध्याच्या पाल्यात दिल्या. नेहमी सणादिवशी गावातले कुणीही वारले तरी वाड्यात सण होत नसे. ते म्हणत, ''गोर-गरिबांच्या दुःखात आपण सहभागी व्हावं. म्हणजे सण गोड होतो.''

पुढं बराच काळ गेला. तालमीतही दोन गट पडले. वस्तादांचे मन निराश झाले. त्यांनी सगळ्या पैलवानांना एकत्र केले. म्हणाले, ''आता मी थकलो. तुमच्यातला एक वस्ताद नेमा. गावाचं नाव मोठं करा. आजपासून मला मोकळं

करा. नाथबाबा तुम्हाला यश देईल.''

वस्तादांना ना मूल ना बाळ. माई अगोदरच गेलेल्या. ते एकटे राहत. कुणी वाड्याच्या पायऱ्या चढून वर आले तर बोलत. जुन्या गोष्टी घडत. ते आणखी थकले. एका तिन्ही सांजेला दादा वस्तादांनी आपला देह उंबराच्या झाडाखाली ठेवला. वाड्याचा शेंडा ढासळला. अन् बुरुजाची माती खचली.

आजही तो वाडा दादा वस्तादांची आठवण सांगत बसतो. कुणी म्हणतं, ''या वाड्यात वस्ताद आजही वास करतात.'' लोक म्हणतात, ''एक देवमाणूस गेला. राजासारखा वागला, जगला आणि माणसांच्या काळजात ठसला.''

.... आता या वाड्यात व्यायामशाळेऐवजी कन्याशाळा भरते, वस्तादांच्या नावाने!

('पंधरा ऑगस्ट' मधून)

❑❑❑

## डोकेवाले संशोधक

# दादाजी खोब्रागडे

**– व्ही. एन. शिंदे**

आम्ही लहान होतो, तेव्हा आई, वडील गोष्ट सांगायचे. गोष्टीमधील नायक शक्यतो नावडत्या राणीचा मुलगा असायचा. त्याला अनेक संकटांचा सामना करावा लागे. मुख्य म्हणजे तो सद्‌गुणी असायचा. अनेक संकटांवर मात करायचा आणि शेवटी राजा व्हायचा. अशा अनेक सुखान्त गोष्टी ऐकत आम्ही झोपायचो. पुढे अनेकदा बिकट परिस्थितीतून जाताना हे सगळे बकवास वाटायचे. पण लहानपणी त्या कथांनी केलेले संस्कार जायचे नाहीत. दादाजी खोब्रागडे यांच्या निधनाची बातमी समजली आणि पुन्हा सर्वच कथांचा शेवट सुखान्त असत नाही, याची जाणीव झाली.

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील नांदेड हे एक छोटेसे गाव. त्या गावात रामजी खोब्रागडे हे शेतकरी. पाच एकर शेती; मात्र, ती मनापासून कसायचे. लग्न झाले आणि वर्षभरात त्यांच्या सासरी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील खुटाळा येथे १० जुलै १९३४ रोजी त्यांच्या पोटी पुत्र जन्मला. वडिलांना शेती करताना पाहात हे बाळ मोठे होऊ लागले. वडिलांची शेती करण्याची पद्धत शिकू लागले. त्या बाळाचे नाव दादाजी असे ठेवले. पुढे त्याला शाळेत घातले. तिसरीपर्यंत शाळा पूर्ण केली आणि वडिलांना शेतात मदत करण्यासाठी शिक्षण थांबले. दादाजी पूर्णवेळ शेतीतील कामे करू लागले. वडील

बियाणासाठी भात निवडताना लोंब्या हातावर घेऊन त्या मळत, आतील तांदूळ तुटतो का? तो किती लांबीचा आहे? याचे सूक्ष्म निरीक्षण करत. वडिलांची ही सवय दादाजीवर नकळत संस्कार करत होती. वडील असेपर्यंत ते सहायकाच्या भूमिकेत होते. वडील गेले आणि दादाजी शेती सांभाळू लागले.

दादाजी सकाळी लवकर उठत, फक्त चहा घेऊन शेतात जात. खांद्यावर एक कापडाची पिशवी, हातात काठी एवढेच साहित्य घेऊन स्वारी शेतात जायची. शेत हेच सर्वस्व. शेतातील काडी न काडीची माहिती घ्यायचे. वाढणाऱ्या पिकांचे निरीक्षण करत, वाढत्या पिकाची देखभाल करायचे. शेती जंगलाजवळ असल्याने पिकाभोवती काटेरी कुंपण करायचे. आवश्यक तेवढेच पाणी शेतात राहील. याची काळजी घ्यायचे. पिकात इतर कोणतेही तण वाढू देत नसत. त्यांचे शेत स्वच्छ असायचे. दहा वाजेपर्यंत असे शेतात फिरून काम करायचे. दहा वाजले की दादाजी परत फिरायचे. गावातील चहाच्या टपरीवर येऊन चहा प्यायचा. पेपर वाचायचा. गावकऱ्यांशी गप्पा मारायच्या आणि नंतर घरी यायचे. ऊन असो, थंडी असो वा पाऊस, दादाजींचा दिनक्रम ठरलेला. धो-धो पावसातही त्यांचा दिनक्रम बदलत नसे. कोणी विचारले तर ते आपल्या परीने शेतात जाणे कसे आवश्यक आहे, ते सांगत. त्यांचे म्हणणे लोकांच्या डोक्यावरून जायचे. आपल्याला एखाद्याचे म्हणणे पटले नाही की, लोक त्याला अतिशहाणा म्हणून विषय सोडून देतात. दादाजींना असे काहीसे उपहासात्मक 'डोकेवाले' हे नाव गावाने प्रदान केले. त्यांचे डोके गावाला समजण्यापलीकडचे होते. म्हणून कदाचित त्यांना हे नाव दिले असावे. पण या डोकेवाल्या दादाजींचे डोके खरंच कोणत्याही प्रशिक्षित कृषी संशोधकापेक्षा जास्त चालत होते.

दादाजींच्या शेतात अनेक वर्षापासून भात लावला जात असे. १९८१ पासून दादाजींनी आपल्या शेतात 'पटेल-३' हे भाताचे संकरित वाण लावायला सुरुवात केली. त्यावेळी इतर वाणापेक्षा हा वाण अधिक प्रसिद्ध झाला होता. पीक कापणीला आले असताना त्यातील काही भाताच्या रोपांच्या लोंब्या या इतर वाणांपेक्षा लांब आणि भरपूर दाणे असणाऱ्या दिसल्या. त्यांनी त्या लोंब्या काळजीपूर्वक बाजूला काढल्या पुढील वर्षी त्या वेगळ्या ठेवलेल्या लोंब्यांतील भाताचे बी काढून त्यांची वेगळी लागवड केली. शंभर चौरस फूट जागेत

लावलेल्या या वाणाचे पीक 'पटेल-३' वाणापेक्षा कितीतरी जास्त होते. त्यातील काही भाग त्यांनी सडला. त्यापासून मिळालेला तांदूळ शिजवला. हा भात इतर भातांपेक्षा अधिक चवदार असल्याचे त्यांच्या लक्षात आले. पुढे त्यांनी आपल्या संपूर्ण शेतात हे वाण पेरले आणि भाताच्या उत्पादनात मोठी वाढ झाली. तीन चार वर्षांत दादाजींचे प्रति एकर भाताचे उत्पादन इतरांपेक्षा जास्त निघते. याची चर्चा सर्वत्र होऊ लागली. आजूबाजूचे शेतकरी त्यांच्याकडे बियाणे मागू लागले. यापैकीच एक शेतकरी होते भिमराव शिंदे. ते दादाजींचे मेहुणे. त्यांनी दादाजींकडून नव्वद किलो बियाणे नेले आणि ते चार एकरात लावले. त्यातून त्यांना नव्वद पोती भाताचे उत्पादन मिळाले. शिंदे यांनी हा भात विकायला अडत दुकानात नेला.

शिंदे यांचा भात भरपूर होता आणि तो इतर तांदळापेक्षा वेगळा होता. या वाणाचे वेगळेपण ओळखून व्यापाऱ्याने शिंदे याना वाणाचे नाव विचारले. त्यांनी 'नाव तुम्हीच लिहा' असे सांगितले. त्या काळात एचएमटी घड्याळे प्रसिद्ध होती. त्या व्यापाऱ्याने काही दिवसांपूर्वीच एचएमटी कंपनीचे नवे घड्याळ विकत घेतले होते. त्याने भाताच्या या वाणाचे नाव 'एचएमटी' असे लिहिले. हे भाताचे वाण सर्वत्र 'एचएमटी' या नावाने लावले जाऊ लागले. या भाताचे नामकरण त्याच्या पित्याला दादाजींना न विचारता परस्पर झाले. सर्वत्र या वाणाची चर्चा होऊ लागली. आपण विकसित केलेला वाणच 'एचएमटी' नावाने लोक लावतात. हे लक्षात आल्यावरही दादाजींना त्याचे ना कौतुक, ना अहंभाव. आपले वाण लावतात याचा अभिमानही त्यांच्या बोलण्यात नसे. दादजींनी 'एचएमटी' वाण तयार करताना आपल्या शेतातील विशिष्ट वाणांचाच संकर या जास्त लांबीच्या आणि भरपूर व घट्ट दाणे असणाऱ्या वाणाशी होऊ दिला होता. हे प्रयोग सलग चार पाच वर्षे करून त्यांना यश मिळाले होते. या यशामुळे नवा वाण तयार होतो, याची त्यांना खात्री पटली. त्यानंतर त्यांनी आपले प्रयोग सातत्याने सुरू केले आणि नवे वाण शोधत राहिले.

'एचएमटी' हा सर्वात यशस्वी वाण १९८३ पासून लावला जात होता. चारच वर्षात ठेंगू चिनोर किंवा नांदेड चिनोर हा वाण लागवडीसाठी उपलब्ध झाला. पुढच्या पाच वर्षात म्हणजेच १९९२ मध्ये नांदेड -९२ हा भाताचा नवा

वाण तयार केला. पुढच्या सहा वर्षात आणखी चार वाण त्यांनी तयार केले. नांदेड हिरा (१९९४), विजय नांदेड (१९९६), दिपक रत्ना (१९९७), डीआरके (१९९८) या वाणाचे बियाणे लावण्यासाठी दादाजींनी उपलब्ध करून दिले. हे वाण सर्वत्र लावले जाऊ लागले. हे बियाणे कोणत्याही शासकीय यंत्रणेने किंवा कंपनीने लागवडीसाठी उपलब्ध करून दिलेले नव्हते. तरीही हळूहळ विदर्भ, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि ओरिसा राज्यात या वाणांची लागवड होऊ लागली.

पुढे हा एवढा प्रसिद्ध झालेला वाण कोणी विकसित केला? याचा शोध काही लोकांनी घेतला. दादाजींचा नागभीड तालुक्यात सत्कार झाला. तेथील गटविकास अधिकाऱ्यांनीही त्यांचा सत्कार केला. त्याच्या वर्तमानपत्रांतील बातम्या पाहून चंद्रपूरच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंशी संपर्क साधला. तत्कालीन कुलगुरू आणि नागभीड तालुक्यातील भात संशोधन केंद्राचे अधिकारी दादाजींच्या घरी गेले. त्यांच्याकडून १९९४ च्या जून महिन्यात एचएमटी वाणांचे पाच किलो बियाणे घेतले. तसेच ठेंगू चिनोर आणि नांदेड-९२ या वाणांचेही बियाणे घेतले. आपण या बियाण्याला शास्त्रीयदृष्ट्या लोकांपर्यंत पोहोचवू, असे दादाजींना सांगण्यात आले. मात्र तत्कालीन कुलगुरूंचे दीड वर्षात दुर्दैवी निधन झाले. त्यानंतर दादाजींना विद्यापीठाने काहीही कळवले नाही. अचानक एक दिवस विद्यापीठाने एचएमटी वाण हा आपला म्हणून नोंदवला आणि तो बाजारात बियाणे रूपात आणला.

दादाजींचे वाण शोधणे सुरू असताना त्यांचा मुलगा मित्रजीत आजारी पडला. अनेक उपचारानंतरही तो बरा होत नव्हता. मुलाला त्यांनी बियाणे कसे बनवायचे, याचे प्रशिक्षण दिले होते. मुलगा महत्त्वाचा म्हणत त्याच्या उपचारासाठी दादाजींना आपली काही जमीन विकावी लागली. पुढे मुलाच्या सासऱ्यांनी त्यांना दीड एकर शेती घेऊन दिली. त्यानंतर दादाजींना पेटंट, रॉयल्टीबाबत कळाले. २०१० मध्येही दादाजी असेच शेतात काम करत होते. इकडे सर्व चॅनेलवर फोर्ब्जच्या प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत नाव झळकल्याची बातमी दाखवली जात होती. सर्वांत प्रथम दादाजींशी संवाद साधण्यासाठी प्रतिनिधींची धांदल सुरू होती. शेतात काम करत असताना प्रसिद्धी माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांना फोर्ब्ज मासिकाने तुमची दखल घेतल्याचे सांगितले. दादाजींना याचे काहीच कौतुक

नव्हते. महाराष्ट्र शासनाने त्यांचा कृषिभूषण पुरस्कार देऊन गौरव केला. त्यानंतर दादाजींनी आपल्या प्रयोगासाठी आणखी शेती मिळावी, अशी मागणी केली. मात्र त्यांना दीड एकर शेती देण्यात आली. त्यांना सव्वाशेपेक्षा जास्त पुरस्कार देण्यात आले आहेत. मात्र त्यांनी वीस एकर शेतीची केलेली मागणी मात्र अखेरपर्यंत पूर्ण झाली नाही. तरीही ते नव्या वाणांच्या शोधात मग्न राहिले.

त्यांनी आपल्या बियाणांच्या हक्कासाठी कायदेशीर लढाई लढावी, म्हणून खूप लोक आग्रही राहिले. त्यांनी तसे प्रयत्न केले. मात्र त्यांच्या हाती तुटपुंजी रक्कम आली. मे २०१८ मध्ये त्यांची प्रकृती आणखी खालावली उपचारासाठी त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. त्यातच त्यांचे ३ जून २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. एक खरा 'डोकेवाला' कृषी संशोधक काळाच्या पडद्याआड गेला. ही साठा उत्तराची कहाणी संपली. मात्र, त्यांच्या निधनानंतर का होईना, एचएमटी भाताचा बाप आम्हाला कळाला. धनसंपत्तीचे नाही पण आमच्यासारख्या अनेकांच्या मनावर दादाजी खोब्रागडे हे नाव कायम कोरले गेले. दादाजी गेल्यावरच त्यांचे महत्त्व आम्हाला समजले, याला काय म्हणावे?

('हिरव्या बोटांचे किमयागार' मधून)

❑❑❑

## लेखक परिचय

**व्यंकटेश माडगूळकर** (६ जुलै, १९२७ ते २८ ऑगस्ट, २००१)

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर यांचा जन्म माडगूळ, जिल्हा सांगली येथे झाला. ग्रामीण कथाकार, कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध. याबरोबरच नाटक व पटकथांचेही लेखन केले आहे. 'माणदेशी माणसं' (१९४९), या व्यक्तीरेखांतून मराठी माणसाला अधिक परिचित. त्यानंतर 'सीताराम एकनाथ' (१९४९), 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१), 'हस्ताचा पाऊस' (१९५३), 'काळी आई' (१९५४), 'जांभळाचे दिवस' (१९५७), 'उंबरठा' (१९६०), हे कथासंग्रह प्रसिद्ध. वास्तववादी ग्रामीण माणसांचे अस्सल चित्रण या कथासंग्रहातून केले आहे. ग्रामीण कथेप्रमाणे ग्रामीण कादंबरी लेखनही त्यांनी केले आहे. यामध्ये 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४), 'पुढचं पाऊल' (१९६५), 'काळे दिवस' (१९७९), 'करुणाष्टक' (१९८६) आणि 'सत्तांतर' (१९८२) इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध; ह्याशिवाय 'सती' (१९६८) 'तू वेडा कुंभार' (१९८६) ह्यासारखी दहा नाटके प्रसिद्ध.

१९८३ ला 'सत्तांतर' या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. आंबेजोगाई येथे १९८३ रोजी संपन्न झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

**प्रल्हाद केशव अत्रे** (१३ ऑगस्ट, १८९८ ते १३ जून, १९६९)

मराठीतील नावाजलेले लेखक. कवी, नाटककार, संपादक, पत्रकार, मराठी व हिंदी चित्रपट निर्माते, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी व स्पष्टवक्ते म्हणून परिचित.

केशवकुमार या टोपणनावाने काव्य व विनोदी लेखन केले आहे. यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील सासवड जवळच्या कोडीद गावी झाला. कथा, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र आणि पटकथा व वृत्तपत्रातून विविध विषयावर विपुल

लेखन. सुरुवातीच्या काळात प्राथमिक शिक्षक, नंतर प्राचार्य म्हणून कार्यरत. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना अध्यापन शास्त्रातील बी. टी. (मुंबई) व टी. डी. (लंडन) या पदव्या सन्मानपूर्वक मिळाल्या. पुढे त्यांनी नवशिक्षणासंबंधी प्रसारमाध्यमांमध्ये विविधांगी लेखन करून नावलौकिक मिळविला. 'गीतगंगा' (१९३५) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. तर 'झेंडूची फुले' हा विडंबनात्मक काव्यसंग्रह १९२५ साली प्रसिद्ध. 'चांगुणा', 'मोहित्यांचा शाप' अशा काही कादंबऱ्या प्रसिद्ध. नाटककार म्हणून त्यांचे स्थान विचारात घेण्यासारखे आहे. 'साष्टांग नमस्कार', 'तो मी नव्हेच', 'मोरूची मावशी' 'बुवा तिथे बाया', 'मी मंत्री झालो', 'डॉक्टर लागू', 'ब्रह्मचारी' इत्यादी नाटके रंगभूमीवर गाजली. 'धर्मवीर', 'प्रेमवीर', 'ब्रह्मचारी', 'ब्रँडीची बाटली', 'अर्धांगिनी' या चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिल्या. 'श्यामची आई' व 'महात्मा फुले' हे दोन चित्रपट काढले. श्यामची आई या चित्रपटाला १९५५ साली पहिले राष्ट्रपती पदक प्राप्त. या बरोबर वृत्तपत्रातून अनेक ज्वलंत विषयावर लेखन केले आहे. त्यांचे 'कऱ्हेचे पाणी', 'मी कसा झालो', 'मी अत्रे बोलतोय' ही आत्मचरित्रात्मक पुस्तके त्यांच्या संपूर्ण जीवनावर प्रकाश टाकतात. 'विनोदगाथा', 'हास्यकट्टा' हे विनोदी संग्रह प्रसिद्ध. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून अत्रे सर्व महाराष्ट्राला परिचित आहेत.

**अण्णाभाऊ साठे** (१ ऑगस्ट, १९२० ते १८ जुलै, १९६९)

लोकशाहीर म्हणून अण्णाभाऊ साठे प्रसिद्ध आहेत. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम भाऊराव साठे. जन्म वाटेगाव (तालुका वाळवा, जिल्हा सांगली). लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार म्हणून त्यांची ख्याती आहे. सन १९३२ रोजी ते वडिलांसोबत मुंबईला आले. पडेल ते काम करताना कामगार जीवनाचा अनुभव तेथे आला. मुंबईत कामगारांचे होणारे संप, हरताळ यांचा प्रभाव त्यांच्यावर झाल्यामुळे त्यांनी कम्युनिस्ट पार्टीत प्रवेश केला. दरम्यान १९३७ ला युद्धाचे वर्णन करणारा स्तालिनग्राडचा पोवाडा लिहिला. १९३८ ला स्पेन चा पोवाडा त्यानंतर १२ पोवाड्यांची रचना केली. समकालीन समाजजीवनाच्या

अनुषंगाने त्यांचे हे पोवाडे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचे आहेत. १९४२ च्या चले जाव आंदोलनात सक्रिय सहभाग. लालबावटा कलापथकाची स्थापना करून प्रबोधनपर विचारप्रर्वतनासाठी 'पेंग्याचं लग्न', 'मिरवणूक', 'अकलेची गोष्ट', 'माझी मुंबई' इत्यादी लोकनाट्ये लिहिली. तसेच 'चित्रा', 'फकिरा', 'वारणेचा वाघ', 'गुलाब', 'चंदन', 'माकडीचा माळ', 'रानगंगा', 'वैजयंता' इत्यादी अशा जवळपास ३७ कादंबऱ्या प्रसिद्ध. 'फकिरा' या कादंबरीला राज्य सरकारचा उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार प्राप्त. यावर 'फकिरा' नावाचा मराठी चित्रपट निघाला. ह्याशिवाय 'बरबाद्या कंजारी' (१९६०), 'चिरानगरची भुतं' (१९७८), 'निखारा', 'फरारी', 'कृष्णाकाठच्या कथा' इत्यादी १३ कथासंग्रह प्रसिद्ध. 'इनामदार' हे नाटक १९५८ मध्ये लिहिले. 'माझा रशियाचा प्रवास' हे त्यांचे प्रवासवर्णन प्रसिद्ध आहे.

**विभावरी शिरूरकर** (०१ ऑक्टोबर, १९०५ ते ६ मे, २००१)

विभावरी शिरूरकर यांचे नाव मालती विश्राम बेडेकर. बाळुताई या टोपण नावाने त्यांनी लेखन केले आहे. त्यांना मराठीतील आद्य स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखले जाते. स्त्रियांच्या दुःखांना वाछा फोडण्याचे मोठे काम त्यांनी आपल्या लेखनातून केले आहे. सुरुवातीला पुण्यात शिक्षिका म्हणून नोकरी, नंतर सोलापूरच्या बॅकवर्ड क्लास ऑफिसात रिमांड होम व रेक्स्यू होम स्त्री विभागातून पर्यवेक्षिकाचे काम केले. यावेळी अनाथ, विधवा, परित्यक्तांच्या समस्या जवळून पाहिल्या. यातून त्यांच्या दुःखाल वाछा फोडण्यासाठी लेखन केले. 'कळ्यांचे निश्वास' हा पहिला कथासंग्रह १९३३ ला प्रकाशित झाला. १९३४ मध्ये 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी प्रसिद्ध. या साहित्यकृतीने समाजात खळबळ निर्माण केली. पुढे 'विरलेले स्वप्न' (१९३५), 'जाई' (१९५२), 'शबरी' (१९६२), 'उमा' (१९६६) या कादंबऱ्या लिहिल्या. १९५० मध्ये गुन्हेगार ठरवलेल्या जाती-जमातीचे चित्रण करणारी 'बळी' कादंबरी प्रकाशित झाली. ती खूपच लोकप्रिय ठरली. 'पारध' नावाचे नाटक १९४७ साली प्रसिद्ध. याबरोबर 'घराला मुकलेल्या

स्त्रिया', 'काळाची चाहूल' 'मनस्विनीचे चिंतन' हे वैचारिक लेखन प्रसिद्ध आहे. त्यांच्या लेखणात स्त्री प्रश्नाविषयी आस्था आणि  मार्ग या विषयीचे विवेचन येते. त्यांच्या 'बळी', 'शबरी' आणि 'घराला मुकलेल्या स्त्रिया' या पुस्तकांना राज्यशासनाचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांची गुजराथी भाषेत भाषांतरे झाली आहेत. १९८१ साली मुंबई येथे संपन्न झालेल्या पहिल्या समांतर साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते.

**हमीद दलवाई** (२९ सप्टेंबर, १९३२ ते ३ मे, १९७७)

हमीद उमर दलवाई यांचे माध्यमिक शिक्षण चिपळूणमध्ये व नंतरचे शिक्षण रूपारेल व इस्माईल युसफ या मुंबईतील महाविद्यालयात झाले. परखड भूमिका घेणारे कृतीशिल विचारवंत. धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही ही दोन मूल्ये  दलवाईंच्या विचारांच्या केंद्रस्थानी होती; याचे प्रत्यंतर त्यांच्या लेखनात पहावयास मिळते. सुरुवातीस राष्ट्रसेवा दलाकडे त्यांचा ओढा होता. नंतर १९७० मध्ये मुस्लीम सत्यशोधक समाजाची स्थापना करून समाजातील अनिष्ट प्रथांविषयी चळवळ सुरू केली.

कथा, कादंबरी आणि वैचारिक या प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. त्यांचा 'लाट' (१९६१), 'जमीला जावद'(१९६६) हे कथासंग्रह व 'इंधन' (१९६५) ही कादंबरी प्रसिद्ध आहे. इंधन कादंबरीच्या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर काळातील बदलते वास्तव व हिंदू मुस्लीम समाजाचे चित्रण अंतर्मुख करायला लावणारे आहे. 'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप, कारणे आणि उपाय' (१९७८) 'इस्लामचे भारतीय चित्र' (१९८२), 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' ही वैचारिक पुस्तके. हमीद दलवाईंना जानेवारी, २०१७ सालचा अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनचा मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. 'हमीद : द अनसंग ह्युमॅनिस्ट' हा हमीद दलवाई यांच्या विविध पैलूवर प्रकाश टाकणारा लघुपट आहे.

**व. वा. बोधे** (१ जून, १९४५)

व. वा. बोधे यांचा जन्म अंकलखोप जिल्हा सांगली येथे. मराठी विषयाचे प्राध्यापक. कादंबरीकार व ललित लेखक म्हणून प्रसिद्ध. बालवाङ्मय समीक्षात्मक लेखन, नाटक, चरित्रे, शब्दचित्रे, विनोदी लेखन व प्रवास वर्णन असे विविध वाङ्मयप्रकाराचे लेखन त्यांनी केले आहे. 'फिस्ट', 'तकाटा', 'जत्रा', 'भटजीची मेक', 'तिगाड' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'पाननिवळी', 'भैरोबाची लेकरं', 'जंगल', 'वाघीण', 'बारा गावचं पाणी', 'सामना', 'विलायती मखमल', 'रान चिमणी', 'हिरवं सोनं' इत्यादी अशा जवळजवळ ७७ कादंबऱ्यांचे लेखन. ललित गद्य लेखनात यांनी 'चंदनबटवा', 'वैखरीचा वारकरी', 'फुल चुखी', 'कंदिलाचे दिवस', 'कृष्णविवर', 'चैतन्यपंचक' इत्यादी १२ ग्रंथ प्रसिद्ध. या विपुल लेखनाबरोबर त्यांनी 'कोकर उड्या', 'रानपालवी' ही दोन आत्मकथने लिहिली आहेत. विपुल लेखन करणाऱ्या या लेखकास अनेक मानसन्मान व ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले आहे. आचार्य अत्रे (१९९९), 'चंदनबटवा' या ललित गद्य लेखनास कोल्हापूरचा शाहू पुरस्कार, 'फुल चुखी' व 'कंदिलाचे दिवस' या दोन ललित कृतींना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत.

**उत्तम कांबळे** (३१ मे, १९५६)

उत्तम कांबळे यांचा जन्म टाकळवाडी, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. मूळ गाव बेळगावमध्ये शिरगुप्पी. राज्यशास्त्र विषयात एम. ए. पदवी संपादन, पत्रकारिता व साहित्यनिर्मिती या क्षेत्रात विशेष कार्य. १९८२ मध्ये दैनिक सकाळ वृत्तपत्र समूहात रुजू. २००९ पासून मुख्य संपादक. कथा, कविता, कादंबरी, समीक्षा, संपादन, संशोधन व संकीर्ण लेखन प्रकारात विपुल लेखन. देवदासी प्रथा व अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात मोलाचे योगदान. 'अस्वस्थ नायक' (२०००), 'बुद्धाचा रहाट', 'श्राद्ध' (१९८६) इ. कादंबऱ्या. तर 'कथा माणसांच्या' (२००१) 'कावळे आणि माणसं' (१९९८), 'न दिसणारी लढाई' (२००८) हे कथासंग्रह

आणि ‘अखंड घालमेल’, ‘उजेड अंधाराचा’, ‘आभाळ’, ‘कुंभमेळ्यातील भैरू’ (२००८) इ. ललित संग्रह. ‘जागतिकीकरणात माझी कविता’ (२००६), ‘नाशिक तू एक सुंदर कविता’ (२००८), ‘पाचव्या बोटावर सत्य’ इत्यादी काव्यसंग्रह. ‘आई समजून घेताना’, ‘एका स्वागताध्यक्षाची डायरी’, ‘वाट’ ही आत्मकथने. त्याचबरोबर ‘अनिष्ट प्रथा’, ‘कुंभमेळा साधूंचा की संधिसाधूंचा’, ‘वामनदादाच्या गीतातील भीम दर्शन’, ‘कुसुमाग्रज, सुर्वे आणि बागूल’, ‘कुंभमेळ्यातील भैरू’ इत्यादी संशोधन ग्रंथ. ‘गजाआडच्या कविता’ (२००२), ‘झोत–सामाजिक न्यायावर’ (२००६), ‘जागतिकीकरणातील मराठी कविता’ (२०१०), इत्यादी संपादने असे विविधांगी स्वरूपाचे लेखन केले आहे. ‘अनिष्ट प्रथा’, ‘श्राद्ध’, ‘प्रथा अशी न्यारी’ या कलाकृतींना महाराष्ट्र शासनाचे राज्य साहित्य पुरस्कार मिळाले आहेत. सांगली येथे दिनांक १८ ते २० जानेवारी, २००८ रोजी झालेल्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. तर २५ ते २७ डिसेंबर २०१० रोजी भरलेल्या ठाणे, मुंबई येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

**अरुण खोपकर** (५ नोव्हेंबर, १९४५)

मुंबई येथे वास्तव्य. लेखक, चित्रपट निर्माते व चित्रपट दिग्दर्शक म्हणून मान्यता. बहुभाषिक व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख. चित्रपट हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरदर्शन संस्थेत चित्रपट दिग्दर्शनाचे शिक्षण घेतले. नाटकातही भूमिका केल्या. बालमोहन नाट्य संस्थेतील ओळखी, अभिनयाचा अनुभव व एकूण वातावरणाचा परिणाम म्हणून साहित्यलेखनाकडे वळले. चित्रपट व कलाक्षेत्राशी निगडित मौलिक ग्रंथलेखन. ‘कथा दोन गणपतरावांची’ (पटकथा), ‘गुरुदत्त’(तीन अंकी शोकांतिका) दृक–श्राव्य जाण उलगडून दाखविणाऱ्या या ग्रंथास राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त. ‘चित्रव्यूह’ आणि ‘चलत्–चित्रव्यूह’ या दोन पुस्तकांतून चित्रपट आणि कला क्षेत्रातील त्यांचा प्रवास, त्या त्या क्षेत्रातील अभिजात कलावंत यांची व्यक्तिचित्रं आणि अनुभवचित्रं साकारली

आहेत. यातील 'चलत्-चित्रव्यूह' हा साहित्य अकादमी, नवी दिल्ली पुरस्कारप्राप्त ग्रंथ. याबरोबर 'चित्रव्यूह', 'चित्रभास्कर भास्कर चंदावरकर'(संपादन) इ. या लेखनाबरोबर त्यांनी अनेक लघुपट निर्माण केले आहेत. 'नारायण गंगाराम सुर्वे' हा नारायण सुर्वे यांच्या जीवनचरित्रावर प्रकाशझोत टाकणारा लघुपट निर्माण केला आहे.

**इंद्रजित भालेराव** (५ फेब्रुवारी, १९६२)

जन्म रिधोरा, जिल्हा हिंगोली. प्रसिद्ध ग्रामीण कवी किंबहुना कृषिसंस्कृतीचा लोककवी म्हणून ओळख. गावच्या अस्सल मातीशी नातं सांगणाऱ्या, शेतकऱ्याच्या काबाडकष्टांना आपल्या कवितेतून उद्गार दिला आहे. कृषिजन्य संस्कृतीतील सूक्ष्म बारकावे टिपणारे त्यांचे लेखन आहे. कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन, समीक्षा, संपादन इ. साहित्य प्रकारात त्यांनी साहित्यनिर्मिती केली आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती व लोककलेचे सूक्ष्म ज्ञान. 'पीकपाणी' (१९८९), 'आम्ही काबाडाचे धनी' (१९९२), 'दूर राहिला गाव' (१९९४) इत्यादी काव्यसंग्रह तर 'गाई घरा आल्या'(१९९७), 'लळा' (२०००), 'नाद' (२०११) इ. ललित लेखसंग्रह. ह्याशिवाय 'समग्र बी रघुनाथ' (१९९५), 'भिंगुळवाणा' (१९९६), 'गाऊ जिजाऊस आम्ही' (२०१३) इत्यादी लेखन प्रसिद्ध. महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती मंडळाचा 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार' (१९९१), महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार. सर्जनशील साहित्यनिर्मितीसाठी एक लाख रूपयांचा लाभसेटवार पुरस्कार प्राप्त. फेब्रुवारी २०१९ मध्ये अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

**दि. बा. पाटील** (२४ नोव्हेंबर, १९५४)

सध्या वास्तव्य कामेरी, जिल्हा सांगली. समाजशास्त्र व राज्यशास्त्र विषयात एम. ए. करून ग्रंथालय शास्त्राची पदवी घेऊन आनंदराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर येथे ग्रंथपाल म्हणून सेवानिवृत्त. कथा, कादंबरी, ललित अशा प्रकारात गद्यलेखन. ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान. 'वादळ', 'वेदना', 'रक्तबंध,

‘मंतरलेली मने’, ‘होकार’, ‘प्रतिस्पर्धी’, ‘डियर मॅडम’, ‘सावलीचं घर उन्हात’ इत्यादी कादंबऱ्या; तर ‘विसावा’, ‘हिरवा चुडा’, ‘वाड्या’ इत्यादी कथासंग्रह. तसेच ‘भली माणसं’ हा व्यक्तिचित्रण संग्रह. अशा विविधांगी स्वरूपाची साहित्य निर्मिती. त्यांच्या या वाङ्मय निर्मितीबद्दल महाराष्ट्र शासनाचा २००४ चा ‘हिरवा चुडा’ या कथासंग्रहास उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा बी. रघुनाथ पुरस्कार प्राप्त. १९१७ साली कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली येथे झालेल्या ‘चारुतासागर प्रतिष्ठान’ साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

**सयाजीराजे मोकाशी** (१ जून, १९६१)

सयाजीराजे मोकाशी यांचा जन्म शेटफळ तालुका आटपाडी जिल्हा सांगली येथे. शिक्षण व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ग्रामीण भागात झाल्यामुळे शेतीव्यवसाय व कृषिसंस्कृतीबद्दल त्यांना नितांत प्रेम. सध्या ते कला, वाणिज्य महाविद्यालय मायणी, जिल्हा सातारा येथे प्राचार्य म्हणून कार्यरत. त्यांनी कथा, कविता, संपादने, समीक्षा, संशोधने या साहित्य प्रकारात लेखन केले आहे. ‘सूर्याची शिकार’ (बालकवितासंग्रह १९८४), ‘व्यावहारिक मराठी’ (सहकार्याने २००२), ‘मराठीतील लेखन शुद्धी’ (२००९) सोपे मराठी व्याकरण लेखन (२०१२), ‘अक्षर नोंदी’ (समीक्षाग्रंथ २०१४), ‘शब्द जागर’ (समीक्षाग्रंथ २०१७) ‘पंधरा ऑगस्ट’ (कथासंग्रह २०१६) त्याचबरोबर ‘माणदेशी कथा’ (१९८९), ‘आधुनिक मराठी कविता’ (२००२) ‘माणगौरव, माणवैभव, (दिवाळीअंक), क्रांतिभूमी, ध्यासपर्व, ग्रामीण साहित्याचा इतिहास, ग्रामीण साहित्य आणि स्त्रीवाद व महाराष्ट्रातील लोकचळवळी इत्यादी पुस्तकांची संपादने; तसेच नाट्याचार्य श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि नाट्याचार्य कृ. प्र. खाडीलकर यांच्या नाटकांचा तुलनात्मक अभ्यास-१९९३, ‘माणदेशाची बोलीचा अभ्यास’ (२००७) इ. संशोधने. त्यांच्या या वाङ्मयीन कामगिरीबद्दल विविध पुरस्कार प्राप्त.

**डॉ. व्ही. एन. शिंदे** (१ जानेवारी, १९६९)

डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे जन्मगाव चिंचोली, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर. प्राथमिक शिक्षण चिंचोली. माध्यमिक शिक्षण पांगरी व बार्शी येथे. पदवी शिक्षण दयानंद कॉलेज सोलापूर येथे. शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्र विषयात एम्. एस्सी. आणि पीएच्. डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर भौतिकशास्त्र विषयाचे पाच वर्षे अध्यापन. सध्या ते शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव म्हणून कार्यरत. यापूर्वी स्वा. रा. ती. म. विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून काम पाहिले. एक वृक्ष प्रेमी नागरिक म्हणून त्यांची ओळख. त्यांनी आपल्या सेवेच्या ठिकाणी हजारो वृक्षांची लागवड केली आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे शिवाजी विद्यापीठाचा परिसर हिरवागार व पाणीदार झालेला आहे. मराठी विज्ञान साहित्य परंपरेत त्यांनी आपले स्वयंपूर्ण स्थान निर्माण केले आहे. या लेखनात विज्ञानातील वस्तुनिष्ठता मांडण्याबरोबर त्या अनुषंगाने मानवी भावभावनांची चित्रेही रेखाटलेली आढळतात. ‘एककांचे मानकरी’ (२०१५), ‘असे घडले भारतीय शास्त्रज्ञ’ (२०१८), ‘हिरव्या बोटांचे किमयागार’ (२०१८), ‘आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया’ (२०१९) इत्यादी विज्ञान विषयक ग्रंथ. ‘आवर्त सारणी व मुलद्रव्यांची दुनिया’ या ग्रंथास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा महात्मा जोतीराव फुले पुरस्कार प्राप्त. त्यांच्या विज्ञान साहित्यास दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा कृ. गो. सुर्यवंशी पुरस्कार, मिरजेच्या चैतन्य शब्दांगण संस्थेचा पुरस्कार इ. मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी मराठी विश्वकोशात नोंदीचे लेखन केले आहे.

याबरोबरच विविध दैनिक, वृत्तपत्रे, पुरवण्या, साप्ताहिके, नियतकालिके यामधून विज्ञान, शेती, पर्यावरण, पाणी, शिक्षण व स्पर्धा परीक्षा विषयक शेकडो लेख प्रकाशित. वैज्ञानिक ललितलेखन ह्या नव्या वाङ्मय प्रकारांतर्गत त्यांचे विविधांगी लेखन drvnshinde.blogspot.com या ब्लॉगवर प्रकाशित आहे.

❑❑❑

ISBN : 978-93-85190-19-3

मूल्य : रु. ८५/-

